# १

# माओच्या नियंत्रणाखालील चीनी प्रजासत्ताकाचे अंतर्गत धोरण

**घटक रचना:**

१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ माओची पार्श्वभूमी

१.३ हुनान अहवाल

१.४ लाल सेना

१.५ कम्युनिस्टांच्या विरोधात मोहिमा

१.६ यादवी युद्ध

१.७ पीपल्स रिपब्लिक ऑफ चायना

१.८ चीनच्या प्रगतीतील माओचे योगदान

१.९ कृषी क्षेत्राची पुनर्रचना

१.१० उद्योगाची पुनर्रचना

१.११ कृषी उत्पादक सहकारी संघ

१.१२ पंचवार्षिक योजना

१.१३ शंभर फुले फुलू द्या

१.१४ हनुमान उडी

१.१५ कम्युनचे स्थापना

१.१६ कम्युन अपयश

१.१७ सांस्कृतिक क्रांतीची घोषणा

१.१८ समारोप

१.१९ प्रश्न

१.२० संदर्भ

munotes.in

## १.० उद्दिष्टे

१) माओची पार्श्वभूमी  समजावून घेणे.

२) माओचे साम्यवादी विचारांचा अभ्यास करणे.

३) साम्यवादी आणि राष्ट्रीय सरकारमधील संघर्ष अभ्यासणे.

४) प्रजासत्ताक अंतर्गत धोरणाचा आढावा घेऊन माओच्या कार्यक्रमांचे परीक्षण करणे.

## १.१ प्रस्तावना

एकोणिसाव्या शतकात चीनमधील राजकीय, सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीच्या माध्यमातून १९११ साली राज्यक्रांती झाली होती. त्यानंतर चिआंग-कै-शेक याने चीनचे नेतृत्व केले. चीनच्या राष्ट्रीय सरकारने चीनची प्रगती करण्याचा प्रयत्न केला चिआंग-कै-शेक याने साम्यवादी विचारांचा विरोध केला राष्ट्रीय सरकार आणि साम्यवादी यांच्यात यादवी युद्ध होऊन १९४९ साली माओच्या नेतृत्वाखाली लोक प्रजासत्ताक निर्माण झाले लोक प्रजासत्ताक सरकारने अनेक योजना राबवून चीनला जागतिक राजकारणात जगातील महत्वाच्या देशाचा दर्जा मिळवून दिला त्याचा आढावा घेतला जाणार आहे

## १.२ माओची पार्श्वभूमी

चीन ही आशिया खंडातील एक महासत्ता आहे. डॉ. सेन यांनी चीनमध्ये १९११साली राज्यक्रांती करून प्रजासत्ताकाची स्थापना केली. डॉ. सेन  यांच्यानंतर चिआंग-कै-शेक याने चीनचे नेतृत्व केले १९४९ला माओ-त्से-तुंगने घडवून आलेल्या क्रांतीने आशियात वेगळी सत्ता उभी राहिली. चिनी साम्यवादी क्रांतीचा जनक माओ-त्से-तुंगचा जन्म शाओशान या गावी २६ डिसेंबर १८९३ रोजी एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. माओचे कुटुंब सनातनी परंपरावादी व कन्फ्युशन विचारसरणीचा प्रभाव असलेले होते. माओने वयाच्या तेराव्या वर्षी आपले शिक्षण बंद केले, परंतु १६व्या वर्षी त्याच या गावातील पाश्चिमात्य शिक्षण देणाऱ्या शाळेत प्रवेश घेतला १९११मध्ये माओ हुनान प्रांताची राजधानी असणाऱ्या चांगल्या शहरात उच्च शिक्षणासाठी आला. याच काळात चीनमध्ये क्रांतीचे वारे वाहू लागलेले होते. डॉ. सेन च्या नेतृत्वाने संपूर्ण चीनमध्ये राष्ट्रवादाचे विचार जागृत झालेले होते. संघटनेचे वृत्तपत्र “मीन पाओ” वाचल्यानंतर माओच्या मनात देखील तुंग-मेंग-हुई संघटनेचे राष्ट्रवादाचे विचार जागृत झाले. चीनमध्ये प्रजासत्ताक निर्माण होऊन त्याचे अध्यक्षपद देखील डॉ. सेन यांना मिळावे या विषयावर त्याने निबंध लिहून प्रकाशित केला. १९११ मध्ये क्रांतीकारकांनी चांग्ला येथे आपले सरकार स्थापन केले. त्याचवेळी क्रांतिसेनेची देखील उभारणी करण्यात आली. माओने या क्रांतीसेनेत प्रवेश केला १९१२ मध्ये मांचू सत्ता नष्ट होऊन प्रजासत्ताक स्थापना करण्याचे प्रयत्न सुरू झाले. प्रजासत्ताक क्रांतीनंतर माओ क्रांती सेनेतून बाहेर पडला. यानंतर हुनान येथील नॉर्मल स्कूलमध्ये प्रवेश घेतला. या शाळेतील त्याचे या

प्राध्यापकाचा त्याच्या जीवनावर विलक्षण प्रभाव पडला माओ-त्से-तुंग ने तीनस मिन या नावाने तरुणांसाठी एक अभ्यास केंद्र सुरू केले

चीनमध्ये विद्वान आणि विचारवंतांच्या विचारामुळे पेकिंग विद्यापीठातील विद्यार्थी जागृत झाले पॅरिस शांतता परिषदेतील निर्णयाविरुद्ध दिनांक ४मे १९१९रोजी चीनमध्ये चळवळ सुरू झाली. पहिल्या महायुद्धानंतर घेण्यात आलेल्या पॅरीस शांतता परिषदेने शांटूंग प्रांतातील जर्मनीचे अधिकार जपानला दिल्याबद्दल चळवळ सुरू झाली. या चळवळीतील विचारवंत लि-ता-चाऊ आणि लिन-से-सू याच्या संपर्कात आला. हुनानच्या विद्यार्थ्यांची एक संघटना उभारली. संघटनेने ४ जून १९१९ रोजी मोठा संप पुकारला. हा संप यशस्वी झाल्याने माओला प्रसिद्धी मिळाली. माओने या संघटनेचे सियांग रिवर रिव्ह्यू हे पाक्षिक सुरू केले व लोकशाही विचाराचा प्रसार सुरू केला हुनानच्या राज्यपालाने या पाक्षिकावर बंदी घातली. माओने लगेच नवे साप्ताहिक सुरू केले. या कृत्यामुळे राज्यपालाने माओ-त्से-तुंग ला अटक करायचे ठरवले. म्हणून माओ-त्से-तुंग जानेवारी १९२० मध्ये पेकिंगला पळून गेला पेकिंगला आल्यावर तो मार्क्सवादी अभ्यास मंडळाचा सदस्य बनला. मार्क्सच्या ग्रंथाचे त्याने वाचन केले. या काळात तो पक्का मार्क्सवादी बनला १९२० नंतर माओ-त्से-तुंगने द कम्युनिस्ट मॅन्युफेस्टचे व समाजवादाच्या इतिहासाचे वाचन केले तेव्हापासून मार्क्सवादावर त्याची पक्की श्रद्धा बसली. माओने लि-ता-चाऊ यांच्याबरोबर साम्यवादाबद्दल प्रदीर्घ चर्चा केली.

चांग्ला येथे एका प्राथमिक शाळेचे संचालक त्याला मिळाले. तेथे त्यांनी समाजवादी युवक संघाची स्थापना केली तसेच कल्चरल बुक सोसायटी हे ग्रंथालय स्थापन केले. १९२१ मध्ये गुप्तपणे साम्यवादी पक्षाची स्थापना केली. साम्यवादाच्या प्रसारासाठी मार्क्स व लेनिनवादाला चिनी स्वरूप देण्याचे कार्य केले. कामगार संघटना निर्माण करण्यासाठी मेहनत घेतली. पश्चिम चीनमध्ये लि-ता-चाऊच्या सहकार्याने कोळसा व खाण कामगारांना संघटित केले. रेल्वे कामगार व कोळसा खाण कामगारांचे संप घडून आले. या संपामुळे नोव्हेंबर १९२२ मध्ये २० कामगार संघटनांनी मिळून एकच संयुक्त कामगार संघटना स्थापन केली. माओ-त्से-तुंग हा हुनान कम्युनिस्टचा प्रमुख असताना त्याने शेतकऱ्यांना संघटित करून मोठी चळवळ उभारली कम्युनिस्टांचा मोठा गट उभारला या प्रांतातील ग्रामीण भागात पदयात्रा केली. ३२ दिवसात पाच जिल्हे पायाखाली तुडवले. त्याने शेतकऱ्यांचे जीवन जवळून अनुभवले. शेतकऱ्यांचे मते जाणून घेतली या सर्व गोष्टीच्या आधारावर त्याने एक हुनान अहवाल तयार केला.

## १.३ हुनान अहवाल

माओ-त्से-तुंग याचा अहवाल २० मार्च १९२७ रोजी गाईड साप्ताहिकात हुनान अहवाल म्हणून प्रसिद्ध झाला. हुनान अहवालामध्ये चीनमध्ये नवीन जाणीव निर्माण होत असल्याने शेतकरी जागा होऊ लागला. हि प्रक्रिया गतिमान झाल्यास साऱ्या चीनमधून लाखो शेतकरी क्रांतीच्या प्रेरणेने पेटून उठतील. प्रचंड प्रलय होईल, या प्रलयात प्रतिक्रियावादी शक्ती नष्ट होतील आणि या देशातील शेतकरी मुक्त होईल. या क्रांतीमुळे ग्रामीण जीवनाच्या क्रांतीत जुन्या रूढी, परंपरा व अंधश्रद्धा दूर करण्याचा प्रयत्न केला.

माओच्या विचारावर कट्टर साम्यवादी विचारवंतांनी टीका केली. कारण मार्क्सवादानुसार साम्यवादी क्रांती केवळ कामगार करतात अशी त्यांची धारणा होती. शेतकरी स्वतंत्रपणे क्रांती करू शकत नाहीत असे त्यांनी विचार मांडले या विचारांना माओने बदलण्याचा प्रयत्न केला. हुनान अहवालात सामाजिक, साम्यवादी क्रांतीचा भर शेतकरी क्रांतीवर दिला. कामगारांना दुय्यम स्थान दिले.

## १.४ लाल सेना

माओच्या नेतृत्वाखालील कम्युनिस्ट पक्षाची व कोमिंगटाँग पक्षाशी युती होती, पण डॉ. सेन यांच्या मृत्यूनंतर या दोघांमध्ये मतभेद निर्माण झाले. माओने शेतकरी संघटनांच्या माध्यमातून त्यांना लष्करी प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली. प्रशिक्षण घेतलेल्या शेतकऱ्यांच्या नवीन संघटना तयार करण्यात आल्या. त्याला लाल सेना म्हणून ओळखले जाऊ लागले.

लाल सेनेमध्ये सर्वसामान्य लोकांचे नम्रतेने वागणे, त्यांना मदत करणे, सर्वांचे प्रामाणिकपणे आचरण करणे, दुसऱ्याची वस्तू खराब झाल्यास नवीन वस्तू आणून देणे, कोणती वस्तू मोफत न घेणे, शेतकऱ्यांना चांगली वागणूक देणे व साम्यवादी विचारांचा प्रसार करणे याबरोबरच शत्रूशी लढतांना साम्यवादी क्रांतीसाठी पैसे उभारणे, ही कर्तव्य सैनिकाला पार पडावी लागत. माओच्या नेतृत्वाखाली लाल सेनेने संपूर्ण चीनमध्ये आपले वर्चस्व निर्माण केले. माओनच्या शेतकऱ्यांची लालसेना उभारून प्रजासत्ताकाच्या विरोधात संघर्ष केला. चीनमधील यादवी युद्धानंतर सोव्हिएट सरकार टिकून ठेवण्याचे कार्य लालसेनेच्या मदतीने केले. चिआंग-कै-शेकने साम्यवाद्याविरुद्ध कारवाई करून पाश्चात्यांची त्याने सहानभूती मिळवली.

चीनमध्ये चिआंग-कै-शेक ने साम्यवाद्यांच्या विरुद्ध घेतलेल्या भूमिकेमुळे व आक्रमक कृतीमुळे रशियात बरेच वादळ उठले. चीनमधील साम्यवादी चळवळ संकटात आली होती. अशा वेळेला चीनच्या परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी पक्षामधील मतभेद मिटवण्यासाठी स्टॅलिन यांनी डॉ. एन.एम. रॉय यांना चीनमध्ये पाठवले. डॉक्टर मानवेंद्र रॉय हे भारतीय क्रांतिकारक साम्यवादी विचारवंत म्हणून साम्यवादी चळवळीमध्ये प्रसिद्ध होते. त्यांनी शेतीप्रधान राष्ट्रातही साम्यवादी क्रांती जमीनदाराच्या विरोधात होऊ शकते, असा विचार मांडला होता. १९२८ मध्ये चिनी साम्यवादी पक्षाचे सहावे अधिवेशन मास्को येथे भरले होते; त्याचे नेतृत्व स्टॅलीनने केले. त्यावेळेला चिनी कम्युनिस्ट पक्षाने अधिक आक्रमक होण्याचे ठरवले होते. गनीमी काव्याने युद्ध करावे, हे युद्ध शेतकऱ्यांनी करावे, परंतु क्रांतीचे नेतृत्व कामगारांकडे असावे असे ठरवण्यात आले. परंतु कामगारांचा प्रतिसाद नसल्याने कामगार क्रांतीचा प्रयत्न फसला. याच वेळेला माओने ग्रामीण भागात शेतकऱ्यांसाठी प्रचंड कार्य करून चांगले यश मिळवले. शेतकऱ्यांचे लाल सैन्य साम्यवादी क्रांतीच्या नेतृत्वासाठी वापरले १९२७ मध्ये कोमिंगटाँग व कम्युनिस्ट यांच्यातील युती समाप्त झाली. चिआंग-कै-शेक ने चीनमधील कम्युनिस्टांना दडपण्यासाठी प्रचंड लष्कर उभारून कम्युनिस्टांच्या विरोधात मोहिमा सुरू केल्या.

## १.५ कम्युनिस्टांच्या विरोधात मोहिमा

डिसेंबर १९३० ते जानेवारी १९३१च्या दरम्यान चिआंग-कै-शेक ने पहिली मोहीम सुरू केली. एक लाख सैन्यासह की यांगसी प्रांतावर हल्ला चढवला. पण त्याआधी कम्युनिस्टांच्या ताकतीची व संख्येची माहिती मिळाली नसल्याने त्याचा तोटा झाला, कम्युनिस्टांनी भौगोलिक स्थितीचा फायदा घेऊन गनिमी काव्याने युद्ध त्यांना ८००० बंदुका, दारूगोळा, औषधे व इतर साहित्य मिळाले. १००० युद्धकैदी पकडण्यात आले. फेब्रुवारी १९३१ मध्ये दुसरी लष्करी मोहीम काढली, त्याच्याबरोबर दोन लाख सैन्य प्रचंड तोफखाना आणि शंभर विमाने दिली त्यावेळेला कम्युनिस्टांकडे फक्त तीस हजार फौज होती. यावेळी कॉमिंगटाँचा मोठा विजय झाला. तिसऱ्या मोहिमेचे नेतृत्व चिआंग-कै-शेक ने स्वतःकडे घेतले. याच वेळेला १८ सप्टेंबर १९३१ रोजी जपानने मांचूरियावर आक्रमण केल्याने चिआंग-कै-शेकने ही मोहीम सोडून दिली. ऑक्टोबर १९३३ ते ऑक्टोबर १९३४ या काळात सात लाख सैन्यानिशी राबवलेली पाचवी मोहीम भयंकर होती. कम्युनिस्टांवर चारही बाजूने हल्ला करण्याचा निर्णय घेतला कम्युनिस्टांचे प्रदेश बेचिराख करण्यात आले. या प्रदेशातून मिळणारे अन्नधान्य बंद झाले. एक लाख कम्युनिस्टांची हत्या करण्यात आली. पाचव्या मोहिमेमध्ये जबरदस्त हानी झाल्यामुळे कम्युनिस्टनी यांगत्सी प्रांत सोडण्याचा निर्णय घेतला. त्यालाच लाँग मार्च किंवा प्रदीर्घ मोर्चा असे म्हटले जाते. जवळजवळ एक लाख सैन्य १६ ऑक्टोबर १९३४ रोजी यांगसी प्रांतातून बाहेर पडले. संपूर्ण प्रवास जवळजवळ एक वर्षभर सुरू होता. प्रवासात अनेक प्रकारच्या नैसर्गिक आपत्तींना आणि हल्ल्यांना तोंड द्यावे लागले प्रवासाच्या काळात दुष्काळ रोगाच्या साथी, तसेच अतिश्रम यामुळे हजारो लोक मृत्युमुखी पडले.

श्रीमंतांकडून अन्नधान्य, जमीनदारांकडून जमिनी काढून घेऊन त्यांचे जनतेस समान वाटप करून टाकले. या प्रदीर्घ मोर्चाचे अनेक दूरगामी परिणाम झाले. झालेल्या लढायांमध्ये कम्युनिस्टच्या ताब्यात ११ प्रांत आले व क्रांतीचा प्रसार वीस कोटी लोकांपर्यंत जाऊन पोहोचण्यामध्ये यश मिळाले. अनेक अडचणींमधून बाहेर पडलेल्या कम्युनिस्टांनी नंतर चीनचे नेतृत्व करण्याचा प्रयत्न केला. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जपानने चीनवर आक्रमण केले. चीनवरील आक्रमण थोपण्यासाठी कम्युनिस्ट आणि राष्ट्रवादी पक्षाच्या लोकांनी एकत्रित येऊन संघर्ष करण्याचा प्रयत्न केला त्यांना युरोपियन राष्ट्रांनी आणि अमेरिकेने आर्थिक व लष्करी मदत केली, परंतु चिआंग-कै-शेक ने जपान विरुद्ध न लढता कम्युनिस्ट पक्षाचा पाडाव करण्याचे धोरण स्वीकारले. या काळात कम्युनिस्ट पक्षाने चीनवरील जपानच्या आक्रमणाला विरोध केला. त्यामुळे चीनमधील साम्यवादी पक्ष अधिकच लोकप्रिय बनला.

## १.६ यादवी युद्ध

दुसऱ्या महायुद्धात चीनने दोस्त राष्ट्रांच्या बाजूने भाग घेतला होता. दुसऱ्या महायुद्धानंतर कम्युनिस्ट पक्ष आणि कोमिंगटाँग पक्ष यांनी परस्परांमध्ये समन्वय करावा अशी इच्छा अमेरिकेने व्यक्त केली. माओच्या नेतृत्वाखालील चिनी कम्युनिस्ट पक्षाने

युद्धकाळात राष्ट्रीय पक्षाशी जरी सहकार्य केले असले, तरी त्यानंतर आपला स्वतंत्र सुभा निर्माण करून स्वतंत्र कार्यक्रम जाहीर केला. दुसऱ्या महायुद्धानंतर कम्युनिस्ट पक्षाने प्रातिनिधिक कायदेमंडळ स्थापन करून प्रतिनिधित्व देण्याची मागणी केली, परंतु चिआंग-कै-शेकने अमेरिकेच्या दबावाखाली कम्युनिस्ट पक्षाची मागणी फेटाळली होती. परिणामी चिआंग-कै-शेक यांचा राष्ट्रीय पक्ष व चिनी कम्युनिस्ट पक्ष यांच्यात यादवी युद्ध सुरू झाले. १९४० ते १९४९ या काळात झालेल्या यादवी युद्धात कम्युनिस्ट पक्षाचे नेतृत्व माओ-त्से-तुंग ने केले होते. माओने गरीब शेतकरी व शेतमजूर यांना कम्युनिस्ट पक्षामध्ये सहभागी करून घेतले. त्यामुळे माओची संख्यात्मक ताकद वाढली. कम्युनिस्ट पक्षाने प्रतिगामी जमीनदारांनी ज्यांचे न्याय हक्क नाकारले होते, त्यांच्यासाठी व छोट्या शेतकऱ्यांसाठी कृषी विषयक सुधारणांचा कार्यक्रम जाहीर केला. जमीनदारांच्या जमिनी कसण्यासाठी कोणाकडे आहेत त्या त्यांच्या मालकीच्या केल्या जातील अशी हमी दिली. या भागात कम्युनिस्टांचे प्रशासन होते. तेथील सर्व शेतकरीवर्ग माओ-त्से-तुंगच्या पाठीशी राहिला. त्यामुळे यादवी युद्धात माओला सहज विजय मिळाला. यादवी युद्धात माओचा विजय झाल्यामुळे चिआंग कै शेक  फोर्मासा बेटावर पळून गेला. चिआंग-कै-शेकने तेथे राष्ट्रीय सरकार स्थापन केले.

## १.७ पीपल्स रिपब्लिक ऑफ चायना

१५ ऑक्टोबर १९४९ रोजी माओने कम्युनिस्ट साम्यवादी प्रजासत्ताक निर्माण केले. माओ-त्से-तुंग ची लाल क्रांती यशस्वी होऊन चीनमध्ये पीपल्स रिपब्लिक ऑफ चायनाची स्थापना करण्यात आली. चिनी प्रजासत्ताकाची स्थापना झाल्यानंतर राज्यघटना तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले. १९४९ मध्ये चीनची तात्पुरती राज्यघटना बनवण्यात आली. घटनेनुसार चीनची सर्वोच्च सत्ता राजकीय सल्लागार परिषदेच्या हाती देण्यात आली.

दुसऱ्या महायुद्धानंतर परिस्थितीचा लाभ उठवण्यासाठी अमेरिका व रशिया या महासत्तानी आपले प्रभाव क्षेत्र काबीज करण्यासाठी सेंटो(SENTO) व नाटो(NATO) इत्यादी लष्करी संघटना उभ्या केल्या. रशियाने लष्करी शर्यतींमध्ये सहभागी होताना व्हिएतनाम,कंबोडिया,कोरिया इत्यादी देशात साम्यवादी राजवटी उभ्या करून आपल्या साम्राज्याचा पाया रचला. आशिया खंडातील चीन या दोन महासत्तांच्या पासून आपले स्वतंत्र अस्तित्व राखून होता. १९४९ला माओ-त्से-तुंगने घडवून आणलेल्या चीनमधील लाल क्रांतीने वेगळी सत्ता उभी केली. माओने चीनमध्ये क्रांती घडवून आणताना साम्यवादाच्या अंगी असलेल्या लेनीनवाद, स्टॅलिनवाद या परंपरागत विचारधारांचा आधार घेत नवा माओवाद अनुसरला. रशियाच्या साम्यवादापासून फारकत घेऊन आशियातील स्वतंत्र अस्मिता असलेली साम्यवादी सत्ता माओने चीनमध्ये उभी केली. सीमा प्रश्नावरून रशियाशी संघर्ष करण्याची तयारीही माओ-त्से-तुंगने केली. दोन्ही महासत्तांच्या प्रभावाला भीक न घालता चीनने आशियाची महासत्ता बनण्याच्या दिशेने वाटचाल सुरू केली.

munotes.in

## १.८ चीनच्या प्रगतीतील माओचे योगदान

सप्टेंबर १९४९ मध्ये राष्ट्रीय प्रतिनिधींची परिषद आयोजित करण्यात आली. १ ऑक्टोबर १९४९ रोजी चिनी प्रजासत्ताकाचे समारंभपूर्वक उद्घाटन करण्यात आले. प्रजासत्ताकाचे अध्यक्ष म्हणून माओ-त्से-तुंग व पंतप्रधान म्हणून चौ-एन-लाय यांची नियुक्ती करण्यात आली. प्रजासत्ताकाचे संपूर्ण नियंत्रण चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या हाती सोपवण्यात आले. प्रजासत्ताकामधील सर्व मोठया व महत्त्वाच्या पदावर माओच्या विश्वस्त व मदतनिसांची निवड करण्यात आली. सत्ता कम्युनिस्ट पक्षाच्या हाती आली तरी लोकशाही पद्धतीच्या शासनव्यवस्थेचा देखावा करण्यात आला होता. प्रजासत्ताकाची रीतसर स्थापना झाल्यानंतर जागतिक सत्ता म्हणून प्रतिष्ठा मिळवण्यासाठी प्रयत्न केले होते. माओ ज्याप्रमाणे राजकीय नेता होता, त्याप्रमाणेच विचारवंत म्हणूनही ओळखला जात होता. त्याने मार्क्सवादावर आधारलेली रशियन राज्यक्रांती अभ्यासलेली होती. चीनमध्ये मार्क्सवादाचे बीजारोपण केले होते. कम्युनिस्ट क्रांतीचा रुपाने त्याला फळे आली होती, परंतु त्याला सतत असे वाटत होते की, कामगारांच्या हुकूमशाहीवर आधारलेला मार्क्सवाद त्यामध्ये यशस्वी झाला असला तरी असा मार्क्सवाद चीनमध्ये यशस्वी होऊ शकणार नाही. चीनमध्ये मार्क्सवाद कामगारांमध्ये राबवण्याच्या ऐवजी शेतकऱ्यांमध्ये राबवला पाहिजे, कारण चीन शेतीप्रधान देश आहे. तेथे शेतकऱ्यांची संख्या जास्त आहे. माओच्या मते, लोक या संज्ञेत फक्त शेतकरी, कामगार, मध्यमवर्ग आणि राष्ट्रवादी भांडवलदार यांचा समावेश होतो. समाजातील इतर वर्ग जमीनदार, प्रत्येक क्रांतिवादी, त्यांचे दलाल हे लोकांचे शत्रू आहेत. चीनमध्ये हुकूमशाही पद्धती अनुसरून शासनाचे निर्णय आणि अंमलबजावणी एकतंत्री पद्धतीने होऊ लागली. माओने चीनची पुनर्रचना आणि पुनर्बांधणी करण्यासाठी अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने निर्णय घेतले.

## १.९ कृषी क्षेत्राची पुनर्रचना

माओ-त्से-तुंगचा पहिला महत्त्वाचा निर्णय म्हणजे सर्व जमीनदारांच्या जमिनी शासनाने आपल्या ताब्यात घेण्याचा आणि शेतकऱ्यांना वाटून देण्याचा होता. जमीनदारांची जमीन व स्थावर मालमत्ता ताब्यात घेण्याचा आणि तिचे वाटप करताना कृषी सुधारणा कायदा २८ जून १९५० रोजी करण्यात आला. यापूर्वी माओने दिलेले आश्वासनाचे पालन केल्यामुळे सर्वसामान्य शेतकरी वर्गात समाधान पसरले. त्यानंतर उत्पादन वृद्धीचा कार्यक्रम हाती घेऊन दीर्घ मुदतीचे सामाजिकरण करण्याचे धोरण अंमलात आणले.

## १.१० उद्योगाची पुनर्रचना

माओ-त्से-तुंग ने पहिल्या दोन पंचवार्षिक योजनांमध्ये जलद गतीने औद्योगिक विकास करण्यावर लक्ष केंद्रित केले. लोखंड, पोलाद, कोळसा, विद्युत निर्मिती, जड उद्योग धंदे, गृहबांधणी साहित्य आणि मूलभूत रासायनिक द्रव्यांची निर्मिती केली. त्या गोष्टींना औद्योगिक विकासामध्ये अग्रक्रम देण्यात आला. १९५७ पर्यंत सुमारे आठशे पायाभूत औद्योगिक प्रकल्प पूर्ण करण्यात आले. औद्योगिक उत्पादनाचा वेग १२ टक्क्यांनी

वाढला राष्ट्रीय उत्पन्नात ५० टक्क्यांची वाढ झाली. पोलाद आणि कच्चे लोखंड यांचे उत्पादन तिप्पट झाले. विद्युतनिर्मिती क्षमता दुप्पट वाढली. अर्थात जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन वाढले नाही.

प्रथम उद्योगाचे पुनर्रचना करण्याचे धोरण स्वीकारल्यानंतर शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यानंतर बेरोजगारी निर्माण होणार हे लक्षात घेऊन चीनच्या राज्यकर्त्यांनी ग्रामीण रोजगारावर भर देऊन रोजगार उपलब्ध करून दिला. विकेंद्रित विकासाचे उद्दिष्टही काही प्रमाणामध्ये साध्य झाले. चीनने औद्योगिकीकरणाबरोबर वेगवेगळ्या प्रकारच्या वस्तूंचे निर्यात करण्याचे धोरण हे स्वीकारलेले दिसून येते. राज्यकर्त्यांनी अत्यंत व्यवहारी आणि एकसंध असे आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक धोरण स्वीकारले होते. ग्रामीण विभागात रोजगाराची निर्मिती केल्यामुळे तेथील सर्वसामान्य जनतेला आणि शेतकऱ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या. चीनची आर्थिक क्षमताही वाढली. भाववाढ रोखण्यात यश मिळाले, अन्नधान्याचे उत्पादन वाढले, असले तरी त्याचे निर्यात करण्याचे धोरण न स्वीकारता आवश्यकतेनुसार वस्तूंची आयात करण्याचाही निर्णय त्यांनी घेतला. त्यामधून कित्येक कोटी लोकांना दारिद्र्यातून बाहेर काढण्याचा निर्णय त्यांनी घेतला आणि त्याप्रमाणे ते यशस्वी झाले. चिनी कम्युनिस्ट पक्षाने कामगार क्रांतीऐवजी शेतकरी क्रांतीवर अधिक भर दिला होता. चीनमधील शेतकऱ्यांना संघटित करण्यासाठी कम्युनिस्ट पक्षाने चीन च्या ग्रामीण भागामध्ये संपर्क केला होता. तेथील शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचे व त्यांच्यावरील अत्याचाराचे व असंतोषाचे जवळून दर्शन घेतले. गरीब शेतकऱ्यांना संघटित करून त्यांच्या संघटना निर्माण केल्या.

## १.११ कृषी उत्पादक सहकारी संघ

कम्युनिस्ट पक्षाने १९२६-२७ मध्ये 'कसेल त्याची जमीन' ही योजना कार्यान्वित केली. १९४७ मध्ये शेती सुधारणा कार्यक्रमाला अग्रस्थान दिले. शेतीविषयक सुधारणांचा **सोळा कलमी कार्यक्रम** मंजूर करण्यात आला.१९४८ मध्ये शेतीसुधारणा कायद्याचा मसुदा करण्यात आला.१९५० मध्ये अनेक शेती सुधारणा कायदे पास करण्यात आले. या कायद्यानुसार गंभीर गुन्हे व अत्याचार करणाऱ्या जमीनदारांना लोकन्यायालयापुढे उभे करून त्यांना देहांत शिक्षा देण्यात आल्या. त्यांच्या जमिनी काढून घेऊन सर्वांना जमिनीचे समान वाटप केले. मध्यमवर्गीय शेतकऱ्यांच्या जमीनी काढून घेतल्या. जमीन विक्री व खरेदी बाबत अनेक बंधने लादली. जमीनदारांच्या जमिनीचे हस्तांतरण भूमिहीन टप्प्यात करण्याचे ठरवण्यात आले.. खेड्यांचे गट तयार करण्यात आले. न्यायालयाने जुलमी जमीनदारांना शिक्षा केल्या. शेतमजुरांना शिक्षा करण्याचे हक्क दिले गेले या सुधारणेमुळे सरंजामशाही रद्द झाली. सुधारणांच्या दुसऱ्या टप्प्याच्या योजनेत समाजाची विभागणी करण्यात येऊन एका बाजूला शेतमजूर व दुसऱ्या बाजूला जमीनदार अशी वर्गवारी करून खेड्यातील प्रत्येक कुटुंबाचे स्थान निश्चित करण्यात आले. या टप्प्यात जमीनदाराकडून काढून घेतलेल्या जमीनीचे पुनर्वाटप करण्याचे काम हाती घेतले. मध्यमवर्गीय श्रीमंत शेतकऱ्यांना जमिनीचे सविस्तर माहिती देण्याविषयी आव्हान करण्यात आले. जमिनीची वाटणी समानतेने करण्यात आली. सुधारण्याच्या चौथ्या

munotes.in

टप्प्यात गुंतागुंतीची प्रकरणे सोडवणे, मालकी हक्काचे कागदपत्रे तयार करणे, कर्जाच्या हप्त्याचे पुरावे, कर्जाचे कागदपत्रे तपासण्याचे काम हाती घेण्यात आले. ही तपासणी पूर्ण झाल्यावर सर्व नवीन शेतमजूर मालकांना मालकी हक्काच्या कागदपत्राचे वाटप करण्यात आले. या सुधारणेमुळे चीनमधील जमीनदार व सरंजामदार वर्ग नष्ट झाला. १९४७ मध्ये प्रार्थनास्थळे व सार्वजनिक संस्थांच्या ताब्यात असलेली जमीन सरकारने ताब्यात घेतली. ती जमीन गरज असणाऱ्या शिपायांना देऊन टाकली.

## १.१२ पंचवार्षिक योजना

माओ-त्से-तुंगने शेती विकासाबरोबर प्रचंड आर्थिक झेप घेण्याचा प्रयत्न केला. माओ-त्से-तुंगने प्रजासत्ताक निर्माण करून साम्यवादावर आधारित नवी लोकशाही स्वीकारली. या लोकशाहीत कामगार, शेतकरी, शेतमजूर यांना महत्त्वाचे स्थान होते. युद्धसमाप्तीनंतर चीनच्या लोकसंख्येत प्रचंड भर पडत होती. युद्धामुळे उद्योग व दळणवळण यंत्रणा विस्कळीत झाली होती. यामुळे शेतीबरोबर औद्योगिक उत्पादनात वाढ करणे आवश्यक होते. चीनमध्ये १९५८मध्ये जसे पंचवार्षिक योजना सुरुवात करण्यात आली. पहिल्या योजनेत उत्पादन वाढीला अपेक्षित यश मिळाले नव्हते अन्नधान्याची स्थिती बिकट झाली होती. अन्नधान्याच्या पुरवठयाची मागणी वाढली होती. शहरांची लोकसंख्या प्रचंड वाढली असल्यामुळे अन्नधान्याची मागणी वाढली, परंतु तेवढया प्रमाणात अन्नधान्य उत्पादन होऊ शकले नाही. म्हणून दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत शेती उत्पादनावर भर देण्यात आला.

## १.१३ शंभर फुले फुलू द्या !

साम्यवादी सरकारची स्थापना झाल्यानंतर जनता आणि साम्यवादी पक्ष कार्यकर्ते यांच्या बद्दल माओला आत्मविश्वास होता. त्याने जनतेला भाषण स्वातंत्र्य देण्याचा विचार केला. २ मे १९५६ रोजी केलेल्या भाषणात 'शंभर फुले फुलू द्या शंभर विचार प्रवाह रुजू दया' अशी घोषणा करून अभिव्यक्ती स्वातंत्र्य उदघोषित केले. पक्षाच्या अनुयायांना तसेच पक्षाबाहेरील सदस्यांना सरकारच्या चुकीच्या धोरण निर्णयावर टीका करण्याचे स्वातंत्र्य दिले. लोकांनी तसेच विचारवंत, विद्यार्थी यांनी साम्यवादी सरकारवर सरकारच्या चुकीच्या धोरण निर्णयावर टीका केली. निर्णयांना आव्हान दिले. त्यामुळे सुगंधित फुले विषारी बनली. माओ-त्से-तुंग ला अभिव्यक्ती स्वातंत्र्य यावर प्रतिबंध घालावा लागला. विरोध आणि टीका करणाऱ्या बुद्धिवंत विचारवंत, यांना ग्रामीण भागात शेतमजुरीची कामे करण्यासाठी सक्तीने पाठवण्यात आले.

## १.१४ हनुमान उडी

१९५८ मध्ये माओची 'हनुमान उडी' ही योजना राबवण्यात आली.५ मे १९५८ रोजी माओ-त्से-तुंग ची ही योजना साम्यवादी पक्षाच्या आठव्या अधिवेशनामध्ये मांडली. चीनमधील सर्व जमिनीतून जास्तीत जास्त उत्पन्न काढणे, शेती उत्पादनाबरोबरच उद्योगधंद्यांचा मोठ्या प्रमाणात विकास करणे, देशात लहान मोठे उद्योगधंदे उभारणे व या

उद्योगधंद्यांच्या माध्यमातून तरुणांना रोजगार उपलब्ध करून देणे, एका वर्षात सर्वसाधारणपणे १०० टक्के उत्पन्न वाढवणे, पंधरा वर्षात मालमोटारी, ट्रॅक्टर, लहान उद्योगांचा विस्तार करणे, रेल्वेमार्ग व महामार्गाचे निर्मिती करणे, असे उद्दिष्ट जाहीर करण्यात आले. लोखंड, पोलाद उत्पादन मोठ्या प्रमाणात करून त्यांच्या निर्यातीमधून परकीय चलन मिळवून देण्याचेही उद्देश ठरवण्यात आले. शेतीचे सामूहिक एकीकरण करून त्यांच्यासमोर वस्त्या किंवा कमेंटची स्थापना करण्यात आली. औद्योगिक विकास जलद गतीने घडवून आणण्याचा प्रयत्न केला. साम्यवादी सरकारने देशात ८०० उद्योगधंदे सुरू केले. कच्चे लोखंड घालण्याचा उद्योग, सिमेंट उद्योग, पोलाद निर्मितीचा उद्योग, विद्युत निर्मिती, रेल्वे बांधणी खाणकाम व रसायने निर्मिती असे अनेक उद्योग सुरू करण्यात आले. देशाच्या औद्योगिक उत्पादन क्षमतेवर देशाची प्रगती अवलंबून असल्याचे ठरवण्यात आले. यासाठी सर्व आर्थिक आघाडयांवर प्रयत्न केले या योजनेमुळे देशाचे प्रचंड उत्पन्न वाढण्यास मदत झाली. अनेक बेरोजगारांना काम देण्यात आले. त्याच्यासाठी मोठे-मोठे प्रकल्प उभारले गेले, अनेक लोकांना व कामगारांना सामावून घेतले पोलाद उत्पादनाकडे सर्वाधिक लक्ष देण्याचे धोरण जाहीर करण्यात आले. त्यासाठी पुरेपूर वापर केला. ३००००० टन लोखंडाचे उत्पादन रोज होत असे, परंतु हे आकडे सरकारी होते. तेलाच्या बाबतीत चीन परावलंबी होता. देशात तेलाचे साठे शोधण्याची मोहीम हाती घेतली. यामधून १९५९ च्या अखेरीला मोठया प्रमाणावर तेल साठे सापडले. या शोधामुळे १९६३ पर्यंत चीन पेट्रोलियम क्षेत्रात स्वयंपूर्ण बनला असून या प्रांताचे तेलाचे तेथे उत्पादन मोठया प्रमाणावर वाढवण्याचे उद्दिष्ट ठरवले होते. माओने साम्यवादी विचारसरणीनुसारच सामूहिक शेती करण्याची योजना पुढे आणली. २९ ऑगस्ट १९५८ रोजी पक्षाच्या मध्यवर्ती समितीने सर्व देशभर कम्युन्सची स्थापना करून देशाची विभागणी केली.

पुढील पंचवार्षिक योजनेत माओने हनुमान उडी घेण्याचा बेत जाहीर केला. पहिल्या दोन पंचवार्षिक योजनांच्या अभूतपूर्व यशामुळे कम्युनिस्ट पक्षात उत्साह संचारला. औद्योगिक उत्पादनात ३० टक्के वाढ करायचे ठरवून अंतिम लक्ष खूप उंच करण्यात आले. लघु उद्योगाचा असाच मोठया प्रमाणावर विकास करण्याचे ठरवले, त्यामुळे चीनमधील प्रचंड मनुष्यबळ याचा उपयोग करणे शक्य झाले. उद्योगासाठी भांडवल व यांत्रिक वस्तू खूप कमी प्रमाणात लागून ते छोटया घरात आणि ग्रामीण भागात स्थापन करणे शक्य झाले.

## १.१५ कम्युनची स्थापना

शेती सुधारणा रचनेमुळे भूमिहीन शेतकऱ्यांना जमिनी मिळाल्या तरी शेतमजुरांचे प्रश्न सुटले नाही. लोकसंख्येच्या प्रमाणात शेतीचे उत्पादन वाढणे गरजेचे होते. शेतीसाठी लागणारा पैसा, बी-बियाणे, खते, अवजारे, जनावरे या महत्त्वाच्या गोष्टी गरीब शेतकऱ्यांकडे नव्हत्या. शेतकऱ्यांना सहकार्य करणाऱ्या संस्थांची स्थापना करण्यात आली. १५ ते ३० शेतकरी कुटुंबाचे गट केले. १९५३ मध्ये आठ लक्ष संस्था देशभर निर्माण झाल्या. त्याच बरोबर शेती उत्पादकांच्या सहकारी संस्था निर्माण करून सहकारी संस्थांचे कार्यक्षेत्र वाढले. त्यांच्या सभासदांना जनावरे, बी-बियाणे, खते,

अवजारे या शेतीसाठी लागणाऱ्या गोष्टी संस्थेकडून पुरवल्या जात. सहकारी संस्थाच्या निर्मितीमुळे उत्पादन वाढत असले तरी त्यातून फार मोठी गती मिळालेली नव्हती. यातून शेतीचे सामूहिक सामूहिकिकरण करण्याचा विचार पुढे आला.

कम्युन्स स्थापन करणे हा हनुमांन ऊडी धोरणाचा एक भाग होता. माओ-त्से-तुंग ने चीन मध्ये सामूहिक पद्धतीने शेती करण्याचा प्रयोग सुरू १९५६ ला सामुहिक शेतीत प्रत्येकाने शेतावर काम करणे सक्तीचे केले. स्त्रियांनासुद्धा सहभागी करून घेण्यात आले. शेतीसाठी आधुनिक बी-बियाणे, रासायनिक खते, अवजारे यांचा वापर केला. सर्व शेतकरी कुटुंब शेतावर काम करण्याचे सरकारने सक्ती केली. मार्क्सवादी तत्वज्ञानानुसार फ्रान्समध्ये कम्युन्स ही संकल्पना उदयाला आली होती. दुसरा प्रयोग रशियात आणि तिसरा प्रयोग चीनमध्ये करण्यात आला. कम्युन्सकडे त्या भागातील सर्व शेतकऱ्यांची जमीन सोपवलेली होती. प्रत्येकाला कामानुसार वेतन मिळे. कम्युन्समध्ये लहान-मोठ्या उद्योगधंद्यांचे कारखाने होते. शेतीचा हंगाम नसल्यास शेतकरी या कारखान्यात काम करीत. कम्युन्समधील सदस्यांना जास्त वेळ कष्ट करता यावे म्हणून भव्य स्वरुपाचे ४० लाख भोजनालये, मुलांना सांभाळणारी संगोपनगृहे तयार केले. त्यामुळे श्रमशक्तीचा योग्य विनियोग करणे शक्य झाले कम्युन्समध्ये धान्य उत्पादन करणे, पशुपालन करणे, दुग्धजन्य पदार्थांचा व्यवसाय करणे, मांस, अंडी, भाजीपाला यांचे निर्मिती करणे, ट्रॅक्टर चालवणे, विहिरींचे खोदकाम करणे, कच्चे लोखंड गाळणे, पोलाद निर्मिती, शेतीची अवजारे तयार करणे, खतांचे कारखाने चालवणे, कॅन्टीन चालवणे, कपडे शिवणे असे अनेक उद्योग कम्युन्समध्ये केले जात होते. कम्युन्सची रचना तीन स्तरात केली जात होती. पहिल्या घटकात उत्पादनाच्या योजना आखल्या जात होत्या, त्यानुसार सदस्यांकडून कामे करून घेण्याचे, स्टॉक तपासण्याचे, शेतीची कामे करण्याचे ,डुकरांचे पैदास करण्याचे आणि त्यांची देखभाल करण्याची कामे कम्युन्स मध्ये केली जात होती. दुसरा महत्त्वाचा घटक ब्रिगेड हा होता. यामध्ये पाणीपुरवठा, पूरनियंत्रण ,तांदूळ व खाद्य पदार्थावर प्रक्रिया करणारे कारखाने, प्राथमिक शाळा, दवाखाने, यांचे देखभाल ही कामे हा घटक करत होता. तिसरा महत्त्वाचा घटक समिती होता यात समितीला महत्त्वाचे स्थान होते. या समितीचे सदस्य पूर्णवेळ शासकीय स्वरूपाची कामे करणारे कार्यकर्ते असत. ट्रॅक्टर उद्योग, अवजड उद्योग, शेती अवजारे निर्मितीचे कारखाने, पंपाचे केंद्रे, वीज निर्मिती, खत कारखाने, लष्करी कामे, शासकीय सुरक्षितता, माध्यमिक आणि तांत्रिक शाळा चालवण्याची जबाबदारी या समितीवर होती.

सामुदायिक शेतीचे कायदे यापूर्वीच हाती घेण्यात आले होते. त्याचेच परिवर्तन कम्युन्स मध्ये करण्यात आले अशी कम्युन्स कमालीची यशस्वी ठरली. त्यानंतरच्या तीन महिन्यांत २५००० कम्युन्स स्थापन करण्यात आली. प्रारंभीच्या कम्युन्सपेक्षा वेगळ्या अधिकाऱ्यांनी नवीन कम्युन्सकडे करवसुली करणे, कच्च्या मालाच्या पुरवठ्याची व्यवस्था करणे, शाळा चालवणे, बँक चालवणे, हॉस्पिटल वरती देखरेख करणे इत्यादी जबाबदारी सोपवण्यात आली .

## १.१६ कम्युन्सचे अपयश

कम्युन्सकडे विविध जबाबदाऱ्या सोपविण्याचे धोरण फारसे यशस्वी झाले नव्हते. कारण हा प्रयोग नवीन होता. त्यांच्यात अनुभवाची वानवा होती. परिणामी वस्तूंचे उत्पादन खर्च वाढला आणि दर्जा घसरला. आधुनिक काम करणारा कुशल कामगार वर्ग नसल्याने यंत्रे तशीच पडून राहिली. कम्युनिस्ट पक्षाच्या धोरणामुळे आपल्या निर्णयामुळे व नियंत्रणाच्या अभावामुळे कम्युन्स अयशस्वी झाली हे कम्युनिस्ट पक्षाने मान्य केले नाही आणि आस्ते कदम धोरण अवलंबण्याचे जाहीर केले .माओच्या धोरणामध्ये काहीही थोडयाफार चुका असतील, परंतु त्यानंतर पुन्हा नव्या दमाने चीनच्या विकासाला हात घातला. माओच्या संपूर्ण कारकिर्दीत औद्योगिक उत्पादन लक्षणीय वाढले व दूरसंचार क्षेत्रात खूप सुधारणा झाली. चीनमध्ये प्रत्येक मोठे शहर व प्रांताची राजधानी आणि पेकिंग  हवाईमार्गाने जोडण्यात आले. पेकिंगचे नाव बीजिंग असे करण्यात आले. माध्यम यंत्रणाचे जाळे सर्व देशात पसरवण्यात आले. प्रचंड लोकसंख्या विचारात घेता अपेक्षेप्रमाणे हनुमान उडी घेण्यात यश मिळू शकले नाही. त्याच्यामध्ये रासायनिक खतांचा वापर करण्याकडे दुर्लक्ष आणि निसर्गावर अवलंबून राहण्याची प्रवृत्ती यांमुळे चीनमध्ये कृषी उत्पन्न घटत चालले होते. चीनने कृषी उत्पादनात खालील क्षेत्र लक्षात घेता तांदूळ, गहू, सोयाबीन, तंबाखू, तेलबिया, कापूस या अन्नधान्य उत्पादनात जगात अग्रेसर स्थान मिळवले होते. औद्योगिक क्षेत्रात मात्र चांगलीच भरारी मारली होती. अत्याधुनिक नाजूक वस्तूंचे उत्पादन करणारे अनेक औद्योगिक प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले. आणि विक्स संशोधनात आघाडी घेऊन अन्य वस्तूंचे उत्पादन सुरू केले. अणुस्फोटाचे तंत्रज्ञान अवगत करून घेऊन, अणुबॉम्बच्या यशस्वी चाचण्या घेऊन त्यात १५ वर्षाच्या आत एटॉमिक क्लबचा कायमचा सभासद होण्याचा सन्मान मिळवून अणुबॉम्ब असणाऱ्या अमेरिका, रशिया, फ्रान्स, इंग्लंड या राष्ट्रांच्या मालिकेत पाचवे राष्ट्र म्हणून स्थान मिळवले. अवकाश संशोधनातही चीनने अनेक उपग्रह अवकाशात सोडले. अवकाश शास्त्रात त्यांच्या उत्पादनात आघाडी मारली आणि जागतिक महासत्तांच्या स्पर्धेत लवकरच चीनने  पदार्पण केले.

कम्युन्स व्यवस्थापनाचा प्रश्न निर्माण झाला अनुभवी व प्रशिक्षित कार्यकर्ते नसल्यामुळे कम्युन्सच्या कारभारात अडचणी निर्माण झाल्या. कम्युन्समध्ये हजारो माणसांचे कुटुंब होते, भूमिहीन शेतमजुराला मिळालेला जमिनीचा तुकडा लगेच सोडावा लागला होता, तो मनापासून काम करत नव्हता. सामूहिक जीवनाच्या प्रयोगामुळे वैयक्तिक कुटुंब संस्थेचे अस्तित्व धोक्यात आले होते. शेतकऱ्यांच्या जीवनाला लष्करी छावणीचे स्वरूप प्राप्त झाले. अवजार उद्योगावर भर, शेतीकडे दुर्लक्ष, सत्तेचे केंद्रीकरण, व्यवस्थापकीय कार्यक्षमता व व्यक्तिगत प्रोत्साहनाचा अभाव यामुळे कम्युन्स ही योजना यशस्वी होऊ शकली नाही.

## १.१७ सांस्कृतिक क्रांतीची घोषणा

माओ-त्से-तुंगच्या क्रांतीनंतर सामुदायिक उत्पादक, सामुदायिक शेतीचा प्रयोग फसलेला होता. औद्योगिक उत्पादनात वाढ झाली नव्हती. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत चीनला

स्थान असल्यामुळे देशांतर्गत मालाचा पुरेसा साठा होत नव्हता, परंतु कम्युनिस्ट पक्षाच्या हुकूमशाहीला विरोध करण्याची मानसिकताही झाली नव्हती. चीनमध्ये उद्योग आजार पडू लागले, बेकारीचे प्रमाण वाढले ,भूकबळी व उपासमार होण्याच्या घटनाही घडू लागलेल्या होत्या. माओला हे अपयश माहीत होते परंतु त्याच्यावर उपाय सापडत नव्हता.

चिनी जनतेच्या मनातील असंतोष दूर करण्यासाठी माओ-त्से-तुंगने १९६६ मध्ये सांस्कृतिक क्रांतीची घोषणा केली. साम्यवादी सरकारच्या काळात प्रशासकीय जबाबदारी वाढली होती, परंतु प्रशासनाची कार्यक्षमता वाढली नव्हती. कम्युनिस्ट विचारसरणी व पक्ष संघटना मजबूत करायची होती. प्रशासनातील दोष दूर झाल्याशिवाय उद्योग व प्रशासनावर साम्यवादाची पकड बसू शकणार नव्हती, म्हणून १९५१ च्या शेवटच्या महिन्यात माओच्या सरकारने दोन मोहिमा हाती घेतल्या, त्यातील पहिली मोहीम ही पक्षातील व शासनातील शत्रूविरुद्ध होती, दुसरी व्यापारी व उद्योजकांविरुद्ध होती. या मोहिमेमुळे सामाजिक क्रांती घडून आली. चीनमध्ये साम्यवादी सरकारची पहिली मोहीम ही प्रशासनाविरुद्ध होती. समाज व प्रशासनाची गाडी रुळावर आणण्यासाठी भ्रष्टाचार, उधळपट्टी व दप्तर दिरंगाई या तीन गोष्टींचा नायनाट करण्याचे ठरवण्यात आले. या मोहिमेमुळे दोषी व अकार्यक्षम व्यक्तींना काढून टाकण्यात आले. साम्यवादी पक्षाच्या कार्यात अडथळा निर्माण करणाऱ्या राजवटीतील प्रशासकांना व जुन्या भ्रष्ट अधिकाऱ्यांना सेवेतून कमी करून शिक्षा देणे हा या मोहिमेचा उद्देश होता. सेवेतून कमी केलेल्या अधिकाऱ्यांच्या जागा साम्यवादी लोकांना दिल्या गेल्या. या मोहिमेमुळे अंतर्गत गटबाजी नष्ट झाली साम्यवादी शासन स्थिर झाले. राजकीय विरोधक, धनिक, व्यापारी व उद्योजक यांना निष्प्रभ करून मध्यमवर्ग विरुद्ध जनतेच्या मनात असंतोष निर्माण करणे हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश होता. कर चुकवणे, लाचलुचपत, लफडेबाजी, साठेबाजी, जनतेची लूट करण्यासाठी धोकेबाजी या पाच अपप्रवृत्ती विरुद्ध माओ सरकारने लढा दिला. मोहिमेचा भर अप्रामाणिक व बेजबाबदार उद्योगधंदे करणाऱ्यांना शासन करण्यावर होता. व्यापारी आणि उद्योजकांची नीतिमत्ता ढासळली असून साठेबाजी, भ्रष्टाचार व समाज व राष्ट्रविरोधी गोष्टी वाढल्या होत्या. यामधूनच माओने उद्योगधंद्यांचे पाहणी करण्याचे ठरवले. या मोहिमेत आढळून आलेल्या गुन्हेगारांना छावणीत पाठवले जात होते. खासगी उद्योग व त्यांची मालमत्ता जप्त करीत असे या मोहिमेमुळे दोनशे गुन्हेगारांना शासन करून सरकारचा कर वाढलेला दिसून येतो. सर्वसामान्य लोकांनी एकत्र यावे, भ्रष्टाचार दूर करून टाकावा आणि या क्रांतीला विरोध करणाऱ्यांना ठेचून काढावे असे आवाहन केले. त्यानिमित्ताने माओला पक्षांतर्गत विरोधकांना ही संपवता आले. या धोरणामुळे चीनमध्ये विरोधकांना हिंसाचाराच्या मार्गाने नष्ट करण्यात आले. अगोदरच उद्ध्वस्त झालेली अर्थव्यवस्था सांस्कृतिक क्रांतीमुळे देशोधडीला लागली, अराजकता माजली. शेवटी माओ-त्से-तुंगला हस्तक्षेप करून सांस्कृतिक क्रांतीचे आव्हान मागे घ्यावे लागले.

## १.१८ समारोप

माओ-त्से-तुंगच्या नेतृत्वाखाली साम्यवादी प्रजासत्ताक स्थापन झाले, त्यांनी चीनची सर्वांगीण प्रगती करण्याचे धोरण आखले शेतीची पुनर्रचना, जमीनदारी पद्धतीचा शेवट,समुह कृषी उत्पादक संघ, कम्युन्स, सांस्कृतिक क्रांती, औद्योगिक पुनर्रचना, पंचवार्षिक योजना, शंभर फुले फुलू द्या, हनुमान उडी असे कार्यक्रम राबवून देशाची प्रगती करण्याचा प्रयत्न केला. सांस्कृतिक क्रांतीने काही सकारात्मक बदल झाले असले तरी माओ-त्से-तुंग ची लोकप्रियता घटली.

## १.१९ प्रश्न

१) चीनच्या प्रगतीतील माओ-त्से-तुंगच्या  योगदानाचा आढावा घ्या.

२) माओ-त्से-तुंगच्या कृषी सुधारणाची सविस्तर माहिती लिहा.

३) माओ-त्से-तुंगच्या सांस्कृतिक क्रांतीची चर्चा करा.

४) हनुमान उडीचे महत्व विषद करा.

## १.२० संदर्भ

१) कदम य.ना., “समकालीन आधुनिक जग”, फडके प्रकाशन, कोल्हापूर, जानेवारी २००१.

२) भिडे गजानन, “चीन आणि जपानचा इतिहास”, फडके प्रकाशन, कोल्हापूर, मार्च २००२.

३) शिंदे सुभाष, “समकालीन जग” शेठ प्रकाशन, मुंबई, जानेवारी २००६.

४) भामरे जितेंद्र, “आशियाचा इतिहास”  शेठ प्रकाशन, मुंबई, जानेवारी २००६.

❖❖❖❖

munotes.in

# २

## डेंग झीओपिंगच्या नेतृत्वाखालील आर्थिक प्रगती

**घटक रचना :**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ डेंग झीओपिंगचे पूर्व आयुष्य

२.३ डेंग झीओपिंगचे चीनमधील राजकारणात सहभाग

२.४ सांस्कृतिक क्रांतीचे पुनर्मूल्यांकन

२.५ सर्वंकष सुधारणा कार्यक्रम

२.६ तीयानमेन चौकात विद्यार्थ्यांचे प्रचंड निदर्शने

२.७ डेंग झीओपिंगचे आर्थिक धोरण

२.८ शेतकऱ्याचे स्वातंत्र

२.९ औद्योगिक क्षेत्रातही मूलभूत स्वरूपाचे बदल

२.१० डेंग झीओपिंगच्या सामाजिक सुधारणा

२.११ समारोप

२.१२ प्रश्न

२.१३ संदर्भ

## २.० उद्दिष्टे

१) माओच्या मृत्यूनंतर चीनमधील राजकीय बदलाची नोंद घेणे.

२) डेंग झीओपिंग यांच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक विचारांचा अभ्यास करणे.

३) डेंग झीओपिंग यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आर्थिक प्रगतीची माहिती घेणे

४) चीनमधील शेतकऱ्याचे स्वातंत्र्य अभ्यासणे.

५) औद्योगिक क्षेत्रातील मूलभूत स्वरूपाचे बदल जाणून घेणे.

munotes.in

## २.१ प्रस्तावना

१९४९ मध्ये माओ-त्से-तुंगने साम्यवादी विचाराच्या सरकारची स्थापना केली. आपल्या विविध कार्यक्रम योजनांमार्फत चीनला जागतिक महासत्ता म्हणून स्थान मिळवून दिले. त्याच्या धोरणावर काही नेत्यांनी सुधारणा सुचवण्याचा आणि बदल करण्याचा प्रयत्न केला. माओ-त्से-तुंगने आपल्या विरोधकांना पक्षाबाहेर घालवण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये डेंग झीओपिंग यांचा समावेश होता. माओच्या मृत्यूनंतर चीनमध्ये बदल होऊन डेंग झीओपिंग सत्तेवर आले. त्यांनी माओच्या धोरणाचा फेरविचार करून आपले धोरण राबवले होते. आर्थिक सुधारणाच्या माध्यमातून देशाचा विकास करण्याची योजना आखली. जुन्या चुका दुरुस्त करून चीनची प्रगती करण्याचा प्रयत्न केला.

## २.२ डेंग झिओपिंग पूर्व आयुष्य

डेंग झीओपिंग हे प्रमुख चीनी क्रांतीकारक, राजकारणी, कृतीशील समाज सुधारक आणि चिनी साम्यवादी पक्षाचे एक नेते होते. चीनचा राज्यकारभार केवळ एक सत्ता, देश ,एक प्रशासन प्रमुख म्हणून पाहिला नाही तर इसवी सन १९७९ ते ९० दरम्यान चीनचे एक कुशल कार्यवाह म्हणून सेवा केली. प्रजासत्ताक साम्यवादी चीनला प्रगती पथावर नेले. माओ-त्से-तुंगच्या राज्यात सांस्कृतिक क्रांती व चळवळी यांच्यावर सकारात्मक उपाय करण्याची जबाबदारी डेंग झीओपिंग यांच्यावर आली होती. डेंग झीओपिंग हे चीनमध्ये नवीन सामाजिक विचारप्रणालीची सुरुवात करणारे नेते होते. त्यांनी चीनच्या परिस्थिती संदर्भातील समाजवाद विकसित केला आणि आर्थिक सुधारणांच्या बाबतीतही समाजवादी अर्थव्यवस्थेच्या तत्त्वाचा पुरस्कार करून चीन जागतिक बाजारपेठेत जोडला. जगाला सर्वात जलद गतीने विकास पावणारी बाजारपेठ म्हणजेच चीनची बाजारपेठ बनवण्याचे श्रेय डेंग झीओपिंग यांना द्यावे लागते. चिनी जनतेच्या आर्थिक राहणीमानाचा दर्जा उंचावण्याचे श्रेय त्यांना जाते

डेंग झीओपिंग यांचा जन्म २२ ऑगस्ट १९०४ रोजी सिचूऑन प्रांतातील गुआंगन जिल्ह्यात हक्का कुटुंबामध्ये झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण चीनमध्ये झाले. चिनी इतिहासामध्ये ४ मे १९१९ च्या आंदोलनाचे गौरवपूर्ण उल्लेख केला जातो. त्या विद्यार्थी बंडामध्ये डेंग झीओपिंग सामील झाले होते. १९१९ च्या उन्हाळ्यात डेंग झीओपिंग चोंगकिंग स्कूलमधून पदवीधर झाले. त्यानंतर आपल्या महाविद्यालयीन सहकार्यासोबत कार्य अभ्यास करण्यासाठी झीओपिंग फ्रान्सला गेले त्या ठिकाणी त्यांनी अनेक नोकऱ्या केल्या त्यामधून कसेबसे जीवन जगण्यासाठी उत्पन्न त्यांना मिळत होते. फ्रान्समध्ये शिक्षणाबरोबर काम करत असताना डेंग झीओपिंगवर इतर चिनी विचारवंतांबरोबर चौ-एन-लाय चा अधिक प्रभाव झाला. शिकत असताना त्याने मार्क्सवादाचा सखोल अभ्यास केला आणि त्याचा राजकीय प्रचार केला. १९२१मध्ये त्यांनी साम्यवादी पक्षाचे सदस्यत्व घेतले. युरोपातील चिनी साम्यवादी युवा संघाचे महत्त्वाचे पदाधिकारी बनले. सोवियत संघातील मास्कोमध्ये अभ्यास पूर्ण केल्यानंतर डेंग झीओपिंग १९२६ च्या सुरुवातीला चीनमध्ये परतले.

## २.३ डेंग झीओपिंगचा चीनमधील राजकारणात सहभाग

चीनमध्ये परतल्यावर डेंग झीओपिंगनी राजकारणामध्ये सक्रिय सहभाग घेतला. साम्यवादी पक्षांमध्ये वरचे स्थान त्यांना मिळू लागले. लॉंग मार्चच्या वेळी ते प्रमुख नेत्यांच्या रांगेत होते. साम्यवादी पक्षाच्या केंद्रीय समितीचे महासचिव म्हणून काम पाहत होते. जपानबरोबर युद्धाच्या वेळी त्याने अनेक मोहिमा आखल्या होत्या. यादवी युद्धाच्या वेळेला चीनच्या राष्ट्रीय सैन्याविरुद्ध संघर्ष केला होता. १९४८ च्या शेवटी आणि चिआंग-कै-शेकच्या प्रत्यक्ष नेतृत्वाखाली असलेल्या राष्ट्रीय सरकारच्या सैन्याबरोबर त्यांनी निकाराचा अंतिम लढा दिला. चेकिंग शहर साम्यवादी प्रजासत्ताक सैन्याच्या ताब्यात आले. डेंग झीओपिंग यांना चेकिंग शहराचे महापौर व राजकीय प्रमुख म्हणून नेमण्यात आले. डेंग झीओपिंग हे माओ-त्से-तुंगचे समर्थक असल्याने साम्यवादी प्रजासत्ताक चीनमध्ये त्यांना वेगवेगळ्या उच्च पदावर काम करण्याचे संधी मिळाली. १९५७ मध्ये माओ-त्से-तुंगनी साम्यवादी उजव्या गटाच्या विरोधी मोहीम राबवली तेव्हा डेंग झीओपिंगनी माओ-त्से-तुंगचे समर्थन केले, ते १९५६ मध्ये साम्यवादी लोक प्रजासत्ताकाचे महासचिव झाले व दैनंदिन कामकाजात लिओ शाओची यांच्याबरोबर यशस्वीपणे चालवले. माओ-त्से-तुंगच्या भविष्याप्रत हनुमान उडी कार्यक्रमाला हवे तेवढे यश मिळाले नाही, त्यामुळे डेंग झीओपिंग आणि लिओ यांचा साम्यवादी पक्षांमध्ये प्रभाव वाढू लागला. त्यांनी आर्थिक सुधारणांवर भर दिल्याने पक्षात व जनतेमध्ये त्यांचे प्रतिष्ठा अधिक वाढली. माओच्या पारंपारिक जहाल आर्थिक धोरणाच्या जागी डेंग झीओपिंग व लिओ यांनी अधिकृत आर्थिक धोरणाचा पुरस्कार केला डेंग आणि लिओची साम्यवादी पक्षातील शक्ती वाढत होती. याची माओ-त्से-तुंगला कुणकुण लागली होती. त्यांना असुरक्षित वाटू लागले. आपले पक्षातील स्थान बळकट करण्यासाठी माओनी १९६६ मध्ये सांस्कृतिक क्रांतीचा नारा दिला. दरम्यान डेंग पूर्णपणे माओ-त्से-तुंगच्या मर्जीतून उतरले. त्यांना सर्व शासकीय कार्यालयातून पायउतार व्हावे लागले. सांस्कृतिक क्रांतीच्या दरम्यान डेंग झीओपिंग आणि त्यांचे कुटुंबीय यांचा लाल सैन्यामार्फत छळ केला गेला. डेंग झीओपिंगना सक्रिय राजकारणातून आणि पक्ष कार्यकारिणीतून हद्दपार केले असले तरीही त्यांनी नेत्यांमध्ये आपल्याविषयी सदिच्छा व संतुलन राखण्याचे काम केले.

### डेंग झीओपिंग चीनमधील पहिले उपपंतप्रधान :

१९७४ मध्ये डेंग झीओपिंग चीनचे पहिले उपपंतप्रधान बनले आणि संपूर्ण चीनचा दैनंदिन कारभार पाहू लागले. चीनचा उपपंतप्रधान झाल्यावर डेंग झीओपिंगने चीनची आर्थिक पुनर्रचना करण्यावर लक्ष केंद्रित केले. उत्पादनात वाढ होण्यासाठी देशातील एकजूट अत्यंत महत्त्वाची आहे, यावर त्यांनी भर दिला कागदावर तरी माओ-त्से-तुंगच्या विचार प्रणालीचे उल्लंघन होणार नाही याचे खबरदारी घेतली. अजूनही सांस्कृतिक क्रांती संपलेली नव्हती. साम्यवादी पक्षांमध्ये सत्ता संघर्षासाठी प्रयत्न सुरू झाले जानेवारी १९७६ मध्ये चौ-एन-लाय यांचा मृत्यू झाल्यानंतर पक्षाच्या केंद्रीय समितीमध्ये डेंग झीओपिंगला कोणी पाठीराखा उरला नाही. माओ-त्से-तुंगचा पूर्ण पाठिंबा

असल्यामुळे डेंग झीओपिंगवर विरोधकांनी टीका केली. माओच्या प्रयत्नामुळे थोड्याच कालावधीमध्ये डेंग झीओपिंगवर प्रती क्रांतीवादी असा शिक्का मारला गेला. त्यांना पक्षाच्या सदस्यत्व व्यतिरिक्त सर्व प्रकारच्या राजकीय व प्रशासकीय पदांपासून वंचित करण्यात आले. कम्युनिस्टांच्या दृष्टीकोनातून यांचे धोरण पाखंडी होते. माओ-त्से-तुंग नी यांना पक्षाचा आणि देशाचा शत्रू म्हणून घोषित केले. सांस्कृतिक क्रांती यशस्वी झाल्यानंतर चाऊ-एन-लाय यांनी डेंग झीओपिंग यांना परत बोलावून घेतले आणि अर्थव्यवस्था त्यांच्याकडे सोपवली आणि खुली अर्थव्यवस्था मांडायला सुरूवात केली माओ-त्से-तुंगने पुन्हा त्याच्यावर पक्षांतर्गत हल्ला चढवला. भांडवली विचार मांडून पक्षाच्या आणि देशाचे नुकसान करीत आहेत असा आरोप करून डेंग झीओपिंग यांना राजकीय पटलावरून दूर केले.

**डेंग झीओपिंग चिनी प्रजासत्ताकाचा अध्यक्ष :**

१९७६ मध्ये माओ-त्से-तुंगचा मृत्यू झाल्यानंतर माओ-त्से-तुंगची पत्नी जियान किंग आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी चीनची सत्ता बळकावली. त्यांना चीनची सत्ता सांभाळणे अशक्य आहे असे लक्षात आल्यानंतर कम्युनिस्ट पक्षातील डेंगसारख्या नेत्यांनी चीन वर आपल्या पक्षाची सत्ता स्थापन केली डेंग झीओपिंग हे चीनच्या राजकारणात निर्विवाद नेते म्हणून पुढे आले.

डेंग झीओपिंग चिनी प्रजासत्ताकाचा अध्यक्ष झाला. डेंग झीओपिंग यांनी सत्तेवर आल्यानंतर थोडयाच दिवसात पक्षावर व प्रशासनावर भक्कम पकड बसवली. संस्कृती क्रांतीच्या पुढाऱ्यांना अटक करून बंदीशाळेत टाकले. त्यांना पक्षांतर्गत तीव्र विरोध होता. त्यामुळे खुले धोरण अमलात आणण्याचे कठीण व्रत त्यांना पत्करावे लागले. त्यांची स्वतःची काही राजकीय प्रणाली व धोरणे होती. या विचारप्रणाली आणि धोरणाद्वारे डेंग चीनचा कायापालट करू इच्छित होते. युरोपात कम्युनिस्ट राजवटी कोसळत होत्या. चीनचा विकास वेगाने घडवून आणायचं झाल्यास मार्क्सवाद, लेनिनवाद, माओवाद यात बदल घडवून आणायचा होता. समाजवाद असला पाहिजे पण राजकीय व्यवस्थेचे भान राखून परिस्थितीशी जुळवून घेता आले पाहिजे असे त्यांचे धोरण होते. मार्क्सवाद आणि समाजवाद ही निकामी झालेली अर्थनीती नसून तिला परिस्थितीनुसार रूप देण्याची आवश्यकता आहे असे त्यांना वाटत होते. अस्तित्वात असलेल्या समाजवाद आणि व्यवहार यांची सांगड घालून आधुनिक समाजवादी निर्माण करण्यासाठी समाजवादी बाजार प्रणित अर्थनीती मांडून नवा क्रांतिकारी प्रयोग चीनमध्ये सुरू केला . डेंग झीओपिंग यांच्या या प्रयोगाला चीनची दुसरी क्रांती असे संबोधले जाते.

## २.४ सांस्कृतिक क्रांतीचे पुनर्मूल्यांकन

माओ-त्से-तुंगच्या मृत्यूनंतर पेकिंगमधील पक्षाच्या बैठकीत सांस्कृतिक क्रांतीचे पुनर्मूल्यांकन करण्याचा ठराव झाला. माओ-त्से-तुंग च्या कार्याचेही पुनर्मूल्यांकन केले गेले. या नेत्यावर कठोर टीका करण्यात आली. माओचे विचार लेनिन आणि मार्क्स यांच्याशी विसंगत आहेत, असे मत मांडले गेले. प्रतिक्रांतीवादी व भांडवलशाहीला पोषक

होते असे विचार मांडताना माओशी निष्ठावान असणाऱ्या सदस्याची संख्या लक्षात घेऊन माओचे तत्वज्ञान उपयुक्त आहे पण दावेपणा अतिरिक्त नको असा विचार मांडला.

## २.५ सर्वंकष सुधारणा कार्यक्रम

डेंग झीओपिंग यांनी १९७८ मध्ये कम्युनिस्ट पक्षाच्या दर पाच वर्षांनी भरणाऱ्या ११ व्या अधिवेशनात उद्योगधंदे, कृषी, विज्ञान, तंत्रज्ञान आणि संरक्षण या क्षेत्रात आधुनिकीकरण घडवून आणण्यासाठी आपला कार्यक्रम सादर केला. हा कार्यक्रम म्हणजे सर्वंकष सुधारणा आणि खुलेपणा स्पष्ट करणारा होता, त्याला डेंग युगाची नांदी म्हणतात. कार्यक्रमाच्या कार्यवाहीद्वारे विसाव्या शतकाच्या अखेरीस देशांतर्गत वस्तूंचे उत्पादन चौपट करण्याचे ठरवले आणि राजकीय सुधारणा घडवून आणण्यासाठी व संस्थात्मक लोकशाही सुस्थिर करण्यासाठी कम्युनिस्ट पक्ष, लष्कर आणि शासन यांच्या अधिकारांच्या कक्षा निश्चित करणारा सत्ता विभाजनाचा सिद्धांत मांडला होता. या तीन घटकांनी परस्परांच्या अधिकारात हस्तक्षेप न करता त्यांना आपल्या कार्यक्षेत्रात पूर्ण स्वातंत्र्य देण्याचा मनोदय व्यक्त केला. डेंग झीओपिंग यांनी कार्यक्रम सादर करून माओवादाला मुठमाती देण्याचा निश्चय केला होता. परंतु माओ-त्से-तुंगच्या समर्थक आणि स्वतःला डावे म्हणून घेणाऱ्या पक्षातील नेत्यांनी समाजवाद, त्याचे श्रेष्ठत्व आणि मार्क्स–लेनिन-माओ तत्वज्ञान डेंग झीओपिंग यांच्या भांडवलशाहीवादी खुल्या अर्थनीतीमुळे मागे पडेल या भीतीने विरोध केला.

## २.६ तीयानमेन चौकात विद्यार्थ्यांचे प्रचंड निदर्शने

चीनला एकात्मसत्ता आणि प्रभावी बनवण्यासाठी माओने पुरस्कारलेला संप, स्वातंत्र्य, संघटना हक्क आणि प्रभावी प्रचारासाठी नेत्यांची भव्य पोस्टर प्रदर्शित करण्याचा हक्क अशी मूलभूत स्वातंत्र्य घटनेतून रद्द केली. डेंग झीओपिंगचा निषेध करण्यासाठी विद्यार्थ्यांना चिथावणी दिली गेली. बीजिंगमध्ये तीयानमेन चौकात विद्यार्थ्यांचे प्रचंड निदर्शने झाली. निदर्शनास हिंसक स्वरूप प्राप्त झाले आणि हिंसक विद्यार्थ्यावर गोळीबार करण्याची आज्ञा दिली, शेकडो विद्यार्थी या गोळीबारात मारले गेले. तीयानमेन चौकातील हत्याकांडाचा डेंग झीओपिंग यांच्या कार्यावर अनिष्ट परिणाम होण्यास सुरुवात झाली. खुल्या अर्थकारणाला व आर्थिक विकासाला बांध घालण्यात आला. आमच्या काळातील पश्चिमात्य संकल्पनेमुळे १९९२च्या प्रारंभी वयाच्या ८८ व्या वर्षी झीओपिंगनी आपल्या आयुष्यातील अखेरचा लढा सुरू केला. त्यांनी चीनचे विशेष आर्थिक विभाग केले होते, आपल्या नवीन धोरणाला जनतेचा पाठिंबा मिळावा यासाठी चिनी क्रांतीचे भवितव्य या विषयावर राष्ट्रव्यापी चर्चा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. कम्युनिस्ट पक्षाचा१४ व्या अधिवेशनात त्यांनी आपल्या भावी योजनांवर शिक्कामोर्तब करून घेतले, त्यामुळे पुढील पाच वर्षे त्यांना निश्चितपणे आपल्या कार्यक्रमाची कार्यवाही करण्यासाठी वेळ मिळाला. डेंग झीओपिंग यांचे वय झाले होते, परंतु आपल्या दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर त्यांनी आपली दुसरी क्रांती यशस्वी करून दाखवली. डेंग झीओपिंग यांनी साम्यवादी तत्त्वज्ञान व्यवहाराच्या पातळीवर आणले. रशियात क्रुश्चेव आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी साम्यवादात सुधारणा केल्या होता तर माओ-त्से-तुंगनी साम्यवादामुळे देश धोक्यात आणला होता.

डेंग झीओपिंग यांनी दोन्ही बाजू कशा चुकीच्या आहेत हे चीनमध्ये आर्थिक पुनर्रचना व खुलेपणा स्वीकारून सप्रमाण सिद्ध केले. लेनीनने जसे आपल्या काळात मार्क्सवाद बाजूला ठेवून राज्यक्रांतीनंतर रशियास नवीन आर्थिक धोरणाच्या संकटातून वाचवले, त्याप्रमाणे डेंग यांनी चिनी समाजवाद अमलात आणून माओप्रणित सांस्कृतिक क्रांतीमुळे निर्माण झालेल्या संकटातून चीनला वाचवले.

## २.७ डेंग झीओपिंगचे आर्थिक धोरण

“राष्ट्राचा विकास” हे कोणत्याही आर्थिक धोरणाचे उद्दिष्ट असते आणि हाच व्यवहारवादी दृष्टिकोन ठेवून चीन साम्यवादी आहे की भांडवलवादी याचा विचार केला. खुल्या अर्थव्यवस्थेत अभिप्रेत असणारे बाजारप्रणित अर्थशास्त्र आपल्या नजरेसमोर ठेवून त्यांनी साम्यवादाला मुरड घातली. डेंग झीओपिंग यांनी बाजारप्रणीत अर्थशास्त्र हा भांडवलवादीन सिद्धांत स्वीकारला असून साम्यवादाला दूर केले आहे अशी टीका केली. चीनमध्ये सर्वात मोठा व्यवसाय असणाऱ्या शेतीमध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर औद्योगिकीकरणामुळे आमुलाग्र स्वरूपाचे बदल घडवून आर्थिक प्रगती साध्य केलेली दिसून येते.

## २.८ शेतकऱ्याचे स्वातंत्र

डेंग झीओपिंग याने सामुदायिक शेतीच्या ऐवजी खाजगी शेतीला प्राधान्य देण्याचे धोरण स्वीकारले. ज्या शेतकऱ्यांना जमीन कसायची आहे त्यांना सुमारे तीस वर्षांच्या भाडेपट्टीवर जमीन देण्यात येऊन ती जमीन कशी कसायची, कोणते पीक घ्यायचे, आलेल्या उत्पादनातून किती आपल्याजवळ ठेवायचे, किती विकायचे याबाबतचे सर्व अधिकार व स्वातंत्र्य शेतकऱ्यांना देण्यात आले. शेतमालाचा सर्व व्यापार शासन नियंत्रित केला. त्याचबरोबर बाजारावर नियंत्रण ठेवण्यात येऊ लागले. या नवीन व्यवस्थेला हाऊसहोल्ड प्रोडक्शन रिस्पॉन्सिबिलिटी सिस्टिम असे म्हटले जाऊ लागले. या नव्या व्यवस्थेमुळे चीनच्या कृषी उत्पादनात अत्यंत भरीव वाढ झाली. १९७८मध्ये चीनचे अन्नधान्याचे उत्पादन ३०४ दशलक्ष टन होते ते १९९६ मध्ये ४८० दशलक्ष टनांवर गेले. याच काळात कापूस तेलबिया आणि साखर यांचे उत्पादन झपाट्याने वाढले. शेती उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढण्याचे कारण म्हणजे चीन मधील लागवडीयोग्य जमिनीच्या५० टक्के जमीन सिंचनाखाली आणली. अन्नधान्याच्या बाबतीत जवळजवळ चीन स्वयंपूर्ण झाला होता. अन्नधान्याच्या जोडीला फळे, भाज्या, मांस, अंडी यांचे उत्पादन वेगाने वाढले. त्याला चीनमध्ये दुय्यम उत्पादन म्हटले जाते. त्यातून शेतकऱ्याचा फायदा झाला. शेतकऱ्यांचे उत्पादन वाढले आणि सकस आहार जनतेला मिळाला. हे डेंग झीओपिंग यांच्या कार्यक्रमाचे यश मानले जाते.

## २.९ औद्योगिक क्षेत्रातही मूलभूत स्वरूपाचे बदल

पूर्वीप्रमाणे उद्योगांबाबतचे सर्व निर्णय नोकरशाहीने घेण्याऐवजी ते त्याच्या उद्योगातील व्यवस्थापनाने घेण्यास सुरुवात केली. उत्पादन वाढीचे राष्ट्रीय उद्दिष्ट पार पाडण्यासाठी

सर्व प्रकारच्या गोष्टी, सुविधा देण्यात आल्या. त्याचबरोबर स्वायत्तता उद्योगांना प्रदान करण्यात आली. औद्योगिक क्षेत्रात चीनचे सर्वात मोठे यश म्हणजे ग्रामीण उद्योगांच्या संख्येत भरमसाठ वाढ झाली. टाउनशीप अँड व्हिलेज इंटरप्राईजेस या योजनेखाली सर्व प्रकारचे उद्योग ग्रामीण भागामध्ये सुरू करण्यात आले. यातून १३ कोटी लोकांना रोजगार उपलब्ध झाला. चीनच्या दुसऱ्या क्रांतीसाठी डेंग झीओपिंग यांनी केलेल्या विविध प्रकारच्या सुधारणा या महत्त्वाच्या होत्या. आर्थिक व तांत्रिक क्षेत्रात आधुनिकीकरण करणे, आंतरराष्ट्रीय पातळीवर राजकीय तत्वज्ञानाच्या शासन प्रणालीचे सहअस्तित्व मान्य करणे या दोन गोष्टी डोळ्यासमोर ठेवल्या. त्यामुळे चीनची द्वारे जगासाठी खुली झाली आणि पाश्चिमात्य तंत्रज्ञान व कौशल्य सहजपणे चीनमध्ये आली. त्यांनी आर्थिक विकासाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय विकास संघटना, आशियाई विकास बँक यासारख्या आंतरराष्ट्रीय आर्थिक संस्थांबरोबर संबंध प्रस्थापित केले. त्यांनी मुदतीची मोठी कर्जे उपलब्ध करून दिली. यात अनेक देशांसोबत राजकीय तडजोडी त्यांनी घडवून आणल्या आणि भारत या शेजारी देशाबरोबर सीमा प्रश्नावरून असलेले मतभेद बाजूला ठेवून त्यांच्याशी आर्थिक, व्यापारी, सांस्कृतिक संबंध प्रस्थापित केले. त्याचा चांगला आर्थिक लाभ झालाच पण त्याचबरोबर सीमा प्रदेशात तणाव कमी होऊन शांतता निर्माण झाली. आर्थिक प्रगतीमुळे चीनला भाववाढ रोखण्यात यश मिळाले. डेंग झीओपिंगच्या आर्थिक सुधारणामुळे गरिबी कमी होण्यास सुरुवात झाली. १९७८ साली गरिबांची संख्या २५ कोटी होती ती १९८५ साली १२.५ कोटीवर आली १९९३ पर्यंत दरवर्षी ६० लाख लोकांची गरिबी कमी करण्यात यश मिळाले. चीनचा बड्या राष्ट्रात समावेश होण्यास सुरुवात झाली.

## २.१० डेंग झीओपिंगच्या सामाजिक सुधारणा

माओच्या मृत्यूनंतर डेंग झीओपिंगने खुल्या अर्थव्यवस्थेद्वारे आर्थिक विकासाला गती देण्याचे कार्य सुरु केले. शेती आणि औद्योगिक प्रगतीला गती मिळाली होती. याच काळात सामाजिक सुधारणांसाठी काही निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी करण्यात आली. कुटुंब नियोजन, शिक्षण गृह निर्माण योजना, सामाजिक आरोग्य यामध्ये प्रगती करण्याचे धोरण स्वीकारले होते.

### १) कुटुंब नियोजन :

चीनच्या वाढत्या लोकसंख्येला नियंत्रित ठेवण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले होते . १९६५ पर्यंत चीनची लोकसंख्या ७२.५ कोटी झाली होती. आर्थिक कमकुवत असणाऱ्या देशासमोर लोकसंख्येचा प्रश्न निर्माण झाला होता. म्हणून डेंग झीओपिंग याने १९७० नंतर कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम देशभर राबवला होता. उशिरा लग्न करणे, एक किंवा दोन मुले असणे या धोरणाचा प्रचार करण्यात आला. कुटुंब नियोजनाची सर्व प्रकारची साधने दिली गेली. शासनाने केलेल्या नियमांचे पालन न करणाऱ्यांना कठोर स्वरूपाची शिक्षा देण्याचे धोरण स्वीकारले गेले. १९९५ पर्यंत लोकसंख्या वाढीचा दर १.०५ टक्के ठेवण्यात आणि लोकसंख्या १२० कोटी राखण्यात यश मिळाले त्यानंतरच्या काळात एक मुल किंवा मुल नको अशी संकल्पना विकसित केली गेली.

**२) शिक्षण :**

कुटुंब नियोजन बरोबरच चीनमधील निरक्षरता कमी करण्यासाठी प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण करण्याला प्राधान्य दिले गेले. चीनमधील मुले शाळेत जातील यासाठी प्रयत्न करण्यात आले. शिक्षणात अपंग मुलांसाठी वेगळी सोय करण्यात आली. प्रौढ आणि तांत्रिक शिक्षणालाही प्राधान्य देण्यात आले. चीनी नागरिक वैचारिक दृष्टीकोनातून परिपक्व व्हावा, सुसंस्कृत व्हावा हे उद्दिष्ट चीनमधील शिक्षणाचे ठेवले होते. पाश्चात्य भाषेचा स्वीकार न करता सर्व स्तरावरील शिक्षणासाठी चीनी भाषा हेच माध्यम स्वीकारण्यात आले. शैक्षणिक प्रसारासाठी वृत्तपत्रे आणि नियतकालिके यांचा प्रसार करण्यात आला. डेंगझीओपिंगने शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले होते. जागतिक घडामोडी समाजापर्यंत पोचवण्यासाठी १९८० मध्ये चायना डेली हे इंग्रजी दैनिक सुरू करण्यात आले.

**३) गृह निर्मिती :**

शिक्षणाबरोबरच समाजाची निवारा ही मुलभूत गरज भागवण्यासाठी ग्रामीण भागापासून घरे बांधण्याचा राष्ट्रव्यापी कार्यक्रम राबवला गेला. शहरातील जागेचे योग्य नियोजन करून घरे बांधण्यात आली १९९५ पर्यंत प्रत्येक व्यक्तीला राहण्यासाठी ८.१ चौरस मीटर जागा उपलब्ध व्हावी अशी योजना करण्यात आली. सार्वजनिक गृहनिर्माण संस्था स्थापन करून त्यांना आर्थिक मदत देण्यात आली. खाजगी तत्वावर ही घरे बांधली गेली.

**४) सार्वजनिक आरोग्य:**

समाजाला सकस आहार, पिण्याचे स्वच्छ पाणी आणि प्रदूषण मुक्त पर्यावरण उपलब्ध व्हावे अश्या योजना केल्या होत्या. समाजाच्या आरोग्यासाठी शासकीय स्तरावर दवाखाने उघडण्यात आले, शासनाच्या माध्यमातून सार्वजनिक आरोग्य सेवा राबवली गेली. समाजामधील पुरुषांचे प्रमाण वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न केले गेले. मुलींना स्वतःचा वर निवडण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले. चीनमध्ये धर्म ही बाब वैयक्तिक जीवनातील ठरवण्यात आली. धर्माचा विचार न करता सर्वांना प्रतिनिधित्व देण्याचे धोरण स्वीकारण्यात आले. सार्वजनिक जीवनात भ्रष्टाचार हा गुन्हा मानला गेला. भ्रष्टाचार करणाऱ्या व्यक्तीला तुरुंगवासाची शिक्षा दिली. यामधून सार्वजनिक आरोग्य व समाजजीवन सुधारण्याचा प्रयत्न केला गेला.

## २.११ समारोप

डेंग झीओपिंग याने चीनमध्ये सुधारणावादी आणि व्यावहारिक आर्थिक धोरण स्वीकारले होते. माओच्या कारकिर्दीमधील बंदिस्त जीवन मुक्त करण्यात आले. मुक्त अर्थव्यवस्थेमुळे परकीय देशातील विचार चीनमध्ये येऊ लागले होते. त्यातून चीनमध्ये लोकशाही विचार व व्यक्तीस्वातंत्र्याचा पुरस्कार करण्यात येऊ लागला. त्यामधून चीनची आर्थिक प्रगती झाली. खुली अर्थव्यवस्था स्वीकारत असताना चीनमधील मुलभूत उद्योग नष्ट होणार नाहीत याकडे लक्ष दिले होते डेंग झीओपिंगने खुल्या आर्थिक विकासाचे वा शांततापूर्ण सहजीवनाचे धोरण स्वीकारले. चीनची प्रचंड लोकसंख्या, प्रादेशिक

विशालता, अण्वस्त्रासह शस्त्रास्त्र निर्मितीतील स्वावलंबन आणि आर्थिक विकासाचा वेग यामुळे चीनचे महासत्तेमध्ये रुपांतर करण्यास डेंगला यश मिळाले होते. १९ फेब्रुवारी १९९७ रोजी डेंग झीओपिंगचा मृत्यू झाला.

## २.१२ प्रश्न

१) डेंग झीओपिंगच्या आर्थिक सुधारणावर निबंध लिहा.

२) डेंग झीओपिंगच्या सामाजिक सुधारणाची चर्चा करा.

३) डेंग झीओपिंगच्या कार्याची माहिती लिहा.

## २.१३ संदर्भ

१) कदम य. ना., "समकालीन आधुनिक जग", फडके प्रकाशन, कोल्हापूर, जानेवारी २००१

२) भिडे गजानन, "चीन आणि जपानचा इतिहास", फडके प्रकाशन, कोल्हापूर, मार्च २००२

३) शिंदे सुभाष, "समकालीन जग", शेठ प्रकाशन, मुंबई, जानेवारी २००६

४) भामरे जितेंद्र, "आशियाचा इतिहास", शेठ प्रकाशन, मुंबई, जानेवारी २००६

❖❖❖❖

munotes.in

# ३

## चीनचे परराष्ट्रीय धोरण व रशियाबरोबरचे संबंध

**घटक रचना**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ चीनचे परराष्ट्रीय धोरण

३.३ चीन व रशिया संबंध

३.४ फेब्रुवारी १९५० चा करार

३.५ चीन रशिया १९५७ चा करार

३.६ रशियाची स्टालिनविरोधी भूमिका

३.७ आंतरराष्ट्रीय घडामोडीतून मतभेद

३.८ अण्वस्त्र प्रसार बंदी करार

३.९ युद्धबंदी व फौजांची माघार

३.१० डेंग झीओपिंग धोरण

३.१२ चीन-रशिया संबंधाचा सुधार

३.१३ समारोप

३.१४ प्रश्न

३.१५ संदर्भ

## ३.० उद्दिष्टे

१) चीनचे परराष्ट्र धोरण समजून घेणे.

२) चीनच्या परराष्ट्र धोरणातील तत्वे अभ्यासणे.

३) चीन आणि रशिया संबंधाचे परीक्षण करणे.

४) चीन आणि रशिया संबंधातील संघर्षाचे स्वरूप पाहणे.

munotes.in

## ३.१ प्रस्तावना

१९४९ला साम्यवादी क्रांतीनंतर चीनला आशिया खंडात महत्वाचे स्थान प्राप्त झाले. चीनने जागतिक स्तरावर आपल्या परराष्ट्र धोरणाद्वारे प्रबळ साम्यवादी राष्ट्र म्हणून वाटचाल केली होती. चीनने एक स्वतंत्र व सार्वभौम राष्ट्र म्हणून महत्व वाढवण्यास सुरवात केली. साम्यवादी क्रांती करणारे चीन आशिया खंडातील पहिले राष्ट्र होते. म्हणून चीनचे परराष्ट्र धोरण वैशिष्टयपूर्ण असणारे होते. चीनने परराष्ट्र धोरणात साम्यवादाचा जगभर प्रसार करणे, साम्यवादी चळवळ यशस्वी करणे व तिचे नेतृत्व करणे यावर भर दिला.

## ३.२ चीनचे परराष्ट्रीय धोरण

चीनमध्ये कम्युनिस्ट क्रांती झाल्यानंतर चीनने कम्युनिस्ट विचारांचा जागतिक प्रसार करण्याचे धोरण स्वीकारले होते. शेजारील राष्ट्रातील कम्युनिस्टांना आर्थिक आणि लष्करी मदत देण्याचे धोरण स्वीकारले गेले. कम्युनिस्ट राज्यक्रांती धोरणांचाच तो एक भाग होता. सप्टेंबर १९४९ मध्ये कम्युनिस्ट क्रांतीनंतर घटनात्मकदृष्ट्या माओ-त्से-तुंगने चीनचे प्रजासत्ताक जाहीर केले. जगातील सर्व देशांनी चिनी प्रजासत्ताकाला राजनैतिक मान्यता देण्याविषयी आव्हान करण्यात आले. त्यानुसार कम्युनिस्टांची सत्ता असणाऱ्या देशांनी तात्काळ  मान्यता दिली युगोस्लाव्हिया, नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क, इस्त्रायल,  नेदरलँड्स, स्वित्झर्लंड, इंग्लंड, तसेच भारत, अफगाणिस्तान, ब्रह्मदेश, पाकिस्तान, श्रीलंका, इंडोनेशिया या कम्युनिस्टतेत्तर देशांनी १९५० पर्यंत राजनैतिक मान्यता दिली. १९५१ पर्यंत २६राष्ट्रांनी  राजनैतिक दर्जा दिला. चीनला संयुक्त राष्ट्राचे सदस्यत्व मिळावे अशी विनंती चीनने संयुक्त राष्ट्रसंघाकडे केली. चीनला संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेचे कायम सदस्यत्व द्यावे अशी मागणी केली. अमेरिका आणि अमेरिकेच्या गटात असणाऱ्या राष्ट्रांनी चीनला  मान्यता देण्यास नकार दिला. क्रांतीनंतरच्या वीस वर्षात चीनने आर्थिक आघाडीवर लक्षणीय यश मिळवले होते. तिचा आंतरराष्ट्रीय व्यापारही वाढीस लागला होता, अमेरिकेतील व्यापारी वर्ग आणि औद्योगिक कंपन्यांकडून तात्कालीन अध्यक्ष रिचर्ड निक्सन यांच्यावर चीनचे बाजारपेठ मिळवण्यासाठी प्रचंड दबाव येऊ लागला शेवटी अमेरिकेने १९७१ मध्ये मान्यता दिली. यामुळे संयुक्त राष्ट्रसंघाचे सदस्यत्व २६ ऑक्टोबर १९७१ रोजी मिळाले.

## ३.३ चीन व रशिया संबंध

चीनमध्ये कम्युनिस्ट क्रांती झाल्यानंतर चीन व रशिया या दोन देशांमध्ये मैत्रीचे संबंध निर्माण झाले. प्रथमता चीनमध्ये कम्युनिस्ट विचारसरणीचे रोपण करण्यात रशियाने मदत केली होती. पुढे क्रांतिकार्यात रशियाने खूप मदत केली. रशियाला आंतरराष्ट्रीय राजकारणात चीनच्या रुपाने एक मित्र मिळाला होता. जिनेव्हा परिषदेसाठी सर्व आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सतत पाठिंबा व्यक्त केला. महायुद्धांच्या युद्धात आज सत्तांच्या शीतयुद्धात चीनही रशियाच्या सदैव पाठीशी राहिला होता. चिनी क्रांतीला विरोध करणाऱ्या या अमेरिकेबाबत रशियाने खंबीर भूमिका घ्यावी त्यासाठी युद्ध पत्करावे लागले तरी चालेल अशी चीनची रशियाबद्दल अपेक्षा होती. परंतु चीनच्या या धोरणाला रशियाचा ठाम विरोध होता. कारण रशिया आणि अमेरिका या महासत्तांमध्ये युद्ध झाल्यास त्यांचा वापर होईल

munotes.in

आणि त्याचा अमेरिका-रशिया बरोबर सगळ्या मानवजातीच्या अस्तित्वास धोका निर्माण होईल असे त्याचे मत होते, परंतु रशियाचे हे धोरण चीनला नापसंत होते. यामधून चीन आणि रशिया मध्ये काही प्रमाणात मतभेद निर्माण झाले. १९५६ पर्यंत चीन आणि रशिया यांच्यात मैत्रीचे संबंध होते परंतु रशियाचा हुकूमशहा स्टॅलिनचा १९५३ला मृत्यू झाल्यानंतर सत्तेवर आलेल्या निकिता क्रुश्चेव आदी नेत्यांनी स्टॅलिनवर टीका करण्यास सुरुवात केली आणि पत्रकारांना आणि चिनी नेत्यांना ही टीका मान्य नव्हती. स्टॅलिन वर टीका म्हणजे माओ-त्से-तुंग वर टीका असा अर्थ चिनी प्रेसने लावला. ऑगस्ट १९५७ मध्ये रशियाने आंतरखंडीय क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी केली १९५७ मध्ये स्फुटनिक उपग्रह आकाशात सोडला. १९५७ मध्ये माओ-त्से-तुंग ने रशियाला भेट दिली. माओने रशियाने जे सामर्थ्य प्राप्त केले त्याचा उपयोग कम्युनिस्ट पक्षाचा विस्तार करण्यासाठी करावा असा आग्रह धरला . क्रुश्चेव ने माओच्या सूचनेला प्रतिसाद दिला नाही या घटनेपासून रशिया-चीन संबंधात दुरावा निर्माण झाला. चीन-भारत संघर्षांमध्ये रशियाने चीन विरुद्ध भारताला पाठिंबा दिला होता ही गोष्ट चीनला सलत होती. यातील चीन रशिया सीमाप्रश्नाबाबत संबंध ताणले गेले होते.

## ३.४ फेब्रुवारी १९५० चा करार

चीनच्या परराष्ट्र नीतीची सुरुवात रशियाबरोबर झाली. साम्यवादी चीनला सर्वात प्रथम जागतिक मान्यता रशियाने दिलेली होती. यामुळेच १९४९ मध्ये बीजिंग चिनी सरकार स्थापन झाल्याबरोबर डिसेंबर १९४९ मध्ये माओने सर्वप्रथम मास्कोला भेट देण्याचे ठरवले. त्यातून चीन व रशियाने फेब्रुवारी १९५०मध्ये तीस वर्षे मुदतीचा परस्पर सहकार्य व मैत्री सामंजस्य करार केला. (जपानच्या आणि मित्रांनी चीन व रशिया यांच्या वरील आक्रमणानंतर दोन्ही राष्ट्रीय आपापसात सहकार्याची भावना ठेवतील व एकमेकांचे संरक्षण करण्यासाठी एकत्र येतील असे ठरले.) चांग-च्यून रेल्वे, दयरन आणि पोर्ट बंदर चीनकडे ठेवावे, चीनला आर्थिक विकासाकरिता रशियाकडून आर्थिक मदत मिळावी, मंगोलियन गणराज्याच्या स्वातंत्र्यास चीन व रशियाने मान्यता द्यावी, दुसऱ्या महायुद्धात जपानकडून मिळवलेली मांचूरियाची सर्व मालमत्ता रशियाने चीनला द्यावी, रशियाने पेकिंगमधील आपले लष्करी तळ चीनकडे द्यावेत. इ. कलमांचा स्वीकार करण्यात आला.

दोन्ही देशांमधील कराराचे सर्वात महत्त्वाचे तरतूद अशी की दोन्ही देशांमध्ये आर्थिक व सांस्कृतिक विकास करणे आणि साध्य करण्यासाठी चीन व रशियाने एकमेकांना सर्व प्रकारचे आर्थिक सहकार्य करावे हे मुख्य धोरण होते. चीनबरोबर करार झाल्याबरोबर रशियाने चीनच्या आर्थिक व तांत्रिक विकासासाठी रशियन सल्लागार तज्ञ चीनमध्ये पाठवण्यास सुरुवात केली. रशियाने चीनला लष्करी व आर्थिक मदत प्रत्यक्ष पाठवण्यास सुरुवात केली. सायबेरिया ते मंचुरिया हे रशियाने बांधलेले रेल्वेसेवा आता संयुक्तपणे चीन व रशिया व्यवस्थापन करतील असे ठरले. त्या बदल्यात रशियाला डेरियन बंदर व पोर्ट ऑर्थरपर्यंत नाविक तळाची मुभा मिळाली. चीन आणि रशियामध्ये मैत्री संबंध असल्याने चीनच्या विकासाला गती आली .

## ३.५ चीन रशिया १९५७ चा करार

१५ ऑक्टोबर १९५७ मध्ये रशियाने करार करून चीनला अण्वस्त्र निर्मितीसाठी भांडवल, ज्ञान आणि तंत्रज्ञ पुरवण्याचे मान्य केले. त्यानंतर चीनमध्ये अण्वस्त्र निर्मिती सुरु झाली. १९५८ मध्ये ४७ प्रकल्पांना ,१९५९ मध्ये ३१ प्रकल्पांना रशियाने अर्थसहाय्य पुरवले. या मैत्री कराराने चीनला अण्वस्त्र निर्मितीबरोबर औषधी, पोलाद, शेती अवजारे यांचे कारखाने, वीजनिर्मिती आणि अवजड यंत्र निर्मिती सुरु करता आली.

रशियाने तांत्रिक शिक्षण चीनला दिले. तंत्रज्ञ पुरवले. चीनची औद्योगिक प्रगती आधुनिक पद्धतीने सुरु झाली. रशियातून उच्च शिक्षण घेऊन आलेले तरुण चीनच्या औद्योगिक व अण्वस्त्र क्षेत्रात भर घालू लागले, पंचवार्षिक योजनेसाठी देखील रशियाची मदत चीनला मिळू लागली यामुळे चीन रशियाकडे आदराने पाहू लागला.

## ३.६ रशियाची स्टॅलिन विरोधी भूमिका

चीन आणि रशियामध्ये १९५७च्या दरम्यान वितृष्ट येण्यास सुरुवात केली. त्याचे खरे कारण म्हणजे चीनमध्ये आलेला आत्मविश्वास, ज्यामुळे साम्यवादी गटांमध्ये समान दर्जा मिळवण्याची इच्छा याविषयी चीनच्या प्रत्यक्ष मागण्या व थोडेसे रशिया आणि चीनमध्ये सैद्धांतिक मतभेद होण्यास सुरुवात झाली. १९५३ मध्ये स्टॅलिन मृत्यू पावल्यानंतर त्याचा वारसदार कोण हे ठरले नव्हते. १९५६ मध्ये निकिता क्रुश्चेव्ह हा रशियन सुधारणावादी नव्याने समोर आला. त्याने स्टॅलिनवाद नष्ट करण्यासाठी प्रयत्न केले. १९५६ च्या रशियन साम्यवादी पक्षाच्या अधिवेशनात निकिता क्रुश्चेव्ह यांनी स्टॅलिनचा निषेध केला. त्यामुळे त्याच्या प्रतिमेला हादरा बसला. माओनी रशियाचा निषेध केला. कारण चीनला रशियाने विश्वासात न घेता हा बदल घडवून आणला होता. क्रुश्चेव्हने याच काळात साम्यवादी देशावरील रशियाचे नियंत्रण काही प्रमाणात शिथिल करण्यास सुरुवात केली. यातून पूर्व युरोपातील हंगेरियाने १९५६ मध्ये सोवियत संघाविरुद्ध बंड पुकारले. ते बंड मोडून काढण्यासाठी रशियन फौजा हंगेरीत दाखल झाल्या. या प्रकारावर चीनने रशियावर टीका केली. क्रुश्चेव्हने शांतीपूर्ण सहअस्तित्वाचा नीतीचा पुरस्कार केला. त्यामुळे रशिया आणि चीन यांचे संबंध बिघडण्यास सुरुवात झाली. रशियाने शांतीपूर्ण नितीनेच साम्यवादाचा प्रसार जगात करता येईल असे धोरण आखले. चीन या सिद्धांताशी पूर्णपणे असहमत होता. चीनच्या मते, युद्ध नीतीच व्हिएतनामसारख्या अशियन देशात साम्यवादाचा प्रचार व प्रसार व स्थापना करण्यास आवश्यक आहे याच्यातूनही चीन आणि रशियामध्ये मतभेद निर्माण झाले. १९५८ च्या ऑगस्टमध्ये चीनने तैवाने राष्ट्रीय सरकारच्या ताब्यातील क्ले मौर्य व मत्स्य बेटे आपल्या नियंत्रणात घेण्याचे ठरवले या धोरणाला रशियाने विरोध केला होता. यामुळे चीन आणि रशियाच्या परराष्ट्र नीतीमध्ये समन्वयाचा अभाव दिसून येतो. यामुळे चीन राज्याविषयी अविश्वास वाटू लागला. १९५८ मध्ये चीनने भविष्याप्रत हनुमान उडी आर्थिक विकास कार्यक्रम जाहीर केलेला होता. याच्याच आधारे आपण रशियापेक्षा पुढे जाऊ असे वाटत होते क्रुश्चेव्हने चिनी साम्यवादाच्या जुनाट व निकामी धोरणावर टीका केली. सप्टेंबर १९५९ मध्ये क्रुश्चेव्हने अमेरिकेला सदिच्छा भेट दिली ते चीनला आवडले नाही १९६० मध्ये चीनने रशियाच्या शांतीपूर्ण सहअस्तित्वाच्या धोरणाला कठोर विरोध

munotes.in

करण्यास सुरुवात केली. या वैचारिक मतभेदामुळे क्रुश्चेव्हने चीनमधून रशियन तज्ञ व तंत्रज्ञ परत बोलावले व चीनला दिलेली आर्थिक मदत ताबडतोब थांबवण्याचे आदेश दिले.

## ३.७ आंतरराष्ट्रीय घडामोडीतून मतभेद

१९६२ मध्ये चीनने भारतीय प्रदेशावर आक्रमण केले. भारत-चीन युद्धास तोंड फुटले. त्यावेळेस रशियाने पूर्णपणे तटस्थपणाची भूमिका घेतली. एवढेच नाही तर भारताला लढाऊ विमानेसुद्धा पुरवली. यामुळे चीन अधिकच दुखावला गेला. रशियाने आपली क्षेपणास्त्रे क्युबामध्ये उभारले. याबद्दल चीनने रशियाला आपला पाठिंबा जाहीर केला. परंतु त्याच वेळेला अमेरिकेच्या दबावापुढे नमते घेऊन रशियाने माघार घेतली तेव्हा चिनी नेत्यांनी रशिया व धाडसीपणा व नंतर शरणागती अशी जाहीर टीका केली. १९६२ मध्ये सिकीयांग सरहद्दीचा प्रश्न दोन्ही राष्ट्रांमध्ये महत्त्वाच्या वादाचा मुद्दा ठरला. चेन्नई रशियावर असा आरोप केला, की रशियाने चीनच्या सिकीयांगभागातील ६००० लोकांना आपल्या प्रदेशात घेतले आहे. त्यामुळे चीनने त्यांना पुन्हा चीनमध्ये परतण्यास बंदी घातली. चीन-रशिया सरहद्दीचा मुद्दा पुढे करून चीनने झारच्या राजवटीमध्ये चीनबरोबर झालेले तह व करार अन्यायकारक व विषम असल्याचे सांगण्यास सुरुवात केली.

## ३.८ अण्वस्त्र प्रसार बंदी करार

जुलै १९६३ मध्ये इंग्लंड, अमेरिका आणि रशिया यांनी मास्को येथे अण्वस्त्र प्रसार बंदी करारावर स्वाक्षरी केली. त्यामुळे चीनने रशियावर चीनला आण्विक गटापासून अलग ठेवण्याचा आरोप केला. रशियाने चीनपेक्षा पाश्चिमात्य राष्ट्रांना आपले मित्र मानले, त्यामुळे १९६४ मध्ये पेकिंग येथे रशिया-चीन सरहद्दीच्या प्रश्नावर बोलणे सुरू झाले पण एकमत न झाल्याने ती ताबडतोब विस्कटली. व्हिएतनाम युद्धाच्या वेळी चीन आणि रशियाने संयुक्त कृती करावी अशी अपेक्षा रशियाची होती, परंतु चीनला हे मान्य नव्हते. या उलट रशियाची व्हिएतनामला चीनमार्गे जाणारी हवाई मदत रोखण्याचे ठरवले. माओनी रशियाच्या संयुक्त कृती प्रस्ताव कठोरपणे ठोकरला. त्यामुळे चीन आणि रशियामधील मतभेद उघड झालेले दिसून येतात.१९६८ मध्ये रशियाने झेकोस्लाव्हाकीयावर हल्ला केला त्याचा चीनने स्पष्ट शब्दात निषेध केला. २ मार्च १९६९ मध्ये उसुरी नदीतील दमानस्की बेटाबाबत दोन्ही राष्ट्रांमध्ये संघर्ष उदभवला.

## ३.९ युद्धबंदी व फौजांचे माघार

११ सप्टेंबर १९६९ रोजी रशियन पंतप्रधान कोसिजिन यांना श्रद्धांजली आटोपून पेकिंग येथे चीनच्या बरोबर बोलणे करण्यासाठी उतरले. त्यावेळेला उभयतांमध्ये ताबडतोब युद्ध बंदी व फौजा घेण्याचे ठरवले. त्याचे करारात रूपांतर ७ ऑक्टोबर ते २० ऑक्टोबर १९६९ रोजी झाले १९७९ मध्ये चीनने कंबोडियाचे संरक्षण करण्यासाठी व्हिएतनामवर आक्रमण केले. त्याचा रशियाने जाहीर निषेध केला. १९७९ च्या दरम्यान रशियाने अफगाणिस्तानवर आक्रमण केले आणि चीन-रशिया शांतीवाती संपुष्टात आली. त्यातच चीनने रशियाचे अफगाणिस्तान बरोबर कराराचा पुन्हा उल्लेख केला. १९८२ मध्ये चीन-रशिया प्रश्नावर बोलणे पुन्हा सुरू झाले. १९८८ मध्ये अफगाणिस्तान व्हिएतनाम व

कंबोडियामधून रशियन व चिनी फौजा मागे घेण्याच्या निर्णयामुळे पुन्हा चीन-रशिया संबंध सुधारू लागले.

## ३.१० डेंग झीओपिंग धोरण

डेंग झीओपिंग यांनी चीनच्या परराष्ट्र नितीबद्दल सखोल विचार केला होता. शांतता आणि विकास हे चीनच्या परराष्ट्र धोरणाची वैशिष्ट्ये होती. रशिया आणि भारत यांच्याबरोबर सीमा प्रश्न बाजूला ठेवून आर्थिक, व्यापारी सांस्कृतिक संबंध प्रस्तापित केले. याच काळात सोव्हिअत रशियाच्या विघटनाच्या हालचाली सुरु झाल्या होत्या. त्याचा चीनवर परिणाम होण्याची शक्यता होती. रशियाच्या विघटनानंतर चीनच्या अस्तित्वाला धोका होता. म्हणून अमेरिकेच्या महासत्तापदास विरोध करण्यासाठी रशियाबरोबर करार केला. ३१ डिसेंबर १९९१ मध्ये रशियाचे विघटन होऊन नवीन क्रांती करण्यात आली.

## ३.११ चीन रशिया संबंधाचा सुधार

१९९० च्या दशकात चीनने रशियाकडून शस्त्रास्त्रे व इतर लष्करी सामग्री आयात करण्यामध्ये रस दाखवला. दोन्ही देशांना दोन्ही देशांचे संबंध सुधारण्यास मदत झाली. १९९२ मध्ये उभय देशांमध्ये लष्करी तज्ञांची देवाण-घेवाण करण्यात सुरुवात झाली. तसेच शस्त्राचा आयात-निर्यात विषयी करार होण्यास सुरुवात झाली १९९४ ते ९६ च्या दरम्यान चीन हे रशियन शस्त्रांसाठी एक महत्त्वाची बाजारपेठ झाली होती. रशियाने चीनला लढाऊ विमाने, बलाढ्य पाणबुड्या दिल्या होत्या. तसेच रशियाने कच्चामाल, धातू यांचे तंत्रज्ञान याच्या व्यापाराबाबतीत चीनबरोबर संतुलन राखले होते. तसेच दोघांनी अमेरिकेबाबतची आपली भूमिका निश्चित केली होती. यानंतर १९९६ मध्ये रशियाने चीनला दोन बिलियन अमेरिकन डॉलर्सची मदत करण्याची घोषणा केली.

वरील गोष्टीवरून आपल्या असे निदर्शनास येते की, चीनने रशिया बाबत नेहमीच आक्रमक भूमिका घेऊन रशियाला सतत विरोध केला, परंतु आंतरराष्ट्रीय स्तरावर रशियाला शांतता परस्पर सहकार्य शांतीपूर्ण सहअस्तित्व यांचे महत्त्व माहीत असल्यामुळे शेवटी उभय देशातील संबंध सुधारण्यास रशियाने पुढाकार घेतला आणि या परराष्ट्रीय धोरणाचे महत्त्व चीनलादेखील समजले.

## ३.१२ समारोप

चीन आणि रशिया या साम्यवादी देशाच्या आंतरराष्ट्रीय राजकारणात सतत तणाव राहिला होता. मार्क्सवादी विचारसरणी असतानाही त्याची पूर्तता करण्याचे मार्ग भिन्न होते. यामध्ये वैचारिक मतभेदापेक्षा राष्ट्रीय स्वार्थ, राजकारणातील मतभेद यांचा प्रभाव अधिक आहे. हा मतभेद तणावपूर्ण सत्ता-स्पर्धेतून पुढे आला. जागतिक साम्यवादी स्पर्धेत आपणाला महत्वाचे स्थान असावे अशीही महत्त्वाकांक्षी स्पर्धा दिसून येते.

munotes.in

## ३.१३ प्रश्न

१) चीनच्या परराष्ट्र धोरणाचा आढावा घ्या.

२) माओकालीन चीनच्या परराष्ट्र धोरणाची चर्चा करा.

३) चीन आणि रशिया संबंधाचे मूल्यमापन करा.

४) डेंग झीओपिंगकालीन परराष्ट्र धोरणावर निबंध लिहा.

५) चीन आणि रशिया तणावाच्या संबंधाचे विश्लेषण करा.

## ३.१४ संदर्भ

१) कदम य. ना., “समकालीन आधुनिक जग”, फडके प्रकाशन, कोल्हापूर, जानेवारी २००१.
२) भिडे गजानन, “चीन आणि जपानचा इतिहास”, फडके प्रकाशन, कोल्हापूर, मार्च २००२.
३) शिंदे सुभाष, “समकालीन जग”, शेठ प्रकाशन, मुंबई, जानेवारी २००६.
४) भामरे जितेंद्र, “आशियाचा इतिहास”, शेठ प्रकाशन, मुंबई, जानेवारी २००६.

❖❖❖❖

munotes.in

# ४

# अमेरिकेचे जपानवरील वर्चस्व

**घटक रचना**

४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ दुसरे महायुद्धात जपानचा सहभाग

४.३ दुसऱ्या महायुद्धात जपानचा पराभव व परिणाम.

४.४ जपानचे आर्थिक नुकसान

४.५ स्कॅप प्रशासन

४.६ अमेरिका जपान संबंध

४.७ जपान-अमेरिका व्यापारी संबंध

४.८ समारोप

४.९ प्रश्न

४.१० संदर्भ

## ४.० उद्दिष्टे

१. दुसऱ्या महायुद्धात जपान कसे सहभागी झाले हे जाणून घेणे.

२. दुसऱ्या महायुद्धात जपानचा पराभव व परिणामांचा आढावा घेणे.

३. स्कॅप प्रशासनाविषयी जाणून घेणे.

४. अमेरिका व जपान संबंध जाणून घेणे.

५. अमेरिकेने दुसऱ्या महायुद्धानंतर जपानवर मिळवलेल्या वर्चस्वाची माहिती घेणे.

## ४.१ प्रस्तावना

दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका आणि रशिया यांचा महाशक्ती म्हणून जगाच्या राजकारणात उदय झाला. ही घटना जगाच्या इतिहासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मानली जाते. अमेरिका आणि रशियाची मदत घेऊनच ग्रेट ब्रिटन आणि फ्रान्स यांना

munotes.in

जर्मनी आणि जपान यांचा पराभव करावा लागला. जर्मनीने शरणागती घेतली तरीसुद्धा जपान शरणागतीस तयार नव्हते, म्हणून शेवटी अमेरिकेला जपानवर प्रथमच अणूबॉम्ब टाकावे लागले. त्यामुळे हिरोशिमा आणि नागासाकी ही शहरे पूर्णपणे उध्वस्त झाली आणि अणुबॉम्बचे विध्वंसक स्वरूप पाहून शेवटी जपानने शरणागती घेतली. जोपर्यंत जपान आणि जर्मनी यांचा पराभव करण्याचे ध्येय अमेरिका आणि रशिया आणि अन्य पाश्चिमात्य राष्ट्रांच्या डोळ्यासमोर होते, तोपर्यंत त्यांचे आपापसातील मतभेद एका विशिष्ट मर्यादेपर्यंत नियंत्रित राहिले. परंतु जर्मनी आणि जपानचा पराभव झाल्यानंतर मात्र त्यांचे आपापसातील स्पर्धा उफाळून आली. त्यांच्या राजकीय प्रणाली एकमेकांच्या अगदी विरुद्ध असल्यामुळे त्यांच्यात एकमेकांमध्ये कटू स्पर्धा निर्माण झाल्या. थोडक्यात, साम्यवाद विरुद्ध भांडवलशाही राष्ट्रीय संघर्ष निर्माण झाला आणि त्याचे परिणाम सर्वच राष्ट्रांना भोगावे लागले. त्यामधील सर्वात महत्त्वाचे राष्ट्र म्हणजेच जपान होय. उगवत्या सूर्याचा देश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जपानला आता अणुबॉम्बच्या स्फोटकामुळे सूर्यास्त झाला होता. त्यामुळेच जपानची पूर्ण अर्थव्यवस्थाही कोलमडून पडली होती. सरते शेवटी अमेरिकेने पूर्णपणे जपानचा ताबा घेतलाच. याचा सविस्तर वृत्तांत आपण पुढील प्रमाणे पाहू.

## ४.२ दुसऱ्या महायुद्धात जपानचा सहभाग

संपूर्ण जगाने महाविनाशक असे जागतिक पहिले महायुद्ध पाहिल्यामुळे दुसरे महायुद्ध निर्माण करण्यापूर्वी संपूर्ण युरोपातील राज्य आपल्या परिणामांचा दूरवर विचार करतील व असे युद्ध टाळतील असे अपेक्षा होती. परंतु ती अपेक्षा फोल ठरली इ.स.१९१९ ते १९३९ या कालखंडात कोणाचाच कोणावर विश्वास उरलेला नव्हता सर्व वातावरण सुडानी भरलेले होते. स्वतःची सुरक्षितता टिकवण्याकरिता शस्त्रसज्ज होण्याची स्पर्धा निर्माण झाली होती. अशा परिस्थितीत युद्ध झाले नसते या असंतोषाचा भडका उडाला नसता तरच आश्चर्य काय, सर्व जगात युद्धखोर हुकूमशाहाचे वर्चस्व प्रस्थापित झाल्याने त्याचा जो परिणाम व्हायचा होता तोच झाला. इ.स.वी १९३९ मध्ये दुसऱ्या महायुद्धास प्रारंभ झाला. व्हर्सायच्या तहाचा हिटलरने सूड घेण्यास प्रारंभ केला. अतिशय थोडयाच कालावधीतील अकराळ विकराळ युद्धात सारे जग उतरले गेले.

त्यातच ७ डिसेंबर १९४१ रोजी जपानने अमेरिकेच्या पर्ल हार्बर येथील नाविक तळावर अकस्मित हल्ला चढविला. अमेरिकेच्या पॅसिफिक नौदलाने जपानच्या आग्नेय आशियातील साम्राज्यविस्तारस ब्रिटन, नेदरलँड आणि अमेरिकेच्या ताब्यातील प्रांताना विरुद्ध आखण्यात आलेल्या लष्करी कारवायात अडथळा आणू नये म्हणून जपानने १९४१ च्या सकाळी हा हल्ला केला. ३५३ जपानी लढाऊ विमाने, बॉम्ब आणि टार्पर्डो विमाने यांचा वापर करून तळावर हल्ला केला. अमेरिका नौदलाच्या आठही लढाऊ जहाजांचे प्रचंड नुकसान झाले. अमेरिकेचे १८८ विमाने नष्ट झाली. २,४०२ अमेरिकन लोक मृत्युमुखी पडले. या अनपेक्षित हल्ल्याने अमेरिकन जनतेला प्रचंड धक्का बसला व त्याने अमेरिकेला दुसऱ्या महायुद्धास उतरण्यास भाग पाडले. ८ डिसेंबर १९४१ रोजी

अमेरिकेने अधिकृतरित्या जपानविरुद्ध युद्ध पुकारले. अशाप्रकारे पर्ल हार्बर जपानने केलेल्या हल्ल्याच्या कारणास्तव अमेरिका युद्धात सहभागी झाले.

## ४.३ दुसऱ्या महायुद्धात जपानचा पराभव व परिणाम

सुरुवातीपासूनच जपान हा देश अतिशय महत्त्वकांक्षी राष्ट्र म्हणून परिचयास होता. त्यातच दुसरे महायुद्ध सुरू होताच त्याने दुसऱ्या महायुद्धात अक्षराष्ट्र गटाच्या बाजूने व मित्र राष्ट्राच्या विरुद्ध लढत होते. १९३० च्या दशकात जपानची साम्राज्यवादी भूक प्रकर्षाने वाढली होती. तिच्या आर्थिक प्रगतीमुळे, वाढत्या लोकसंख्येमुळे व औद्योगीकरणामुळे जपानला इंग्लंड व फ्रान्सप्रमाणे आपल्यालाही वसाहती असाव्यात जेणेकरून तेथून उद्योगाला लागणारा कच्चामाल मिळेल व पक्का माल विकता येईल. शेतीची उत्पादने वसाहतीमधून जपानमध्ये नेता येतील. एवढेच नव्हे तर अतिरिक्त जपानी लोकांना ह्या वसाहतीत पाठवल्यामुळे जपानमधील वाढत्या लोकसंख्येच्या घनतेची समस्या सोडवता येईल असे जपानला वाटले.

जपानला जवळजवळ संपूर्ण अतिपूर्वक व जमल्यास सर्व आशिया खंडावर प्रभुत्व प्रस्थापित करण्याची महत्त्वकांक्षा होती. जपानला चांगल्या प्रकारे माहित होते की, त्याच्या या साम्राज्यवादाच्या धोरणास अमेरिकेकडून कडवा विरोध होऊ शकतो त्यामुळे जपानी ०७ डिसेंबर १९४१ रोजी अमेरिकेच्या प्रशांत महासागरातील 'पर्लहार्बर' ह्या नाविक तळावर हल्ला चढवला जपानला वाटले ह्या हल्ल्यामुळे अमेरिकेचे खच्चीकरण होईल व अमेरिका या हल्ल्यातून सावरेपर्यंत जपानच्या आशिया काबीज करण्याच्या मार्गात कोणताही अडथळा आणू शकणार नाही. किंबहुना अमेरिका ह्या धक्क्यातून वर येईपर्यंत जपानी आशिया गिळंकृत करण्याचे कार्य यशस्वीरित्या संपवलेले असेल असे जपानला वाटत होते. जपानला अमेरिकेच्या खऱ्या ताकदीची व सामर्थ्याची तीळमात्र ही कल्पना नव्हती. अमेरिकेने दुसऱ्या दिवशी म्हणजेच ८ डिसेंबर १९४१ रोजी जपानविरुद्ध युद्ध घोषित केले. पाठोपाठ इंग्लंड, हॉलंड, चीन व इतर राष्ट्रांनी देखील जपानविरुद्ध युद्ध घोषित केले. याचाच अर्थ असा आहे की, या हल्ल्यानंतर अमेरिका दुसऱ्या महायुद्धात मित्र राष्ट्रांच्या बाजूने जपान व अक्ष राष्ट्राच्या विरोधात उतरली होती. दुसऱ्या महायुद्धाच्या शेवट १९४५ साली झाला. जपान ह्या युद्धात हार मानण्यास तयार नव्हते. जपानला साध्या व सरळ मार्गाने हरवणे अशक्य आहे. असे लक्षात आल्यावर अमेरिकेने जपान विरुद्ध अणुबॉम्बचा वापर करण्याचे निर्णय घेतला. अमेरिकेने अनुक्रमे ६ ऑगस्ट व ९ ऑगस्ट १९४५ रोजी जपानच्या हिरोशिमा व नागासाकी या दोन शहरांवर अनुबॉम्ब टाकले. या हल्ल्यात ही दोन्ही जपानी शहरे बेचिराख होऊन गेले. शेवटी जपानचा सम्राट 'हिरोहीटो' यांनी १५ ऑगस्ट १९४५ जपानी रेडिओवर जपान दुसऱ्या महायुद्धातून बिनशर्त माघार घेत असल्याची घोषणा केली. २ सप्टेंबर १९४५ रोजी अमेरिकेच्या 'मिसुरी' नामक युद्धनौकेवर शरणागती समारंभाचे आयोजन करण्यात आले. व जपानने दुसऱ्या महायुद्धात अधिकृतरित्या माघार घेतली असे घोषित केले.

## ४.३ दुसऱ्या महायुद्धाचे जपानवरील परिणाम

१. जपानी व्यापारी जहाजांची अमेरिकन नौदलाने अफाट हानी केली. जपानी शहरे, औद्योगिक केंद्र, विमानतळ, रेल्वे, बंदरे यावर मिळून १९४५ प्रारंभपर्यंत एक लक्ष टन बॉम्ब टाकण्यात आले. योकोहामा व टोकियो ही शहरे म्हणजे केवळ सांगाडेच बनली होती जपानच्या या हल्ल्यामुळे या शहरांची प्रचंड हानी झाली होती.

२. ६७ मैल व ३ ते २० मैल रुंद असलेल्या 'ओकीनावा' बेटावर ५०० तोफा आणि ७० हजार जपानी सैनिक बेटांच्या रक्षणार्थ सिद्ध होते. १ एप्रिलला पहिले अमेरिकन सैन्यदल ओकिनावा बेटावर उतरल्यापासून जपानने आपल्या प्राणांची बाजी लावून, बेटाच्या रक्षणार्थ तिखट प्रतिकार केला. १८ जूनला या मोहिमेचा अमेरिकन प्रमुख बर्कन ठार झाला, तर २२ जूनला जपानी सेना प्रमुख उशीजिमा यांनी हाराकिरी केली. बेटावरील सामान्य जपानी नागरिकांनी शरण यावे यासाठी अमेरिकन सैन्याने प्रयत्न केला. परंतु सामान्य जपानी नागरिकांनी शरणागती ऐवजी मृत्यु स्वीकारला याही लढाईत ओकिनावा बेटावरील १ लक्ष ९ हजार ५०० जपानी ठार झाले. सामान्य जपानी नागरिकांसह अवघ्या जपानाने अमेरिकन सैन्यापुढे शरणागती पत्करली.

३. ऑगस्ट रोजी अमेरिकेने हिरोशिमा या शहरावर अणुबॉम्ब टाकला. या अणुबॉम्बच्या हल्ल्यात ७८ हजार नागरिक जागच्याजागी ठार झाले. १० हजारांचा पत्ता लागला नाही आणि ३७ हजार भाजले व जायबंदी झाले. गँमा किरणामुळे पुढे किती जणांना भयानक रोग जडले त्याची गणतीही अशक्य ठरली. ९ ऑगस्टला नागासाकी यावर अमेरिकेने दुसरा अणुबॉम्ब टाकला आणि क्षणार्धात लक्ष वस्तीचे हे शहर नष्ट झाले. उरली ती फक्त राख व भग्न अवशेष.

## ४.४ जपानचे आर्थिक नुकसान

अमेरिकेने केलेल्या विघातक अशा अणुबॉम्बच्या हल्ल्यामुळे जपानमधील महत्वाची व्यापारी शहरे नष्ट झाली, लाखो कारखाने नष्ट झाले. शिवाय दुसऱ्या महायुद्धानंतर जपानच्या औद्योगिक उत्पादनात फार मोठया प्रमाणात घट निर्माण होऊन जपानला अन्नधान्याची देखील आयात करावी लागली. जमीन नापीक झाल्यामुळे उत्पादनामध्ये घट निर्माण झाली. सर्व उद्योगधंदे ठप्प झाले. रस्ते, रेल्वे, वाहतूक दळणवळण साधने नष्ट झाले आणि सर्वार्थाने जपानमध्ये आर्थिक दुरावस्था निर्माण झाली.

वरील सर्व परिणामामुळे जपानने शस्त्र खाली ठेवले व अमेरिकेने जपानचा पूर्णपणे ताबा आपल्या हाती घेतला व दुसरे महायुद्ध येथे संपुष्टात आले.

## ४.५ स्कॅप प्रशासन

१९४५ ते १९५२ या कालावधी दरम्यान जपानवर 'सुप्रीम कमांडर फॉर अलाईट पॉवर्स'(स्कॅप) चे नियंत्रण होते. जनरल डग्लस मॅक आर्थर हा सुप्रीम कमांडर फॉर

अलाईड पॉवर्स होता. त्याने दुसऱ्या महायुद्धा दरम्यान जपानविरुद्ध मित्रराष्ट्रांच्या सैन्याचे नेतृत्व केले होते. तो अमेरिकन सैन्यातील सेनापती होता. १९४५ ते १९५२ या काळात जपानमध्ये अनेक दूरगामी बदल घडवण्यात आले. हे बदल राजकीय, शैक्षणिक, आर्थिक इत्यादी क्षेत्रात घडून आणण्यात आले होते. या कालावधीत जपानमध्ये प्रामुख्याने लोकशाही रुजवण्यावर भर देण्यात आला. त्याचप्रमाणे जपानची भविष्यात कोणतेही युद्ध करण्याची कुवत नष्ट करून टाकण्याचे प्रयत्न करण्यात आले. जपानला स्वतःचे सैन्य बाळगण्यास देखील मनाई करण्यात आली. जपानचे खऱ्या अर्थाने लोकशाहीकरण करण्यासाठी जपानसाठी नवीन राज्यघटना बनवण्यात आली. या राज्यघटनेनुसार जपानमध्ये 'डायट' (जपानची संसद) स्थापन करण्यात आली. प्रत्येक मंत्री 'डायट' मध्ये निवडून आलेला प्रतिनिधी पाहिजे असे बंधनकारक करण्यात आले.

सुरुवातीला अमेरिका व स्कॅपला जपानच्या आर्थिक प्रगतीमध्ये रस नव्हता. परंतु काही विशिष्ट जागतिक घटनांमुळे अमेरिकेला हा निर्णय बदलून जपानच्या आर्थिक प्रगतीमध्ये लक्ष घालणे भाग पडले. या घटना म्हणजे शीत युद्धाची सुरुवात झाली. चीनमध्ये चियांग-काई-शेक व माओ त्से तुंग यांच्या नेतृत्वाखाली साम्यवादी सरकारची स्थापना, उत्तर कोरिया साम्यवादाची स्थापना, या घटनांमुळे अतिपूर्वेकडे शीतयुद्धाची लाट सोवियत संघात पूरक असल्याची अमेरिकेला वाटले. अमेरिकेला या भागातील व एकंदरीतच संपूर्ण आशियातील सोवियत संघाचा व साम्यवादाचा वाढता प्रभाव कमी करण्याची गरज वाटली. अमेरिकेला अतिपूर्वक साम्यवादाचा प्रसार थोपवून धरण्यासाठी एक आर्थिकदृष्ट्या प्रबळ असणाऱ्या राष्ट्राची साथ हवी होती. या गरजेतून अमेरिकेने जपानची आर्थिक प्रगती घडून आणण्याचे प्रयत्न सुरू केले व त्यादृष्टीने जपानला आर्थिक सहाय्य करण्याचे त्याने ठरवले.

## ४.६ अमेरिका- जपान संबंध

अमेरिका व जपान या देशातील तणाव कमी व्हावा म्हणून निक्सन यांनी जपानच्या पंतप्रधानांची भेट घेतली. त्यात ठरल्याप्रमाणे अमेरिकेने पॅसिफिक महासागरातील ओकिनावा हे बेड १९७२ मध्ये जपानला देण्याचे मान्य केले. पण एक अट ठेवली ती अशी की दोन्ही देशांना संमत होईल अशा सुविधा अमेरिका ओकीनावामध्ये करीत राहील. त्याचबरोबर दोन्ही देशांनी सहमती दर्शवली की, दोन्ही देश आर्थिक क्षेत्रात परस्परांना सहकार्य करतील. जपानने १९७० मध्ये 'ओसुमी' या नावाचा एक उपग्रह अंतराळात सोडला. जपान याबाबतीत जगामधील चवथे राष्ट्र म्हणून प्रसिद्धीस आला. त्यांचे वळ वाढले.

जपानने आत्ता 'ओकिनावा' या बेटावर पुन्हा आपल्या आरमाराचे प्रमुख केंद्र बनवले. जपान दुसऱ्या महायुद्धाच्या अगोदर जसा बलाढ्य देश होता तसा तो १९७२ च्या सुमारास बनू लागला. पण पूर्वीचा आक्रमक प्रवृत्तीचा होता. यावेळी मात्र तो आक्रमक बनू शकणार नाही. कारण जपानमधील लोकशाहीवर श्रद्धा असणारा गट तसे करू देणार नाही. जगातील देशांना तसेच आशियातील देशांना जपानची खटकू लागली.

राष्ट्राध्यक्ष निक्सन यांनी जपानच्या मालावर दहा टक्के आयात कर वाढविला. अमेरिकेच्या प्रोत्साहनाने जपान बराचसा माल अमेरिकेला निर्यात करीत होता. त्यामुळे आता त्याला आर्थिक घाटा सहन करावा लागला. दुसरी गोष्ट म्हणजे अमेरिकेने चीनशी व्यापारी करार केला ही गोष्ट जपानला खटकली. ते स्वाभाविकही होते कारण व्यापाराच्या क्षेत्रात चीन व जपान हे दोन्ही देश स्पर्धक होते. दोघांचीही आशियात आपले प्रभावक्षेत्र वाढवण्याची महत्त्वकांक्षा होती. चीनशी अमेरिकेने जेव्हा करार केला. तेव्हा जपानला वाटले की अमेरिकेला आता आपल्याविषयी आवड राहिली नाही. पण निक्सन यांना तर चीनशी संबंध वाढवणे जसे वाटत होते तसे जपानशी मैत्री करण्याची इच्छा होती. १९७२ मध्ये निवडून आलेल्या जपानी पंतप्रधान काकूई तनाका यांची शिखर परिषदेत भेट घेऊन, निक्सन यांनी खालील बाबींवर चर्चा केली. १) जगातील समस्या २) आशियातील प्रकरणे ३) एकमेकांच्या हितसंबंधी बाबी.

शेवटी दोघांनी आपल्या राजनीतिक संबंधाविषयी निष्ठा ठेवण्याची गोष्ट बळकट केली. याप्रमाणे जपानची सलोख्याचे संबंध प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न चालू ठेवले. जपान व अमेरिका यांचे व्यापारी संबंध वाढू लागले.

## ४.७ जपान-अमेरिका व्यापारी संबंध

### १. वस्तूची देवाण-घेवाण :

जपानचा सर्वात जास्त व्यापार अमेरिकेसोबत चालत होता. जपान व अमेरिकेमध्ये अनेक वस्तूची देवाण-घेवाण होत होती. जपान अमेरिकेकडून अन्नधान्य, लाकूड, कापूस व इतर कच्च्या मालाचे आयात करत होता. तर अमेरिका या वस्तूच्या मोबदल्यात जपानकडून पोलादयंत्रे, कॅमेरा, घड्याळे, दूरदर्शन संचारसाठी लागणारे इलेक्ट्रॉनिक वस्तू विकत घेत होते. १९९० च्या दशकात अमेरिकेच्या मोटारगाडया जपानमध्ये देखील विकल्या जाऊ लागल्या. जपानमधील संगणक उद्योगात अमेरिकेत बनवलेल्या संगणक सॉफ्टवेअरसाठी मोठया प्रमाणात मागणी होती. सध्या जपानने खुल्या अर्थव्यवस्थेचे तत्व स्वीकारलेले आढळते. त्याचप्रमाणे जपानने खाजगीकरण करण्याचा देखील स्वीकार केलेला दिसतो.

उदा. जपानमध्ये रेल्वेचे खाजगीकरण करण्यात आले आहे.

### २. व्यापारामधील रुसवे फुगवे:

जपान व अमेरिका यांच्या दरम्यान जरी फार मोठया प्रमाणात व्यापार चालत असला तरी, देखील दोन आर्थिक बलाढ्य देशांमध्ये व्यापारासंबंधित थोड्याफार प्रमाणात रुसवे फुगवे असल्याचे दिसून येते. कारण अमेरिका उद्योजकांशी जपानविरुद्धची मुख्य नाराजी म्हणजे, जपानमध्ये अमेरिकन वस्तू विकणे त्यांना फार कठीण जात होते. जपानची उत्पादनाच्या तुलनेत अमेरिकन बनावटीची उत्पादने व वस्तू जपानमध्ये महाग पडतात. कारण जपान सरकार जपान उद्योगांना मोठया प्रमाणात अनुदान देते. त्यामुळे जपानी वस्तूच्या किंमती अमेरिकन वस्तुपेक्षा निश्चितच कमी होत्या, असे असल्यामुळे

जपानमध्ये अमेरिकन वस्तूंना फार कमी प्रमाणात बाजारपेठ असून, त्यांचा खप कमी होता. जपानी सरकार जपानी उद्योजकांना अनुदान देणे अमेरिकेला रुचत नाही. त्याचप्रमाणे अमेरिकेने एकेकाळी भुईसपाट केलेले राष्ट्र आर्थिक दृष्ट्या बलाढय होत चालले आहे व अमेरिकेस दोन्ही डोईजड होत आहे. ही कल्पना अमेरिकन लोकांना रुचत नाही.

### ३. एकमेकांवर अवलंबून असलेली अर्थव्यवस्था:

जपान व अमेरिकेला चांगल्या प्रकारे माहिती आहे की, त्यांच्या अर्थव्यवस्था एकमेकांवर अवलंबून आहेत व दोघांनाही आर्थिक संबंध तोडून टाकणे परवडणार नाही. १९८६ पर्यंत जपानने अमेरिकेतील जमिनी, हॉटेलमध्ये व इतरही अनेक क्षेत्रांमध्ये फार मोठया प्रमाणात गुंतवणूक केलेली होती. या गुंतवणुकीतून दोन्ही देशांना फार मोठया प्रमाणात फायदा होत होता. त्यामुळे आर्थिक संबंध बिघडणे दोन्ही राष्ट्रांना नुकसान कारक होते. हे जाणूनच अर्थव्यवस्था एकमेकांवर अवलंबून राहिली.

### ४. अमेरिका-जपानमधील आयात निर्यात धोरण:

१९९५ साली अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष बिल क्लिंटन यांनी जपानी बनावटीच्या जपानमधून अमेरिकेत बाजारपेठेत येणाऱ्या मोटार गाडयांच्या आयात करात १००% वाढ करण्याची धमकी वजा घोषणा केली होती. याचे मुख्य कारण असे होते की, टोयोटा, निसान, होंडा इत्यादी जपानी कंपन्या त्यांनी बनवलेल्या मोटार गाडया अमेरिकेत मोठया प्रमाणात विकत होते. जपानी कंपनीच्या मोटार गाडयांना अमेरिकेत मोठी मागणी देखील होती. या विक्रीतून जपानी कंपन्यांना व त्यांच्या अनुषंगाने जपानच्या अर्थव्यवस्थेला फार फायदा होत होता. असे असले तरी, अमेरिकन कंपन्यांचे म्हणणे होत होते की, जपानमध्ये अमेरिकन कंपन्यांनी बनवलेल्या मोटारगाडयांना अतिशय नगण्य प्रमाणात बाजारपेठ होती व जपानी लोक फक्त जपानी बनावटीच्या गाडया विकत घेत होते. याचाच अर्थ जपान अमेरिकेत आपल्या मोटार गाड्या विकत घेण्यात धजावत नसत. जपानने अमेरिकन बनावटीच्या मोटार गाडयासाठी बाजारपेठ खुली करून देण्यासाठी जपानवर दबाव आणण्यासाठी बिल क्लिंटन यांनी १००% कर वाढवण्याची घोषणा केली होती. प्रत्यक्षात मात्र असे काही न होता अमेरिकेवर जपानमध्ये मोटार गाड्यांच्या बाजारपेठेविषयी एक करार झाला. जपानने अमेरिकन मोटारगाड्यांना जपानमधील बाजारपेठ खुली करून देण्याची मान्यता दिली.

### ५. आंतरराष्ट्रीय चलन संस्था :

१९४५ नंतरच्या २५ वर्षात जपानने केलेले आर्थिक प्रगती निश्चितच अतुलनीय आहे. १९७० पासून जपान आग्नेय-आशियाई राष्ट्रांच्या आर्थिक विकासाला हातभार लावू लागले. मोठया रकमा उद्योजकांसाठी आशियाई राष्ट्रांना कर्जाऊ दिल्या. केवळ आशियात नव्हे तर आफ्रिका व लॅटिन अमेरिकन राष्ट्रातील खाजगी जपानी कंपन्यांनी भांडवल व तंत्रज्ञान पुरविले. १९७० साला नंतर आंतरराष्ट्रीय चलन स्पर्धेत अमेरिकन

डॉलरची बरोबरी जपानी करू लागले. आज आशियातील विकसित देशात जपान पहिल्या क्रमांकावर तर जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे.

**६. जपानी लोकांची जिद्द व शिस्त:**

औद्योगिक विकासाला अनुकूल एक बाब ठरली ती म्हणजे जपानी लोकांची शिस्तप्रियता आणि परिश्रमाची वृत्ती. अनुबॉम्ब टाकून अमेरिकेने जपानमध्ये केलेल्या मानवी सहारक व त्यानंतर ही वर्षानुवर्षे त्याचे दुष्परिणाम डोळ्यापुढे सतत दिसूनही, मनाच्या कोपऱ्यात जपानी लोकांनी जिद्दीने आणि शिस्तीने काम करून जागतिक आर्थिक क्षेत्रात पाश्चात्य राष्ट्रांच्या बरोबरीचे स्थान प्राप्त करून घेतले. प्रगत राष्ट्राच्या आंतरराष्ट्रीय संघटनेचे सदस्यत्व जपानने मिळविले यावरून जपानी एक आर्थिक शक्ती बनण्याचे स्पष्ट झाले.

**७. आधुनिक यंत्रसामग्री व तंत्रज्ञान :**

१९५२ नंतर जपानचा औद्योगिक विकास व्यापार वृत्ती आणि एकूण आर्थिक भरभराट होण्यास अनेक गोष्टी अनुकूल ठरल्या. अमेरिकन भांडवल मोठया प्रमाणात जपानमध्ये गुंतवले जाऊ लागले. जहाज बांधणी, कापड, मोटारी, इलेक्ट्रॉनिक वस्तू इत्यादींच्या उत्पादन क्षेत्रात जपानने महत्त्वाचे स्थान पटकावले. मालाचा उत्तम दर्जा व वाजवी किमती यावर जपानने नव्या नव्या बाजारपेठा मिळवल्या. जुनी औद्योगिक यंत्रणा उध्वस्त झाल्याने, त्या जागी नवीन औद्योगिक यंत्रणा उभारणे शक्य झाले. अमेरिकेच्या तुलनेने पैसा उद्योगात भांडवल म्हणून गुंतवणे जपानाला योग्य वाटू लागले व त्यामुळे अमेरिकेच्या मनात जपानविषयी संशयाची भावना निर्माण झाली.

## ४.८ समारोप

आशिया खंडाच्या अतिपूर्वेला वसलेले जपान हे चार बेटांचे मिळून बनलेले राष्ट्र, 'उगवत्या सूर्याचा देश' म्हणून प्रसिद्ध आहे. १९ व्या शतकाच्या मध्यानंतर सुमारे साठ ते सत्तर वर्षाच्या कालावधीत या राष्ट्राने नेत्रदीपक प्रगती करून आणि शक्ती सामर्थ्य वाढवून जागतिक राजकारणात महत्त्वाचे स्थान मिळवले. पाश्चात्य साम्राज्यवादाच्या पावलावर पाऊल ठेवणाऱ्या जपानने चीन व आग्नेय आशियात प्रभाव प्रस्थापित करण्याची महत्त्वकांक्षा उराशी बाळगली. त्या सध्याच्या पूर्तीसाठी जपानने अमेरिकेसारख्या सामर्थ्यशाली राष्ट्राला आव्हान देण्याचे धाडस केले. डिसेंबर १९४१ मध्ये अमेरिकेचे हवाई बेटावरील पर्ल हार्बर या नावीक तळावर जपानने अनपेक्षित हल्ला चढवला. दोन वर्षात जपानी लष्कराने झंजावती वेगाने मुसंडी मारून तेथील युरोपीय सत्तांचे उच्चाटन केले. व त्या प्रदेशावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. परंतु १९४४ सालामध्ये जपानच्या युद्धाचे चक्र उलटया दिशेने फिरू लागले. जपानच्या ताब्यातील प्रदेशावर अमेरिकेचे हल्ले सुरू झाले. त्यांना जपानने नेटाने तोंड दिले. परंतु जपानच्या दाट लोकवस्तीच्या हिरोशिमा व नागासाकी या शहरावर अनुक्रमे ६ व ८ ऑगस्ट १९४५ रोजी अमेरिकेने अणुबॉम्ब टाकले. त्यामुळे झालेल्या भयानक संहारामुळे जपान हादरले. व शेवटी माघार घेऊन, १४ ऑगस्ट १९४५ रोजी शरणागती पत्करली. परंतु न डगमगता, न कोलमंडता पुन्हा जपानी राष्ट्र आपल्या इच्छाशक्तीच्या जोरावर पुन्हा

पुनःस्थापित झाले. जपानी लोकांची चिकाटी, शिस्त, परिश्रम, प्रामाणिकपणा यामुळे जपान पुन्हा जागतिक पातळीवर स्पर्धेत समाविष्ट झाले. जपानने अमेरिका व इतर राष्ट्राशी सलोख्याचे व शांततेचे धोरण स्वीकारले.

## ४.९ प्रश्न

१. दुसऱ्या महायुद्धात जपानचा सहभाग कसा झाला हे सविस्तर स्पष्ट करा.

२. दुसऱ्या महायुद्धात जपानचा झालेला पराभव व परिणामांची चर्चा करा.

३. स्कॅप प्रशासन यावर सविस्तर टीप लिहा.

४. जपान व अमेरिका व्यापारी संबंध स्पष्ट करा.

## ४.१० संदर्भ

१) कोलारकर, श. ग., आधुनिक जग, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर.

२) आचार्य धनंजय, विसाव्या शतकातील जग श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

३) शिंदे सुभाष, लोखंडे अजयकुमार, समकालीन जग, शेठ पब्लिकेशन, मुंबई.

४) वक्कानी, नि. आ. आधुनिक अमेरिकेच्या इतिहास (१९६०-१९९५)

५) कदम, य. ना. आधुनिक युरोपचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

❖❖❖❖

munotes.in

# ५

## जपानचा आर्थिक चमत्कार

**घटक रचना :**

५.० उद्दिष्टे

५.१ प्रस्तावना

५.२ दुसरे महायुद्ध व जपान

५.३ दुसऱ्या महायुद्धामुळे झालेले जपानचे आर्थिक नुकसान

५.४ जपानची पुनर्स्थापना

I) नव्या राज्यघटनेचे स्वरूप

II) शैक्षणिक क्षेत्रातील बदल

III) व्याप्तीच्या उद्दिष्टात बदल

IV) १९५२ नंतरचे जपान अंतर्गत परिस्थिती

५.५ जपानच्या आर्थिक प्रगतीस सुरुवात

५.६ जपानचा आर्थिक चमत्कार / विकास

५.६.१ १९५० च्या दशकात उत्पादनात दुपटीने वाढ

५.६.२ विविध नवीन वस्तूचे उत्पादन

५.६ ३ नवीन तंत्रज्ञानाचा विकास

५.६.४ जपानची आर्थिक प्रगती

५.६.५ शेती

५.६.६ खनिजसंपत्ती

५.६.७ पोलाद

५.६.८ विद्युत निर्मिती

५.६.९ इलेक्ट्रॉनिक वस्तू

५.६.१० रसायने

munotes.in

५.६.११ कापड उद्योग

५.६.१२ मत्स्य उद्योग

५.७ समारोप

५.८ प्रश्न

५.९ संदर्भ

## ५.० उद्दिष्टे

१. दुसऱ्या महायुद्धात जपानच्या सहभागा विषयीची माहिती जाणून घेणे.

२. दुसऱ्या महायुद्धानंतर जपानच्या पुनर्स्थापनाविषयी माहिती जाणून घेणे.

३. जपानचा आर्थिक चमत्कार व विकास या विषयीचा आढावा घेणे.

## ५.१ प्रस्तावना

दुसरे महायुद्ध हे संपूर्ण जगाला कवेत घेणारे युद्ध होते. हे युद्ध मानवाच्या शौर्य' धैर्य इ. गुणवैशिष्टयाने नव्हे तर विमाने, रणगाडे, अवजड तोफा, अजस्त्र युद्धनौका, पाणबुड्या, विनाशिका अशा विज्ञानाने मानवाच्या हाती दिलेल्या यंत्र आयूध यांनी लढले गेले. त्यामुळे विज्ञानाचे प्रयोग करून नवनवीन संहारिक शस्त्रास्त्र शोधून काढण्याच्या प्रक्रियेला प्रत्येक बडया राष्ट्रांना जबरदस्त चालना मिळाली. त्यातून अधिक विघातक अशी शस्त्र निर्माण केली गेली. तसेच या विघातक शस्त्रांचा वापर दुसऱ्या महायुद्धात करण्यात आला. त्याचे अत्यंत प्रत्येकारी उदाहरण म्हणजेच जपान होय. अमेरिकेने जपानमधील हिरोशिमा व नागासाकी या दोन शहरांवर केलेल्या अनुबॉम्बचा हल्ला यामुळे संपूर्ण जपान उध्वस्त झाला. उगवत्या सूर्याचा देश म्हणून ओळखला जाणाऱ्या जपानचा या घटनेने सूर्यास्त झाला होता. पण या सर्व घटनांवर मात करून जपानने पुन्हा शून्यातून विश्व निर्माण केले. ते म्हणजे सर्व परिस्थितीवर मात करून, दुसऱ्या महायुद्धानंतर जपानने केलेले आर्थिक विकासाला व प्रगतीला जपानमधील आर्थिक चमत्कार असे संबोधले जाते. जपानने १९४५ नंतर अतिशय थोड्या कालावधीत दैदीप्यमान व डोळे दिपून टाकणारी, झटपट आर्थिक प्रगती साधली. त्यामुळे देखील या काळातील जपानच्या आर्थिक प्रगतीला जपानमधील आर्थिक चमत्कार असे म्हणतात.

## ५.२ दुसरे महायुद्ध व जपान

जपान दुसऱ्या महायुद्धात अक्षराष्ट्र गटाच्या बाजूने तर मित्र राष्ट्राच्या विरुद्ध लढत होता १९३० च्या दशकात जपानची साम्राज्यवादी भूक प्रकाशाने वाढलेली होती. संपूर्ण जग आपल्या कवेत ठेवण्याची इच्छा त्यास निर्माण झाली होती. जपानला जवळजवळ संपूर्ण अतिपूर्वेकडील राष्ट्रांवर सत्ता प्रस्थापित करण्याची महत्त्वकांक्षा होती. जपानला चांगल्या प्रकारे माहीत होते की, त्याच्या या साम्राज्यवादाच्या धोरणास अमेरिकेकडून कडवा

विरोध होऊ शकतो. परंतु जपानने ६ डिसेंबर १९४१ रोजी अमेरिकेच्या प्रशांत महासागरातील पर्ल हार्बर नाविक तळावर हल्ला चढविला. या हल्ल्यामुळे अमेरिकेचे खच्चीकरण होईल असे जपानला वाटले. परंतु असे न होता, अमेरिकेने जपानला प्रतिउत्तर देण्याचे ठरवले व अमेरिकेने ८ डिसेंबर १९४१ रोजी जपानविरुद्ध युद्ध घोषित केले. पाठोपाठ इंग्लंड, हॉलंड व इतर राष्ट्रांनी देखील जपानविरुद्ध युद्ध घोषित केले. पर्ल हार्बरवरील हल्यानंतर अमेरिका दुसऱ्या महायुद्धात मित्र राष्ट्राच्या बाजूने तर जपान अक्षराष्ट्रच्या विरोधात उतरली होती. दुसऱ्या महायुद्धाचा शेवट १९४५ साली झाला. जपान या युद्धात हार मानण्यास तयार नव्हता. जपानला साध्या सरळ मार्गाने हरवणे अशक्य आहे हे लक्षात आल्यावर अमेरिकेने जपानवर अणुबॉम्बचा वापर केला. अमेरिकेने अनुक्रमे ६ व ९ ऑगस्ट १९४५ रोजी जपानच्या हिरोशिमा व नागासाकी या या शहरावर अनुबॉम्ब टाकले व क्षणार्धात ही दोन्ही शहरे जमिनदोस्त झाली. शेवटी जपानी सम्राट हिरोहिटो यांनी १५ ऑगस्ट १९४५ ला जपानी रेडिओवर जपान दुसऱ्या महायुद्धातून माघार घेत असल्याची घोषणा केली.

## ५.३ दुसऱ्या महायुद्धामुळे जपानच झालेले आर्थिक नुकसान

दुसऱ्या महायुद्धामध्ये सर्वच राष्ट्रांचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान झाले होते. परंतु सर्वात जास्त जर कोणाचे नुकसान झाले असेल तर ते जपानचे झाले होते. कारण अमेरिकेने जपानवर फार मोठया प्रमाणात हवाई हल्ले चढवले होते. जपानमधील अति महत्त्वाच्या शहरांवर हे हवाई हल्ले करण्यात आले होते. या हवाई हल्ल्यात जपानची बरीच आर्थिक व जिवीत हानी झाली. तसेच जपानमध्ये अनेक इमारती, जमीनी उद्ध्वस्त झाल्या. १९४५ च्या मार्च महिन्यात अमेरिकेने केलेल्या टोकियोवरील हवाई हल्ल्यात जवळजवळ ८०००० लोक मृत्यूमुखी पडले तर, २५% टोकियो शहर जमिनीदोस्त झाले. असे म्हटले जाते की जपानमधील लाखो कारखाने अमेरिकेच्या हवाई हल्ल्यात नष्ट होऊन गेले. त्याचप्रमाणे जवळजवळ २५% घरे नष्ट होऊन गेले.

महायुद्धात जपानचा पराभव झाल्यानंतर मित्र राष्ट्रांनी प्रामुख्याने अमेरिकेने जपानचे साम्राज्य नष्ट करून टाकले, म्हणजेच जपानने अशियातील ज्या राष्ट्रांना दुसऱ्या महायुद्ध दरम्यान आक्रमण करून त्यांच्यावर ताबा प्रस्थापित करून त्यांना आपली वसाहत बनवले होते, अशा बहुतांश राष्ट्रांना स्वतंत्र बहाल करून टाकले, दुसऱ्या महायुद्धात जपानच्या औद्योगिक उत्पादनात फार मोठया प्रमाणात घट झाली. जपानची दुसऱ्या महायुद्धानंतर एवढी दैन्य परिस्थिती निर्माण झाली की, जपानला अन्नधान्याची देखील आयात करण्याची पाळी आली.

## ५.४ जपानची पुनर्स्थापना

पाश्चिमात्य साम्राज्यवादाच्या पावलावर पाऊल ठेवणाऱ्या जपानने चीन व आग्नेय आशियात प्रभाव प्रस्थापित करण्याची महत्त्वकांक्षा उराशी बाळगली. ते साध्य करण्यासाठी जपानने अमेरिकेसारख्या सामर्थ्यशाली राष्ट्राला आवाहन देण्याचे धाडस केले. डिसेंबर १९४१ मध्ये अमेरिकेच्या हवाई बेटावरील पर्ल हार्बर या नाविक तळावर

जपानने अनपेक्षित हल्ला चढवला. अमेरिका-जपान युद्धाला तोंड लागले आणि अमेरिका दुसऱ्या महायुद्धाच्या आवर्तात खेचला गेला. दोन वर्ष जपानने लष्कराने झंजावती वेगाने आग्नेय-आशियात मुसंडी मारून तेथील युरोपीय सत्तांचे उच्चाटन केले व त्या प्रदेशावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. परंतु १९४४ सालच्या मध्यापासून जपानच्या दृष्टीने युद्धाचे चक्र उलटया दिशेने फिरू लागले. जपानच्या ताब्यातील प्रदेशावर अमेरिकेने हल्ले सुरू केले. जपानच्या दाट लोकवस्तीच्या व भरभराटलेल्या हिरोशिमा व नागासाकी या शहरावर अनुक्रमे ६ व ८ ऑगस्ट १९४५ रोजी अमेरिकेने अनुबॉम्ब टाकले. त्यामुळे झालेल्या भयानक संहारामुळे जपान हादरले. या राष्ट्रांनी परिस्थितीच्या अनिवार्य दडपणाखाली १४ ऑगस्ट १९४५ रोजी शरणागती पत्करली. असे असले तरी जपानने हार मानली नाही. जिद्दीने चिकाटीने प्रामाणिकपणाने अति परिश्रमाने आधुनिक यंत्र-तंत्र निर्मितीने पुन्हा आपली परिस्थिती मजबूत बनवली.

**I) नव्या राज्यघटनेचे स्वरूप-**

मेईजी क्रांतीनंतर जपानमध्ये अंगीकृत करण्यात आलेली राज्यघटना बाजूला सारून, नवीन लोकशाही राज्यघटना लागू करणे ही जपानच्या इतिहासातील मोठी राजकीय क्रांतीच होती. नव्या घटनेचे स्वरूप स्थूल मानाने इंग्लंडमधील घटनात्मक राज्य सत्तेच्या स्वरूपाचे होते. मेईजी घटनेत सर्व अंतिम अधिकार सम्राटयाच्या हाती केंद्रित झाले होते. नवी घटना मात्र जनतेने तयार केलेली होती. "जनता सार्वभौम असून, शासन ही जनतेची पवित्र ठेव आहे. शासनाचा अधिकार जनतेकडून देण्यात आला आहे आणि निर्वाचित प्रतिनिधींच्या मार्फत त्या अधिकाऱ्यांची अंमलबजावणी व्हायची आहे. असा निर्देश घटनेच्या सरनाम्यात करण्यात आला. सम्राट केवळ राजाचा नाममात्र प्रमुख व जनतेच्या ऐक्याचा प्रतीक बनला. राज्यघटनेला देशातील सर्वोच्च कायद्याचे स्वरूप देण्यात आले. आणि त्यातील तरतुदींना बाधक ठरतील असे कोणतेही आदेश काढण्याचा सम्राटाला अधिकार राहणार नाही अशी तरतूद करण्यात आली. तसेच इतर राष्ट्रांशी उपस्थित होणाऱ्या वादग्रस्त समस्या सोडवण्यासाठी जपान युद्धाचा मार्ग पत्करणार नाही आणि मोठी संरक्षक दले ठेवणार नाही. अशीही तरतूद घटनेत होती.

घटनेनुसार जपानी नागरिकांना मूलभूत अधिकार देण्यात आले. तसेच ते हक्क जोपासण्यासाठी न्यायालयाकडे दाद मागण्याचाही अधिकार प्रदान करण्यात आला. २१ वर्षावरील सर्व स्त्री- पुरुषांना मतदानाचा अधिकार देण्यात आला. देशासाठी कायदे करण्याचा अधिकार संसदेला देण्यात आला. संसद द्विगृही होती. दोन्ही सभागृहे डाएट व हाऊस ऑफ कॉन्सिल्स ही निर्वाचीत सभागृहे होती. हाऊस ऑफ कौन्सिल्स या वरिष्ठ सभागृहाची काल मर्यादा ६ वर्षे तर डाएट या कनिष्ठ सभागृहाची ४ वर्षे निर्धारित करण्यात आली. कायदे करण्याचा; अर्थसंकल्प मान्य करण्याचा अधिकार संसदेला देण्यात आला. राजघराण्याबाबतच्या सर्व मुद्यांवर चर्चा करण्याचा, निर्णय घेण्याचा अधिकार या लोकप्रतिनिधी गृहाला देण्यात आला.

देशाच्या प्रशासनाचे कार्य मंत्रिमंडळाने करायचे होते. मंत्रिमंडळाचे सदस्य संसदेचे सदस्य असावेत असा दंडक घालून देण्यात आला. पंतप्रधानाचे नाव संसदेने सुचवावे,

तो संसदेचा सदस्य असावा आणि मुख्य म्हणजे तो लष्करी अधिकारी नसावा, अशी तरतूद करण्यात आली. संसदेने नाव सुचवल्यानंतर पंतप्रधानाची औपचारिक नेमणूक सम्राटाने करायची होती. त्याने आपले मंत्रिमंडळाचे सदस्य संसदेतून निवडावेत व ते लष्करी अधिकारी नसावेत असा निर्बंध घालण्यात आला. मंत्रिमंडळ सम्राटाला नव्हे तर लोकप्रतिनिधी गृहाला जबाबदार राहणार होते. घटनादुरुस्तीसाठी कनिष्ठ गृहात २/३ मते मिळणे आवश्यक राहणार होते.

स्वतंत्र्य न्यायव्यवस्था ही नव्या घटनेत स्थापन करण्यात आली. राष्ट्रीय स्तरावर सर्वोच्च न्यायालय असावे, त्यातील न्यायाधीशांची नेमणूक मंत्रिमंडळाने करावी व त्याला संसदेने केलेल्या कायद्याचा अगर प्रशासकीय नियमांचा, अध्यादेशांचा अन्वयार्थ लावण्याचा तसेच न्यायालयांना पुनर्विलोकनाचा अधिकार असावा अशी तरतूद करण्यात आली.

लोकशाहीची पाळेमुळे समाजात खोलवर रुजावीत म्हणून प्रशासकीय कार्याचे विकेंद्रीकरण करण्यात आले. स्थानिक स्वशासन संस्था बळकट करण्यासाठी केंद्र सरकारचे त्यावरील नियंत्रण शिथिल करण्यात आले. स्थानिक स्वशासन संस्थांचे प्रमुख हे निर्वाचित असावेत अशी तरतूद करण्यात आली. अशा स्वशासनसंस्थांना त्या भागापुरते नियम करण्याचा मर्यादित अधिकार देण्यात आला. या नवीन राज्यघटनेच्या स्वरूपामुळे जपानमधील जनसमुदायांमध्ये एक वेगळेच नवचैतन्य निर्माण झाले व त्यांनी आपल्या सर्वांगीण विकासासह आपल्या राष्ट्राचे विकास पूर्णपणे घडून आणला हे तितकेच खरे आहे.

**II) शैक्षणिक क्षेत्रातील बदल-**

जपानमध्ये करावयाचे सर्वकष परिवर्तन कायम टिकावे यासाठी जपानी समाजाचा बौद्धिक दृष्टिकोन परंपरानिष्ठ व एकूण मानसिकता बदलणे अगत्याचे होते. या दृष्टीने शैक्षणिक क्षेत्रात परिवर्तन घडवून आणणे निकडीचे मानले गेले. जपानमधील शैक्षणिक संस्था व त्यांचा अभ्यासक्रम लष्करवादी परंपरा जोपासणारी केंद्रे होती. सम्राटयाच्या देवी अंशाचे व जपानी लोकांच्या वंश श्रेष्ठत्वाचे धडे विद्यार्थ्यांना दिले जात, ही परिस्थिती नाहीशी करणे लोकशाही संकल्पना नव्या तरुण पिढीत रुजवणे आवश्यक होते. या हेतूने परंपरावादी शिक्षकांना बडतर्फ करण्यात आले. अभ्यासक्रमात लोकशाही संकल्पना अंतर्भूत करण्यात आल्या, त्यादृष्टीने नवी पाठ्यपुस्तके तयार करण्यात आली. पाश्चिमात्य जगातील उदारमतवादी विचारप्रणालीची शिकवण जपानी विद्यार्थ्यांना देऊन त्यांच्यातील अंधश्रद्धा, परंपरानिष्ठा नाहीशा करून, त्यांच्यात बुद्धीवादी दृष्टिकोन व स्वतंत्र विचार शक्ती विकसित करण्यावर भर देण्यात आला. जपानी तरुणांना परदेशात विशेषतः अमेरिकेत जाऊन शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली.

**III) व्याप्तीच्या उद्दिष्टात बदल-**

१९४९ ते ५० च्या सुमारास अमेरिकेच्या जपानबाबतच्या धोरणात मूलता परिवर्तन होत असल्याची चिन्हें दिसू लागली. जपानच्या आक्रमक राष्ट्रवादाचा व लष्करी

साम्राज्यवादाचा कठोरपणे उच्चार करणे, जपानची आत्मशक्ती, जपानची अस्मिता व जपानी वंश श्रेष्ठत्वाची भूमिका ठेचून टाकून, जपानचे नेते नष्ट करणे व आपल्या मतानुसार नव्या जपानचे घडण करणे, या उद्दिष्ट सिद्धीसाठी जपानच्या मानहानीच्या जखमेवर नव्या सुधारणांचे मीठ चोळले जाईल असे काही बदल मॅक ऑथर यांनी हेतू पुरस्ककृत घडून आणले होते. जपानने हे सर्व बदल कोणत्याही तक्रार न करता निमूटपणे व संयमाने मान्य केले होते. याचा अर्थ जपानी हे सर्व स्थित्यंतर आनंदाने स्वीकारले होते असा मात्र होत नाही. राष्ट्रीय प्रतिष्ठेची आणि अमेरिकन सैन्याने सुमारे पाच वर्षाच्या कालावधीत केलेली मानहानी, अपराधी भावना, स्वाभिमानी जपानी मनाला निश्चितच टोचत होती. अशा स्थितीत जपानच्या शक्तीचे खच्चीकरण करण्याचे कठोर धोरण सोडून देऊन, जपानचा आर्थिक विकास घडवून आणणे, जपानला पूर्वेतील एक भरलेले बळकट राष्ट्र बनवणे आणि त्या राष्ट्राला अमेरिकेच्या प्रभावळीत कायम टिकवणे याची गरज अमेरिकेला जाणू लागली.

जपानच्या आर्थिक भरभराटीसाठी उद्योगधंद्यांना चालना देण्यात आली. अमेरिकन भांडवल कर्जाच्या रूपाने ओतले जाऊ लागले. युद्धखंडणी म्हणून जपानमधून जी औद्योगिक मालमत्ता आणि यंत्रसामग्री अमेरिकेने उचलून घ्यावयाची होती, ती तेथेच उपयोगात आणली जाऊ लागली. भांडवलदारांना व कारखानदारांना सरकारकडून अनेक सवलती दिल्या जाऊ लागल्या. कारखान्यांना लागणारा कच्चामाल खरेदी करण्यासाठी सरकार कर्जाऊ रक्कमा देऊ लागले. मोठया चार घराण्याच्या औद्योगिक मालमत्ता मुक्त करून खाजगी औद्योगिक संघावर निर्बंध दूर करण्यात आल्या. जपानच्या मालाला परदेशात बाजारपेठा मिळवण्याची व्यवस्था करण्यात आली आणि कामगारांच्या संपावर बंदी घालण्यात आली. या बदललेल्या धोरणामुळे जपानचे उद्योगधंदे झपाटयाने वाढले आणि सावरले. औद्योगिक भरभराटीचा मार्ग मोकळा झाला. आर्थिकदृष्ट्या बलशाली बनलेला जपान भांडवलवादी राष्ट्रांना साम्यवाद विरोधी लढयातील आशियामधील भक्कम बालेकिल्ला बनले. जपानमार्फत आग्नेय-आशियाई राष्ट्रांना आर्थिक सहाय्य देता येईल व तेथे साम्यवादाचा प्रसार होण्याची संभावना नाहीशी करता येईल अशी अमेरिकेची भूमिका होती.

१९५० सालच्या अखेरी जपानशी शांततेचा तह करण्याविषयी अमेरिकेने संबंधित राष्ट्रांशी बोलणे सुरू केली. सप्टेंबर १९५१ मध्ये यासाठी सनफ्रान्सिस्को येथे आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली. अमेरिकेसह ४८ राष्ट्रांनी जपानशी शांतता करारावर सह्या केल्या. भारत, ब्रह्मदेश व युगोस्लाव्हिया या राष्ट्रांनी परिषदेत भाग घेतला नसल्याने करारावर त्यांच्या सह्या झाल्या नाहीत. रशिया व चीन या साम्यवादी राष्ट्रांनी करारावर स्वाक्षऱ्या करण्यास नकार दिला. या करारामुळे युद्ध स्थितीचा शेवट झाला. सार्वभौमत्व जपानला परत देण्यात आले. त्याबरोबर जपान व्याप्तीचाही अंत करण्याचे ठरवण्यात आले. जपानच्या भूसीमा मात्र चार मोठया बेटांपुरत्या मर्यादित केल्या होत्या. त्या तशाच राहिल्या. संरक्षणासाठी संरक्षक व्यवस्था उभारण्याचा जपानचा अधिकार मान्य करण्यात आला. जपान व्याप्तीच्या काळात केलेले

सर्वच कायदे पाळण्याचे बंधन जपानवर घालण्यात आले नाहीत. तसेच अर्थव्यवस्थेवर बंधनेही लादण्यात आली नाहीत. युनोच्या सनदेतील सर्व तत्वे जपानने मान्य केली

याचवेळी अमेरिकेने जपानशी स्वतंत्रपणे सुरक्षा करार केला. या करार नुसार व्याप्तीची मुदत संपल्यानंतर ही अमेरिकेचे लष्करी व नाविक तळ आणि अमेरिकेची सेना जपानमध्ये ठेवण्याचा अधिकार अमेरिकेने जपानकडून मिळविला. परकीय आक्रमणापासून जपानचा बचाव करण्याची जबाबदारी अमेरिकेने उचलली. जपानमध्ये राहणाऱ्या अमेरिकेच्या लष्कराच्या खर्चासाठी जपानने अमेरिकेला ५.५ मिलियन डॉलर्स द्यायचे होते. अशा प्रकारे जगात साम्यवादाच्या प्रसाराला अडसर लावण्यासाठी पश्चिमे पासून पूर्वेपर्यंत अमेरिकेने जी साखळी तयार केली होती त्याची जपान ही शेवटची कडी बनली होती.

२८ एप्रिल १९५२ रोजी अमेरिका जपान शांतता कराराच्या तरतुदी अंमलात आल्या. त्या दिवशी प्रत्यक्षात जपान व्याप्तीची इतिश्री झाली. तेव्हापासून स्वतंत्र सार्वभौम राष्ट्र म्हणून जपानची वाटचाल सुरू झाली.

**IV) १९५२ नंतरचे जपान: अंतर्गत परिस्थिती-**

१९५२ साली व्याप्तीची राष्ट्रीय मानहानी संपल्यानंतर जपानला स्वतःचे भवितव्य घडवण्याचे स्वातंत्र्य मिळाले. नव्या लोकशाही व्यवस्थेखाली राजकीय स्थैर्य, आर्थिक प्रगती व सामाजिक सुस्थिरता प्रस्थापित करण्याच्या कार्यावर जपानच्या शासकाने लक्ष केंद्रित केले. यावेळी जपानपुढे अनेक अडचणी होत्या. लोकशाही शासनयंत्रणा प्रस्थापित झाली असली तरी ती लादलेली होती. ती मुळातून उत्क्रांत झाली नव्हती. लोकशाही तत्वे जनतेच्या अंगवळणी पडली नव्हती. तसेच दुसऱ्या महायुद्धापूर्वी जपान मध्ये राजकीय पक्ष अस्तित्वात असले तरी लष्करवादाच्या शासनावरील प्रभावामुळे ते बळकट झाले नव्हते. व्याप्तीच्या काळात नवे राजकीय पक्ष अस्तित्वात आले. परंतु राजकारणाचे धागे पक्षाभोवती केंद्रित होण्याऐवजी व्यक्तीभोवती केंद्रित झाले. त्यामुळे निर्वाचित सरकारेही काही अपवाद वगळता आपला कार्यकाळ पूर्ण करू शकली नाहीत. परराष्ट्रीय संबंधाच्या क्षेत्रामध्ये मात्र जपानने हळूहळू स्वतंत्र धोरणाचा आग्रह धरण्याचा आणि अमेरिकेचे दडपण कमी करण्याचा प्रयत्न केला. आर्थिक व व्यापारी क्षेत्रात तर जपानने केलेली प्रगती निश्चितच आश्चर्यजनक ठरते.

## ५.५ जपानच्या आर्थिक प्रगतीस सुरुवात

१९५० साली झालेल्या कोरियन युद्ध जपानच्या अर्थव्यवस्थेला कलाटणी देणारे ठरले. हे युद्ध शीतयुद्धाच्या राजकारणाचा एक भाग होते. उत्तर कोरिया या साम्यवादी राष्ट्राने दक्षिण कोरिया या लोकशाही राष्ट्रावर हल्ला चढविला होता. दुसऱ्या महायुद्धापूर्वीही दोन्ही राष्ट्र एकच राष्ट्र होती, दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका व सोविएत संघ या दोन महासत्तांच्या स्पर्धेमुळे या राष्ट्राचे विभाजन उत्तर व दक्षिण कोरिया अशा दोन राष्ट्रांमध्ये झाले. उत्तर कोरियाने साम्यवादाचा स्वीकार केल्यामुळे सोविएत संघाचा त्यास पाठिंबा होता. तर दक्षिण कोरियाने लोकशाही प्रणालीचा स्वीकार केल्यामुळे अमेरिका व मित्र

राष्ट्रांचा त्या राष्ट्राला पाठिंबा होता. या दोन राष्ट्रांमध्ये नेहमी काही ना काही कारणांवरून समस्या निर्माण होत होत्या. १९५० साली उत्तर कोरियाने दक्षिण कोरियावर आक्रमण करून दक्षिण कोरियातील काही भाग ताब्यात घेतला. त्यामुळे अमेरिकेने दक्षिण कोरियाला सर्वतोपरी मदत करून उत्तर कोरियाच्या सैन्याला तेथून हुसकावून लावण्याचा निर्णय घेतला. अशा प्रकारे १९५० साली कोरियन युद्धाला सुरुवात झाली. या युद्धात मित्र राष्ट्राच्या सैन्याचे नेतृत्व जनरल डग्लस मॅक ऑर्थर करत होते.

कोरीयन युद्धाचा जपानला फार मोठया प्रमाणात आर्थिक फायदा झाला. कारण युद्धात मित्र राष्ट्रांना जेवढी काही युद्ध सामग्री व इतर वस्तूंची गरज भासत होती, त्यांचा पुरवठा जपान करत होते. अशा रीतीने जपानने मित्र राष्ट्रांना लागणाऱ्या सामग्रीचे व वस्तूचे फार मोठयाप्रमाणात करण्यास सुरुवात केली. यामुळे दुसऱ्या महायुद्धामुळे जपानच्या औद्योगिक क्षेत्राला लागलेले ग्रहण सुटण्यास मदत होऊन जपानमधील अनेक बंद पडलेले कारखाने सुरू झाले. अनेक बेकार तरुणांना रोजगार उपलब्ध झाला. देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात भर पडू लागली. १९५० चे कोरियन युद्ध म्हणजे जपानच्या आर्थिक व्यवस्थेला जीवदान देणारे ठरले. या युद्धामुळे जपानला न भूतो न भविष्यती नफा कमवण्याची संधी मिळाली. येथून पुढे जपानने मागे वळून पाहिले नाही. तेव्हापासून ते आजतागायत जपानची आर्थिक प्रगती अविरतपणे चालू आहे. जपानने अगदी अल्पशा कालावधी स्वतःला एक आर्थिक प्रगत देश बनवून घेतले आहे. म्हणून जपानच्या ह्या प्रगतीला जपानने मधील आर्थिक चमत्कार असे देखील संबोधले जाते.

## ५.६ जपानचा आर्थिक चमत्कार / विकास

१९५० साली झालेले कोरीयन युद्ध जपानच्या आर्थिक प्रगतीला चालना देणारे ठरले. कारण कोरियन युद्धात मित्र राष्ट्रांना जेवढी काही युद्ध सामग्री व इतर वस्तूंची गरज भासत होती त्याचा पुरवठा जपान करत होते. त्यामुळे त्याने मोठमोठी यंत्रसामुग्री तयार करण्यास सुरुवात केली. तसेच नवीन तंत्रज्ञान, आधुनिक यंत्र-तंत्रे, खनिज संपत्ती यामध्ये देखील मोठया प्रमाणामध्ये उत्पादन करून त्यांचा विकास घडवून आणला. या जपानच्या आर्थिक चमत्काराचा  विकासाचा आढावा आपण पुढील प्रमाणे घेऊ..

### ५.६.१. १९५० च्या दशकात उत्पादनात दुप्पटीने वाढ :

१९५० च्या दशकाचे आर्थिक उत्पादकता जवळजवळ दुप्पटीने वाढली होती. १९५३ पर्यंत जपानमधील कापडाचे विविध धातूपासून बनवलेले वस्तूंचे व विविध यंत्राचे उत्पादन फार मोठया प्रमाणात वाढले. १९६० च्या दशकात जपानची आर्थिक उत्पादकता इंग्लंड, फ्रान्स व पश्चिम जर्मनीपेक्षा वाढली, जपान जागतिक आर्थिक उत्पादकतेच्या बाबतीत तिसऱ्या क्रमांकाचे राष्ट्र बनले. १९९० च्या दशकाच्या मध्यापर्यंत जपान जगातील दुसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनले होते. ही आर्थिक प्रगती साधताना जपानने पूर्वापर जपानमध्ये प्रस्थापित झालेल्या उद्योगांची उत्पादकता

वाढवून ते उद्योग वृद्धिंगत तर केलेच परंतु त्याचबरोबर काही प्रकारच्या आधुनिक उद्योगाची स्थापना करून, त्या उद्योगाचे देखील उत्पादकता वाढवली.

### ५.६.२ विविध नवीन वस्तूंचे उत्पादन:

अल्पावधीत जपानने जगातील सर्वात मोठे जहाज बांधणी करणारे पोलाद निर्यात करणारे व हलके व जड- अवजड यंत्रसामुग्री निर्यात करणारे राष्ट्र बनले. एवढेच नव्हे तर जपानने केमिकल्स (रसायने) इलेक्ट्रॉनिक्स तसेच संगणक तंत्रज्ञान इत्यादी क्षेत्रांमध्ये देखील वाखाणण्याजोगे नाव कमावले. इलेक्ट्रॉनिक्सच्या क्षेत्रात तर जपानच्या कंपन्यांनी एक प्रकारची क्रांती आणली. सोनी, तोशिबा, अकाई इत्यादी जपानी कंपन्याने जगभरात नाव कमावले. ह्या कंपन्याने बनवलेल्या इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंना जगभरात फार मोठी मागणी होती. ह्या कंपन्या जपानला फार मोठया प्रमाणात परकीय उत्पन्न मिळवून देणाऱ्या कंपन्या ठरल्या आहेत. या कंपनीची बाजारपेठ भारतासह अनेक राष्ट्रांमध्ये पसरली आहे.

### ५.६.३ नवीन तंत्रज्ञानाचा विकास:

जपानच्या आर्थिक प्रगतीचे महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे जपानच्या आपली आर्थिक प्रगती साधताना नवनवीन तंत्रज्ञानाचा फार मोठया प्रमाणात वापर केला आहे. जपानने आर्थिक प्रगती साधताना स्वतःच्या अनेक अंतर्गत समस्यांवर नवीन तंत्रज्ञानाच्या मदतीने तोडगा काढण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. उदाहरणार्थ- जपानमधील विविध भागात राहणाऱ्या लोकांना दूरवर असणाऱ्या आपल्या नोकरीच्या ठिकाणी लवकरात लवकर पोहोचता यावे यासाठी जपानने बुलेट ट्रेन नामक रेल्वे काढली आहे. या बुलेट ट्रेन अतिशय वेगाने धावणाऱ्या आगगाडया असून, लोकांना देशाच्या एका भागातून दुसऱ्या भागात क्षणात अत्यंत वेगाने पोहोचवितात. अशा आगगाड्या अगदी नजीकच्या काळापर्यंत पश्चिमेकडील पुढारलेल्या राष्ट्रांमध्ये देखील नव्हत्या. अशा प्रकारच्या अनेक नवनवीन यंत्राचा तंत्राचा जपानने मोठया प्रमाणात विकास घडवून आणला.

### ५.६.४. जपानची आर्थिक प्रगती:

जपानच्या ह्या वेगवान आर्थिक प्रगतीमध्ये जपानच्या आर्थिक स्त्रोतांचा फार मोठया प्रमाणात वाटा आहे. कुठल्याही देशाला आर्थिक प्रगती साधन्यासाठी विविध उद्योगधंद्याची वाढ करून त्याची उत्पादकता वाढवावी लागते. याकरिता मोठया प्रमाणात भांडवलाचे मुख्यतः आर्थिक भांडवलाची आवश्यकता असते. जपानमध्ये या भांडवलाची कमतरता नाही. कारण जपानमध्ये अनेक मोठमोठया बँका तर आहेतच. ज्या उद्योगधंद्यांना कर्ज पुरवठा करू शकतात. त्याचप्रमाणे तेथे शेअर्स बाजार देखील आहेत. या शेअर बाजारांपासून फार मोठया प्रमाणात शेअर्स विकले जातात व कंपन्यांसाठी भांडवल उभे केले जाते. जपानच्या विविध कंपन्या जपानला एवढया मोठया प्रमाणात नफा कमवून देतात की जपान हे जगातील सर्वात जास्त प्रमाणात इतर देशांना कर्ज देणारे राष्ट्र बनले आहे. एवढेच नाही तर जपानने जगातील प्रगत व प्रगतशील देशांमध्ये अतिशय मोठया प्रमाणात वेगवेगळ्या स्वरूपात गुंतवणूक करून ठेवले आहे. १९६० च्या

दशकात जपानने अतिशय वाखाणण्याजोगी प्रगती केली आहे. ह्या दशकात जपानच्या अर्थव्यवस्थेचा वृद्धी दर वर्षाला १०% एवढा प्रचंड होता. यावरूनच जपानने अगदी कमी कालावधीमध्ये आपली आर्थिक प्रगती कशी साधून घेतली हे स्पष्ट होते.

### ५.६.५ शेती:

शेती हा जपानमधील प्रमुख व्यवसायापैकी एक आहे. प्रारंभीपासून शेती व्यवसायामध्ये ८०% लोक गुंतलेले होते. १९५० नंतरच्या काळात शेतमजूर व शेतकऱ्यांच्या संख्येत मोठया प्रमाणात घट होत आहे. जपानमध्ये शेती बऱ्याच प्रमाणात लावारसापासून बनलेली असल्याने शेती फार कष्टाची आहे. जमिनीची धूप मोठया प्रमाणात होत असल्याने शेतकऱ्यांना खनिज व रासायनिक खतांचा मोठया प्रमाणात वापर करणे आवश्यक ठरते. तसेच दुसऱ्या महायुद्धानंतर उत्तम बी- बियाणे खते व कृषी रसायने यामुळे शेतीचे उत्पादनात मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. १९८० पर्यंतच्या व नंतरच्या काळात सुमारे ३० लक्ष ग्रामीण कुटुंबाकडे ०.८% पेक्षाही कमी जमीन होती. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीला जोडधंदा म्हणून इतरही उद्योग करावे लागले. असे एकूण जमिनीपैकी ४८% जमिनीतून भात हे प्रमुख पीक घेतले जात होते. तर त्या खालोखाल गहू, वारली, बटाटे, सोयाबीन ही पिके घेतली जातात.

### ५.६.६ खनिज संपत्ती:

जपानने खनिज संपत्तीला देखील प्राधान्य दिले आहे. जपानमध्ये विविध प्रकारची खनिज संपत्ती असली तरी, त्याचे साठे लहान आहेत. त्यामुळे त्यांचा मागणीशी मेळ घालणे अवघड बनले आहे. खनिजांचा दर्जा ही हलका असून हे साठे दूरवर पसरलेले आहेत. खनिजांमध्ये तांबे, जस्त, शिसे व चांदी यांचा समावेश असून, चुनखडी, पेट्रोलियम, नैसर्गिक वायू, गंधक व चुने या खनिजांचे उत्पादन अत्यल्प आहे. निकेल, कोबाल्ट, पोटॅशियम, फॉस्फेट इत्यादींचा या देशात पूर्ण अभाव जाणवतो. दगडी कोळसा हे सर्वात महत्त्वाचे खनिज होय १९८५ पर्यंत त्याचे उत्पादन केवळ ३.५ कोटी टन होते. या माध्यमातून जपानची केवळ ४५%टक्के मागणी पूर्ण होऊ शकते. देशात कोळसा उद्योगाचे मोठया प्रमाणात उभारणी करण्यासाठी शासनाने स्वतंत्र कार्यक्रम केले आहे. त्यामुळे कोळशाच्या उत्पादनाला मोठया प्रमाणात चालना मिळाली. जपानमध्ये तेलाचे साठेही कमी आहेत. उद्योगधंदे व दळणवळण यासाठी या खनिज तेलाचे मोठया प्रमाणात जपानला आवश्यकता असूनही पेट्रोलियम आयात करून गरज भागवली जाते.

### ५.६.७ पोलाद:

जगात अमेरिका व रशियाच्या खालोखाल पोलाद उत्पादन करणारे तिसरे राष्ट्र म्हणून जपानला ओळखले जाते. उत्तर होन्शु प्रांतात लोहखनिजांचे साठे आहेत. जपानमध्ये पोलादची उत्पादन क्षमतेचे साठे २.४५ कोटी टन असल्याचे सांगितले जाते. लोह खनिजाचा कमकुवत साठा असल्यामुळे, अमेरिका, कॅनडा, मलेशिया, भारत, फिलिपाईन्स या प्रदेशातूनच कच्चे लोखंड आयात केले जाते तांबे हे जपानचे महत्त्वाचे धातू खनिज आहे .

**५.६.८ विद्युत निर्मिती:**

मानवी जीवनाच्या दृष्टीने व उद्योगधंद्यासाठी आवश्यक विद्युत निर्मितीला जपानने चालना दिली, डोंगराळ प्रदेश व विपुल जलसंपत्ती उपलब्ध असल्याने जलविद्युत निर्मितीला चालना मिळाली. एकूण वीज उत्पादनाचा ७५% वीज पुरवठा, औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रातून केला जातो. आज जगात विद्युत निर्मितीच्या बाबतीत जपान जगातील तिसऱ्या क्रमांकाचे राष्ट्र आहे.

**५.६.९. इलेक्ट्रॉनिक उद्योग :**

इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या उत्पादनाच्या बाबतीत जपान जगातील सर्व राष्ट्रांपेक्षा पुढील क्रमांकावर आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या काळापासून रेडिओ, दूरचित्रवाणी, गृहप्रयोगी उपकरणे, इलेक्ट्रॉनिक्स, जनिक यंत्रणे व इतर अवजड सामग्री व दळणवळण, संदेशवहन प्रक्षेपण इत्यादींना उपयुक्त ठरणारी सामग्रीच्या उत्पादनात प्रगती केली आहे. संगणक छपाईच्या निर्मितीला तर जपानने मोठया प्रमाणात चालना दिलेली आहे.

**५.६.१० धातू उद्योग:**

अशुद्ध धातूपासून शुद्ध धातू तयार करणे. या धातूपासून विविध वस्तू व शस्त्रास्त्रे तयार करणे, हे या उद्योगाचे कार्य आहे. या धातूच्या उत्पादनात जपानला मोठया प्रमाणावर चालना मिळाली आहे. हा उद्योग खाजगी व शासकीय स्तरावर चालत आहे. उद्योगाच्या विकासासाठी कच्चामाल निरनिराळ्या देशातून आयात करून जपानने आपले गरज भागवण्याचे प्रयत्न केलेले आहेत. सिमेंटच्या उत्पादनातही जपानची प्रगती झाली असून मोठया प्रमाणात सिमेंट उत्पादन केले जात आहे.

**५.६.११. रसायने:**

औद्योगिक प्रगती व निर्माण झालेली रसायनाची गरज जपानमध्ये मोठया प्रमाणात उद्योगधंद्याच्या विकासाने पूर्ण केली आहे.  विविध औद्योगिक खते व कृषी रसायनाच्या निर्मितीला दुसऱ्या महायुद्धानंतर चालना मिळाली असून जपानचा या औद्योगिक क्षेत्रात जगात पाचवा क्रमांक आहे.

**५.६.१२ कापड उद्योग:**

जपानमध्ये कापड उद्योग हा सर्वात मोठा उद्योग आहे. यात मुख्यता धागे बनवणे, सुती कापड तयार करणे, लोकर धागा बनवणे व लोकरीचे कापड तयार करणे, उत्तम कापड तयार करणे इत्यादी उद्योगांचा समावेश होतो. १९६० नंतर या क्षेत्रात अद्ययावत यंत्रसामग्रीचा उपयोग करण्यात आला. त्यानुसार उत्पादनामध्ये मोठया प्रमाणात वाढ करण्यात आली.

### ५.६.१३. मत्स्य उद्योग:

जपानला मिळालेल्या प्रदीर्घ समुद्रकिनाऱ्याचा उपयोग करून मोठया प्रमाणावर मत्स्य उद्योगाला चालना मिळाली आहे. व्यवसायाच्या उत्पादनाच्या बाबतीत आधुनिक काळाच्या मानाने रशियासारख्या राष्ट्राला मागे टाकले आहे. जपान मासेमारीमध्ये अग्रेसर देश आहे. जपानची अन्नधान्याची गरज काही प्रमाणात भागवण्यास या मत्स्य उत्पादनाचा उपयोग झाला आहे. १९६० पासून मत्स्य उद्योगातील पदार्थाचा ही मोठया प्रमाणात वाढ होण्यास सुरुवात झालेली दिसते.

अशाप्रकारे जपानने आपले नवनवीन यंत्र- तंत्रे, आधुनिक उपकरणे, इलेक्ट्रॉनिक वस्तू, रसायने, कापड उद्योग, मत्स्य उद्योग, शेती, नवीन तंत्राचा विकास, पोलाद, धातूउद्योग अशा अनेक उद्योगांच्या निर्मितीतून मोठया प्रमाणात यश संपादन केला आहे. जपानच्या या आर्थिक प्रगतीसह जपानचा आर्थिक चमत्कार किंवा विकास असे संबोधले जाते.

## ५.७ समारोप

दुसऱ्या महायुद्धानंतर जपानने केलेल्या आर्थिक विकासास व प्रगतीस जपानचा आर्थिक चमत्कार असे संबोधले जाते. जपानने १९४५ नंतर अतिशय थोडया कालावधीत दैदीप्यमान व डोळे दिपून टाकणारी झटपट आर्थिक प्रगती साधली. त्यामुळे देखील या काळातील जपानच्या आर्थिक प्रगतीस जपानमधील आर्थिक चमत्कार म्हणतात. हा चमत्कार सहजासहजी झाला नव्हता. अमेरिकेने हिरोशिमा व नागासाकी या जपानच्या अति महत्त्वाच्या व्यापारी शहरावर व प्रचंड लोकवस्ती असलेल्या प्रदेशात अणुबॉम्बचा हल्ला करून दोन्ही प्रदेश क्षणार्धात बेचिराख केले होते. असे असताना देखील जपानने पुन्हा 'शून्यातून विश्व निर्माण केले' असे म्हणता येईल. कारण जपानच्या ह्या हल्ल्यामुळे मनुष्य, शस्त्रास्त्रे व जीवित हानी होऊन यानंतर अनेक वर्ष रोगराई, अप्रदूषित वातावरणावर मात करून, जपानने पुन्हा आपल्या जिद्द, चिकाटी, अजोड असे कष्ट व प्रामाणिकपणाच्या जोरावर पुन्हा आपल्या देशाला इतर राष्ट्राच्या बरोबरीने आणले. याला चमत्कारच म्हणावे लागेल. म्हणून जपानच्या प्रगतीस आर्थिक चमत्कार संबोधले जाते.

## ५.८ प्रश्न

१. दुसऱ्या महायुद्धामुळे जपानचे झालेले आर्थिक नुकसान सविस्तर स्पष्ट करा.

२. जपानची पुनर्स्थापना सविस्तर स्पष्ट करा.

३. १९५२ नंतरच्या जपानच्या अंतर्गत परिस्थितीचा आढावा घ्या.

४. जपानचा आर्थिक चमत्कार यावर टीप लिहा.

## ५.९ संदर्भ

१) वैद्य सुमन, कोठेकर शांता, आधुनिक जग, (१९४५-२०००).

२) शिंदे सुभाष, लोखंडे अजयकुमार, समकालीन जग, शेठ पब्लिकेशन, मुंबई.

३) कोलारकर, श. ग., आधुनिक जग, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर.

४) आचार्य धनंजय, विसाव्या शतकातील जग श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

५) कदम, य. ना. आधुनिक युरोपचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

६) वक्कानी, नि. आ. आधुनिक अमेरिकेचा इतिहास, श्री. मंगेश प्रकाशन, (१९६०-१९९५)

❖❖❖❖

munotes.in

# ६

## जपानची पुनर्रचना

## अमेरिकेसह जपानचे परराष्ट्रधोरण

**घटक रचना :**

६.० उद्दिष्टे

६.१ प्रस्तावना

६.२ परराष्ट्र धोरणाचा अर्थ व व्याख्या

६.३ परराष्ट्र धोरणाची मूलभूत मार्गदर्शक तत्वे

६.४ वर्चस्वानंतरच्या काळातील अमेरिका-जपान संबंध

६.५ जपानचे अमेरिकेसह इतरराष्ट्रांशी परराष्ट्रीय संबंध

६.६ जपानचीआर्थिक प्रगती

६.७ जपानच्या परराष्ट्र धोरणाचीउद्दिष्टे

६.८ जपानचे परराष्ट्र मंत्रालय

६.९ १९५१ चा सुरक्षा करार

६.१० १९५१ चा शांतता करार

६.११ योशिदा सिद्धांत

६.१२ फुकुडा सिद्धांत

६.१३ समारोप

६.१४ प्रश्न

६.१५ संदर्भ

## ६.० उद्दिष्टे

१. परराष्ट्र धोरणाचा अर्थसमजून घेणे.

२. दोन परराष्ट्र धोरणाची मूलभूत मार्गदर्शक तत्वे जाणून घेणे.

३. अमेरिकेने जपानच्या मिळवलेल्या कब्जानंतर अमेरिका व जपान संबंध जाणून घेणे.

munotes.in

४. जपानचे अमेरिकेसह इतरराष्ट्रांशी असलेले परराष्ट्र धोरण जाणून घेणे.

५. जपानने केलेले विविध करार व सिद्धांत समजून घेणे.

## ६.१ प्रस्तावना

२८ एप्रिल १९५२ रोजी अमेरिका जपान शांतता कराराच्या तरतुदी अंमलात आणल्या. त्या दिवशी प्रत्यक्षात जपान व्याप्तीची इतिश्री झाली. तेव्हापासून स्वतंत्र राष्ट्र म्हणून जपानची वाटचाल सुरू झाली. १९५२ साली व्याप्तीचे राष्ट्रीय मानहानी संपल्यानंतर जपानला स्वतःचे भवितव्य घडवण्याचे स्वातंत्र्य मिळाले. नव्या लोकशाही व्यवस्थेखाली राजकीय स्थैर्य, आर्थिक प्रगती व सामाजिक सुरक्षितता प्रस्थापित करण्याच्या कार्यावर जपानच्या शासकाने लक्ष केंद्रित केले. यावेळी जपान पुढे अनेक अडचणी होत्या. लोकशाही शासनयंत्रणा प्रस्थापित झाली असली तरी, ती लादलेली होती ती मुळातून उत्क्रांत झाली नव्हती. लोकशाही तत्वे जनतेच्या अंगवळणी पडली नव्हती. तसेच दुसऱ्या महायुद्धापूर्वी जपानमध्ये राजकीय पक्ष अस्तित्वात असले तरी लष्करवादाच्या शासनावरील प्रभावामुळे ते बळकट झाले नव्हते. व्याप्तीच्या काळात नवे राजकीय पक्ष अस्तित्वात आले. परंतु राजकारणाचे धागे पक्षाभोवती केंद्रित होण्याऐवजी व्यक्तीभोवती केंद्रित झाले. निर्वाचित सरकारही काही अपवाद वगळता आपला कार्यकाळ पूर्ण करू शकली नाही. परराष्ट्रीय संबंधाच्या क्षेत्रामध्ये मात्र जपानने हळूहळू स्वतंत्र धोरणाचा आग्रह धरला आणि अमेरिकेचे दडपण कमी करण्याचा प्रयत्न केला. आपल्या व्यापार व आर्थिक वृद्धी करण्यासाठी इतर देशांशी सलोख्याची संबंध ठेवणे व व्यापारी संबंध प्रस्थापित करण्याच्या हेतूने जपानने आपले परराष्ट्रीय धोरण ठरवले.

## ६.२ परराष्ट्र धोरणाचा अर्थ व व्याख्या

**परराष्ट्र धोरणाचा अर्थ-**

"प्रत्येक देश अथवा राज्य आपापल्या योग्य असलेले वर्तन इतर राज्य अथवा देशाने करावे यासाठी आपल्या मर्यादित विविध प्रभावांचा वापर करून, त्या त्या राज्यातील अथवा देशातील राज्यकर्त्यांचे मन वळवते यालाच स्थूल मानाने परराष्ट्र धोरण असे म्हणतात."

१९ व्या शतकात परराष्ट्राच्या उदयानंतर प्रत्येक राष्ट्र स्वतंत्र असावे हे तत्व सर्वसामान्य झाले. यातूनच जगातील अशा स्वतंत्र राष्ट्राच्या परस्पर संबंधास आकार लाभून त्यातील एका आंतरराष्ट्रीय व्यवस्थेचे रूप निर्माण झाले व प्रत्येक राष्ट्राने इतर राष्ट्राचे आपले व्यापारी संबंध प्रस्थापित करून आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले वर्चस्व निर्माण केले.

**व्याख्या-**

**१. जॉर्ज मॉडेल्सकी -**

"परराष्ट्र धोरण म्हणजे एका समुदायाने किंवा राष्ट्राने दुसऱ्या समुदायाचे किंवा राष्ट्राचे वर्तन प्रभावित करण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय पटलावर स्वतःचे स्थान सुरक्षित व मजबूत करण्यासाठी कार्यान्वित केलेला क्रियाकलाप होय.

**२. जोसेफ फ्रांकेल -**

"एका राष्ट्राचा इतर राष्ट्राच्या इतर राष्ट्रांशी असलेल्या अन्योन्य क्रियेशी संबंधित निर्णय आणि प्रक्रियेंचा संच म्हणजे त्या राष्ट्राचे परराष्ट्र धोरण होय."

## ६.३ परराष्ट्र धोरणाची मूलभूत मार्गदर्शक तत्वे

१९५० आणि १९६० च्या दशकात जपानने परराष्ट्र धोरणाची कृती तीन मूलभूत तत्वांद्वारे मार्गदर्शन केले. या तत्त्वाचे पालन केल्याने अभूतपूर्व आर्थिक प्रगती प्राप्ती झाली. तसेच प्रगतीच्या वाढीस हातभार लागला व देशाचा सर्वांगीण विकास घडून येऊन इतर राष्ट्रासोबत व्यापारी आणि सलोखाचे संबंध प्रस्थापित करणे सोपे झाले. तत्वे पुढीलप्रमाणे:

१. सुरक्षा आणि आर्थिक दोन्ही कारणासाठी युनायटेड स्टेटशी सहकार्य करणे.

२. जपानच्या स्वतःच्या आर्थिक गरजांसाठी अनुकूल मुक्त व्यापार प्रणालीस प्रोत्साहन देणे.

३. संयुक्त राष्ट्रे (UN) द्वारे आंतरराष्ट्रीय सहकार्य प्रस्थापित करणे.

## ६.४ वर्चस्वानंतरच्या काळातील अमेरिका व जपान संबंध

अमेरिका व जपान या देशातील तणाव कमी व्हावा म्हणून निक्सन यांनी जपानच्या पंतप्रधानांची भेट घेतली. यात ठरल्याप्रमाणे अमेरिकेने पॅसिफिक महासागरातील ओकीनावा हे बेट १९७२ मध्ये जपानला देण्याचे मान्य केले. पण एक अट ठेवली. ती अशी की, दोन्ही देशांना संमत होईल अशा सुविधा अमेरिका ओकिनावामध्ये करीत राहील. त्याचबरोबर दोन्ही देशांनी सहमती दर्शवली की, दोन्ही देश आर्थिक क्षेत्रात परस्परांना सहकार्य करतील. जपानने १९७० मध्ये 'ओसुमी' या नावाचा एक उपग्रह अंतराळात सोडला. जपान याबाबतीत जगामध्ये चौथे राष्ट्र म्हणून प्रसिद्ध झाला. त्याचे बळ वाढले व जपानने ओकिनावा या बेटावर पुन्हा आपल्या आरमाराचे प्रमुख केंद्र बनवले. जपान दुसऱ्या महायुद्धाच्या अगोदर जसा बलाढ्य देश होता. तसा तो १९७२ च्या सुमारास बनू लागला. पण पूर्वी तो आक्रमवृत्तींचा होता. यावेळी मात्र तो आक्रमक बनू शकणार नाही कारण जपानमध्ये लोकशाहीवर श्रद्धा असणारा गट तसे करू देणार नाही. जगातील देशांना तशी आशियातील देशांना जपानचे हे यश खटकू लागले.

राष्ट्राध्यक्ष निक्सन यांनी जपानच्या मालावर१०% आयात कर वाढविला. अमेरिकेच्या प्रोत्साहनाने जपान बराचसा माल अमेरिकेला निर्यात करीत होता. त्यामुळे आता त्याला आर्थिक घाटा सहन करावा लागला. दुसरी गोष्ट म्हणजे अमेरिकेशी व्यापार करार केला ही गोष्ट जपानला खटकली ते स्वाभाविकही होते. कारण व्यापाराच्या क्षेत्रात चीन व जपान हे दोन्ही देश स्पर्धक होते. दोघांची आशियात आपले प्रभावक्षेत्र वाढवण्याची महत्त्वकांक्षा होती. चीनशी अमेरिकेने जेव्हा करार केला तेव्हा जपानला वाटले की, अमेरिकेला आता आपल्याविषयी आवड राहिली नाही. पण निक्सन यांना तर चीनशी संबंध वाढवणे जसे महत्वाचे वाटत होते तसेच जपानशी मैत्री करण्याची इच्छा होती.

munotes.in

१९७२ मध्ये निवडून आलेले जपानचे पंतप्रधान काकूई तनाका यांनी शिखर परिषदेत भेट घेऊन, निक्सन यांनी खालील बाबींवर चर्चा केली.

अ) जागतिक समस्या सोडवणे.

ब) आशियातील प्रकरणे पाहणे.

क) एकमेकांच्या हितसंबंधाच्या बाबी लक्षात घेणे.

शेवटी दोघांनी आपल्या राजनैतिक संबंधाविषयी निष्ठा ठेवण्याची गोष्ट बळकट केली. याप्रमाणे निक्सन यांनी जपानशी सलोख्याचे संबंध प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न चालूच ठेवले. आणि त्यातून अमेरिका व जपान हे संबंध  सुदृढ होण्यास मदत झाली.

## ६.५ जपानचे अमेरिकेसह इतरराष्ट्रांशी परराष्ट्रीय धोरण

### १. जपान-अमेरिका परराष्ट्रीय धोरण-

जपानचा सर्वात जास्त व्यापार अमेरिकेशी चालत होता. जपान व अमेरिकेमध्ये अनेक वस्तूंची देवाण-घेवाण होत होती. जपान अमेरिकेकडून अन्नधान्य, लाकूड, कापूस व इतर कच्च्या मालाची आयात करते तर अमेरिका या वस्तूच्या मोबदल्या जपानकडून पोलाद,यंत्रे, कॅमेरा, घडयाळे, रेडिओ व दूरदर्शन यांसारखी लागणारे इलेक्ट्रॉनिक्स घटक इत्यादी वस्तू विकत घेते. १९९० च्या दशकात अमेरिकेची सफरचंदे व मोटार गाडया देखील जपानमध्ये विकल्या जाऊ लागल्या. जपानमधील संगणक उद्योगात अमेरिकेत बनवलेल्या संगणक सॉफ्टवेअरसाठी मोठया प्रमाणात मागणी होती. सध्या जपानने खुल्या अर्थव्यवस्थेची तत्व स्वीकारलेले आढळते. त्याचप्रमाणे खाजगीकरणाचादेखील स्वीकार केलेला दिसतो. उदा. जपानमध्ये रेल्वेचे खाजगीकरण करण्यात आलेले आहेत.

जपान व अमेरिका यांच्या दरम्यान जरी फार मोठया प्रमाणात व्यापार चालत असला तरी, या दोन आर्थिक बलाढय देशांमध्ये व्यापारासंबंधी थोडेफार रुसवे-फुगवे देखील असल्याचे आढळते. अमेरिकन उद्योजकाने जपानविरुद्धची मुख्य नाराजी म्हणजे जपानमध्ये अमेरिकन वस्तु विकत घेणे फार कठीण पडते. जपानी उत्पादनाच्या तुलनेत अमेरिकन बनावटीचे उत्पादने, वस्तू जपानमध्ये महाग पडतात. कारण जपान सरकारने जपानी उद्योगांना मोठया प्रमाणात सबसिडी अनुदान देते. त्यामुळे जपानी वस्तूची किंमत अमेरिकन वस्तुपेक्षा निश्चितच कमी असते. असे असल्यामुळे जपानमध्ये अमेरिकन वस्तूंचा फार कमी प्रमाणात बाजारपेठ असून त्याचा खप कमी आहे. जपानी सरकारने जपानी उद्योगांना सबसिडी अनुदान देणे अमेरिकेला रुचत नाही. त्याप्रमाणे अमेरिकेने एकेकाळी भुईसपाट केलेले राष्ट्र आर्थिकदृष्ट्या बलाढय होत चालले आहे. हे अमेरिकेस डोईजड होत आहे. तसेच १९९५ साली अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष बिल क्लिंटन आणि जपानी बनावटीच्या जपानमधून अमेरिकन बाजारपेठेत येणाऱ्या मोटार गाडयांच्या आयात करात १००% वाढ करण्याची धमकी वजा घोषणा केली होती. याचे मुख्य कारण असे होते की टोयोटा, मितसुबीशी, निसान, होंडा, माझदा इत्यादी जपानी कंपन्या त्यांनी बनवलेल्या मोटर गाडया अमेरिकेत मोठया प्रमाणात विकत होते. जपानी कंपनीच्या मोटार गाडयांना अमेरिकेत मोठी मागणी देखील होती. या विक्रीतून या जपानी कंपन्यांना व त्या अनुषंगाने जपानचे

अर्थव्यवस्थेला फार फायदा होत होता. असे असले तरी अमेरिकन कंपनीचे म्हणणे होते की, जपानमध्ये अमेरिकन कंपन्यांनी बनवलेल्या मोटर गाडयांना अतिशय नगण्य प्रमाणात बाजारपेठ आहे. जपानी लोक फक्त जपानी बनावटीच्याच गाडया विकत घेतात. याचाच अर्थ जपान अमेरिकेत आपल्या मोटारगाडया विकून विक्रमी नफा कमवत होते. परंतु जपानमध्ये लोक अमेरिकन मोटार गाडया विकत घेण्यास धजत नसत. जपानने अमेरिकन बनावटीच्या मोठया गाडयांसाठी बाजारपेठ खुली करून द्यावी यासाठी जपानने दबाव आणण्यासाठी १००% कर वाढवण्याची घोषणा केली होती. प्रत्यक्षात मात्र असे काही नव्हते. अमेरिका व जपानने मोठया गाडयांच्या बाजारपेठेविषयक एक करार झाला व जपानने अमेरिका मोटरगाडयांना जपानमधील बाजारपेठ खुली करून देण्याचे मान्य केले. अशाप्रकारे जपान व अमेरिका यांच्यातील परराष्ट्रीय धोरण हे बळकट होऊ लागले.

**२. जपान- चीन परराष्ट्रीय धोरण.**

१९५६ नंतर रशिया प्रमाणेच अमेरिका व साम्यवादी चीन यांच्या संबंधाबाबत जपानने विचार करावा असे सूर देशात उठू लागले. अमेरिकेच्या सुरक्षा कराराच्या दडपणामुळे शेजारील राष्ट्राच्या मनात जपानविषयक किंतु निर्माण झाले होते. त्यामुळे चीन सारखी नजीकची मोठी बाजारपेठ जपानी मालाला उपलब्ध होत नाही अशा तक्रारी होऊ लागल्या. तेव्हा जपानच्या सरकारने जपानी व्यापारी शिष्ट मंडळांना चीन भेटीची परवानगी दिली. आणि काही प्रमाणात खाजगी पातळीवर व्यापार करण्याची मुभा दिली.

१९७१ साली साम्यवादी चीन आणि अमेरिका यांच्यातील दुरावा नाहीसा करण्याच्या हेतूने अमेरिकेच्या निक्सन सरकारचे प्रयत्न सुरू झाले. त्याचबरोबर फेरविचार करावा अशी मागणी जपानमध्ये केली जाऊ लागली. चीन व जपान यांची राजनैतिक संबंध अनेक वर्षापासून विळा भोपळ्याचे असले तरी, दोघात सांस्कृतिक साधर्म्य आणि प्रादेशिक निकटता होती. विशेष म्हणजे उद्योग प्रधान जपानला चीनकडून कच्च्या मालाच्या पुरवठयाची गरज होती. १९६० च्या सुमारास जपानमधील अमेरिकेविरोधी लोकमत लक्षात घेता जपानचे सरकार रशियाकडे वळू लागल्याचे दिसू लागले. हा बदल रशियाशी यावेळी वितुष्ट येऊ लागलेल्या चीनला नको होते. अशा स्थितीत सप्टेंबर १९७२ मध्ये जपानचे पंतप्रधान तनाका यांनी पेकिंगला भेट दिली. यावेळी बऱ्याच वर्षाचे वितुष्ट संपवुन चीन-जपान संबंधाचे नवे पर्व सुरू झाले. चीनवर जपानने आक्रमण केल्याबद्दल जपानने दिलगिरी व्यक्त केली. पेकिंग सरकार हेच चीनचे खरे सरकार असून तैवान हा चिनी गणराज्याचाच अविभाज्य भाग असल्याचे जपानने मान्य केले. जपानपासून घ्यावयाच्या युद्धखंडनीवरील हक्क चीनने सोडून दिला आणि जपानने चीनच्या साम्यवादी शासनाला मान्यता दिली. तसेच परस्परांवर आक्रमण न करण्याचे, अंतर्गत कारभारात ढवळाढवळ न करण्याचे आणि दोघातील समस्या वाटाघाटीच्या मार्गाने सोडवण्याचे दोन्ही पक्षात मान्य केले. २२ सप्टेंबर १९७२ रोजी दोन्ही देशात राजनैतिक संबंध प्रस्थापित झाले. त्यानंतर परस्पर व्यापार वाढीस लागला. अशा प्रकारे जपानने अत्यंत हुशारीने चीनशी सलोखाचे संबंध प्रस्थापित करून आपले परराष्ट्रीय संबंध सुदृढ केले.

**३. जपान- रशिया परराष्ट्रीय धोरण-**

युद्धकाळात जपानच्या तिजोरीवर पडलेला बोजा युद्ध समाप्तीच्या वेळी झालेला विध्वंस यामुळे जपानला आर्थिक स्थैर्य प्राप्त करून देणे व त्यासाठी औद्योगिक विकास घडवून परदेशी व्यापार जास्तीत जास्त वाढवणे हे जपानच्या परराष्ट्रीय धोरणाचे मुख्य उद्दिष्ट बनले. या दृष्टीने पाश्चिमात्य राष्ट्रांशी सलोख्याचे संबंध प्रस्थापित करून १९५५ साली जपानने कॉमनवेल्थ राष्ट्रांशी व्यापार सुरू केला. १९५५ साली अधिकार रूढ झालेल्या डेमोक्रॅटिक पक्षाच्या होतोयामा मंत्रिमंडळाने सोविएत रशिया व साम्यवादी चीन यांच्याशी व्यापार व राजनैतिक संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. परंतु असे करताना अमेरिकेचा गैरसमज होऊ न देण्याची खबरदारी घेण्याचा मानस ही व्यक्त केला. रशियाशी राजनीतिक पातळीवर वाटाघाटी सुरू झाल्या त्या बऱ्याच अंशी सफल झाल्या. १९५६ साली दोन्ही देशांनी संयुक्त पत्र काढून युद्धाची स्थिती संपवून राजनैतिक संबंध प्रस्थापित करण्याची व परस्पर व्यापार सुरू करण्याचे मान्य केले. जपानच्या युतीतील प्रवेशाला विरोध न करण्याचे रशियाने मान्य केले. यामुळे १९५६ साली जपानला युनोचा सभासद होण्याचा मार्ग मोकळा झाला.

अशाप्रकारे जपानने अमेरिकेसह रशिया व चीन यांच्याशी सलोख्याचे व्यापारी संबंध ठेवून आपले परराष्ट्रीय धोरण सुदृढ व बलाढय केले होते.

## ६.६ जपानची आर्थिक प्रगती

१९५२ नंतर जपानचा औद्योगिक विकास तसेच व्यापारवृद्धी आणि एकूण आर्थिक भरभराट होण्यास अनेक गोष्टी अनुकूल ठरल्या. पहिली महत्त्वाची बाब म्हणजे खाजगी गुंतवणूकेला प्रोत्साहन देण्यात आले. मोठे औद्योगिक संघ स्थापन करण्यावर जे निर्बंध होते, ते निर्बंध दूर झाल्यामुळे पूर्वीप्रमाणे काही मूठभर मोठया घराण्याच्या ताब्यातील औद्योगिक संघ पुन्हा रिंगणात उतरले. अमेरिकन भांडवल मोठया प्रमाणात जपानमध्ये गुंतवले जाऊ लागले. जहाज बांधणी, कापड, मोटारी, छपाई, इलेक्ट्रॉनिक वस्तू इत्यादीचे उत्पादन क्षेत्रात जपानने महत्त्वाचे स्थान पटकावले. मालाचा उत्तम दर्जा व वाजवी किंमत यावर जपानने नव्या नव्या बाजारपेठा मिळवल्या. जपानवर युद्धकाळात झालेले बॉम्ब हल्ले, अमेरिकेने अमलात आणलेले लष्करवाद आणि आर्थिक खच्ची करणाचे धोरण यामुळे औद्योगिक यंत्रणा उध्वस्त झाल्याने, त्या जागी नवी अद्ययावत यंत्रणा उभारणे शक्य झाले. अद्यावत यंत्रसामग्री व तंत्रज्ञान यांचा वापर करणाऱ्या लहान उद्योगांचे जाळे देशभरात पसरले. कमी वेतनावर काम करणाऱ्या कुशल कामगारांचा तुटवडा जपानमध्ये नसल्यामुळे उत्पादन खर्च इतर प्रगत राष्ट्रांच्या तुलनेत कमी असेल, तसेच जपानने शांततेचे धोरण अंगीकारल्यामुळे आणि जपानच्या वसाहती हातून गेल्यामुळे लष्करी यंत्रणावर होणारा खर्च मोठया प्रमाणात कमी झाला हा पैसा उद्योगात भांडवल म्हणून गुंतवणूक करणे शक्य झाले. याशिवाय औद्योगिक विकासाला अनुकूल ठरलेली एक बाब म्हणजे जपानी लोकांची शिस्तप्रियता आणि परिश्रम वृत्ती अणुबॉम्ब टाकून अमेरिकेने जपानमध्ये केलेल्या मानवी संहार व त्यानंतरही वर्षांनुवर्षं त्यांचे दुष्परिणाम डोळ्यासमोर पुढे सतत दिसूनही, ही सल मनाच्या कोपऱ्यात निर्धारपणे दडपून ठेवून जपानी लोकांनी जिद्दीने आणि शिस्तीने काम करून जागतिक आर्थिक क्षेत्रात पाश्चात्य राष्ट्राच्या बरोबरीचे स्थान प्राप्त करून घेतले.

"ऑर्गनायझेशन फॉर इकॉनोमिक कोऑपरेशन अँड डेव्हलपमेंट" या प्रगत राष्ट्राचे आंतरराष्ट्रीय संघटनेचे सदस्यत्व जपानने मिळवले यावरून जपान एक आर्थिक शक्ती बनल्याचे स्पष्ट झाले.

१९४५ नंतरच्या २५ वर्षात जपानने केलेले आर्थिक प्रगती निश्चितच अतुलनीय आहे. १९७० पासून जपान आग्नेय आशियाई राष्ट्राच्या आर्थिक विकासाला हातभार लावू लागला. मोठया रकमा उद्योगांसाठी आशियाई राष्ट्रांना कर्जाऊ दिल्या. केवळ आशियातच नव्हे तर आफ्रिका व लॅटिन अमेरिका राष्ट्रातही जपानने भांडवल व तंत्रज्ञान पुरवले. १९७० सालानंतर तर आंतरराष्ट्रीय चलन स्पर्धेत अमेरिकन डॉलरची बरोबरी जपानी करू लागले. आज आशियातील विकसित देशात जपान पहिल्या क्रमांकावर तर जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे. उद्योगावर जपानी समाजाचे राहणीमान उंचावले, नवा मध्यम वर्ग अस्तित्वात आला. व्यक्तिस्वातंत्र्याचे वारे वाहू लागले. मात्र काही परंपरा आजही जपानी समाजात जोपासल्या जातात. जपानमध्ये विशेष जीवन पद्धती, कुटुंब पद्धती काही प्रमाणात पाश्चात्य प्रभाव येऊनही हे नष्ट झालेली नाही. १९५६ नंतर काही प्राचीन परंपरांचे पुनरुज्जीवन करण्यात आले. शिंतो धर्म स्थानांना सम्राट व पंतप्रधान भेट देऊ लागले. शैक्षणिक अभ्यासक्रमातून सम्राटाला मान देण्याची शिकवण दिली जाऊ लागली. अशा मार्गाने जपानची मूळ अस्मिता आजही टिकून ठेवण्यात आली आहे.

## ६.७ जपानच्या परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे

### १. देशाच्या सीमांचे रक्षण -

दुसऱ्या महायुद्धात राखरांगोळी झालेल्या जपानने नवनिर्मिती घडवून आणली. राज्यकर्ते व जनता या दोघांनी या कामी सारखीच मेहनत घेतली. आपले स्वार्थ बाजूला ठेवून, राष्ट्राच्या सर्वांगी विकास कसा करता येईल याचाच विचार प्रत्येक जपानी व्यक्तीने केला आणि आपल्या मेहनतीच्या जोरावर आर्थिक विकास घडवून आणला. हे करत असताना त्यांनी आपल्या देशाच्या सीमा संरक्षित केल्या. कारण बाह्य कोणत्याही आक्रमणापासून आपल्या देशाचे रक्षण करता यावे म्हणून जपान इतर महत्त्वाच्या प्रगती सोबतच जपानने देशाच्या सीमा संरक्षित व सुरक्षित केल्या. तसेच सुसज्ज असे लष्कर तैनात करून आपल्या देशाच्या सीमांचे रक्षण केले.

### २. देशाची सुरक्षितता -

जपानने जसे देशाच्या सीमा संरक्षित केल्या. त्याप्रमाणे आपल्या देशाचे संरक्षण व बाह्य आक्रमण होऊ नये या दृष्टीने महत्त्वाचे प्रयत्न केले. कारण इतर विकासासोबत देशाची संरक्षेमध्ये ही अत्यंत महत्त्वाची असल्याने, जपानने आपल्या देशाचे संरक्षिततेत मोठया प्रमाणात वाढ करून घेतली.

### ३. उद्योगधंद्यांचे आधुनिकीकरण -

पाश्चिमात्य राष्ट्राच्या प्रभुत्व व समृद्धीचे रहस्य त्यांच्या औद्योगिक क्षेत्रातील प्रगतीवर अवलंबून आहे हे जपानने ओळखूनच, राष्ट्राच्या औद्योगिकरणाच्या कार्याचे नियोजन केले. त्यासाठी सरकारने स्वतः पुढाकार घेऊन अवजड उद्योगधंद्याची उभारणी आणि वाहतूक व



munotes.in

दळणवळणाच्या मूलभूत सुविधा उपलब्ध करण्यावर भर दिला. पूर्वीच्या अमीर उमरावांना व सामुराईंना सरकारने उद्योगधंदे सुरू करण्यास उत्तेजन दिले. सरकारने पोलाद, कोळसा, पेट्रोलियम, कापड व वीज इत्यादी क्षेत्रातील कारखानदारीमध्ये मोठी गुंतवणूक करून जीवनावश्यक वस्तूंच्या मुबलक उत्पादनाचे उद्दिष्ट ठरवले. त्यामुळे व्यापार वाढण्यास चालना मिळणार होती. तसेच खाजगी भांडवलदारांना उत्तेजन मिळणार होते. जपानमध्ये कापूस पिकत नाही. परंतु जपानने कापड निर्मितीसाठी कापूस घेण्यास सुरू केला. त्यासाठी आवश्यक असलेला कापूस भारत व अमेरिकेतून आयात करून कापड उद्योगात विलक्षण प्रगती साध्य केली. कापडाच्या खप वाढवण्यासाठी देशभर प्रदर्शने भरवण्याचे विविध प्रयत्न केले. जपानने ८०% रेशीम अमेरिका व भारताला निर्यात करून कापडाचे उत्पादनात व विक्रीमध्ये केवळ समतोलच साधला असे नव्हे, तर कापड घेण्याच्या संख्येत वाढ करून कापडाचे उच्चांक उत्पादन सुरू केले. स्वाभाविकच जपानी कापडाचा खप वाढला. लोखंड पोलाद व अवजड यंत्रसामुग्री तयार करण्यासाठी जपानने कच्च्या मालाची उपलब्धता होत नव्हती. तरी ही जपानने इंग्लंडप्रमाणे त्या मालाची आयात करून अवजड यंत्रसामुग्रीची निर्मिती करणारे कारखाने स्थापन केले. दुचाकी वाहन उत्पादनासाठी खाजगी भांडवलदारांना प्रोत्साहन देऊन, वाहन निर्मिती व विक्रीच्या क्षेत्रात उज्ज्वल विकासाचा पाया घातला.

अशा प्रकारे जपानने औद्योगिक क्षेत्रात गरुड झेप घेऊन आपला औद्योगिक व आर्थिक विकास झपाट्याने केला.

**४. जनतेची आर्थिक उन्नती करणे -**

जपानच्या आर्थिक प्रगतीमुळे जपानी लोकांच्या राहणीमानात मोठा बदल झाला. त्यांचे राहणीमान उंचावले. १९७० साली राष्ट्रीय दरडोई उत्पन्नात १५८३ डॉलर्स इतके होते. कापड उत्पादन वाढल्याने सर्व ऋतूंमध्ये मुबलक कापड मिळू लागले. युद्धात नष्ट झालेली घरे, कारखाने, इमारती, बांधकाम व्यवसायिकांनी उभारल्या. वाहतूक साधने वाढली शिक्षण व इतर क्षेत्रात सामान्य लोकांना प्राधान्य मिळू लागले. जपानचा माल पाश्चिमात्य देशातील मालापेक्षा कोणत्याही बाबतीत कमी दर्जाचा नव्हता. शहरी जीवनात आश्चर्यकारक बदल घडून आला. घरोघरी टेलिव्हिजन, रेफ्रिजरेटर, वॉशिंगमशीन दिसू लागले. ग्रामीण जीवनात आधुनिकता शिरली औद्योगिक उत्पादनाप्रमाणे कृषी उत्पादनाचीही वाढ झाली.

**५. शेती व्यवसायातील सुधारणा -**

मेईजी क्रांतीस शेती व्यवसायातील विकासाची चांगली जोड मिळाली. शेतकरी वर्गाचे उत्तम सहाय्य झाले. सरंजामशाहीचा अंत झाल्यामुळे शेतकऱ्यांना शेतीची मालकी देण्यात आली. शेतीच्या मालाची प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. त्यामुळे शेतकऱ्यांना शेती व्यवसाय करताना उत्साह प्राप्त झाला. त्यांनी शेतीच्या विकासाकडे लक्ष देऊन शेतीमालाचे उत्पादन वाढवले. महसुली कराच्या आकारणीतील पूर्वीचे लहरीपणा दूर होऊन, नियमित व न्याय क्षेत्राची वसुली रोखीने सुरू झाल्यामुळे सरकारच्या तिजोरीत निश्चित उत्पन्नाची भर पडू लागली. त्यामुळे सरकारकडून बी- बियाणे, रासायनिक खते, यांत्रिक व शास्त्रीय अवजारांची उपलब्धता इत्यादी सोयी व सुविधा शेतकऱ्यांना मिळू लागल्या. शेतकऱ्यांना सुधारित पद्धतीने शेती व्यवसाय करण्यासाठी भूविकास बँकांकडून कर्ज देण्याची व्यवस्था झाली.

त्यामुळे शेतीचा विकास होऊन, शेतीमालाचे उत्पादन वाढले. शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा झाली. सहाजिकपणे जपानच्या सधन शेतकऱ्याचे देशाच्या विकासाला हातभार लागला. त्यामुळे जपानचा कायापालट घडून आला.

**७. औद्योगिक विकास घडवून आणणे -**

१९६६ च्या अखेरपर्यंत जपानच्या आर्थिक स्थितीत खूपच बदल झाला. जपानचा आर्थिक इतिहास म्हणजे खाजगी उद्योग, भांडवलशाही अर्थव्यवस्था व सहाय्यकारी शासकीय धोरण यांच्या संमिश्रनाने बनलेली यशोगाथा आहे. गेल्या काही वर्षात आर्थिक विकासाचा दर झपाट्याने वाढवून जपानने सर्व जगाचे लक्ष आपल्याकडे वेधले. याचे मुख्य कारण म्हणजे औद्योगिक उत्पादनामध्ये विलक्षण झपाट्याने झालेली वाढ. १९६२ च्या उत्पादनात झालेल्या वाढीपेक्षा अधिक वाढ १९७१ मध्ये आढळते. परिणामी आर्थिकदृष्ट्या जगामध्ये अमेरिकेची संयुक्त संस्थाने व रशिया यांच्यानंतर जपान हे तिसऱ्या क्रमांकाचे आर्थिक राष्ट्र मानले जाऊ लागले.

याच दशकात जपानने औद्योगिक क्रांती घडवून आणली. जहाज बांधणी, सिमेंट, पोलाद उत्पादन, यंत्रसामुग्री, घरगुती उपयोगासाठी लागणारी उपकरणे, रेडिओ, घडयाळे, टेलिव्हिजन, विजेचे उपकरणे इत्यादी वस्तूंचे प्रचंड उत्पादन करून जपानने आंतरराष्ट्रीय व्यापारात मानाचे स्थान मिळवले. खाजगी उद्योगधंद्यात शिस्त, नियोजन, वस्तूचा दर्जा इत्यादी बाबीकडे सरकारने लक्ष दिले. लघु उद्योगात सरकारी संस्थांनींं भरीव कामगिरी केली. कोणाचेही डोळे दिपून जावेत अशी आश्चर्यकारक प्रगती जपानने दुसऱ्या दशकात साध्य केली. १९५६ मध्ये उत्पादनाचा उच्चांक हा युद्ध पूर्वकाळातील उत्पादनाच्या उच्चांक पेक्षा सर्व उत्पादनाच्या बाबतीत अधिकच होता. वीज निर्मितीचे प्रमाण किती तरी पटीने वाढले होते. शेती, मासेमारी, जंगल पदार्थाचे उत्पादन ४०% ने वाढले. पोलाद उत्पादनाच्या बाबतीत जपानचा जगात पाचवा क्रमांक, सिमेंटच्या बाबतीत चौथा तर जहाज बांधणीच्या बाबतीत पहिला क्रमांक होता.

**८. लष्कराचे आधुनिकीकरण करणे -**

देशांच्या सीमांचे संरक्षण करणे व सुरक्षित करणे यासाठी लष्कर हे अतिशय प्रबळ असणे गरजेचे असल्याकारणाने व आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये आपले प्रभुत्व निर्माण करण्याच्या दृष्टीने आपले लष्कर प्रभावी ठेवणे किंवा प्रबळ असणे यासाठी जपानने लष्कराची पुनर्रचना केली. त्यात सुधारणा घडवून आणल्या जपानची शोगुन राजवटीतील सैन्य व्यवस्था सरंजामशाही पद्धतीची होती. सरंजामशाहीचा अंत झाल्यावर राष्ट्रीय सैन्याची उभारणी करणे आवश्यक होते. तसेच सेनेला पाश्चिमात्य पद्धतीचे लष्करी प्रशिक्षण देणे, अद्यावत युद्ध साहित्य सुसज्य करणे अत्यंत आवश्यक होते. राष्ट्र सामर्थ्यशाली व्हायचे असेल तर लष्करी सामर्थ्याला पर्याय नाही. हे जपानला ज्ञात होते. म्हणून जपानी लष्कराची पुनर्रचना करण्याचा कार्यक्रम हाती घेतला. फ्रान्सच्या धर्तीवर जपानी सैन्याचे फेर बांधणे सुरू करण्यात आले. सैनिकी प्रशिक्षण संस्थांची स्थापना करून सैनिकी अधिकाऱ्यांना कवायती शिस्तीचे धडे देऊन, अद्ययावत युद्धतंत्र व युद्ध साहित्याचे शिक्षण देण्यावर भर देण्यात आला. जपानने आधुनिक राष्ट्रीय लष्कराची उभारणी केली. जपानच्या लष्करासाठी फ्रान्स, जर्मनी व इंग्लंड या राष्ट्रांकडून अद्यावंत युद्ध साहित्य



munotes.in

शस्त्रास्त्रे, दारूगोळा, बनवून देण्यासाठी लढाऊ जहाजांची निर्मिती करण्यात आली. सैनिकाच्या प्रशिक्षणासाठी टोकियोच्या लष्करी अकॅडमीतून प्रथम फ्रेंच व नंतर जर्मनी अधिकाऱ्यांची मदत घेण्यात आली व त्यानुसार आपले लष्कर प्रबळ करून परराष्ट्रीय संबंध अधिक दृढ बनवले.

## ६.८ जपानचे परराष्ट्र मंत्रालय

जपान सरकारने कामकाजाचे नियमान व आंतरराष्ट्रीय संबंध निर्धारित करण्याच्या हेतूने परराष्ट्र मंत्रालयाची निर्मिती केली. परराष्ट्र धोरण हा जपान सरकारचा एक कार्यकारी विभाग आहे. आणि देशाच्या धोरण आणि आंतरराष्ट्रीय संबंधासाठी जबाबदार आहे. तसेच परराष्ट्र व्यवहार मंत्रालय स्थापना कायद्याच्या तिसऱ्या लेखाच्या दुसऱ्या टर्म द्वारे करण्यात आली. कायद्यानुसार मंत्रालयाचे ध्येय जपान आणि जपानी नागरिकांच्या नफ्यात सुधारणा करणे, शांततापूर्ण आणि सुरक्षित आंतरराष्ट्रीय संबंध राखण्यासाठी योगदान देणे आणि सक्रिय उत्सुक उपाययोजनांद्वारे दोन्ही चांगल्या आंतरराष्ट्रीय योजनांची अंमलबजावणी करणे हे आहे. पर्यावरण आणि सुसंवादी विदेशी संबंध ठेवणे व विकसित करणे हा मुख्य उद्देश आहे.

## ६.९ १९५१ चा सुरक्षा करार

८ सप्टेंबर १९५१ रोजी सॅन फ्रान्सिसकोमध्ये स्वाक्षरी केलेल्या जपान सोबतच्या शांतता कराराच्या आधारे जपान आणि सोविएत युनियन आणि पीपल्स रिपब्लिकन ऑफ चायना वगळता, बहुतेक मित्र राष्ट्रामधील युद्धाची स्थिती संपुष्टात आली आणि जपानने यांच्यातील परस्पर सुरक्षा सहाय्य करारावर १९५१ रोजी सॅन फ्रान्सिस्को येथे सुरक्षा करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. यानुसार सर्वच राष्ट्र कोणत्याही प्रकारच्या युद्धजन्य परिस्थिती निर्माण न करता एकमेकांशी मैत्रीचे, विश्वासाचे व्यापारी नाते सलोख्याचे ठेवतील व सुरक्षा प्रदान करण्याचे कार्य करतील.

## ६.१० १९५१ चा शांतता करार

मॅक ऑर्थर यांच्या मते, जपानमध्ये अधिकार शासनाचा काळ तीन वर्षापेक्षा जास्त असू नये कारण जपानमध्ये जर खरी लोकशाही यशस्वी करायचे असेल तर त्यांच्यावर परकीय शासनाचे नियंत्रण असता कामा नये. त्यामुळे अमेरिकेने जपान बरोबर तह करण्यासाठी मित्र राष्ट्रांबरोबर वाटाघाटी सुरू केल्या. अमेरिका व रशियामध्ये शीतयुद्धाला सुरुवात झाली होती. त्याचा परिणाम पूर्व आशियावर झाला होता. चीनमध्ये कम्युनिस्ट सत्ता स्थापन झाल्याने अमेरिकेची चिंता वाढली होती. त्यामुळे जपान आपल्या बाजूने राहावा असे अमेरिकेला वाटत होते. म्हणूनच सॅनफ्रान्सिसको येथे परिषद घेण्याचे ठरवण्यात आले. अमेरिकन परराष्ट्र सचिव जॉन डलेस यांनी युरोपातील विविध राष्ट्रांना भेटी दिल्या. यानंतर तहाचा एक कच्चा मसुदा तयार करण्यात आला. जपानविरुद्ध लढाईत भाग घेतलेल्या देशांना परिषदेचे निमंत्रण पाठविले. परंतु रशियाने व साम्यवादीची Brown या कराराला विरोध केला ४ सप्टेंबर १९५१ रोजी या परिषदेला सुरुवात झाली ५५

राष्ट्रापैकी ५० राष्ट्रांचे प्रतिनिधी हजर होते. जपानने ४२ राष्ट्रांनबरोबर तह केला. या त्यानुसार तरतुदी पुढीलप्रमाणे होत्या.

१. पॉटसडयाम करारानुसार घोषित केलेल्या सीमा जपानने मान्य कराव्यात. फार्मोसा पेस्का डोर्स, कुरील, दक्षिण साखलीन बेटावरील हक्क जपानने सोडावेत.

२. रयुक्यू व बोनीन बेटावर संयुक्त राष्ट्रसंघाची देखरेख राहील.

३. कोरियाच्या स्वातंत्र्याला जपानने मान्यता द्यावी.

४. संयुक्त राष्ट्रसंघटनेचे सभासद होण्यासाठी जपानने रीतसर अर्ज करावा.

५. १९४७ च्या नवीन राज्यघटनेनुसार नागरी अधिकाराचे जपानने पालन करावे.

६. जपानने संरक्षणासाठी सेनादल व नाविक दल उभारावे.

७. अमेरिकेने तीन महिन्यात आपले सैन्य जपानमधून काढून घ्यावे, पण आवश्यकता असल्यास काही फौजा जपानमध्ये राहतील.

अशाप्रकारे अमेरिकेने जपान इतर राष्ट्रांसोबत वेगवेगळ्या प्रकारच्या अटी व तहानुसार शांततापूर्वक तह करण्यात आला व तो जपानने मान्य केला.

## ६.११ योशिदा सिद्धांत

१९४८ ते १९५४ पर्यंत जपानचे पंतप्रधान धान शिगेरु यशोदा यांनी १९९१ मध्ये प्रसिद्ध यशोदा सिद्धांत मांडला. या सिद्धांतानुसार अमेरिकेच्या मदतीने जपानची देशांतर्गत अर्थव्यवस्था मजबूत करणे हे लक्ष होते. हा तो काळ होता जेव्हा जपानने अमेरिकेच्या मुक्त व्यापारी योजनेअंतर्गत वेगाने आर्थिक प्रगती केली होती. या काळात जपानची अमेरिकन निर्यात शिखरावर होती. जपानी वाहने आणि इलेक्ट्रॉनिक उत्पादनांना अमेरिकेत मोठी मागणी होती. आणि हाच तो काळ होता जेव्हा जपान अमेरिकेनंतर जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनणार होता. तसेच २१ व्या शतकात जपानने परराष्ट्रीय धोरणाला आकार दिला. कारण या सिद्धांताद्वारे जपानने युनायटेड स्टेट्स बरोबरच्या सुरक्षा युतीवर विसंबून न राहता देशांतर्गत अर्थव्यवस्थेची पुनर्रचना करण्यावर लक्ष केंद्रित केले होते. या सिद्धांताद्वारे प्रथम जपानने साम्यवादाच्या विरुद्धच्या शीत युद्धात अमेरिकेशी घट्टपणे सहयोगी असल्याचे सांगितले. तसेच जपान-अमेरिका लष्करी सामर्थ्यावर अवलंबून आहे आणि स्वतःचे संरक्षण दल कमीत कमी मर्यादित करीत आहे व जपान आपल्या जागतिक घडामोडींमध्ये आर्थिक विकासावर भर देत आहे असे स्पष्ट केले.

## ६.१२ फोकुडा सिद्धांत

जपानचे पंतप्रधान ताकियो फुकूडा यांच्या भाषणावर आधारित फुकुडा सिद्धांत आहे. १९७७ मध्ये आशियन सदस्य देशाच्या दौऱ्यावर असताना पंतप्रधानांनी मनीला येथे भाषण केले. ज्यामध्ये त्यांनी जपानचे परराष्ट्र धोरण स्पष्ट केले जे नंतर फुकडा सिद्धांत म्हणून ओळखले गेले. या फुकडा सिद्धांतानुसार जपानचे पंतप्रधान फुकुडा यांनी असे वचन

दिले की, जपान हा शांततेसाठी वचनबद्ध असलेला देश आहे तो कधीही लष्करी शक्ती बनणार नाही आणि जपान दक्षिणपूर्व आशियाई देशांसोबत विस्तृत क्षेत्रात परस्पर विश्वास आणि विश्वासाचे नाते निर्माण करेल आणि जपान आशियांना सकारात्मक सहकार्य करेल. त्यांचे सदस्य देश त्यांच्या स्वतःच्या प्रयत्नात समान भागीदार म्हणून फुकडा सिद्धांत ह्या उर्वरित आशियातील जपानच्या वर्तमान आणि भविष्यातील मुत्सद्देगिरीचा पाया आहे. यानुसार या सिद्धांताचे काही उद्देश ठरवण्यात आले ते पुढील प्रमाणे.

**फुकुडा सिद्धांताचे उद्देश-**

१. प्रथम जपान शांततेसाठी वचनबद्ध राष्ट्र लष्करी शक्तीची भूमिका बजावेल.

२. आग्नेय आशियातील देशांचा खरा मित्र म्हणून जपान या देशांशी मनःपूर्वक समजूतीवर आधारित परस्पर विश्वास आणि प्रामाणिकपणाचे नाते दृढ करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करेल.

३. जपान अशियन आणि त्यांच्या सदस्य देशांचा समान भागीदार असेल आणि त्यांची एकता आणि लवचिकता मजबूत करण्यासाठी त्यांच्या स्वतःच्या प्रयत्नांमध्ये सकारात्मक सहकार्य करेल.

## ६.१३ समारोप

पूर्व आशियातील जपानला "उगवत्या सूर्याचा देश" किंवा "दाई निप्पॉन" असे म्हटले जाते. आज जपान हा आर्थिक व औद्योगिदृष्ट्या विकसित असलेल्या बडया राष्ट्रांपैकी एक असून, या छोट्याश्या देशाने दुसऱ्या महायुद्धातील भयंकर विध्वंसातून अल्पकाळात नेत्रदीप विकास साध्य केला आहे. भूकंप, ज्वालामुखी ही नैसर्गिक संकटे सतत पाठीशी असताना अत्यंत मर्यादित खनिज साधन संपत्तीच्या साह्याने जपानने विकासाची प्रचंड झेप घेतली आहे. तसेच आपल्या व्यापारात वाढ करून इतर राष्ट्रांशी सलोख्याचे व मैत्रीपूर्वक संबंध प्रस्थापित करून मोठया प्रमाणात आंतरराष्ट्रीय बाजारपेठ काबीज केली आहे. जपानने आपल्या देशाच्या विकासाच्या दृष्टीने व्यापार उद्योगात प्रचंड प्रमाणात प्रगती करून पाश्चिमात्य राष्ट्रांशी व्यापार वाढवला आहे. तसेच अमेरिकेसारख्या महाशक्ती असलेल्या देशाच्या सहाय्याने अनेक उद्योगधंदे व व्यापार वाढवला आहे. व त्यांच्या बरोबरच चीन, रशिया, भारत या देशांशी परराष्ट्रीय संबंध प्रस्थापित केले आहेत.

अशाप्रकारे जपानने प्रचंड अडचणींवर मात करून आपले इतर राष्ट्रांशी परराष्ट्रीय संबंध सुदृढ केले आहेत.

## ६.१४ प्रश्न

१. परराष्ट्रीय धोरणाचा अर्थ व व्याख्या सविस्तर स्पष्ट करा.

२. जपानने अमेरिकेसह इतर राष्ट्रांशी कशाप्रकारे परराष्ट्रीय संबंध प्रस्थापित केले ते स्पष्ट करा.

३. परराष्ट्रीय धोरणाच्या माध्यमातून जपानची आर्थिक प्रगती स्पष्ट करा.

४. टिपा द्या-

१. १९५१ चा शांतता करार.

२. १९५१ चा सुरक्षा करार.

३. योशिदा सिद्धांत.

४. फुकडा सिद्धांत.

## ६.१५ संदर्भ


१. वैद्य सुमन, कोठेकर शांता, आधुनिक जग (१९४५ ते २०००) श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

२. निकम तानाजीराव, आधुनिक चीन-जपानचा इतिहास, डायमंड पब्लिकेशन, पुणे.

३. भामरे जितेंद्र, आशियाचा इतिहास (१९०० ते १९४६), शेठ पब्लिकेशन, मुंबई.

४. आचार्य धनंजय, विसाव्या शतकातील जग, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.


❖❖❖❖

munotes.in

# ७

# शीतयुद्ध आणि व्हिएतनाम

**घटक रचना:**

७.० उद्दिष्ट्ये

७.१ प्रस्तावना

७.२ दुसऱ्या महायुद्धात कम्युनिस्ट पक्षाची भूमिका

७.३ व्हिएतमिन्ह आणि फ्रांस यांच्यातील युद्ध

७.४ सारांश

७.५ प्रश्न

७.७ संदर्भ

## ७.० उद्दिष्ट

१) व्हिएतनाममधील स्वातंत्र्य लढा समजून घेणे.

२) व्हिएतनाममधील शीतयुद्धाचा प्रभाव अभ्यासणे.

३) व्हिएतनाम संघर्षात अमेरिकेची भूमिका तपासणे.

४) व्हिएतनामचे एकीकरण कसे झाले ते समजून घेणे.

## ७.१ प्रस्तावना

व्हिएतनाम, लाओस आणि कंबोडिया या तीन प्रदेशांचा समावेश असलेला इंडो-चीन आग्नेय आशियातील फ्रेंच वसाहतवादी साम्राज्याचा भाग होता. सोळाव्या शतकात हे प्रदेश चिनी नियंत्रणातून मुक्त होऊ शकले. त्याच शतकात पोर्तुगीज इंडो-चीनमध्ये मिशनरी कार्य व व्यापारासाठी गेले. पण पोर्तुगीजांना फारशी प्रगती करता आली नाही. १७ व्या व १८ व्या शतकात फ्रेंचही याच उद्देशाने या देशात आले. शेवटी फ्रेंचांचा वरचष्मा झाला आणि एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस इंडो-चीन हा फ्रेंच सरकारने नेमलेल्या गव्हर्नर-जनरलच्या अधिपत्याखालील फ्रेंच रक्षकांचा समूह बनला. प्राचीन काळी व्हिएतनामी लोकांवर चिनी आणि भारतीय संस्कृतीचा प्रभाव होता. फ्रेंच अधिपत्याखाली इंडो-चीन मध्ये वाहतूक व दळणवळणाच्या क्षेत्रात सुधारणा झाली. औद्योगिक क्षेत्रात थोडी वाढ झाली. मात्र ग्रामीण भागात शेतकऱ्यांना भरमसाठ कराचा सामना करावा लागत होता. तुटपुंज्या मजुरीमुळे कारखाने, कोळसा खाणी, आणि रबर बागांमधील कामगारांची कामाची परिस्थिती अत्यंत बिकट होती. १९२० च्या दशकाच्या सुरुवातीस राष्ट्रवादी पक्षांनी राजकीय सुधारणा आणि स्वातंत्र्याची मागणी करण्यास सुरुवात केली.

munotes.in

## ७.२ दुसऱ्या महायुद्धात कम्युनिस्ट पक्षाची भूमिका

दुसरे महायुद्ध सुरू होईपर्यंत साम्यवादी गटाने क्रांतिकारी चळवळी सुरु केल्या होत्या. १९४० मध्ये दुसऱ्या महायुद्धात जर्मनीने फ्रान्सचा पराभव केल्याने फ्रेंच वसाहतवादी प्रशासन स्पष्टपणे कमकुवत झाले. दरम्यान जपानने उत्तर व्हिएतनामला लष्करी बळाने ताब्यात घेण्याच्या अधिकाराची मागणी केली. जपानने या भागाचा वापर एक तळ म्हणून करण्याची योजना आखली जिथून जपान भविष्यात दक्षिण-पूर्व आशियातील उर्वरित भागावर आक्रमण करू शकत होता. फ्रेंच व्हाईसरॉयने जपानच्या मागण्या मान्य केल्या. ही परिस्थिती पाहून हो ची मिन्ह यांना जपानी साम्राज्यवाद्यांविरुद्ध साम्यवादी आणि साम्यवादी नसलेल्या सर्व राष्ट्रवादी शक्तींचे एकत्रीकरण करण्याची गरज वाटू लागली. आपल्या देशाला जपानच्या तावडीतून मुक्त करण्याच्या आपल्या मनसुब्याचे सर्व व्हिएतनामी स्वागत करतील आणि सर्व गट पाठिंबा देतील याची त्यांना खात्री होती. त्यामुळे त्यांनी १९४१ मध्ये जपानी आणि फ्रेंच या दोन्ही सत्तांचा प्रतिकार करण्यासाठी व्हिएतनाम इंडिपेंडेंस् लीग किंवा व्हिएतमिन्ह या नावाने एक नवा पक्ष स्थापन केला. हो-ची-मिन्ह यांनी रशियात अनेक वर्षे क्रांती कशी करावी हे प्रशिक्षण घेतले होते. व्हिएतनाममध्ये साम्यवादी राजवट स्थापन करणे हे त्याचे अंतिम उद्दिष्ट होते.

महायुद्धाच्या शेवटी क्रांतिकारी उठावाच्या तयारीसाठी त्यांनी गनिमी फौजाही तयार केल्या. व्यापक जनसमर्थन मिळविण्यासाठी व्हिएतमिन्ह पक्षाने साम्यवादी उद्दिष्टांना उघडपणे पाठिंबा देण्याऐवजी राष्ट्रीय स्वातंत्र्य आणि उदारमतवादी सुधारणांवर भर दिला. १९४५ पर्यंत व्हिएतमिन्हने उत्तरेत आपले स्थान मजबूत केले होते. ऑगस्ट १९४५ मध्ये जपानच्या शरणागतीनंतर हो-ची-मिन्हने उत्तरेत मित्र राष्ट्रांच्या सैनिकांच्या आगमनापूर्वी सप्टेंबर, १९४५ मध्ये संपूर्ण व्हिएतनामला स्वतंत्र व्हिएतनाम प्रजासत्ताक म्हणून घोषित केले.

## ७.३ व्हिएतमिन्ह आणि फ्रांस यांच्यातील युद्ध

जपानने इंडो चीनमधून माघार घेतल्यावर फ्रान्सचे सैन्य व्हिएतनामवर कब्जा करेल अशी अपेक्षा होती. पण व्हिएतनाम नियंत्रित करण्यासाठी पुरेसे लष्करी बळ त्यांच्याकडे नसल्याने फ्रेंचांना तसे करता आले नाही. या परिस्थितीत चीनच्या सैन्याने (जे अक्षशक्तींविरुद्ध लढत होते) उत्तर व्हिएतनामवर कब्जा केला आणि ब्रिटिश साम्राज्याच्या सैन्याने दक्षिण व्हिएतनामवर कब्जा केला. परंतु काही काळानंतर जेव्हा फ्रान्स पुरेसे सैन्य घेवून सक्षम झाला, तेव्हा ब्रिटिश सैन्याने त्यांना दक्षिण व्हिएतनाम ताब्यात घेण्याची परवानगी दिली. फ्रेंचांनी आपले साम्राज्यवादी वर्चस्व कायम ठेवण्याच्या धोरणामुळे उत्तर व्हिएतनाम आणि दक्षिण व्हिएतनामला भयंकर यादवी युद्धात ढकलण्याची पार्श्वभूमी तयार केली. त्यामध्ये अमेरिका आणि रशियासह इतर मोठ्या शक्तींचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हस्तक्षेप देखील झाला.

'लोकशाही' आणि 'स्वातंत्र्य' या विषयांवर भर देऊन हो-ची-मिन्ह यांनी फ्रेंच सत्तेविरुद्ध संयुक्त जनआघाडी उभी केली होती. त्यांच्या प्रशासनात कम्युनिस्ट तसेच कम्युनिस्टेतर लोकांचा समावेश होता. व्हिएतनामचे स्वातंत्र्य टिकवून ठेवण्यासाठी मात्र केवळ हे डावपेच



munotes.in

पुरेसे नव्हते. ६ मार्च, १९४६ रोजी झालेल्या करारानुसार फ्रान्सने हो-ची-मिन्हच्या हो वर्चस्वाखालील व्हिएतनामला डेमोक्रॅटिक रिपब्लिक म्हणून मान्यता दिली. मात्र दक्षिण व्हिएतनाम अद्याप याचा भाग नव्हता. फ्रेंचांनी दक्षिण व्हिएतनाममध्ये प्रतिस्पर्धी अशी कठपुतळी राजवट स्थापन केली आणि नोव्हेंबर, १९४६ मध्ये हायफोंगवर नौदल आणि हवाई बॉम्बवर्षाव केला. एका महिन्यानंतर व्हिएतनामी प्रजासत्ताकाचे सैन्याने हनोई येथे फ्रेंचांवर आक्रमण केले. सात वर्ष चाललेल्या फ्रँको - व्हिएतनामी युद्धाची ही सुरुवात होती.

### शीतयुद्ध वियतनाममध्ये उफाळले :

इ.स.१९४७ ते १९५४ या काळात फ्रान्सने राष्ट्रवादी आणि साम्यवादविरोधी राजवटींमार्फत काम करून आपले वसाहतवादी वर्चस्व टिकवून ठेवण्याचा प्रयत्न केला. १९४९ पर्यंत फ्रेंचांनी सायगॉन येथे माजी सम्राट बाओ-दाई यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन केले होते. पुढील वर्षी फ्रान्सच्या नॅशनल असेंब्लीने बाओ-दाईच्या व्हिएतनामसह कंबोडिया आणि लाओसला फ्रेंच फेडरेशनमध्ये "संलग्न" राज्ये म्हणून घोषित केले. दरम्यान फ्रेंचांची उद्दिष्टे अगदी स्पष्ट झाली होती. हे सर्व घडत असताना चिनीमध्ये कम्युनिस्ट सत्तेवर येत होते. इंडोनेशिया, मलाया आणि फिलिपाईन्समध्ये स्वतंत्र कम्युनिस्ट नेतृत्वाचा उद्रेक होत होता आणि जेव्हा जगभरात कम्युनिस्ट आणि साम्यवादी विरोधी शक्तींमधील संघर्ष तीव्र झाला होता. त्याचा परिणाम असा झाला की, साम्यवादी चीन आणि सोव्हिएत युनियनने हो-ची-मिन्हच्या लोकशाही प्रजासत्ताकाला मान्यता दिली आणि अमेरिका आणि ग्रेट ब्रिटनने बाओ-दाईच्या सरकारला मान्यता दिली. अमेरिकन मदत आणि शस्त्रास्त्रे फ्रेंच व्हिएतनामकडे ताबडतोब पोहोचली आणि चिनी मदत टोन्किनची सीमा ओलांडून व्हिएतमिन्हपर्यंत पोहोचली. शीतयुद्ध व्हिएतनाममध्ये उसळू लागले होते.

### डाएनबियेनफू

फ्रँको-व्हिएतनामी संघर्षात फ्रेंचांनी लष्करी मोहिमा सुरू ठेवल्या, ज्यासाठी १९४९ च्या अखेरीस १.५ अब्ज डॉलर्स खर्च आला होता. त्यांच्या उत्तम मारक क्षमतेमुळे त्यांनी बहुतेक शहरे आणि प्रमुख शहरे ताब्यात घेतली परंतु ग्रामीण भागातील त्यांची ताकद झपाट्याने कमी झाली. फ्रेंच सैन्याने व्हिएतमिन्हच्या ताब्यातील प्रदेशात वारंवार घुसखोरी केली तरीही त्या भागावर फ्रेंच सैन्य संपूर्ण वर्चस्व प्रस्थापित करू शकले नाही. १९५३ च्या मध्यात फ्रान्सने व्हिएतमिन्ह सैन्याला नष्ट करण्याच्या अंतिम प्रयत्न केला. १९५४ मध्ये डायनबिएनफूच्या अनेक आक्रमणांची मालिका आखली गेली. डायनबीएनफू येथे फ्रेंचांनी जनरल व्हो गुयेन गियाप यांच्या नेतृत्वाखाली व्हिएतमिन्ह सैन्यापुढे शरणागती पत्करली.

### जिनेव्हा करार १९५४

डाएनबियेनफूच्या पतनानंतर पॅरिसमध्ये नवे सरकार सत्तेवर आले. कठीण वास्तवाला सामोरे जात असलेल्या नव्या राजवटीने इंडोचायना प्रदेशातून मधून माघार घेण्याचा आणि पूर्वीच्या वसाहतींचे स्वातंत्र्य मान्य करण्याचा निर्णय घेतला. २१ जुलै १९५४ रोजी जिनेव्हा येथे झालेल्या सत्तांच्या आंतरराष्ट्रीय परिषदेत एक करार झाला. जिनेव्हा करारानुसार पुढील तत्वे स्वीकारली गेली.

१. इंडोचीन प्रदेशातील व्हिएतनाम, कंबोडिया आणि लाओस या देशांच्या सार्वभौमत्वाचा आणि स्वातंत्र्याचा आदर करणे.

२. उत्तर आणि दक्षिण व्हिएतनाम असे तात्पुरते विभाजन स्वीकारणे.

३. उत्तर व्हिएतनाममध्ये हो-ची-मिन्ह यांच्या सरकारला मान्यता देण्यात आली.

४. दक्षिण व्हिएतनाममध्ये सध्या स्वतंत्र बिगर साम्यवादी सरकार असणार होते, पण १९५६ मध्ये संपूर्ण देशामध्ये निवडणुका होणार होत्या. मात्र निवडणुका कधीच झाल्या नाहीत आणि कोरिया देशात घडलेल्या घटनांची पुनरावृत्ती होण्याची शक्यता निर्माण झाली होती. उत्तर व्हिएतनाम व दक्षिण व्हिएतनाममध्ये हळूहळू यादवी युद्ध विकसित झाले.

### उत्तर व्हिएतनाम :

उत्तरेत हो-ची-मिन्ह आणि कम्युनिस्ट पक्ष यांनी एकत्रीकरण आणि विकास कार्य सुरु केले. कृषी उत्पादकता वाढविण्यासाठी प्राथमिक उपाय म्हणून जमीन सुधारणा राबविण्यासाठी बुद्धिजीवी आणि कुशल कामगारांची संख्या वाढविणे; व्यवसायाच्या सर्व स्तरांवर राज्य मालकी प्रस्थापित करणे; आणि अवजड उद्योगांवर भर देऊन आर्थिक नियोजन सुरू करणे सुरु झाले. हे बदल इतके मूलभूत होते आणि त्यांची अंमलबजावणी इतकी कठोर होती की सरकारला सुरुवातीला व्यापक उठावांना सामोरे जावे लागले. मात्र, लवकरच त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यात आले. देशाचा आर्थिक पाया मजबूत बनवण्यातही बऱ्यापैकी यश मिळाले.

पुढची पाच वर्षे व्हिएतनामध्ये थोड्या काळासाठी शांतता प्रस्थापित झाली. हनोईमध्ये डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ व्हिएतनाम म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हो-ची-मिन्ह यांच्या सरकारने निवडणुकांच्या माध्यमातून राष्ट्रीय एकत्रीकरणाची अपेक्षा ठेवत कम्युनिस्ट समाजाची पायाभरणी करण्यावर लक्ष केंद्रित केले. पण दक्षिणेत बाओ दाई यांची जागा लवकरच कम्युनिस्टविरोधी कॅथलिक डिन्हदिएम याने घेतली. त्याने जिनिव्हा कराराप्रमाणे राष्ट्रीय निवडणुका घेण्यास नकार दिला. त्याच्या साम्यवादविरोधी धोरणांबद्दल सहानुभूती बाळगून आणि संपूर्ण व्हिएतनाम कम्युनिस्टांच्या ताब्यात जाऊ नये म्हणून अमेरिकेने दिएमला पाठिंबा दिला. दक्षिण व्हिएतनामसाठी नवीन राज्यघटना स्वीकारण्यात आली. केवळ दक्षिणेत झालेल्या निवडणुकांनंतर दिएम नव्या व्हिएतनाम प्रजासत्ताकाचा राष्ट्राध्यक्ष बनला.

### दिएमची राजवट

बाओ दाईपेक्षाही वाईट असलेल्या दक्षिण व्हिएतनामचा राष्ट्राध्यक्ष दिएमला अमेरिकेने पूर्ण पाठिंबा दिला होता. अमेरिकन मदतीसाठी त्यांची एकमेव पात्रता होती ती म्हणजे त्यांची साम्यवादविरोधी भूमिका. अमेरिकेच्या मदतीने बाओ दाईला हटवण्यात आले आणि दिएम आपली क्रूर हुकूमशाही प्रस्थापित करू शकला. अमेरिकेच्या दृष्टीने साम्यवादविरोध हा कुठल्याही प्रकारच्या मदतीला आवश्यक असा गुण होता. अमेरिकन राष्ट्राध्यक्ष आयझेनहॉवर यांनी दक्षिण व्हिएतनामला स्वतंत्र प्रजासत्ताक म्हणून एकतर्फी घोषित केले. दिएमची लोकशाहीविरोधी राजवट अत्यंत अकार्यक्षम आणि मुळातच भ्रष्ट होती. त्याच्या

सरकारचा तिरस्कार करणाऱ्या व्हिएतनामी लोकांनी १९६० मध्ये त्याला उलथवून टाकण्यासाठी आणि व्हिएतनाममधून त्याचा आश्रयदाता अमेरिकेला हद्दपार करण्यासाठी नॅशनल लिबरेशन फ्रंट (एनएलएफ) स्थापन केले. दिएमची सत्ता उलथवून टाकण्यासाठी त्याच्याविरुद्ध व्हिएत कॉंग गनिमी युद्ध सुरु झाले.

**व्हिएतनाम युद्धातील अमेरिकेचा सहभाग :**

राजकीय गोंधळामुळे दक्षिण व्हिएतनाममधील राजकीय व लष्करी स्थिती बिघडत गेली. अत्यंत निरर्थक आणि अन्यायकारक युद्धात अब्जावधी डॉलर्स उधळण्याबरोबरच अमेरिकेने स्वत:चे सैन्य पाठवले. १९६५ मध्ये अमेरिका उघडपणे युद्धात उतरली. १९६७ पर्यंत युद्धात ४,३०,००० अमेरिकन सैनिक या युद्धात गुंतले होते. अमेरिकन सैन्याने व्हिएतनाम मध्ये सामान्य लोकांवर अन्वनित प्रकारचे अत्याचार केले आणि सभ्य आचरणाचे सर्व निकष वाऱ्यावर टाकून मोठ्या प्रमाणात विनाश घडवून आणला. काही भागात संपूर्ण लोकसंख्या नष्ट करणाऱ्या, गावे आणि शहरे जमीनदोस्त करणाऱ्या आणि जंगलांमध्ये सतत युद्ध करून जंगलांचे मैदानी प्रदेशात रूपांतर करणाऱ्या अमेरिकन सैन्याने केलेल्या अत्याचारांवर संपूर्ण जग आश्चर्यचकित झाले. कुठल्याही दृष्टिकोनातून पाहिलं तर अमेरिकेचे धोरण माणुसकीला काळिमा फासणारे होते. व्हिएतनाम युद्धात अमेरिकेच्या हस्तक्षेपामुळे कम्युनिस्टांसमोर गंभीर समस्या निर्माण झाल्या. मात्र त्यांनी आपला लढा सोडला नाही. उत्तर व्हिएतनामी नेत्यांना खात्री होती की, ते अमेरिकनांचा प्रतिकार करू शकतात, कारण त्यांनी पूर्वी फ्रेंचांना प्रतिकार केला होता. पण अमेरिकेच्या प्रचंड मारक शक्तीवर मात करणे त्यांना अवघड जात होते.

१९६८ च्या सुरुवातीला दक्षिण व्हिएतनामचे पतन व्हावे किंवा किमान अमेरिकेतील युद्धप्रयत्नांना लोकांचा पाठिंबा कमी व्हावा या अपेक्षेने उत्तर व्हिएतनामने वेगवान आक्रमण सुरू केले. दक्षिण व्हिएतनामच्या जवळजवळ प्रत्येक प्रमुख शहरांवर एकाच वेळी हल्ला करण्याचा या हल्ल्याचा उद्देश होता. ग्रामीण भागातील शहरे आणि गावांवरही असेच हल्ले झाले. अशा हल्ल्यात अमेरिकन सैनिकांचे प्रचंड नुकसान झाले. यामुळे दक्षिण व्हिएतनामचे नवे राष्ट्राध्यक्ष गुयेन व्हॅन थियू यांचे सरकारही कमकुवत झाले. अमेरिकेच्या रणनीतीच्या परिणामकारकतेबद्दल अमेरिकन लोकांचा विश्वास तीव्रपणे डळमळीत करण्यात हे आक्रमण यशस्वी झाले. मार्चमध्ये राष्ट्राध्यक्ष जॉन्सन यांनी चर्चेतून तोडगा काढण्याचा निर्णय घेतला आणि पुन्हा निवडणूक लढवणार नसल्याचे जाहीर केले. मे १९६८ मध्ये पॅरिसमध्ये शांतता चर्चा सुरू झाली. परंतु या वाटाघाटी झपाट्याने फोल ठरल्या आणि अनेक महिने गतिरोध निर्माण झाला. नोव्हेंबर १९६८ मध्ये रिचर्ड निक्सन यांची अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी निवड झाली. व्हिएतनाम युद्ध संपुष्टात आणण्याची ग्वाही देऊन पदभार स्वीकारलेल्या राष्ट्राध्यक्ष निक्सन यांनी अमेरिकन लढाऊ सैन्य माघारी घेण्याच्या हालचाली सुरुवात केल्या. अमेरिकेच्या अधिपत्याखाली आणि अमेरिकेच्या मदतीने सायगॉन झपाट्याने राजकीयदृष्ट्या स्वायत्त होत आहे आणि नव्याने प्रशिक्षित आणि पुरवलेले तिचे सैन्य व्हिएतकाँग आणि त्यांच्या उत्तर व्हिएतनामी मित्रदेशांशी सामना करू शकते या सिद्धांतावर अमेरिकेने युद्धाचे "व्हिएतनामीकरण" करण्याचे धोरण जाहीर केले. सोप्या भाषेत सांगायचे तर "व्हिएतनामीकरण" मध्ये अमेरिकन सैन्याच्या जागी दक्षिण व्हिएतनामी सैन्य तैनात करणे.

अमेरिकेने उत्तरेवर केलेल्या बॉम्बहल्ल्यामुळे दळणवळण आणि उत्पादन या दोन्हींचे नुकसान झाल्यामुळे उत्तर व्हिएतनामच्या युद्ध-प्रयत्नांमध्ये व्यत्यय आला. दक्षिणेत व्हिएतकाँगला त्यांच्या नव्याने जिंकलेल्या काही प्रदेशातून बाहेर काढण्यास भाग पाडले गेले. जसजशी त्यांची जीवितहानी वाढत गेली तसतसे मनोबल कमी होत गेले. जानेवारी १९६८ मध्ये व्हिएतकाँग आणि उत्तर व्हिएतनामी सैन्याने उत्तर आणि किनारपट्टीच्या प्रांतातील प्रत्येक शहर यावर हल्ले सुरू केले, जे टेट आक्रमण म्हणून ओळखले जाऊ लागले ज्यात कम्युनिस्ट तसेच दक्षिण व्हिएतनामी आणि अमेरिकन लोकांमधील जीवितहानी बरीच मोठी होती. तथापि जरी दक्षिण व्हिएतनामी आणि अमेरिकन लोकांनी उत्तर व्हिएतनामींचा काही आघाड्यांवर पराभव केला. तरी टेट हा कम्युनिस्टांचा राजकीय विजय होता. शिवाय दक्षिण व्हिएतनाममध्येच टेट हल्ल्याचे दीर्घकालीन परिणाम दिसून आले. अमेरिकी आणि दक्षिण व्हिएतनामी सैन्य ग्रामीण भागातून शहरांकडे वळवून केलेल्या या हल्ल्यामुळे व्हिएतकाँगला ग्रामीण भागातील मोठ्या भागावर नियंत्रण मिळाले होते आणि सायगॉन सरकारच्या ग्रामीण सुधारणा कार्यक्रमाला मोठा धक्का बसला होता.

### अमेरिकेतील युद्धविरोधी चळवळ

व्हिएतनाममधील अमेरिकेच्या सहभागामुळे अमेरिकेच्या तिजोरीवर प्रचंड ताण पडत होता. शिवाय व्हिएतनाममध्ये लढण्यासाठी तयार करण्यात आलेल्या हजारो तरुणांना आपला जीव गमवावा लागत होता. शिवाय असहाय व्हिएतनामी लोकांवर अमेरिकन लष्कराने केलेल्या अत्याचारांमुळे देशाच्या लोकशाही छबी बद्दल लोकांमध्ये चिंता निर्माण झाली होती. हळूहळू अमेरिकेतील मोठ्या संख्येने लोकांमध्ये युद्धविरोधी भावना निर्माण झाली त्यातून पुढे युद्धविरोधी चळवळ उभी राहिली. कॉलेज आणि विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी युद्धाला विरोध दर्शवल्यामुळे युद्धविरोधी चळवळीला नवी चालना मिळाली. कंटाळलेले राष्ट्राध्यक्ष जॉन्सन यांनी नोव्हेंबर १९६८ मध्ये होणाऱ्या निवडणुकीत राष्ट्राध्यक्ष म्हणून दुसऱ्या खेपेसाठी डेमोक्रॅटिक पक्षाची उमेदवारी मागणार नाही किंवा स्वीकारणार नाही अशी घोषणा केली. कार्यालयातील उरलेला वेळ शांतता तोडगा शोधण्यात घालवण्याचा त्यांचा मानस होता.

टेट हल्ल्यानंतर जनमताच्या दबावामुळे राष्ट्राध्यक्ष जॉन्सन यांनी राजदूत स्तरावर उत्तर व्हिएतनामशी चर्चेच्या बदल्यात उत्तरेकडील बॉम्बवर्षाव थांबविण्याचे आदेश दिले होते. पण उत्तर व्हिएतनामने सर्व बॉम्बहल्ले थांबवण्याची मागणी केली आणि मे १९६८ मध्ये पॅरिसमध्ये सुरू झालेली चर्चा रखडली. दक्षिणेत कम्युनिस्टांचा जनाधार आणि प्रभाव कमी होत गेला पण पॅरिसमध्ये अजूनही समझोता होऊ शकला नाही. नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणुकीपूर्वी जॉन्सन यांनी पुन्हा एकदा पुढाकार घेत उत्तर व्हिएतनामवरील बॉम्बहल्ले पूर्णपणे आणि बिनशर्त थांबविण्याची घोषणा केली. तथापि प्रत्यक्षात कोणतीही वास्तविक प्रगती झाली नाही आणि चर्चासत्रे केवळ दिखावू बनली.

### निक्सन यांचे व्हिएतनामीकरणाचे धोरण

रिचर्ड निक्सन (१९६९-७४) जानेवारी १९६९ मध्ये लिंडन जॉन्सन यांच्यानंतर राष्ट्राध्यक्ष झाले. देशांतर्गत दबावामुळे अमेरिकेच्या नव्या राष्ट्राध्यक्षांना युद्धातून आपले सैन्य मागे घेण्यास भाग पाडले जाईल असे उत्तर व्हिएतनामला वाटत होते. त्याला उत्तर

देताना निक्सन यांनी १९६९ च्या मध्यात या भागातून अमेरिकन सैन्य माघारी घेण्याचा आपला हेतू असल्याचे जाहीर केले. पण त्याच वेळी त्यांनी आदेश दिले की, उपलब्ध असलेली सर्वात आधुनिक उपकरणे दक्षिण व्हिएतनामी लोकांना पाठवावीत जेणेकरून प्रस्थान करणाऱ्या अमेरिकन लोकांची जागा अशाच सशस्त्र व्हिएतनामी सैन्याने घ्यावी. निक्सन यांच्या नव्या कल्पनेला व्हिएतनामीकरण म्हणून ओळखले जात होते, ज्याद्वारे अमेरिकन लोक दक्षिण व्हिएतनामच्या संरक्षणाची काळजी घेण्यासाठी दक्षिण व्हिएतनामी सैन्याला पुन्हा सशस्त्र आणि प्रशिक्षण देतील. यामुळे व्हिएतनाममधून हळूहळू अमेरिकन सैन्य माघारी जाऊ शकेल, असा त्यांचा विश्वास होता. दुसरीकडे, निक्सन यांनी उत्तर व्हिएतनामवर पुन्हा जोरदार बॉम्बवर्षाव सुरू केला.

**व्हिएतनाम युद्धाचा अंत :**

या सर्व अमेरिकन डावपेचांना यश आले नाही. १९७२ च्या अखेरीस व्हिएतकाँगने देशाच्या संपूर्ण पश्चिम भागावर ताबा मिळवला. तोपर्यंत निक्सन यांच्यावर व्हिएतनाममधून माघार घेण्यासाठी देशांतर्गत आणि जागतिक पातळीवर दबाव होता. अनेक कारणांमुळे व्हिएतनामी युद्धाविरुद्ध चीड निर्माण झाली होती. उत्तर व्हिएतनाम, लाओस आणि कंबोडियावर झालेल्या भीषण बॉम्बस्फोटात असंख्य निरपराध लोक मृत्युमुखी पडले. साम्यवाद्यांविरुद्धचे युद्ध जिंकण्यासाठी अमेरिकेने रासायनिक अस्त्रांचा वापर करून जंगलाची नासधूस केली होती.  काही ठिकाणी हजारो लोक जिवंत जाळले गेले. अमेरिकेने रासायनिक अस्त्रांच्या अमानुष वापरात हजारो निरपराध नागरिकांना आपला जीव आणि संपत्ती गमवावी लागली. सर्वात कुख्यात घटना मार्च १९६८ मध्ये घडली जेव्हा अमेरिकन सैनिकांनी मायलाई या पाड्यातील लहान मुलांना घेऊन जाणाऱ्या वृद्ध रहिवाशांना घेरले आणि सर्वांना गोळ्या घालून सामूहिक कबरीत दफन करण्यात आले; ४५० ते ५०० लोक मारले गेले. व्हिएतकाँगला मदत करणारे रशिया आणि चीनही हे युद्ध समाप्त करण्यासाठी मार्ग शोधत होते. जानेवारी १९७३ मध्ये अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री डॉ. किसिंजर यांनी उत्तर व्हिएतनामबरोबर राजकीय करार झाल्याची घोषणा केली. या करारामुळे अमेरिकेला दक्षिण व्हिएतनाममधून आपले सैन्य मागे घ्यावे लागले.

**व्हिएतनामचे एकीकरण :**

व्हिएतनाममधून सर्व अमेरिकन सैन्य मागे घेतले जाईल आणि उत्तर आणि दक्षिण सैन्य दोघेही सीमेचा आदर करतील यावर एकमत झाले. तथापि व्हिएतकाँगने आपली मोहीम सुरू ठेवली आणि अमेरिकन मदत असूनही सायगॉनमधील राष्ट्राध्यक्ष थियूचे सरकार लवकरच कोसळले. एप्रिल १९७५ मध्ये व्हिएतकाँगने सायगॉनवर ताबा मिळवला. शेवटी व्हिएतनाम एकसंध आणि परकीय हस्तक्षेपापासून मुक्त झाला. त्याच वर्षी लाओस आणि कंबोडियातही साम्यवादी सरकारे स्थापन झाली. आग्नेय आशियात साम्यवादाचा प्रसार रोखण्याचे अमेरिकेचे धोरण पूर्णपणे अपयशी ठरले होते.

**व्हिएतनाम आणि शेजारी देश :**

इ.स. १९७६ मध्ये व्हिएतनामच्या नव्या समाजवादी प्रजासत्ताकात दक्षिणेचे उत्तरेशी पुनर्मिलन करण्यात आले आणि सायगॉनचे नाव बदलून हो ची मिन्ह सिटी करण्यात आले. मात्र युद्ध संपल्याने देशाच्या अडचणी संपल्या नाहीत. चीनी निर्वासितांचे स्थलांतर होवू

लागले. सायगॉनच्या पतनानंतर कंबोडियातील साम्यवादी सरकारशी सीमेवरील तणाव झपाट्याने वाढला आणि १९७९ च्या सुरुवातीला व्हिएतनामींनी खमेर रूजच्या विरोधी घटकांच्या समर्थनार्थ कंबोडियावर आक्रमण केले आणि व्हिएतनाम समर्थक सरकार स्थापन केले. या घटनेचा आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठ्या प्रमाणात निषेध झाला आणि काही आठवड्यांनंतर त्याचा साम्यवादी शेजारी आणि पूर्वीचा हितचिंतक असलेल्या चीनने व्हिएतनामवर हल्ला केला. चिनी सैन्याने सीमाभागात मोठं नुकसान केलं, पण त्यात चीनची मोठी जीवितहानी झाली. १९८० च्या दशकाच्या मध्यात कंबोडियात सुमारे १,४०,००० व्हिएतनामी सैनिक आणि लाओसमध्ये आणखी ५०,००० सैनिक तैनात होते. व्हिएतनामने १९८८ मध्ये लाओसमधील आपले सैन्य मोठ्या प्रमाणात कमी केले आणि सप्टेंबर १९८९ पर्यंत कंबोडियातून आपले जवळजवळ सर्व सैन्य मागे घेतले.

## व्हिएतनामची पुनर्रचना

दीर्घ काळ चाललेले व्हिएतनाम युद्ध १९७५ मध्ये समाप्त झाल्यानंतर भांडवलशाही अर्थव्यवस्था असलेले दक्षिण व्हिएतनाम आणि समाजवादी अर्थव्यवस्था असलेले उत्तर व्हिएतनाम यांचा योग्य मेळ घालावयाचा तसेच अर्थव्यवस्थेची पुर्न:स्थापना करून देशाचा आर्थिक विकास घडवून आणावयाचा ही फार मोठी आव्हाने देशापुढे होती. युद्धामुळे शहरांची, कारखान्यांची व वाहतूक साधनांची अपरिमित हानी झाली होती. जमिनीवर लढले गेलेले युद्ध आणि रासायनिक द्रव्यांची हवाई फवारणी यांमुळे शेतजमिनीचेही नुकसान झाले. त्यामुळे युद्धकाळात लाखो शेतकऱ्यांनी खेड्यातून पळ काढला होता. १९७५ मध्ये सायगाँव शहराची लोकसंख्या वाढून एकदम ३५ लाखांवर पोहोचली. उत्तेजन आणि सक्ती या दोहोंचा एकत्रित अवलंब करून युद्धकालीन निर्वासितांचे शेतीमध्येच पुनर्वसन करण्याचा शासनातर्फे प्रयत्न करण्यात आला. त्यामुळे अनेकांनी शहरे सोडून आपल्या मूळ वसत्यांकडे स्थलांतर केले. उत्तर आणि दक्षिण व्हिएतनामच्या राजकीय एकत्रीकरणामुळे सामूहिक आर्थिक विकासाची गरज निर्माण झाली. १९५४ सालापर्यंत दोन्ही प्रदेशांत विकासाचे मार्ग वेगवेगळे होते. १९७० च्या दशकात, उत्तर व्हिएतनाममधील शेती सामान्यत: खाजगी मालकीची होती आणि कारखाने आणि वितरण व्यवस्था प्रामुख्याने हजारो लहान कुटुंबांच्या मालकीची होती. दक्षिण व्हिएतनामची अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणात अमेरिकेच्या मदतीवर अवलंबून होती. १९७५ मध्ये ही मदत बंद झाली.

१९७० नंतर आर्थिक विकासात एकात्मता आणण्यासाठी सरकारने प्रयत्न केले. या संदर्भात संपूर्ण व्हिएतनाममध्ये औद्योगिकीकरण आणि समाजवादी अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी महत्त्वाकांक्षी योजना सुरू करण्यात आल्या. मात्र त्यासाठी भांडवल आणि कुशल मजुरांची कमतरता होती. यासोबतच अकार्यक्षम व भ्रष्ट नोकरशाहीमुळे पुनर्बांधणी कार्यक्रमात अनेक अडथळे निर्माण झाले. देशाची अर्थव्यवस्था स्थिरावली पण त्याच वेळी लोकसंख्या झपाट्याने वाढली. १९७८ मध्ये पुरामुळे ३ दशलक्ष टन तांदूळ नष्ट झाला होता. पूरग्रस्त भागातील १० लाख हेक्टर पिके पाण्याखाली गेली आणि एकूण गुरांपैकी २० टक्के मरण पावले. १९७८ मध्ये व्हिएतनामने कंबोडियावर आक्रमण केले आणि १९७९ मध्ये व्हिएतनामला चीनशी युद्ध करावे लागले. चीनबरोबरच ग्रेट ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड या देशांची मदत बंद करण्यात आली. या सर्व प्रकारामुळे व्हिएतनामची अर्थव्यवस्था पुन्हा कोलमडली. १९७९ मध्ये सरकारने आर्थिक पुनर्रचना योजना सुरू केली. या अंतर्गत सरकारी नियंत्रण कमी करण्यात आले आणि खाजगी घरांना

२० पेक्षा कमी कामगारांसह उद्योग आणि व्यवसाय चालविण्यास परवानगी देण्यात आली. यामुळे काही खाजगी उपक्रम आणि स्पर्धेला प्रोत्साहन मिळाले. त्याचा अनुकूल परिणाम देशाच्या आर्थिक विकासावर दिसून आला.

## ७.५ सारांश

व्हिएतनाममध्ये शांतता प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने एप्रिल १९५४ व्हिएतनाम, कंबोडिया, लाओस, चीन, फ्रान्स, ग्रेट ब्रिटन, सोव्हिएट संघ व अमेरिकेची संयुक्त संस्थाने यांच्या प्रतिनिधींची परिषद स्विझर्लंडमधील जिनिव्हा येथे झाली. व्हिएतनाममधील स्वामित्वासाठी झालेल्या द्येन ब्येन फू येथील युद्धात व्हिएटमिन्हने फ्रेंचांचा पराभव केला व मे १९५४ मध्ये व्हिएतनाम-फ्रान्समधील युद्ध समाप्त झाले .१७° उ. अक्षवृत्ताला अनुसरून व्हिएतनामची कम्युनिस्ट उत्तर व्हिएतनाम व कम्युनिस्टेतर दक्षिण व्हिएतनाम अशी दोन भागांत तात्पुरती विभागणी करण्याचा निर्णय जिनिव्हा परिषदेत घेण्यात आला. १९७३ मध्ये दक्षिण व्हिएतनाम, अमेरिका व कम्युनिस्ट पक्ष यांच्यात युद्धबंदी करारावर सह्या झाल्या त्यामुळे अमेरिकेने व्हिएतनाममधून आपले सैन्य काढून घेतले परंतु कम्युनिस्टांनी दक्षिण व्हिएतनामवर पुन्हा हल्ला चढविला. दीर्घकाळ चाललेल्या गृह्ययुद्धानंतर एप्रिल १९७५ मध्ये दक्षिण व्हिएतनामच्या राजधानीचे ठिकाण असलेले सायगाँव कम्युनिस्टांच्या ताब्यात आले. १९८६ मध्ये पक्षाचे ज्येष्ठ प्रमुख ले डुआन यांच्या निधनानंतर कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या तरुण पिढीच्या पाठिंब्याने आर्थिक सुधारणावाद्यांनी सत्ता हाती घेतली आणि रशियन पेरेस्त्रोइकावर आधारित डोई मोई (नूतनीकरण) या नवीन धोरणाची घोषणा केली. १९८८ मध्ये या प्रक्रियेला वेग आला, जेव्हा दुष्काळ आणि नोकरशाहीच्या गैरव्यवस्थापनामुळे अभूतपूर्व सुधारणावादी दबावाखाली कन्झर्व्हेटिव्ह पक्षाच्या कार्यकर्त्यांना मोठ्या प्रमाणात बडतर्फ करण्यात आले. १९९१ मध्ये सोव्हिएत साम्यवादाच्या पतनाबरोबर माजी सोव्हिएत युनियनकडून मिळणारी मदत संपुष्टात आल्याने व्हिएतनाममधील आर्थिक सुधारणांना आणखी गती मिळाली.

## ७.६ प्रश्नोत्तरे

१. व्हिएतनाममधील १९६२ ते १९८९ या काळातील राजकीय घडामोडींवर चर्चा करा.

२. व्हिएतनाममधील स्वातंत्र्यलढ्याचा लेखाजोखा घ्या आणि त्यावर शीतयुद्धाचा काय परिणाम झाला हे सांगा.

३. व्हिएतनाममध्ये अमेरिकेच्या सहभागाचा लेखाजोखा द्या. त्याचा परिणाम काय झाला?

४. शीतयुद्धाच्या राजकारणाचा व्हिएतनामवर काय परिणाम झाला याचे विश्लेषण करा.

५. खालील गोष्टींवर थोडक्यात टीपा लिहा:

अ) दुसऱ्या महायुद्धात व्हिएतनाममधील कम्युनिस्ट पक्षाची भूमिका

ब) अमेरिकेतील युद्धविरोधी चळवळ

क) व्हिएतनामची पुनर्रचना

ड) व्हिएतनाममधील अमेरिकेच्या अपयशाची कारणे

## ७.७ संदर्भ


१) हेज, सी.जे.एच. कंटेंम्परारी युरोप, १८७०-१९५५, न्यूयॉर्क, मॅकमिलन.

२) स्टोरी रिचर्ड, जपान अँड द डिक्लाइन ऑफ द वेस्ट, १८९४- १९४३, १९७९ न्यूयॉर्क शहर,

३) हेझेन चार्ल्स, मोडर्ण युरोप सिन्स, १७८९, एस. चांद आणि कं, १९९२.

४) डेव्हिड एम.डी., लँडमार्क्स इन वर्ल्ड हिस्ट्री, हिमालय पब्लिशिंग हाऊस, मुंबई, १९९९.

५) डॉ. युजीन डिसोझा, हिस्ट्री ऑफ एशिया, मनन प्रकाशन, २०१८.

६) https://vishwakosh.marathi.gov.in/33209


❖❖❖❖

munotes.in

# ८

# इंडोनेशियातील मार्गदर्शित लोकशाही

**घटक रचना :**


८.० उद्दिष्टये

८.१ प्रस्तावना

८.२ विसाव्या शतकात राष्ट्रवादाचा उदय

८.३ दुसरे महायुद्ध आणि इंडोनेशिया

८.४ अध्यक्ष डॉ. सुकार्णो आणि मार्गदर्शित लोकशाही

८.५ इंडोनेशियाची मार्गदर्शक लोकशाही आणि परराष्ट्र धोरण

८.६ इंडोनेशियाची देशांतर्गत धोरणे

८.७ मार्गदर्शित लोकशाही आणि डॉ. सुकार्णो यांचे पतन

८.८ सारांश

८.९ प्रश्न

८.९ संदर्भ


## ८.० उद्दिष्टये

१) इंडोनेशियातील राष्ट्रीय चळवळीच्या वाढीसाठी जबाबदार घटक समजून घेणे.

२) इंडोनेशियातील मार्गदर्शित लोकशाहीची संज्ञा समजून घेणे.

३) इंडोनेशियात राष्ट्रपती म्हणून डॉ. सुकार्णो यांच्या भूमिकेचे आकलन करणे.

## ८.१ प्रस्तावना

इंडोनेशियामध्ये जावा, सुमात्रा आणि इतर सुमारे ३००० बेटांचा समावेश आहे. मसाल्याच्या व्यापाराने युरोपियनांना फार पूर्वीपासून दक्षिण आशियायी प्रांताकडे आकर्षण होणे. पोर्तुगीज व्यापारी या बेटांवर सर्वात आधी पोहोचले होते. डच लोकांनी पोर्तुगीजांचे अनुकरण केले. १७५० नंतर सुरुवातीला व्यापार करणाऱ्या डच ईस्ट इंडिया कंपनीला स्थानिक राजकीय परिस्थिती आपले सरकार स्थापन करण्यासाठी अनुकूल वाटली. त्यामुळे ईस्ट इंडीजमध्ये डच वसाहतवादाला पुष्टी मिळाली. त्यामुळे हे बेट नेदरलँड्स

munotes.in

इंडीज म्हणून ओळखले जाऊ लागले. एकोणिसाव्या शतकात डचांच्या अधिपत्याखाली बेटांच्या संसाधनांचे शोषण करण्यात आले.

विसाव्या शतकापर्यंत इतर परकीय प्रभाव रोखून डच राज्यकर्त्यांनी हळूहळू आपला प्रभाव सर्वत्र पसरवला. त्यांनी गव्हर्नर-जनरलच्या हाताखाली एक केंद्रीकृत प्रशासन तयार केले आणि विविध प्रांतांचा कारभार राज्यपालांद्वारे चालविला जात असे. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला पर्यंत डचांनी इंडोनेशियन लोकांसाठी शेती आणि मर्यादित आरोग्य आणि शैक्षणिक सेवा विकसित केल्या गेल्या. रेल्वे, रस्ते आणि आंतरद्वीपीय जहाजसेवेचाही विस्तार करण्यात आला. नवशिक्षित इंडोनेशियन लोक डचांच्या वसाहतवादी रचनेबद्दल नाराज होते. त्यांना अनेक प्रकारच्या भेदभावाला सामोरे जावे लागत होते.

## ८.२ विसाव्या शतकात राष्ट्रवादाचा उदय

या घडामोडींमुळे इंडोनेशियन लोकांच्या राष्ट्रीय भावना जागृत झाल्या. राष्ट्रवादाच्या उद्रेकाने अनेक राजकीय संघटना व पक्ष निर्माण झाले. राष्ट्रीय संघटनांपैकी सर्वात सुरुवातीची संस्था म्हणजे बोडी ऑक्टोमो. आर्थिक व शैक्षणिक प्रगती साधणे हा या संस्थेचा मुख्य उद्देश होता. पुढची प्रमुख राजकीय संघटना म्हणजे सरेकत इस्लाम. ती केवळ मुस्लिम प्रतिनिधींची बनलेली होती. चिनी व्यापारी मक्तेदारी वगळून आर्थिक स्वातंत्र्य मिळविणे हा या समाजाचा सुरुवातीचा कार्यक्रम होता. मात्र राजकीयदृष्ट्या याचा उद्देश इस्लामिक स्टेटच्या स्थापनेचा होता. इंडो-कम्युनिस्ट पक्ष ही आणखी एक महत्त्वाची राजकीय शक्ती होती. जी डच राजवटीविरुद्ध कार्य करू लागली. याची स्थापना १९२० मध्ये झाली. इंडोनेशियन कम्युनिस्ट पक्षाचा कार्यक्रम धर्मनिरपेक्ष राज्य स्थापन करण्याचा होता. १९२७ मध्ये स्थापन झालेल्या राष्ट्रवादी पक्षाने अधिक उदारमतवादी धोरण अवलंबले आणि स्वतंत्र प्रजासत्ताक स्थापन करण्याचे उद्दिष्ट ठेवले. त्याचे नेतृत्व सुकार्णो यांनी केले. या संघटनांनी तरुणांना राजकीय कार्याचे प्रशिक्षण दिले. परंतु इंडोनेशियन लोकांमध्ये शिक्षणाचे प्रमाण नगण्य होते. त्यामुळे समाजातील मोठा वर्ग अज्ञानी राहिला. काही सुशिक्षित नागरी सेवेत अडकले होते. यामुळे इंडोनेशियन राष्ट्रवादाच्या प्रगतीला खीळ बसली.

## ८.३ दुसरे महायुद्ध आणि इंडोनेशिया

दुसरे महायुद्ध सुरू झाले तेव्हा इंडोनेशियन लोकांच्या बाबतीत डचांना फारशी चिंता नव्हती आणि त्यांचे वसाहतवादी सरकार अचानक कोसळू शकते. याचीही पूर्वकल्पना त्यांना आली नव्हती. जपानने १९४१ मध्ये इंडोनेशियावर आक्रमण केले आणि १९४२ पर्यंत या बेटांचा ताबा घेतला. डच वसाहतवादाचा अंत झाला. जपानला राष्ट्रवादाच्या एका वर्गाचा पाठिंबा मिळाला. इंडोनेशियन लोकांमध्ये डचविरोधी भावना निर्माण झाल्या. डच राजवटीचा अंत जपानी लोकांशी सहकार्य केल्यास त्यांना राजकीय स्वातंत्र्य मिळेल असा त्यांचा विश्वास होता. परंतु जपानने इंडोनेशियाच्या संसाधनांचे शोषण केले आणि इंडोनेशियाच्या अर्थव्यवस्थेत आणखी घसरण घडवून आणली. मात्र राजकीयदृष्ट्या जपानी आक्रमणामुळे इंडोनेशियन लोकांना आपले स्वातंत्र्य घोषित करणे शक्य झाले. सुरुवातीस सुकार्णो आणि मोहम्मद हट्टा जपानी आक्रमणकर्त्यांमध्ये सामील झाले. त्यांनी १७ ऑगस्ट

munotes.in

१९४५ रोजी जपानी लोकांच्या ताब्यात असताना इंडोनेशियाच्या स्वातंत्र्याची घोषणा केली. जपानच्या शरणागतीनंतर मित्रराष्ट्रांच्या सैन्याच्या उशीरा आगमनामुळे राष्ट्रवादी घटकांना त्यांचे स्थान बळकट करण्यास आणि स्थिर सरकार स्थापन करण्यास मदत झाली.

महायुद्धात जपानचा पराभव झाल्यानंतर सुकार्णोने इंडोनेशियात प्रजासत्ताकाची घोषणा केली. मात्र लवकरच त्यांचा पक्ष (पी.एन.आय.) कम्युनिस्ट पक्ष आणि इस्लामिक मजसुनी पक्ष यांच्यात संघर्ष सुरु झाला. वर्षाच्या अखेरीस डच साम्राज्यवाद्यांनी इंडोनेशियावर पुन्हा ताबा मिळवला. पण सुकार्णोच्या हाताखाली असलेल्या जावा आणि सुमात्राला ते घेऊ शकले नाहीत. डच आणि सुकार्णो यांच्यातील शत्रुत्व सुरूच होते. डचांनी जावा आणि सुमात्रा यांच्या दळणवळणाच्या मार्गांवर हल्ला केला. १९४८ मध्ये पुन्हा डचांनी जावा व सुमात्रा ताब्यात घेतले. राष्टवादी इंडोनेशियन नेत्यांना तुरुंगात डांबण्यात आले पण लष्कर आणि जनतेने त्याविरुद्ध कडवी झुंज दिली. आंतरराष्ट्रीय देश युनो यांनी डचांवर दबाव आणला. त्यांनुसार हेग करारावर स्वाक्षरी करण्यात आली. इंडोनेशियातील पश्चिम न्यू गिनी वगळता सर्व बेटांना स्वातंत्र्य देण्यात आले. सुकार्णो यांना अध्यक्ष आणि हट्टा यांना पंतप्रधान म्हणून स्वीकारण्यात आले.

**इंडोनेशियापुढील समस्या :**

स्वातंत्र्यानंतर इंडोनेशियाला मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागले. प्रांतवाद, दारिद्र्य आणि वाढती लोकसंख्या या इंडोनेशियाच्या राज्यकर्त्यांना आव्हान देणाऱ्या समस्या होत्या. सर्वात गंभीर समस्या म्हणजे डच राजवटीत इंडोनेशियन नागरी सेवकांचा अनुभव आणि प्रशिक्षणाचा अभाव ही होती. डच अधिकाऱ्यांना बडतर्फ करण्यात आले काहींनी स्वत: राजीनामा दिला गेला. सुरुवातीस अशा विविध कारणांमुळे इंडोनेशियन प्रजासत्ताकाला सुरळीत प्रशासन बसवता आले नाही. १९५० पासून राजकीय सत्ता मख्यतः सुकार्णो आणि हट्टा यांच्या हातात केंद्रित झाली. सरकार अस्थिर होते कारण कोणत्याही पक्षाला सोयीस्कर बहुमत मिळवता आले नाही. मस्जुमी आणि पीएनएन (इंडोनेशियन नॅशनलिस्ट पार्टी) हे मुख्य पक्ष होते, याव्यतिरिक्त अनेक लहान पक्ष अस्तित्वात होते.

**१९५५ च्या निवडणुका आणि प्रदीर्घ संकट :**

१९५५ मध्ये संसद आणि संविधान सभेसाठी निवडणुका झाल्या. २५० सदस्यांच्या नव्या हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हमध्ये चार महत्त्वाचे पक्ष आणि अनेक छोटे पक्ष होते. डिसेंबर १९५६ पासून इंडोनेशिया दीर्घ संकटाच्या विळख्यात सापडला आहे. देशाच्या राजकारणाविषयी असंतोष त्या महिन्यात रक्तरंजित उठावाच्या मालिकेत उफाळून आला आणि मध्य, उत्तर आणि दक्षिण सुमात्राच्या सरकारची सूत्रे लष्कराच्या प्रादेशिक परिषदांच्या हाती आली. १९४९ पासून मंत्रिमंडळाची झपाट्याने पडझड झाली. एकही मंत्रिमंडळ दोन वर्षांपेक्षा जास्त काळ राहिले नाही. अत्यंत कमकुवत असलेली मंत्रिमंडळे कोणतीही प्रभावी पावले उचलू शकली नाहीत. जकार्ता आणि या प्रदेशांमधील लढाई अधिकाधिक गंभीर होत गेली. बंडखोर भागातील नेत्यांनी सरकारची स्थिती कमकुवत

आणि अस्थिर केली. १९५७ मध्ये जकार्ता आणि बंडखोर भागातील लष्करी नेत्यांशी वाटाघाटी करण्यात आल्या.

## ८.४ अध्यक्ष डॉ. सुकार्णो आणि (गाइडेड डेमोक्रेसी) मार्गदर्शित लोकशाही

इ.स. १९४९ ते १९५७ या उदारमतवादी लोकशाहीच्या काळात अंमलात आणलेली संसदीय व्यवस्था त्या वेळच्या इंडोनेशियाच्या विभाजनकारी राजकीय परिस्थितीमुळे कुचकामी होती, असे सुकार्णो यांचे मत होते. त्याऐवजी त्यांनी चर्चा आणि सहमतीच्या पारंपारिक ग्रामपद्धतीवर आधारित व्यवस्था शोधली. ज्येष्ठ आणि अनुभवी व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली ती अंमलात आणली गेली. ही पद्धत सुरू झाल्यावर इंडोनेशिया पुन्हा अध्यक्षीय व्यवस्थेत आला आणि सुकार्णो सरकारचा प्रमुख झाला. सुकार्णो यांनी राष्ट्रवाद, धर्म आणि साम्यवाद यांचे त्रिसूत्री मिश्रण सहकारी सरकारी संकल्पनेत मांडले. इंडोनेशियन राजकारणातील लष्कर, इस्लामी गट आणि साम्यवादी या तीन मुख्य गटांना खूश करण्याचा हेतू होता. लष्कराच्या पाठिंब्याने त्यांनी फेब्रुवारी १९५७ मध्ये 'गाइडेड डेमोक्रेसी'ची घोषणा केली आणि इंडोनेशियाच्या कम्युनिस्ट पक्षासह सर्व प्रमुख राजकीय पक्षांचे प्रतिनिधित्व करणारे कॅबिनेट प्रस्तावित केले.

राजकीय कलह टाळण्यासाठी सुकार्णो यांनी फेब्रुवारी १९५७ मध्ये मार्शल लॉ ची घोषणा केली. त्यामुळे त्यांनी सर्वोच्च सत्ता स्वीकारली आणि अध्यक्षांच्या मार्गदर्शनाखाली लष्कराल नियंत्रित झाले. त्यांनी जुलै १९५९ मध्ये संविधान सभा बरखास्त केली आणि १९४५ च्या संविधानाचे पुनरुज्जीवन केले. त्यानंतर त्यांनी संसदेचे कामकाज स्थगित केले. आपल्या राजवटीला पाठिंबा देऊ शकतील अशा आपल्या आवडीच्या माणसांना त्याने प्रशासनाच्या विविध जागेवर नेमले. राष्ट्रवादी, मुस्लीम पुराणमतवादी, साम्यवादी आणि लष्कर अशा विविध राजकीय पक्षांनी त्यांच्या वैयक्तिक नियंत्रणाखाली मार्गदर्शित लोकशाहीचा प्रयोग राबविण्यात त्यांना सहकार्य केले.

सुकार्णो यांच्यावर सुरुवातीच्या काळात पाश्चिमात्य लोकशाहीचा प्रभाव असला तरी जेव्हा त्यांनी सत्ता हाती घेतली तेव्हा लोकशाहीपेक्षा राष्ट्रासाठी हितकारक अशी संरचना त्यांना गरजेची भासू लागली. त्यांच्या तत्त्वज्ञानात राष्ट्रीय परंपरेवर भर देण्यात आला. मार्गदर्शित लोकशाहीची संकल्पना ही विचारमंथन, एकवाक्यता आणि मजबूत नेतृत्व या तत्त्वावर आधारित होती. राष्ट्राध्यक्षांनी या व्यवस्थेत लोकांच्या आकांक्षांचे प्रतिनिधित्व करायचे होते. सुकार्णोने स्थापन केलेल्या व्यवस्थांनी कम्युनिस्टांना सरकारी यंत्रणेपासून दूर ठेवले. सरकारचा अनादर करू नये आणि प्रस्थापित नैतिक निकषांच्या विरोधात काम करू नये म्हणून सर्वसामान्य लोकांची प्रशंसा करण्यात आली. त्याची नैतिक संहिता प्रसिद्ध 'पंचशील' किंवा पाच नैतिक तत्त्वांमध्ये स्पष्ट करण्यात आली होती. या संकल्पना सर्वांनी अप्रत्यक्षपणे आचरणात आणायच्या होत्या. लोकांमध्ये राष्ट्रीय चारित्र्य विकास व्हावा हा त्यामागचा उद्देश होता. हे आदर्श अंमलात आणण्याचे काम लष्करावर सोपविण्यात आले.

**सुकार्णो यांनी मार्गदर्शित लोकशाहीत पुढील गोष्टींचा प्रसार केला**

१) त्यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवाद, इस्लाम आणि मार्क्सवाद.

munotes.in

२) समाज हा कामगार, शेतकरी, अधिकारी, बुद्धिजीवी, सैनिक, विद्यार्थी आणि स्त्रिया अशा विविध कार्यशील गटांचा संयुक्त प्रयत्न आहे, असे त्यांचे मत होते. प्रादेशिक आणि संकुचित हितसंबंधांना मोठ्या उद्दिष्टाच्या अधीन केले तरच राष्ट्रीय उद्दिष्टे साध्य होऊ शकतील.

३) देशात कुठल्याही महत्त्वाच्या वर्गविभाजनाची कल्पना त्यांनी फेटाळून लावली. त्यांचा असा विश्वास होता की, एका गरीब इंडोनेशियन शेतकऱ्याकडे ज्याचा एक छोटासा भूखंड तसेच त्याची अवजारे आणि प्राणी आहेत त्याला सर्वहारा म्हणता येणार नाही.

४) परराष्ट्र धोरणाच्या दृष्टीने इंडोनेशियन लोकांनी स्वत:ला वसाहतवाद, साम्राज्यवाद आणि शोषणाविरुद्धच्या जागतिक चळवळीचा भाग म्हणून पाहावे अशी त्यांची इच्छा होती.

५) पूर्वीची वसाहत आणि आता असंलग्न चळवळीचा संस्थापक सदस्य म्हणून त्यांचा विश्वास होता, इंडोनेशियावर जुन्या प्रस्थापित बलांविरुद्ध न्यू इमर्जिंग फोर्सेस (एनईएफओएस) चे नेतृत्व करण्याची विशेष जबाबदारी होती.

## ८.५ इंडोनेशियाची मार्गदर्शक लोकशाही आणि परराष्ट्र धोरण

**आफ्रो-आशियाई परिषद : एप्रिल १९५५ :**

एप्रिल १९५५ मध्ये आफ्रो-आशियाई देशांची सरकारे बांडुंग येथे शीतयुद्ध, आर्थिक विकास आणि वसाहतमुक्ती यावर तिसऱ्या जगातील देशांची भूमिका यावर चर्चा करण्यासाठी एकत्र आली. बांडुंग परिषदेची मूळ तत्त्वे म्हणजे राजकीय आत्मनिर्णय, सार्वभौमत्वाचा परस्पर आदर, अनाक्रमकता, अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप न करणे आणि समानता. बर्मा, भारत, इंडोनेशिया, पाकिस्तान आणि श्रीलंका ही सरकारे बांडुंग परिषदेचे संस्थापक सदस्य आणि सहसंयोजक होते. परिषदेच्या अखेरीस सहभागी राष्ट्रांनी एकमेकांना आर्थिक व सांस्कृतिक सहकार्य, मानवी हक्कांचे रक्षण आणि स्वयंनिर्णयाचे तत्त्व, जिथे जिथे वांशिक भेदभाव झाला तेथे तो थांबविण्याचे आवाहन आणि शांततापूर्ण सहअस्तित्वाचा महत्त्वाचा पुनरुच्चार करण्याचे आश्वासन देणारे निवेदन सादर केले. ही परिषद १९६१ मध्ये बेलग्रेड येथे झालेल्या असंलग्न चळवळीची अग्रदूत ठरली.

**न्यू वेस्ट गिनी की मुक्ति १९६१-६३ :**

सुकार्णो यांचा वेस्ट न्यू गिनीवरील डच नियंत्रणाला विरोध होता. १९६१ मध्ये डच सरकारने स्वतंत्र राजकीय रचना करण्याचा प्रयत्न केला तेव्हा सुकार्णो यांनी विरोध केला. या प्रकरणात अमेरिकेने इंडोनेशियाला पाठिंबा दिला आणि १ ऑक्टोबर १९६२ रोजी पश्चिम न्यू गिनीचा कारभार संयुक्त राष्ट्रसंघाकडे हस्तांतरित करण्यात आला आणि १९६३ मध्ये इंडोनेशियाकडे सत्ता हस्तांतरित करण्यात आली.

**मलेशियाशी संघर्ष १९६३-६५ :**

मलेशियाने १९६३ मध्ये माजी ब्रिटिश वसाहती आणि संरक्षक प्रदेश यांचे फेडरेशन म्हणून तयार केले. त्यात मलाया द्वीपकल्प, सिंगापूर बेट, उत्तर बोर्नियोमधील सबाह आणि

सारावाक यांचा समावेश होता. सुकार्णो यांनी या योजनेवर आक्षेप घेतला कारण ते मलेशियाला इंग्रजांची नव-वसाहत म्हणून पाहत होते. मलेशियन महासंघाच्या निर्मितीपूर्वी इंडोनेशियाचा सल्ला घ्यायला हवा होता असेही त्यांचे मत होते. त्याने पश्चिम आणि पूर्व मलेशियात सशस्त्र घुसखोरी केली. जेव्हा मलेशियाला यूएनएससीचा सदस्य म्हणून मान्यता देण्यात आली तेव्हा इंडोनेशियाने संयुक्त राष्ट्र सोडले आणि न्यू इमर्जिंग फोर्सेस (सीओएनएफओ) नावाची पर्यायी परिषद आयोजित करण्याचा प्रयत्न केला.

## ८.६ इंडोनेशियाची देशांतर्गत धोरणे

१९६० मध्ये सुकार्णो यांनी सरकारविरुद्ध बंडाच्या कारणास्तव मस्जुमी आणि पीएसआय पक्षांवर बंदी घातली. नेत्यांना एकतर अटक झाली किंवा त्यांना अज्ञातवासात जाण्यास भाग पाडले गेले. सरकारच्या धोरणांपासून असहमत असलेल्या वृत्तपत्रांवर बंदी घालण्यात आली. इंडोनेशियात जरी लोकशाही राज्य असले, तरी सुकार्णोच्या राजवटीत मार्गदर्शित लोकशाहीच्या नावाखाली मर्यादित हुकूमशाही राजवट कार्यरत होती. राष्ट्रपतींच्या संमतीशिवाय कोणताही निर्णय घेण्यात येत नव्हता. जकार्तामधील सार्वजनिक वास्तू हे राष्ट्रपतींच्या अधिकाराचे प्रतीक बनले.

**सुकार्णो आणि सेनेचा सत्तासंघर्ष :**

इंडोनेशियाच्या स्वातंत्र्यासाठी लढताना लष्कर आणि सुकार्णो यांची युती झाली होती. सत्ता टिकवण्यासाठी एकमेकांची गरज आहे याची जाणीव या संघर्षातून झाली. संघर्षादरम्यान त्यांच्या नेतृत्वामुळे सुकार्णो यांना देशाचे नेते आणि मार्गदर्शक मानले जात होते. देशातील सर्व घटकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी संसदीय लोकशाही संपुष्टात आणण्यासाठी आणि मार्गदर्शक लोकशाही आणण्यासाठी सुकार्णोला सैन्याची गरज होती. १९६० मध्ये सुकार्णो यांचा मित्रपक्ष पीकेआयने कॅबिनेट आणि लष्कर या दोघांवर जोरदार टीका केल्यामुळे सर्व पक्षांवर काही काळासाठी बंदी घालण्यात आली. १९६३ मध्ये त्यांनी देशात लागू करण्यात आलेला मार्शल लॉ बदलण्यासाठी लष्करावर दबाव आणला. देशावर पूर्ण नियंत्रण ठेवण्यासाठी सुकार्णो यांनी लष्करात आणि सैन्यदलात फूट पाडण्यास प्रोत्साहन दिले.

**सुकार्णो यांचे राजकीय पक्षांशी संबंध :**

इ.स. १९५९ मध्ये राष्ट्राध्यक्ष सुकार्णो यांनी राजकीय पक्षांना १९४५ची राज्यघटना स्वीकारण्यासाठी दबाव आणणारे नियम जारी केले. त्यात परकीय मदत स्वीकारण्यास बंदी घालण्यात आली आणि सरकारविरोधात बंड करणाऱ्या पक्षावर बंदी घालण्याचा अधिकार राष्ट्रपतींना देण्यात आला, परंतु त्यांनी पक्षांवर पूर्णपणे बंदी घातली नाही आणि पीएनआय, एनयू आणि पीकेआयला मर्यादित अधिकार आणि कामकाज करण्यास परवानगी दिली. परंतु पीकेआयला म्हणजे त्यांच्या स्वतःच्या पक्षाला सुकार्णोने दिलेल्या सवलतींमुळे लष्कराला पीकेआय हा पक्ष आपला प्रतिस्पर्धी व सर्वात मोठा दावेदार वाटू लागला. १९६४ पर्यंत पीकेआयचे राष्ट्रीय आघाडीवर खरे नियंत्रण होते.

**मार्गदर्शित लोकशाहीमधील नोकरशाही**

मार्गदर्शक लोकशाहीतील नोकरशाही हा महत्वाचा घटक होता. प्रत्येक विभागासाठी स्पष्टपणे जबाबदाऱ्या निश्चित केल्या गेल्या नाहीत आणि सनदी अधिकारी उलटसुलट निर्णय घेत गेले. अनेक नियम आणि परवाने हे त्या काळाचे नियम बनले. प्रशासक (नागरी सेवेत प्रशिक्षण घेतलेले) आणि एकात्मता निर्माते (ज्यांनी क्रांतीच्या काळात महत्त्वाची भूमिका बजावली) यांच्यात सत्तेसाठी स्पर्धा होती. एकात्मता निर्मात्यांचाच प्रशासनावर वरचष्मा होता. राजकीय पक्षांच्या अधोगतीमुळे नोकरशाही अधिकाधिक राजकीय होत गेली.

## ८.७ मार्गदर्शित लोकशाही आणि सुकार्णो यांचे पतन

१९६५ मध्ये लोकशाहीवरील संकट तीव्र झाले. लष्कराचे वरिष्ठ जनरल सुकार्णो यांच्याविरोधात बंडखोरी करण्याच्या तयारीत असल्याची जोरदार अफवा पसरली होती. ३० सप्टेंबर १९६५ रोजी अनेक वरिष्ठ जनरलांना अटक करण्यात आली. जकार्तामध्ये एक घोषणा झाली की केंद्रीय क्रांती परिषदेने निवडणुकीपर्यंतचे सर्व अधिकार आपल्या ताब्यात घेतले आहेत. काही सेनापतींचे अपहरण करण्यात आले. यात सुकार्णो आणि पीकेआयचे नेते ऐदित या दोघांचाही सहभाग असल्याचा संशय होता. १ ऑक्टोबर १९६५ रोजी काही लष्करी जनरलांना गोळ्या घालून ठार मारण्यात आले किंवा त्यांना पकडण्यात आले. उलट लष्कराने सूडाच्या कारवाईचा कट रचून या कारवाईचा बदला घेतला. बंडखोरी विरोधी मोहिमेचे नेते मेजर जनरल सुहार्तो होते. मध्य जकार्तामधील रेडिओ स्टेशन आणि इतर इमारतींवर त्याने पटकन ताबा मिळवला. सायंकाळपर्यंत त्यांनी बंडखोरांना एअरबेस सोडण्याचा अल्टिमेटम दिला. ३० सप्टेंबरचे आंदोलन संपले. मार्गदर्शक लोकशाही पूर्वीप्रमाणेच सुरू राहील असा विश्वास व्यक्त करत सुकार्णो पूर्वीप्रमाणेच सत्तेत राहिले. सुहार्तोने हळूहळू आपला फास आवळला व सत्ता हाती घेतली आणि तो सावधपणे पुढे गेला. अखेरीस ३ ऑक्टोबर रोजी सुकार्णो यांना देशातील सुव्यवस्था कायम राखण्यासाठी शासनाची जबाबदारी सुहार्तो यांच्यावर सोपविणे भाग पडले. ८ ऑक्टोबर १९६५ रोजी पीकेआयवर बंदी घालण्यात आली. १४ ऑक्टोबर रोजी सुकार्णो यांनी औपचारिकरित्या सुहार्तो यांची लष्करी कमांडर म्हणून नियुक्ती केली. या नियुक्तीमुळे कोणतीही कारवाई करण्याचे प्रचंड अधिकार सुहार्तोला मिळाले.

**सामूहिक नरसंहार :**

लष्कराने पीकेआयविरुद्ध आघाडी उघडली. पीकेआयचे सुमारे पाच लाख सदस्य आणि समर्थक मारले गेले. पक्षाच्या सदस्यांना आणि जनतेला सूडबुद्धीने होणाऱ्या हल्ल्यांच्या भीषणतेचा अंदाज आला नव्हता. काही दिवसांतच पीकेआयच्या सदस्यांची हत्या सुरू झाली. १९६५ च्या अखेरीस मोठ्या संख्येने पीकेआय सदस्यांची कत्तल करण्यात आली. पीकेआयच्या विनाशामुळे सुकार्णो यांचे स्थान कमकुवत झाले कारण अन्यथा त्यांच्याकडे पक्षाचा आधार नव्हता. त्याचवेळी सुहार्तो नव्या आदेशाची तयारी करत असला तरी त्याचा आराखडा तयार नव्हता आणि मध्यंतरीच्या काळात तो मार्गदर्शक लोकशाहीचा पूर्णपणे त्याग करू शकला नाही. या काळात सुहार्तो, सुकार्णो यांना सत्तेवरून हटवण्यासाठी ठोस

पावले उचलत होते. जानेवारी १९६६ मध्ये महागाई, आर्थिक संकटाविरोधात विद्यार्थी आणि युवक संघटनांनी रस्त्यावर निदर्शने केली होती. फेब्रुवारीमध्ये पुन्हा त्यांनी हिंसक निदर्शने केली आणि गोंधळ पसरला. सुहार्तो याने सुरक्षा, शांतता आणि सरकार आणि क्रांतीची हमी देण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. सुकार्णोच्या नीतीचा आणि पर्यायाने सुकार्णोचा पूर्ण नायनाट करण्यासाठी सुकार्णो यांच्या निकटवर्तीयांवर भ्रष्टाचार आणि गैरकारभाराचे आरोप लावण्यात आले आणि त्यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. नंतर सुहार्तो यांची कार्यवाहक अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आणि सुकार्णो यांना २१ जून १९७० रोजी मृत्यूपर्यंत जकार्ता येथे नजरकैदेत ठेवण्यात आले.

## ८.८ सारांश

प्रदीर्घ काळ डचांच्या वर्चस्वाखाली राहिल्यानंतर विसाव्या शतकात इंडोनेशियन लोकांच्या राष्ट्रीय भावना जागृत झाल्या. राष्ट्रवादाच्या उद्रेकाने अनेक राजकीय संघटना व पक्ष निर्माण झाले. जपानने १९४१ मध्ये इंडोनेशियावर आक्रमण केले. डच राजवटीचा अंत जपानी लोकांशी सहकार्य केल्यास त्यांना राजकीय स्वातंत्र्य मिळेल असा त्यांचा विश्वास होता. राजकीयदृष्ट्या जपानी आक्रमणामुळे इंडोनेशियन लोकांना आपले स्वातंत्र्य घोषित करणे शक्य झाले. सुरुवातीस सुकार्णो आणि मोहम्मद हट्टा जपानी आक्रमणकर्त्यांमध्ये सामील झाले. त्यांनी १७ ऑगस्ट १९४५ रोजी जपानी लोकांच्या ताब्यात असताना इंडोनेशियाच्या स्वातंत्र्याची घोषणा केली. सुकार्णो यांच्यावर सुरुवातीच्या काळात पाश्चिमात्य लोकशाहीचा प्रभाव असला तरी ती जशीच्या तशी न स्वीकारता त्यात बदल केले गेले. त्यांनी आपल्या लोकशाही स्वरूपाला मार्गदर्शित लोकशाही असे नाव दिले.

## ८.९ प्रश्न

१) इंडोनेशियन स्वातंत्र्याच्या वाटचालीची चर्चा करा

२) इंडोनेशियातील डॉ. सुकार्णोच्या उदयाचा मागोवा घ्या.

३) डॉ. सुकार्णोने इंडोनेशियात मार्गदर्शक लोकशाही का लादली? चर्चा करा.

४) इंडोनेशियात मार्गदर्शक लोकशाहीचा काय परिणाम झाला? विश्लेषण करा.

## ८.१० संदर्भ

१) क्रिस ब्रावून, अ शोर्ट हिष्ट्री ऑफ इंडोनेशिया, द अनलाइकली नेशन, अलेन अँड अन्विन, २००३,

२) विलियम रेन्फर्ण, सुकार्नोज गाईडेड डेमोक्रसी अँड द टेक ओवर ऑफ फोरेन कंपनीज इन इंडोनेशिया, इन १९६०, अप्रसिद्ध प्रबंध, मिशिगन विद्यापीठ.

३) स्टोरी रिचर्ड, जपान अंड द डिक्लइन ऑफ द वेस्ट, १८९४- १९४३, १९७९ न्यूयॉर्क शहर,



munotes.in

४) रॉबर्ट क्रिब और कॉलिन ब्राउन, मोडर्ण इंडोनेशिया: लॉन्गमैन, लंदन, १९९५

५) हेझेन चार्ल्स, मोडर्ण युरोप सिन्स १७८९, एस. चांद आणि कं, १९९२.

६) डेव्हिड एम.डी., लँडमार्क्स इन वर्ल्ड हिस्ट्री, हिमालय पब्लिशिंग हाऊस, मुंबई, १९९९.

७) डॉ. युजीन डिसोझा, हिस्ट्री ऑफ एशिया, मनन प्रकाशन, मुंबई, २०१८.

❖❖❖❖

munotes.in

# ९

## आसियान (ASEAN)

**घटक रचना :**

९.० उद्दिष्टये

९.१ प्रस्तावना

९.२ आसियानची उद्दिष्टे

९.३ आसियानच्या स्थापनेची पार्श्वभूमी

९.४ आसियानचे कार्य

९.५ आसियानचे महत्व

९.६ आसियान शिखर परिषद

९.७ सारांश

९.८ प्रश्न

९.९ संदर्भ

## ९.० उद्दिष्टये

१) दक्षिण पूर्व आशियातील आर्थिक विकास, सामाजिक प्रगती आणि सांस्कृतिक विकासात आसियानची भूमिका समजून घेणे.

२) आसियान संघटनेची कार्यप्रणाली समजणे.

३) आसियानचे ध्येय, उद्दिष्टे व कार्यक्रम यांची माहिती घेणे.

४) आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, तांत्रिक, वैज्ञानिक आणि प्रशासकीय क्षेत्रातील आशियनचा प्रभाव जाणून घेणे.

## ९.१ प्रस्तावना

आसियान या संघटनेची आग्नेय आशियाई राष्ट्रांची आर्थिक वाढ, सामाजिक प्रगती आणि सांस्कृतिक विकासास गती देण्यासाठी आणि आग्नेय आशियात शांतता आणि सुरक्षिततेस प्रोत्साहन देण्यासाठी स्थापना केली. जागतिक स्तरावर सुरक्षा, लष्करी, शैक्षणिक आणि सामाजिक-सांस्कृतिक एकात्मता हे देखील आसियानचे उद्दीष्ट होते. इंडोनेशिया, मलेशिया, फिलिपाईन्स, सिंगापूर आणि थायलंड या पाच आग्नेय देशांनी ८ ऑगस्ट १९६७ रोजी

munotes.in

बँकॉक येथे आसियानची स्थापना केली. कालांतराने या समूहाचा विस्तार होऊन सध्याच्या १० सदस्यांचा समावेश झाला. ब्रुनेई १९८४, व्हिएतनाम १९९५, लाओस आणि म्यानमार १९९७ आणि कंबोडिया १९९९ मध्ये सामील झाले. आसियानचे स्थायी सचिवालय जकार्ता, इंडोनेशिया येथे आहे.

## ९.२ आसियानची ध्येय आणि उद्दिष्टे

बँकॉक जाहीरनाम्यात (१९६७) नमूद केलेली आसियानची मुख्य उद्दिष्टे खालीलप्रमाणे होती:

(१) आग्नेय आशियाई राष्ट्रांच्या समृद्ध आणि शांततापूर्ण समुदायाचा पाया भक्कम करण्यासाठी समता आणि भागीदारीच्या भावनेने संयुक्त प्रयत्नांद्वारे या प्रदेशातील आर्थिक वाढ, सामाजिक प्रगती आणि सांस्कृतिक विकासाला गती देणे.

(२) सभासद देशांमधील संबंधांमध्ये न्याय आणि कायद्याचे राज्य यांचा कायम आदर करून आणि संयुक्त राष्ट्रांच्या चारित्र्याच्या तत्त्वांचे पालन करून प्रादेशिक शांतता आणि स्थैर्याला चालना देणे;

(३) आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, तांत्रिक, वैज्ञानिक आणि प्रशासकीय क्षेत्रातील सामायिक हिताच्या बाबींवर सक्रिय सहकार्य आणि परस्पर सहकार्यास प्रोत्साहन देणे;

(४) आंतरराष्ट्रीय व्यापारातील समस्यांचा अभ्यास, त्यांच्या वाहतूक आणि दळणवळणाच्या सुविधांमध्ये सुधारणा यासह त्यांच्या शेती आणि उद्योगांचा अधिकाधिक वापर, त्यांच्या व्यापाराचा विस्तार यासाठी अधिक प्रभावीपणे सहकार्य करणे; आणि राहणीमान उंचावणे.

(५) समान उद्दिष्टे असलेल्या विद्यमान आंतरराष्ट्रीय आणि प्रादेशिक संघटनांशी घनिष्ठ आणि फायदेशीर सहकार्य राखणे आणि आपापसात अधिक घनिष्ठ सहकार्याचे सर्व मार्ग शोधणे.

आसियान ही आर्थिक आणि सामाजिक अशी परस्पर मदत करणारी संघटना होती परंतु यामुळे इंडोनेशियाच्या या प्रदेशावर वर्चस्व गाजवण्याच्या संभाव्य क्षमतेवर अंकुश येईल अशी आशा बाळगली जात होती कारण आसियानच्या लोकसंख्येच्या जवळपास निम्मी लोकसंख्या त्यावेळेस इंडोनेशियात होती. मात्र लवकरच आशियातील इतर देश यात समाविष्ट झाल्याने ही भीती संपुष्टात आली. आसियानने १९७७ मध्ये जपानबरोबर संयुक्त मंचाची स्थापना केली आणि १९८० मध्ये युरोपियन समुदायाबरोबर सहकार्य करारावर स्वाक्षरी झाली. आसियानचा मुख्य भर आर्थिक सहकार्य, आसियान देशांमध्ये आणि आसियान सदस्य आणि उर्वरित जगादरम्यान व्यापाराला प्रोत्साहन देणे आणि सदस्य सरकारांमधील संयुक्त संशोधन आणि तांत्रिक सहकार्याचे कार्यक्रम यावर केंद्रित आहेत.

**मूलभूत तत्त्वे :**

१९७६ च्या आग्नेय आशियातील सौहार्द आणि सहकार्य करारात (टीएसी) समाविष्ट केल्याप्रमाणे आसियान सदस्य देशांनी खालील तत्त्वे स्वीकारली आहेत.

१) सभासद राष्ट्रांचे स्वातंत्र्य, सार्वभौमत्व, समानता, प्रादेशिक अखंडता आणि राष्ट्रीय अस्मितेचा परस्पर आदर.
२) बाह्य हस्तक्षेप, विध्वंस किंवा बळजबरीपासून मुक्त राहून आपले राष्ट्रीय अस्तित्व जगण्याचा प्रत्येक राज्याचा अधिकार
३) एकमेकांच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप न करणे
४) मतभेद किंवा वाद शांततेच्या मार्गाने सोडविणे
५) समस्या सोडवण्यासाठी बळाचा वापर न करणे
६) आपापसात प्रभावी सहकार्य

## ९.३ आसियानच्या स्थापनेची पार्श्वभूमी

८ ऑगस्ट १९६७ रोजी इंडोनेशिया, मलेशिया, फिलिपाईन्स, सिंगापूर आणि थायलंड चे परराष्ट्र मंत्री – थायलंडमधील बँकॉक येथील परराष्ट्र व्यवहार विभागाच्या इमारतीच्या मुख्य हॉलमध्ये एकत्र आले आणि त्यांनी एका दस्तऐवजावर स्वाक्षरी केली. त्या दस्तऐवजाच्या आधारे दक्षिणपूर्व आशियाई राष्ट्रांची संघटना (आसियान) जन्माला आली. इंडोनेशियाचे ॲडम मलिक, फिलिपाईन्सचे नार्सिसो आर. रामोस, मलेशियाचे तुन अब्दुल रझाक, सिंगापूरचे एस. राजरत्नम आणि थायलंडचे थानात खोमन या पाच परराष्ट्र मंत्र्यांनी ज्या दस्तऐवजावर स्वाक्षरी केली त्याला आसियान जाहीरनामा म्हणून ओळखले गेले.

हा एक छोटा व सोप्या शब्दांचा दस्तऐवज होता ज्यात फक्त पाच तत्वे होते. आग्नेय आशियातील देशांमध्ये प्रादेशिक सहकार्य वाढवण्यासाठी दक्षिणपूर्व आशियाई राष्ट्रांची संघटना म्हणून (आसियान) स्थापन केली गेली. या संघटनेची उद्दिष्टे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, तांत्रिक, शैक्षणिक आणि इतर क्षेत्रांमध्ये सहकार्य करणे आणि न्याय आणि कायद्याचे राज्य आणि संयुक्त राष्ट्रांच्या सनदेच्या तत्त्वांचे पालन करून प्रादेशिक शांतता आणि स्थैर्यास प्रोत्साहन देणे हे होते. त्यात असे नमूद करण्यात आले होते की ही संघटना त्याची उद्दिष्टे, तत्त्वे मान्य करतील अशा सर्व आग्नेय आशियाई क्षेत्रातील देशांसाठी खुली होती. आसियानला "आग्नेय आशियातील राष्ट्रांची मैत्री आणि सहकार्यात एकत्र बांधण्याची सामूहिक इच्छा आणि संयुक्त प्रयत्न आणि बलिदानाद्वारे त्यांच्या लोकांसाठी आणि भावी पिढीसाठी शांतता, स्वातंत्र्य आणि समृद्धीचे आशीर्वाद सुरक्षित करण्याची" म्हणून घोषित केले.

**आसियान चे संघटनात्मक स्वरूप**

१) **परराष्ट्र मंत्र्यांची परिषद –** याला सल्लामसलत मंत्रालय असेही म्हणतात. वर्षातून एकदा परिषद घेण्याचा निर्णय या परिषदेकडून घेतला जातो. यात सदस्य देशांच्या सर्व परराष्ट्र मंत्र्यांचा समावेश आहे.

२) **स्थायी समिती –** परराष्ट्र मंत्र्यांच्या परिषदेदरम्यान ही समिती विविध विषयांवर चर्चा करते आणि प्रादेशिक सहकार्य वाढविण्यासाठी आवश्यक त्या सूचना सादर करते. यात यजमान देशाचे परराष्ट्रमंत्री आणि इतर सदस्य देशांच्या राजदूतांचा समावेश आहे.



munotes.in

३) **सचिवालय -** प्रशासकीय सहकार्याची कामे पार पाडण्यासाठी १९७६ मध्ये आसियानच्या संघटनात्मक रचनेत बदल करण्यात आला आणि सचिवालय नावाची नवीन परिषद जोडली गेली. याचे कार्यालय इंडोनेशियाची राजधानी जकार्ता येथे आहे. त्याचे नेतृत्व सरचिटणीस करतात. त्याची नियुक्ती २ वर्षांसाठी आहे. प्रशासकीय कामकाजावर त्याचे पूर्ण नियंत्रण असते. याशिवाय सचिवालयात ब्युरो डायरेक्टर आणि इतर कर्मचारीही आहेत.

## ९.४ आसियानचे कार्य

५) साम्यवादाच्या प्रसाराच्या भीतीने पूर्व आणि दक्षिण-पूर्व आशियाच्या राजकारणावर खूप प्रभाव पडला. या प्रदेशातील देशांतील लोक सामान्यतः गरीब आहेत आणि दीर्घकाळ परकीय वर्चस्वाखाली राहिल्यामुळे त्यांचा आर्थिक विकास योग्य प्रकारे होऊ शकला नाही. ज्ञान-विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीच्या दृष्टिकोनातूनही हे देश खूप मागासलेले आहेत. रशिया आणि चीनसारख्या देशांनी साम्यवादी व्यवस्थेचा अवलंब करून जी विलक्षण प्रगती केली आहे, ती लक्षात घेऊन या देशांतील लोकांचाही कल साम्यवादाकडे आहे, आणि भांडवलशाही व्यवस्थेत त्यांची नीट प्रगती होईल असे वाटत नाही. याच कारणामुळे या

देशांमध्ये साम्यवादी विचारांना सातत्याने गती मिळत आहे, त्यामुळे अमेरिकेसारख्या पाश्चात्य देशांना चिंता वाटणे स्वाभाविक आहे. कम्युनिस्ट प्रभावापासून या प्रदेशाचे रक्षण करण्यासाठी SEATO आणि कोलंबो योजनेसारख्या संस्था तयार केल्या गेल्या आहेत आणि जपानला अमेरिकेच्या लष्करी सामर्थ्याचा आधार बनवण्यात आला आहे. परंतु पूर्व आणि आग्नेय आशियातील अनेक देश आंतरराष्ट्रीय आघाडयांमध्ये तटस्थ राहण्याच्या धोरणाचे समर्थक आहेत आणि त्यांनी या आघाडयांपासून दूर राहण्यातच आपले हित मानले आहे.

६) दुसऱ्या महायुद्धानंतर स्वातंत्र्य मिळालेल्या पूर्व आणि आग्नेय आशियातील देशांमध्ये धर्म, वंश, भाषा इत्यादींवर आधारित अल्पसंख्याक जातींच्या अनेक समस्या आहेत. इंडोनेशिया, मलेशिया, बर्मा इत्यादी देशांमध्ये चिनी लोक मोठया संख्येने स्थायिक आहेत. सिंगापूर, थायलंड, ब्रह्मदेश इत्यादी देशांतही अनिवासी भारतीयांची संख्या कमी नाही. ही राष्ट्रे परकीय राजवटीत असताना त्यांच्यात राष्ट्रीय भावनेचा विकास होऊ शकला नाही. या स्थितीत खूप सारे चिनी आणि भारतीय व्यापारी, मजुरी वगैरे करून उदरनिर्वाहासाठी तेथे गेले व तेथेच स्थायिक झाले. भारतीय आणि ब्रिटीश साम्राज्यातील इतर देशांतील लोकही ग्रेट ब्रिटनच्या अधिपत्याखाली असलेल्या राष्ट्रांमध्ये मोठया संख्येने सरकारी नोकऱ्यांवर गेले आणि तेथे राहू लागले. अनेकांनी तेथे जमिनी व मालमत्ताही विकत घेतल्या आणि तेथील कायमचे रहिवासी जंगलात गेले. मोठया संख्येने परदेशी लोकांच्या उपस्थितीमुळे या राष्ट्रांतील लोकांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेची भावना सहज विकसित होऊ शकत नाही. मलेशियामध्ये राहणाऱ्या भारतीयांना मलायनांपेक्षा भारतातील रहिवासी अधिक जवळचे वाटतात. हीच गोष्ट चिनी लोकांबद्दलही म्हणता येईल. या वस्तुस्थितीमुळे या देशांच्या राजकारणात एक अतिशय महत्त्वाची समस्या निर्माण झाली आहे. तिथे आलेल्या सर्व परदेशी लोकांना तिथले नागरिकत्व मिळायला हवे आणि भाषा, संस्कृतीच्या दृष्टिकोनातून हळूहळू तिथले नागरिक बनले पाहिजेत. तिथल्या परदेशी लोकांमुळे आणखी एक समस्या उद्भवते. दक्षिण-पूर्व आशियातील विविध राष्ट्रांत स्थायिक झालेल्या चिनी लोकांचा चीनशी जवळचा संबंध आहे. चिनी कम्युनिस्टांशी असलेल्या संपर्कामुळे या प्रवासी चिनी लोकांमध्ये साम्यवाद सतत जोर धरत आहे आणि त्यांच्याद्वारे इतर लोकही बळावतात. या विचारसरणीच्या प्रभावाखाली येणे साम्यवादाच्या विरोधकांना आवडत नाही.त्यामुळे गेल्या काही वर्षांत चिनी लोकांना या राष्ट्रांत राहता येणार नाही, त्यांना त्यांच्या मूळ देशात परत जाण्यास भाग पाडले जावे, असे प्रयत्नही गेल्या काही वर्षांत सुरू आहेत. इंडोनेशियन सरकारनेही असे काही कायदे स्वीकारले आहेत.ज्यामुळे आता चिनी लोकांना ग्रामीण भागात व्यवसाय करणे शक्य होणार नाही. राहिले आहे आणि अनेक चिनी लोकांना त्यांच्या देशात परतावे लागले आहे.

७) पूर्व आणि आग्नेय आशियातील देशांमध्ये, जिथे परदेशी चिनी आणि भारतीयांची समस्या आहे, तिथे अल्पसंख्याक जातींची समस्या कमी महत्त्वाची नाही. या देशांच्या सध्याच्या सीमा केवळ हॉलंड किंवा ब्रिटनसारख्या पाश्चिमात्य देशांनी एका नियमाखाली आणलेल्या प्रदेश आणि बेटे स्वातंत्र्यानंतर स्वतंत्र सरकारच्या अधिपत्याखाली आल्यावर आधारित आहेत. 'इंडोनेशियाचे प्रजासत्ताक' हे आग्नेय आशियातील हजारो लहान-मोठया बेटांपासून तयार झाले जे पूर्वी हॉलंडच्या अधिपत्याखाली होते. पण या सर्व बेटांचे रहिवासी भाषा, ऐतिहासिक परंपरा आणि संस्कृती इत्यादी बाबतीत एकसारखे नाहीत. त्यांच्यामध्ये

राष्ट्रीय एकात्मतेची भावना फारशी विकसित झालेली नाही. त्यामुळेच स्वराष्ट्राच्या इतक्या वर्षानंतरही तेथे सुसंघटित सरकार स्थापन होऊ शकले नाही. सुमात्रासारख्या अनेक बेटांवर वेळोवेळी बंडखोरी झाली आहे. ब्रह्मदेशातही कॅरन लोक प्रदीर्घ काळापासून बंड करत आहेत. इतर अनेक अल्पसंख्याक जातीही तेथे आहेत, ज्या बर्मापासून वेगळे होऊन आपले स्वतंत्र राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न करीत आहेत. या प्रवृत्तींचा परिणाम असा आहे की दक्षिण-पूर्व आशियातील अनेक देशांमध्ये स्थिर आणि सुव्यवस्थित प्रशासन अद्याप स्थापित झालेले नाही. राजकीय पक्ष आणि लष्करी नेत्यांची कटकारस्थाने तिथे अनेकदा घडतात आणि पाश्चात्य पद्धतीची लोकशाही तिथे यशस्वी होत नाही.

८) पूर्व आणि दक्षिण-पूर्व आशियातील देश देखील आंतरराष्ट्रीय संघर्षाचे क्षेत्र राहिले आहेत. जगातील विविध राज्ये सध्या दोन गटांमध्ये (कम्युनिस्ट आणि अँटी-कम्युनिस्ट) विभागली गेली आहेत. ते विभागले गेले आहेत आणि हे दोन्ही गट आशियातील या वैविध्यपूर्ण देशांना त्यांच्या संघर्षाचे क्षेत्र मानतात. या वेळी पूर्व आशियामध्ये, जपान मुख्यतः अमेरिकेच्या गटाच्या प्रभावाखाली आहे. दक्षिण कोरिया, दक्षिण व्हिएतनाम, थायलंड आणि फिलिपाइन्सबद्दलही असेच म्हणता येईल. याउलट, उत्तर कोरिया आणि नॉर्दर्न लाइटनिंग कम्युनिस्ट गटात सामील झाले आहेत. उत्तरेकडील प्रदेशातही कम्युनिस्ट बंडखोरी झाली आहे आणि त्यातील काही प्रदेश कम्युनिस्टांच्या ताब्यातही गेले आहेत. इंडोनेशिया, वर्मा इत्यादी काही देश आंतरराष्ट्रीय आघाडयांमध्ये तटस्थतेचे धोरण अवलंबत आहेत. पण ते या धोरणाला फार काळ चिकटून राहू शकतील, असे ठामपणे सांगता येत नाही. पंचगीतांची तत्त्वे खरोखरच चांगली आहेत, पण साम्यवाद हे अशा सभ्यतेचे, संस्कृतीचे, सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेचे आणि आर्थिक लोकशाहीचे प्रतीक आहे, ज्याला जुन्या शैलीतील भांडवलशाही आणि लोकशाही व्यवस्थेशी विरोध आणि संघर्ष करणे बंधनकारक आहे. या स्थितीत कोणत्याही देशाला पूर्ण तटस्थतेचे धोरण अवलंबणे सोपे नाही.

९) पंचशीलची तत्त्वे, जी भारत आणि चीन यांच्या नेतृत्वाखाली पूर्व आणि दक्षिण-पूर्व आशियातील अनेक देशांनी मांडली होती आणि ज्यांना आशिया आणि आफ्रिकेतील जवळपास सर्व देशांनी काही बदलांसह पाठिंबा दिला होता. आता अंमलबजावणी करण्यास सक्षम होण्यात हलगर्जीपणा करत आहे. याचे प्रमुख कारण भारत आणि चीनमधील सीमा विवाद हे आहे. तिबेटवर चीनच्या प्रस्थापित राष्ट्रामुळे आता चीन प्रजासत्ताकची दक्षिण सीमा भारताला लागून आहे. ज्ञान-विज्ञानाच्या सुविकसित साधनांमुळे आणि वाहतुकीच्या साधनांमुळे आता हिमालयातील विस्तीर्ण आणि दुर्गम प्रदेश फार काळ निर्जन राहू शकत नाहीत. खनिजांच्या उपलब्धतेच्या शक्यतेमुळे, आता त्यांच्या प्रार्थनेचे महत्त्व दुर्लक्षित केले जाऊ शकत नाही. लडाख इत्यादी प्रदेश जे आतापर्यंत जवळजवळ निर्जन होते आणि ज्यांना राजकीय आणि आर्थिक दृष्टिकोनातून विशेष महत्त्व नव्हते, त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे भारताला आता शक्य नाही.

१९५८ पर्यंत चीन आणि भारताचे घनिष्ठ मंत्रिस्तरीय संबंध होते. हजारो वर्षे एकमेकांचे शेजारी असूनही कधीही युद्धाची गरज भासली नाही आणि भविष्यातही अशा कारणांची कल्पनाही करता येणार नाही, असे दोन्ही देशांच्या बाजूने जाहीर करण्यात आले. भारत आणि चीनचे हे मंत्रालय शाश्वत आहे. भिन्न विचारसरणी आणि समाजव्यवस्थेचे अनुसरण



munotes.in

करणारे देशही सहअस्तित्वाच्या तत्त्वानुसार एकमेकांशी कसे मैत्रीपूर्ण संबंध ठेवू शकतात, याची ही दोन देश उदाहरणे आहेत. परंतु १९५६ पासून या स्थितीत बदल झाला आहे. सीमावादामुळे भारत आणि चीन यांच्यातील संबंध खूपच बिघडले आहेत. चीन लडाखचा अक्साई चिन प्रदेश आणि भूतानच्या पूर्वीच्या नॉर्थ ईस्टर्न फ्रंटियर एजन्सीचा भाग म्हणून दावा करतो आणि यावरील भारताचे वर्चस्व ब्रिटिश साम्राज्यवादाचा परिणाम मानतो. तिबेट आणि सिंकियांग यांना जोडणाऱ्या अक्साई चिनमध्येही त्यांनी रस्ता बांधला आहे. भारत याला चीनच्या विस्तारवादी प्रवृत्तीचा परिणाम म्हणतो आणि चीनने हा प्रदेश रिकामा करावा अशी त्यांची मागणी आहे. हा प्रश्न सोडवण्यासाठी पंडित जवाहरलाल नेहरू आणि चौ-एन-लाय यांनी कितीही प्रयत्न केले तरी ते यशस्वी होऊ शकले नाहीत. या वादामुळे चीन आणि भारत यांच्या संबंधात कमालीची कटुता आली असून पंचशील तत्त्वांचे महत्त्व कमी झाले आहे. पूर्व आणि दक्षिण-पूर्व आशियातील अनेक देशांमध्ये आता उजव्या विचारसरणीच्या पक्षांना स्थान मिळू लागले आहे आणि समाजवादाच्या वाढत्या शक्तीला मोठा धक्का बसला आहे.

१०) दक्षिण-पूर्व आशिया करार संघटनेला आता विशेष महत्त्व राहिलेले नाही. दक्षिण-पूर्व आशियातील विविध राष्ट्रांचे साम्यवादापासून संरक्षण करण्याच्या उद्देशाने ही संघटना तयार करण्यात आली होती. पण आता कम्युनिस्ट गटात एकी उरलेली नाही. चीन आणि रशिया यांच्यातील वैमनस्य खूप वाढले असून ते एकमेकांना आपला शत्रू मानू लागले आहेत. विचारधारेच्या एकतेच्या आधारे राष्ट्रांमध्ये मैत्रीचे संबंध दृढ राहिलेले नाहीत. आता कम्युनिस्ट देशही विचारधारेपेक्षा आपापल्या राष्ट्रीय हिताला अधिक महत्त्व देऊ लागले आहेत आणि याच आधारावर ते इतर राष्ट्रांशी करार करायला तयार आहेत. कारण भारत आणि चीन यांच्यातील सीमा विवाद संपुष्टात आलेला नाही, त्यामुळे भारताच्या विरोधात चीन इस्लामिक प्रजासत्ताक असलेल्या आणि जिथे लोकशाही अद्याप प्रस्थापित नाही अशा पाकिस्तानसारख्या राष्ट्राशी मैत्री घट्ट करण्यास तयार आहे. . पाकिस्तान जरी कम्युनिझमला विरोध करण्यासाठी निर्माण झालेल्या SEATO आणि CENTO सारख्या आंतरराष्ट्रीय संघटनांचा सदस्य आहे, परंतु यामुळे चीन आणि पाकिस्तानच्या मंत्र्याला अडथळा येत नाही. चीनच्या विरोधामुळे भारत साम्यवादी व्यवस्थेचा अनुयायी नसला तरी रशिया भारतासोबतचे मंत्री संबंध वाढवण्यास उत्सुक आहे. १९७१-७२ मध्ये अमेरिकेसारख्या मोठया भांडवलशाही राष्ट्रानेही चीनकडे मंत्रिपदाचा हात पुढे केला होता, त्याचे प्रमुख कारण हे त्याचे राष्ट्रीय हित होते. जपान आणि चीन हे गेल्या शतकापासून एकमेकांचे शत्रू आहेत, पण आता ते आपले संबंध मंत्री बनवण्याचा प्रयत्न करत आहेत, कारण जपानला चीनशी व्यापार वाढवण्यात रस आहे. विचारसरणीचा संघर्ष आणि राष्ट्रीय स्वातंत्र्याची स्थापना हे दोन मुख्य घटक होते ज्यांनी दुसऱ्या महायुद्धानंतर पूर्व आणि दक्षिण-पूर्व आशियाचे आंतरराष्ट्रीय राजकारण निश्चित केले. परंतु आता त्यांची जागा विविध राष्ट्रांच्या राष्ट्रीय हितांनी घेतली आहे आणि केवळ या घटकाच्या आधारे ही राष्ट्रे परदेशांशी करार करण्यास तयार आहेत. पूर्व आणि दक्षिण-पूर्व आशियातील विविध राष्ट्रांनी अशा संघटना एकत्र बांधण्यास सुरुवात केली आहे, ज्याचा उद्देश परस्पर सहकार्याने प्रगती करणे हा आहे. अशी एक संघटना ऑगस्ट १९६७ मध्ये इंडोनेशिया, थायलंड, मलेशिया आणि फिलीपिन्स यांनी स्थापन केली, ज्याला दक्षिण-पूर्व आशियाई राष्ट्रांची संघटना (ASEAN) म्हणतात. दक्षिण-पूर्व आशिया करार संघटनेच्या कार्यात

हलगर्जीपणामुळे, प्रदेशातील काही राष्ट्रांनी मातृभूमीच्या सुरक्षेच्या उद्देशाने एप्रिल, १९७१ मध्ये दक्षिण-पूर्व आशिया सुरक्षा संघटना स्थापन केली, ज्यामध्ये मलेशिया, सिंगापूर, ऑस्ट्रेलिया, ब्रिटन आणि न्यूझीलंड. बाह्य आक्रमणापासून मलेशिया आणि सिंगापूरचे रक्षण करण्यात त्यांना मदत करणे हा त्याचा उद्देश आहे.

## १०.७ सारांश

आशिया खंडातील विविध देश अज्ञान आणि अज्ञानाच्या अंधारात बुडाले होते तेव्हापासून पूर्व आणि दक्षिण-पूर्व आशियाचा हा आधुनिक इतिहास आपण सुरू केला आहे. धार्मिक सुधारणा, शिक्षणाचे पुनर्जागरण, व्यावसायिक क्रांती इत्यादींमुळे युरोपातील देशांत ज्या प्रकारे नवयुग सुरू होत होते, त्याची चिन्हे आशियामध्ये अद्याप दिसली नव्हती. १९व्या शतकाच्या मध्यात, जेव्हा पश्चिम युरोपातील विविध देशांमध्ये मोठे यांत्रिक कारखाने सुरू होऊ लागले, तेव्हा रेल्वेमार्गांच्या उभारणीमुळे विविध देश एकमेकांच्या जवळ आले आणि भारतातून वाफेवर चालणारी जहाजे समुद्रात मुक्तपणे प्रवास करू लागली. त्यावेळी आशियातील विविध देशांनी मध्ययुगीन परिस्थितीच्या पलीकडे प्रगती केलेली नव्हती. सर्वत्र राजांचे निरंकुश शासन होते, लोक लोकशाही आणि राष्ट्रवादाच्या प्रवृत्तींशी पूर्णपणे अपरिचित होते आणि आधुनिक ज्ञान आणि विज्ञान कोठेही विकसित झाले नव्हते. खरे तर प्रगतीच्या शर्यतीत आशिया खूप मागे राहिला होता.

या परिस्थितीत पाश्चिमात्य देश आशिया खंडात आपला साम्राज्यवाद सहज विस्तारू शकतील हे अगदी स्वाभाविक होते. ग्रेट ब्रिटन, फ्रान्स, स्पेन, हॉलंड, पोर्तुगाल इत्यादी युरोपीय देशांनी या परिस्थितीचा पुरेपूर उपयोग करून आशिया खंडाचा मोठा भूभाग आपल्या ताब्यात आणला. ज्या देशांना ते आपल्या राजकीय नियंत्रणाखाली आणू शकले नाहीत, त्यांनी तेथे आपले आर्थिक साम्राज्यही विकसित केले आणि काही काळ चीनसारखे देशही युरोपचे अधीन झाले. या स्थितीत, अनेक विचारवंतांनी असे प्रतिपादन करण्यास सुरुवात केली की पाश्चिमात्य लोक आशियाई लोकांपेक्षा वंश आणि जातीच्या बाबतीत श्रेष्ठ आहेत आणि आशिया आणि आफ्रिकेतील लोकांवर राज्य करण्याची जबाबदारी देवाने त्यांच्यावर सोपविली आहे आणि तेथील रहिवाशांनी त्यांचे स्वतःचे हित समजून घेतले पाहिजे.

परंतु युरोपातील लोकांचा उदय हा तात्पुरता होता, अशी या विचारवंतांची खात्री होती. इतिहासात अनेक शतके आशियाई लोक ज्ञान-विज्ञान, धर्म आणि सभ्यता या क्षेत्रात युरोपपेक्षा अधिक प्रगत होते आणि त्यामुळेच ते आपली सभ्यता जगाच्या मोठया भागात पसरवू शकले. राजकीय दृष्टिकोनातून अनेक वेळा आशियाई लोकांनी युरोपचा चांगला भाग आपल्या ताब्यात ठेवण्यात यश मिळवले होते. एकोणिसाव्या शतकात युरोपीय लोक आशियामध्ये आपले वर्चस्व प्रस्थापित करू शकले याचे कारण पाश्चात्य लोक आशियाई लोकांपेक्षा श्रेष्ठ होते असे नाही. याचे एकमेव कारण म्हणजे उत्तर-आधुनिक युगात ज्ञान आणि विज्ञानाची विलक्षण प्रगती युरोपमध्ये सुरू झाली.

munotes.in

## १०.८ प्रश्न

१. ASEAN काय सांगून विस्तृत माहिती द्या.

२. SEATO म्हणजे काय?

३. NATO म्हणजे काय?

४. टीप लिहा- बाडुंग परिषद.

५. दुसऱ्या महायुद्धा नंतरचे आशियाई देशातील बदल विस्तृत लिहा.

## १०.९ संदर्भ

1. कदम, य. ना., 'समकालीन आधुनिक जग (१९४५-२०००), फडके प्रकाशन कोल्हापूर. २००१.

2. कोलारकर, श. गो आधुनिक जग (इ.स. १८६९ ते १९६५) श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९५.

3. काळे, अनिल, आधुनिक जगाचा इतिहास (१५००-२०००), के. सागर पब्लिकेशन, पुणे.

4. Carr, E. H., International Relations between the two World Wars,

5. Cornwell, R. D., World History in the Twentieth Century, Longmans, Gordon, 1969.

6. Croff, Richard, Moses, Walfer, Terry Janice, Jiu-Hwa Upshur, The Twentieth Century: A Brief Global History, Moses, Walfer, John Wiley and Sons, New York,1983.

❖❖❖❖

munotes.in

# ११

## अरब-इस्त्राईल संघर्ष

**घटक रचना :**

११.० उद्दिष्टे

११.१ प्रस्तावना

११.२ इस्त्राईलच्या उदयाची पार्श्वभूमी

११.३ अरब राष्ट्रवाद

११.४ इस्त्राइलची निर्मिती

११.५ अरब-इस्त्राईल संघर्ष

११.६ समारोप

११.७ प्रश्न

११.८ संदर्भ

### ११.० उद्दिष्टे

१. इस्त्राइलच्या उदयाची पार्श्वभूमी अभ्यासणे.

२. अरब राष्ट्रावादाचा इतिहास समजून घेणे.

३. अरब-इस्त्राईल संघर्षाची कारणमिमांसा अभ्यासणे.

### ११.१ प्रस्तावना

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धाच्या अखेरीस पॅलेस्टाईनमध्ये इस्त्राईल या ज्यूंसाठी स्वतंत्र राष्ट्राची केलेली निर्मिती हे पश्चिम आशियातील महत्वाचे वैशिष्टये व इतिहासातील एक आश्चर्य मानले जाते. झिओनीस्ट चळवळीमुळे स्वतंत्र इस्त्राईलची निर्मिती झाली. झिऑन पॅलेस्टाईनमधील एक टेकडी असून तेथे ज्यूंच्या देवतेचे वास्तव्य असे. ही पवित्र भूमी परत मिळवण्यासाठी इसवी सन १०९६ ते १२७० या काळात धर्मयुद्धे झाली. पुढे हा संघर्ष चालू राहिला आपली भूमि परत मिळवण्यासाठी ज्यू लोकांनी जो लढा दिला, जी चळवळ उभारली त्या चळवळीला झिओनीस्ट चळवळ असे म्हणतात. शेकडो वर्षापासून ज्यूंवर अनन्वित अत्याचार होत होते, त्यासाठी त्यांनी वेगवेगळ्या देशात वास्तव्यास असलेल्या ज्यूंना संघटीत करून आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्यासाठी झिओनिस्ट चळवळीच्या माध्यमातून प्रयत्न झाले. अखेरीस दुसऱ्या महायुद्धानंतर युनोच्या माध्यमातून



munotes.in

अमेरिकेने स्वतंत्र इस्त्राइलच्या निर्मितीला मान्यता दिली आणि एक स्वतंत्र देश म्हणून इस्त्राइलचा उदय झाला. इस्त्राइलच्या निर्मितीला मोठी पार्श्वभूमी आहे. त्याचा अभ्यास या पाठाच्या माध्यमातून अभ्यासला जाईल.

## ११.२ इस्त्राइलच्या उदयाची पार्श्वभूमी

ज्यूंच्या अत्याचाराची सुरुवात इ.स. ४ थ्या शतकापासून सुरु झाल्याचे दिसून येते. सॉल नावाच्या ज्यू व्यक्तीने ज्यूंना येशूचे खुनी ठरवले होते. त्यामुळे चौथ्या शतकापासून जगाच्या वेगवेगळ्या देशात ज्युंचा छळ सुरु होता. रशिया, इंग्लंड, स्पेन, जर्मनी इत्यादी देशात ज्यूंचा अनन्वित छळ झाला होता. रशियात अनुक्रमे १/३ ज्यूंना ठार मारण्याचा, हाकलून देण्याचा व आपल्या समाजात मिसळून घेण्याचा आदेशच काढला होता. इंग्लंडचा राजा तिसरा हेन्रीने आपल्या देशातील शेकडो ज्यूंना हाकलून लावले होते, स्पेनमधील कॅथलिक राणी इसाबेला यांनी ज्यूंवर प्रचंड अत्याचार केले. त्यामुळे अनेक ज्यूंना स्थलांतरित व्हावे लागले. त्यामुळे ज्यूंनी विविध देशांचा आश्रय घेतला. पुढे १९ व्या शतकात जर्मनीच्या बिस्मार्कने 'रक्त व लोहनीतीचा' वापर करून ज्यूंवर प्रचंड अत्याचार केले होते.

ऑस्ट्रेलियातही त्यांच्या कत्तली झाल्या होत्या. इ.स.१७९९ मध्ये ज्यूंना पॅलेस्टाईनमध्ये वसाहत करून द्यावी असा विचार नेपोलियन बोनापार्टने प्रथम मांडला होता, दुर्दैवाने त्याचा वॉटर्लूच्या युद्धात संपूर्ण पराभव झाल्यामुळे त्याच्या विचाराची अंमलबजावणी झाली नाही. त्यानंतर लाबेल मेंकन या फ्रेंच युवतीने हाच विचार पुढे नेऊन ज्यूंनी पॅलेस्टाईनमध्ये स्वतंत्र राज्य निर्माण करण्यासंबंधी सुतोवाच केले होते. त्याचप्रमाणे जर्मनीतील मोजेस यांनीसुद्धा त्यासाठी पाठपुरावा केला होता. पुढे थिओडर हर्झल याने 'ज्यू राज्य' या पुस्तकाच्या माध्यमातून ज्यूंच्या स्वतंत्र राज्याच्या मागणीची मुहूर्तमेढ रोऊन त्याला संघटीत चळवळीचे स्वरूप दिले. त्यांच्याच नेतृत्वाखाली इ.स.१८९७ मध्ये झिओनिस्ट कॉंग्रेसची स्थापना झाली होती. १९व्या शतकाच्या अखेरीस रशियातील लीऑन पिन्स्कर याने अशी कल्पना मांडली की, ज्यू लोकांना पॅलेस्टाईनमध्ये राष्ट्रीय भूमी मिळावी. पॅलेस्टाईन ही राष्ट्रीय भूमी व्हावी यासाठी झिओनिस्ट चळवळ सुरु झाली. या चळवळीच्या माध्यमातून जगातील वेगवेगळ्या देशामध्ये ज्युंवर होणाऱ्या अत्याचाराला थांबविण्यासाठी व त्यांच्या कायमच्या वस्तीसाठी पॅलेस्टाईनच्या दक्षिणेकडे असलेला एल ऑरीश नावाचा डोंगराळ प्रदेश सुचविण्यात आला, परंतु पाण्याच्या प्रश्नामुळे तो प्रस्ताव नाकारण्यात आला. थिओडर हर्झल यांनी आफ्रिकेतील दुसरा प्रदेश घेण्याची सूचना केली होती, परंतु तीसुद्धा ज्यूंना मान्य झाली नव्हती. थिओडर हर्झल यांच्या मृत्युनंतर या चळवळीचे नेतृत्व डॉ. वाईझमन यांनी केले. इ.स. १९०४ मध्ये डॉ. वाईझमन यांचे कुशल नेतृत्व या चळवळीला मिळाल्यामुळे झिओनिस्ट चळवळीचा जोर वाढला होता. त्यांनी ज्यूंना वेगळे राजकीय अस्तित्व आणि राजकीय स्वतंत्र असावे अशी मागणी केली होती. त्यापूर्वी भटक्या टोळ्यांच्या हल्ल्याने ज्यू लोक युरोपात वेगवेगळ्या देशात विखुरले गेले होते. या सर्व विखरलेल्या ज्यूंना एकत्रित करून स्वतंत्र इस्त्राइलच्या निर्मितीस सुरुवात झाली या निर्मितीची प्रक्रिया विविध टप्प्यात झाली. त्याचा आढावा या घटकात घेणे महत्त्वाचे आहे.

इस्त्राइलच्या निर्मितीत महत्वाची भूमिका बजावणाऱ्या झिओनिष्ट चळवळीला झिओनी या पॅलेस्टाईन मधील झिऑन एका टेकडीच्या नावावरून हे नाव पडले. या टेकडीवर 'येहोवा'

munotes.in

या ज्यूंच्या देवतेचे वास्तव्य असल्याची ज्यूंची धारणा होती. त्यामुळे ती पवित्रभूमी परत मिळविण्यासाठी अरब आणि ज्यू यांच्यामध्ये १०९६ ते १२७० या काळात अनेक क्रुसेडस म्हणजे धर्मयुद्धे झाली होती. अरब आणि ज्यू यांच्यातील संघर्ष चालूच राहिला त्यातून ज्यूंनी आपली पवित्रभूमी परत मिळविण्यासाठी जो लढा दिला त्याला पुढे चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले त्या चळवळीला झिओनिष्ट चळवळ असे म्हणतात.

**इस्त्रायलच्या निर्मितीतील वेगवेगळे टप्पे:**

इस्त्राइलची निर्मिती ही अचानक झालेली नसून त्यासाठी ज्यूंना मोठा संघर्ष करावा लागलेला होता. या संघर्षाचे वेगवेगळे टप्पे पुढीलप्रमाणे आहेत.

**बाल्फोर घोषणा**: पहिले महायुद्ध १९१४ मध्ये सुरू झाले. या महायुद्धाच्या काळात जर्मनी व तुर्कस्थान यांच्याकडून इंग्लंड-फ्रांस या दोस्त राष्ट्रांचा पराभव होत होता, या संकटाच्या काळात जर्मनी – तुर्कस्थान यांच्या विरोधात पॅलेस्टाईन व जगातील सर्व ज्यूंचा पाठींबा मिळविण्यासाठी इंग्लंडचे परराष्ट्रमंत्री लॉर्ड बाल्फोर यांनी २ नोव्हेंबर १९१७ रोजी एक महत्वपूर्ण घोषणा केली होती. त्यामध्ये इंग्लंडने ज्यूंचे नेते रॅसचाइल्ड यांना एक आश्वासन दिले की, 'ज्यूंसाठी पॅलेस्टाईनमध्ये राष्ट्रीय वस्तीस्थान मिळवून दिले जाईल'. यालाच बाल्फोर घोषणा म्हणतात. या घोषणेने जगभरातील ज्यूंच्या आशा पल्लवित झाल्या की, भविष्यात पॅलेस्टाईनमध्ये आपले स्वतंत्र राष्ट्र निर्माण होईल. त्यामुळे त्यांनी पहिल्या महायुद्धात जर्मनी विरोधात इंग्लंड-फ्रांसला भरीव आर्थिक मदत व सहाय्य केले. युद्ध समाप्तीनंतर भरलेल्या शांतता परिषदेत पराभूत राष्ट्राच्या ताब्यातील प्रदेशाची व्यवस्था पाहण्यासाठी राष्ट्रसंघाने **मॅन्डेट** पद्धती अंमलात आणली होती. परिणामी अरब प्रदेशाची व्यवस्था व नियंत्रण इंग्लंड-फ्रांस यांचेकडे आले होते. त्यापैकी पॅलेस्टाईनवर इंग्लंडचा मॅन्डेट प्रदेश [विश्वस्त प्रदेश] म्हणून प्रभुत्व निर्माण झाले आणि या प्रदेशावर देखरेख ठेवण्यासाठी इंग्लंडने हरबर्ट सैम्यूएल याची हायकमिशनर म्हणून नियुक्ती केली होती. पॅलेस्टाईनच्या प्रदेशात ज्यूंची संघटनात्मक शक्ती वाढत असल्याचे इंग्लडच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी ज्यूंचे खच्चीकरण करण्यासाठी पॅलेस्टाईनचे विभाजन करून जॉर्डन या नवीन देशाची निर्मिती केली. त्यामुळे ब्रिटीशांची ही कृती ज्यूंच्या राष्ट्रवादाला मारक ठरल्यामुळे त्यांच्यातील संघर्ष वाढीस लागला. या संघर्षामुळे ब्रिटीशांनी बाल्फोर घोषणा बदलली व अरबांना झुकते माप दिले. कारण ब्रिटीशांचे अरब प्रदेशात तेलाच्या उद्योगात हितसंबंध गुंतले होते. याचा परिणाम अरब-ज्यू , ज्यू-इंग्रज यांच्यातील संघर्ष वाढत गेला.

**विन्स्टन चर्चिल यांची श्वेतपत्रिका**: ज्यू-अरब यांच्यातील वाढत्या हिंसाचारामुळे जुलै १९२२ मध्ये इंग्लंडचे तत्कालीन पंतप्रधान विस्टन चर्चिल यांनी एक श्वेतपत्रिका प्रसिद्ध केली. या श्वेतपत्रिकेनुसार ज्यूंना संपूर्ण पॅलेस्टाईन न देता ज्यूंच्या स्वतंत्र राज्यातील जनता पॅलेस्टाईन म्हणून ओळखली जाईल. डॉ. वाईझमनने विविध देशातील ज्यूंकडून देणगी जमा केल्याने १९२० नंतर पॅलेस्टाईनमध्ये जमीन खरेदीचे प्रमाण वाढले. शेती क्षेत्रात औद्योगिक प्रगतीबरोबरच शैक्षणिकप्रगती केली. मात्र अरबांचा ज्यूद्वेष वाढला. तसेच ज्यूंचे मोठे स्थलांतर येथे होत असल्यामुळे पॅलेस्टाईनमधील संख्येवर अधिक भर पडू नये यासाठी ब्रिटीशांनी ज्यूंच्या मोठया स्थलांतरावर मर्यादा घातली होती.

**दुसऱ्या महायुद्धापूर्वी जर्मनीमध्ये ज्यूंवर झालेले अत्याचारः**

जर्मनीमध्ये ज्यूंच्या विरोधात मोठा असंतोष पसरवला जात होता. कारण पहिल्या महायुद्धामध्ये जर्मनीच्या पराभवास ज्यू जमातच कारणीभूत होती, असा ठपका त्यांच्यावर ठेवला गेला होता. त्यामुळे जर्मनीमध्ये ज्यू द्वेषाला सुरुवात झाली. हिटलरने सत्तेवर येताच आपले वंशश्रेष्ठत्वाचे धोरण जाहीर करून आर्यवंश हाच जगातील सर्वश्रेष्ठ वंश असून जगातील सर्व आर्यवंशाच्या जनतेचे नेतृत्व जर्मनी करेल. त्यामुळे जर्मनीमध्ये आर्य वंशाखेरीज कुणालाच थारा नव्हता. जर्मनीमध्ये लाखो ज्यूंच्या कत्तली करण्यात येऊन त्यांच्यावर प्रचंड अत्याचार केले जात होते. जर्मनीत हिटलरच्या उदयामुळे ज्यूंवर होणाऱ्या अत्याचारात मोठी भर पडली. जर्मनीतील हिटलरच्या अत्याचाराला कंटाळून सुमारे २.५ लाख ज्यूंनी पॅलेस्टाईनमध्ये स्थलांतर केले. जर्मनीमध्ये हिटलरने ज्युंसाठी खास छळ छावण्या उभारल्या होत्या. त्यामुळे स्थलांतराशिवाय त्यांच्याकडे पर्याय नव्हता. ज्यूंच्या वाढत्या स्थलांतरामुळे अरब-ज्यू संघर्ष वाढत गेला. अरबांनी इस्टिकलाल नावाची संघटना स्थापन केली होती. ग्रँड मुफ्ती हा तिचा नेता होता. या संघटनेला हिटलरने पाठिंबा दिला. १९३६ मध्ये अरबांनी उठाव करून ज्यूंचे मोठे नुकसान केले. त्यामुळे इंग्लंडने ऑर्थर पीलचे शिष्टमंडळ पॅलेस्टाईनमध्ये पाठविले. त्यांनी पॅलेस्टाईनचे तीन तुकडे करण्याचे सुचविले. त्यानुसार जेरुसलेमची भूमी इंग्रजांकडे राहील असे सुचविले. त्यामुळे अरबांनी या योजनेला विरोध केला. दुसरीकडे ज्यूंनी हॅगनाह ही संघटना उभारून सेनापती विंगेटच्या नेतृत्वात गनिमी काव्याने लढा देऊन अरबांना त्रास देण्यास सुरुवात केली.

**झिओनिस्ट चळवळ १९३९-१९४५** : थिओडोर हर्झल यांनी १८९७ मध्ये ज्युबिसाईट शहरात झिओनिष्ट संघटनेची स्थापना केली होती. थिओडोर हा वकील व विचारवंत साहित्यिक होता. संघटनेच्या पहिल्या अधिवेशनातील त्याचे 'पन्नासवर्षात ज्युचे राष्ट्र तुम्हाला दिसेल'. हे भाकीत नंतर खरे ठरले. जगभरातील सर्व ज्यूंना संघटीत करणे हे या संघटनेचे प्रमुख ध्येय होते. ह्याच संघटनेने ज्युंसाठी ठिकठिकाणी लढाऊ तरुणांचे पायोनियर दले उभारली होती. हॅगान या संघटनेने जगातील विविध देशातून गुप्तपणे शस्त्रे पुरवठा करण्याचे काम करीत होती. इ.स. १९३९ मध्ये सुरू झालेल्या दुसऱ्या महायुद्धात ज्यूंनी इंग्रजांना पाठिंबा दिला. परंतु १९३९ च्या लंडन गोलमेज परिषदेमध्ये ज्यूंची घोर निराशा झाली होती. कारण ज्यूंचा मागण्या इंग्रजांनी अमान्य केल्या. त्यामुळे ज्यूंनी आपला लढा तीव्र करण्यासाठी १९४३ मध्ये न्यूयार्क येथे अधिवेशन भरविले. जगभरातील सर्व ज्यू प्रतिनिधी या अधिवेशनाला हजर होते. या अधिवेशनात 'बाल्टिमोर योजना' घोषित करण्यात आली. यानुसार इंग्रजांनी लाधलेले बंधने झुगारणे, ज्यूंची लष्कर निर्मिती करणे व इस्राइल या स्वतंत्र राष्ट्राच्या निर्मितीसाठी अरबांबरोबर संघर्ष करणे अशा तरतुदी या जाहीरनाम्यात होत्या. अमेरिकन राष्ट्राध्यक्ष ट्रुमन यांनी ज्यूंच्या प्रवेशाला परवानगी द्यावी ही सूचनासुद्धा इंग्रजांनी फेटाळली. शेवटी हा प्रश्न युनोकडे गेला. युनोने ३ सप्टेंबर १९४७ रोजी फाळणीचा निर्णय दिला. त्यानुसार ऑगस्ट १९४८ पूर्वी विश्वस्तानी म्हणजे इंग्रजांनी या प्रदेशातून निघून जावे व अरब आणि ज्यूंची दोन स्वतंत्र राज्ये निर्माण व्हावीत असा ठराव पास केला. या ठरावाचे ज्यूंनी स्वागत केले, परंतु अरबांनी मात्र ज्यूंच्या स्वातंत्र्याला विरोध करून त्यासाठी सशस्त्र लढा देण्याची तयारी केली. इंग्रजांनी अरबांना शस्त्रे पुरविली होती. ज्यूंनी आपल्या मातृभूमीसाठी चढाईचे धोरण स्वीकारून अखेरचा लढा देण्याची तयारी केली. शेवटी १४ मे १९४८ रोजी दुपारी ४.०० वा. तेलअवीवच्या नगरपालिकेत

ज्यूंच्या स्वातंत्र्याची घोषणा करण्यात आली. स्वतंत्र इस्राइलची निर्मिती झाली. अमेरिका, रशिया, पोलंडने त्याला मान्यता दिली.

ज्यूंनी जगाच्या वेगवेगळ्या देशात अन्याय, अत्याचार, जुलूम सहन करत त्यांच्या स्वतंत्र अस्तित्वासाठी मोठा संघर्ष केला. त्यांच्या शेकडो वर्षाच्या संघर्षाची परिणिती अखेर इस्रायल या स्वतंत्रराष्ट्राच्या निर्मितीने झाली. इस्राइल या स्वतंत्र राष्ट्राची निर्मिती जरी झाली असली तरी त्यांचा संघर्ष अजून संपलेला नाही. अरबांनी त्यांच्या स्वातंत्र्याला स्वीकारलेच नाही त्यामुळे वर्तमानातसुद्धा अरब- इस्रायल संघर्ष संपलेला नाही. इतिहासाच्या अभ्यासक आणि संशोधक डॉ. सुमन वैद्य म्हणतात, 'पॅलेस्टाईनमध्ये निर्माण करण्यात आलेले ज्यूंचे स्वतंत्र राष्ट्र म्हणजे साम्राज्यवादी डावपेचांना आलेले फळ होते'. अमेरिकेच्या मदतीने स्वतंत्र इस्रायलची निर्मिती झाली. तेव्हापासून ते आजतागायत अमेरिकेने इस्रायलला मदत केली आहे. म्हणूनच मध्य आशियात आजूबाजूला अरब राष्ट्रे व मध्येच इस्राइल हे एकमेव ज्यू लोकांचे राष्ट्र असताना इस्राइलने आपले स्वतंत्र अस्तित्व व स्वातंत्र्य टिकून ठेवले आहे. दर वर्षी १४ मे हा इस्रायलचा स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा केला जातो तो नेहमीच ज्यूंना (येहुदींना) प्रज्वलित करणारा व प्रेरणा देणारा आहे.

## ११.३ अरब राष्ट्रवादाचा उदय

तुर्की साम्राज्यात मोडणारा अरब प्रदेश ऑटोमन साम्राज्याच्या कोसळत्या डोलाऱ्यास सावरण्यासाठी तेथील सुलातानाने इंग्लंड, फ्रांस इ. राष्ट्रांकडून कर्ज घेतले. कर्जाच्या मोबदल्यात अनेक सवलती या राष्ट्रांना देण्यात आल्या. युरोपियन राष्ट्रांचा हस्तक्षेप सर्वच स्तरात होऊ लागला. त्यांचा हस्तक्षेप रोखण्यासाठी सार्वत्रिक अरबवाद (Pan-Arabism) या कल्पनेने जोर धरला. इ.स. १९४५ मध्ये विनाशकारी असलेल्या जागतिक दुसऱ्या महायुद्धाची समाप्ती झाली. या महायुद्धाच्या समाप्तीनंतर आशिया व आफ्रिका खंडातील अनेक छोटे मोठे देश स्वतंत्र झाले. याचे मुख्य कारण म्हणजे वेगवेगळ्या देशात उदयास आलेला राष्ट्रवाद होय. राष्ट्रवादाच्या भावनेने पेटलेल्या व पारतंत्र्यात असलेल्या अनेक देशांनी त्यांच्या देशाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी चळवळी सुरु केल्या होत्या. दुसऱ्या महायुद्ध काळात त्याला गती मिळाली आणि दुसरे महायुद्ध संपताच त्यांनी आपल्या देशाच्या स्वातंत्र्याची मागणी तीव्रतेने केली होती. पश्चिम आशियातसुद्धा अरब राष्ट्रवादाचा उदय होऊन सर्व अरबराष्ट्रांमध्ये ऐक्य स्थापन करण्याचे धोरण त्यांनी अंगिकारले होते.

त्यासाठी त्यांनी १९४५ मध्ये अरब लीगची स्थापना केली होती. या लीगच्या माध्यमातून पश्चिम आशियातील सर्व अरब राष्ट्रांच्या अंतर्गत आणि परराष्ट्र धोरणात कोणत्याही साम्राज्यवादी राष्ट्रांना ढवळाढवळ करू न देणे तसेच सर्व अरब राष्ट्रांना सक्षम करणे हे अरब लीगचे वैशिष्टये होते. अरबलीगमधील देशांमध्ये धार्मिक साम्य होते. हे देश इस्लाम धर्माचे आचरण करणारे असल्यामुळे त्यांनी एकत्र येऊन एकमेकांना सहकार्य करण्याचे धोरण स्वीकारले होते. अरब लीगमध्ये इराक, इजिप्त, जॉर्डन, सिरीया, सौदी अरेबिया, येमेन, लेबनॉन या देशांचा समावेश होता. अरब राष्ट्र हे खनिज तेलाच्या साठयांकरिता प्रसिद्ध आहेत. त्यामुळे जगातील तेलाचे राजकारण या देशाभोवती फिरते. त्यासाठी जगातील साम्राज्यवादी देशांचे हितसंबंध पश्चिम आशियामध्ये गुंतलेले आहेत. त्याचाच एक

भाग म्हणून शेकडो वर्षापासून चाललेला अरब-इस्त्राइल संघर्ष हा इस्त्राइलच्या निर्मितीनंतर आजपर्यंत संपलेला नाही.

पश्चिम आशियातील तैग्रिस नदीच्या खोऱ्यामध्ये इराक, लेबनॉन, सिरीया, पॅलेस्टाईन, जॉर्डन, इजिप्त, सौदी अरेबिया या देशांचा समावेश होतो. याच भागामध्ये अरब संस्कृतीचा उदय झाला. पश्चिम आशियामध्ये अरब संस्कृती बरोबरच ख्रिश्चन आणि येहुदी या तीन धर्मियांचे वास्तव्य असल्यामुळे या प्रदेशात तीन स्वतंत्र संस्कृती अस्तित्वात आहेत.

अरब राष्ट्रातील देश १९व्या शतकापर्यंत ऑटोमन तुर्की साम्राज्यात समाविष्ट होते. अरबांच्या भूमीला पूर्वीपासून 'अरबस्थान' म्हणत असत. या प्रदेशाच्या भौगोलिक सीमा पुढीलप्रमाणे होत्या. उत्तरेला तुर्कस्थान व इराण, पूर्वेस पर्शियाचे आखात व अरबी समुद्र, दक्षिणेला अरबी समुद्र व आफ्रिकेतील इथोपिया आणि पश्चिमेला लाल समुद्र, सुवेझ कालवा, इजिप्त व भूमध्य समुद्र आहे. अरबस्थानच्या वायव्यवेस पॅलेस्टाईन व इस्त्राइल हे देश आहेत. आफ्रिकेतील इजिप्तचा संबंध पश्चिम आशियातील अरब राजकारणाशी आहे. त्यांनीच अरब-इस्त्राइल संघर्षात अरबांचे नेतृत्व केले होते.

अरबांच्या याच भूमीवर तुर्की सम्राटांच्या अत्याचारी राजवटीमुळे तसेच तुर्कस्थांनमध्ये क्रांती झाल्यामुळे तुर्की साम्राज्यांचा ऱ्हास झाला व या साम्राज्यातील सर्व देश मुक्त झाले. पर्यायाने सर्व अरब राष्ट्रेसुद्धा तुर्कांच्या जोखडातून मुक्त झाली. जागतिक पहिल्या महायुद्धानंतर झालेल्या पॅरिस शांतता परिषदेमध्ये झालेल्या वाटाघाटीनुसार राष्ट्रसंघाने जर्मनी व तुर्कास्थानमधील प्रदेशांवर इंग्लंड-फ्रान्सचे मॅन्डेट सुरु झाले. इंग्लंड-फ्रान्सच्या वर्चस्वाखाली आलेल्या प्रदेशांना परकीयांचा प्रभाव नको होता त्यासाठी त्यांनी स्वातंत्र्यलढयास सुरुवात केली. वेगवेगळ्या अरब राष्ट्रांमध्ये राष्ट्रवादी चळवळी सुरु झाल्या. त्यांची परिणिती म्हणजे सिरीया, लेबेनॉनमधील फ्रान्सचे मॅन्डेट संपुष्टात येऊन १९४३ मध्ये त्यांना स्वातंत्र्य मिळाले. त्याचप्रमाणे अरबस्थानमधील इतर देशसुद्धा दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतंत्र झाले, तरी त्यांना त्यांचे स्वातंत्र्य टिकविण्यासाठी अनेक वर्ष संघर्ष करावा लागला.

## ११.४ इस्त्राइलची निर्मिती

जगभरात विखरलेल्या ज्यू लोकांवर वेगवेगळ्या देशात अन्याय, अत्याचार आणि जुलूम होत होते. जर्मनीमध्ये पहिल्या महायुद्धानंतर ज्यूंच्या विरोधात वातावरण निर्माण झाल्यामुळे त्यांच्यावर अत्याचार होण्यास सुरुवात झाली. कारण पहिल्या महायुद्धात ज्यूंनी जर्मन विरोधी गटाला पाठींबा दिला. त्याचा राग ठेऊन जर्मनीमध्ये त्यांच्या विरोधात असंतोष निर्माण झाला. जर्मनीमध्ये हिटलर सत्तेवर आल्यानंतर ज्यूंवर होणाऱ्या अत्याचाराने परिसीमा गाठली होती. जर्मनीमध्ये लाखो ज्यूंच्या कत्तली होत होत्या. हिटलरच्या अत्याचाराने ज्यू राष्ट्रवादाला खतपाणी घातले. दुसऱ्या महायुद्ध काळात त्यामुळे मोठया प्रमाणात ज्यूंनी आपला जीव वाचविण्यासाठी स्थलांतर केले होते. स्थलांतरीत झालेल्या ज्यूंनी पॅलेस्टाईनमध्ये वास्तव्य केले. जगातील इतर राष्ट्रात स्थायिक असलेल्या ज्यूंनीसुद्धा त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचाराला कंटाळून पॅलेस्टाईनमध्ये स्थलांतर केले होते. जर्मनीत झालेल्या ज्युंवरील अत्याचारामुळे ज्यूंना त्यांची स्वतंत्र मातृभूमी निर्माण

करण्यासाठी झिओनिस्ट चळवळीच्या माध्यमातून आपला लढा उभारला होता. शेवटी **१४ मे १९४८** मध्ये इंग्लंडने पॅलेस्टाईनमधील आपले नियंत्रण समाप्त करून ज्युंसाठी स्वतंत्र राष्ट्र म्हणून **इस्राइलची निर्मिती** केली. राष्ट्राध्यक्षपदी डॉ.वाईझमन तर पंतप्रधान डेव्हिड बेन गुरियन याच्याकडे सोपविण्यात आली. या देशाने संसदीय लोकशाही पद्धतीचा स्वीकार केला होता. [पश्चिम आशियाचा इतिहास (१९००-१९७०) डा.म.वा.काळे] परंतु इस्राइलच्या निर्मितीने अरब-इस्राइल संघर्ष सुटण्याऐवजी जास्त चिघळला गेला. पॅलेस्टाईनने इस्राइलच्या निर्मितीला विरोध केला. अरब- ज्यू हे दोघे ही तुल्यबळ असल्या कारणाने त्यांनी एकमेकांच्या विरोधात सशस्त्र संघर्ष करण्याचे धोरण अंगिकारले होते.

## ११.५ अरब - इस्राइल संघर्ष

इ.स. १९४८ मध्ये इस्राइल या स्वतंत्र राष्ट्राची निर्मिती झाली याला विरोध म्हणून अरब राष्ट्रांनी इस्राइलवर लष्करी आक्रमण करण्याचा निर्णय घेतला. त्यातून अरब-इस्राइल यांच्यामध्ये युद्ध सुरु झाले. सिरीया-जॉर्डन ह्या अरब राष्ट्राने इस्राइलच्या जेरुसलेम शहरावर प्रचंड मोठया प्रमाणात बॉम्बवर्षाव केला. ज्यूंकडे केवळ तीस हजाराचे सैन्य होते, तर अरब राष्ट्रांकडे इस्राइलच्या सैन्यापेक्षा ४० पट जास्त सैन्य होते. अरब राष्ट्रांमध्ये सिरीया, इराक, जॉर्डन, इजिप्त या अरब राष्ट्रांनी संयुक्तपणे इस्राइलवर आक्रमण केले, परंतु ज्यूंनी अत्यंत चिवटपणे आपल्या नवीन मातृभूमीसाठी प्राणपणाने लढा देऊन आपल्या देशाचे संरक्षण केले. इस्राइलने सुरुवातीपासून त्यांना होणाऱ्या विरोधाची पार्श्वभूमी लक्षात घेता प्रचंड शस्त्रसाठा केला होता. इस्राइलकडे आधुनिक शस्त्रास्त्रे होती. या जोरावर त्यांनी अरबांच्या प्रचंड सैन्याचा पराभव केला होता. त्यांनी असीम धैर्याने या आक्रमणाला तोंड दिले. अरबांनी ज्यावेळी तेलअवीव ते जेरुसलेमचा रस्ता रोखून धरला त्यावेळी ज्यूंनी बर्मा रोड नावाचा रस्ता बनवून मार्ग मोकळा केला. आधुनिक शस्त्रांच्या जोरावर ज्यूंनी हे युद्ध जिंकले. या युद्धामुळे पॅलेस्टाईनचा काही भूभाग जॉर्डनच्या अंमलाखाली आला आणि काही भूभाग इस्त्राईलच्या वर्चस्वाखाली गेला. इस्रायल सैनिकांनी अरबांची कत्तले केली. हजारो अरबांना निर्वासितांचे आयुष्य जगावे लागले. युनोने बर्नेडॉट [स्वीडनचे शांतिदूत] यांना शांतीदूत म्हणून पाठवले. त्यांनी एक महिन्यांची युद्धबंदी घडविली. ब्रिटन, फ्रान्स, अमेरिका यासारख्या राष्ट्रांनी इस्त्राईलचे अस्तित्व मान्य केले. त्यामुळे ज्यूंना एक प्रकारचे पाठबळ मिळाले. स्वतंत्र राष्ट्राचे अनेक वर्षाचे स्वप्न इस्रायलच्या रूपाने साकार झाल्याने त्याचे प्रत्येक नागरिकाने प्राणपणाने रक्षण करणे हे ज्यू कर्तव्य मानत होते. या राष्ट्राचा पूर्ण विजय होऊन अरबांना पराभवाची नामुष्की सहन करावी लागली. ज्यूंचे जगभर कौतुक झाले. हे यश जगाला थक्क करून सोडणारे होते. उच्च प्रतीचे नितीधैर्य, चांगली साधनसामग्री, चांगली संघटना आणि नेतृत्व यामुळे या राष्ट्राचा विजय होऊ शकला. ज्या युरोपातील लोकांनी ज्यूंचा छळ केला, त्यांनी अरबांच्या भूमीत ज्यूंसाठी स्वतंत्र राष्ट्र निर्माण करावे ही गोष्ट अरबांना पसंत नसल्यामुळे हे राष्ट्र टिकू द्यायचे नाही असे अरबांनी ठरवले.

### २. १९५६ सुएझ युद्ध

सुएझ युद्ध मुख्यत्वेकरून अरब देश व इस्त्राइल यांच्या परस्पर संघर्षातून घडले नसले तरी या युद्धात दोन्ही प्रतिस्पर्धी परस्परांविरुद्ध उभे राहिले होते.

इजिप्तचे अध्यक्ष नासेर यांचा इंग्लंड, फ्रान्स व अमेरिका या राष्ट्रांच्या साम्राज्य धोरणांना तीव्र विरोध होता. १९३६ मध्ये इंग्लंड व इजिप्त यांच्यामध्ये एक करार झाला होता. तो करार १९५६ मध्ये संपत आला होता. इंग्लंडला या कराराचे पुनर्जीवन करायचे होते. मात्र नासेरने याला नकार दिला. नासेरची जवळीक रशियाशी वाढत चाललेली होती. अमेरिकेला इजिप्तवरील ताबा रशियाकडे जाण्याची भीती वाटू लागली. ब्रिटिश पंतप्रधान अँथोनी एडेन यांच्या मते, नासेरला इजिप्तच्या अधिपत्याखाली अरब देशांचा एक संघ स्थापन करायचा होता. त्यामुळे तेलसाठ्यांवरील आपला हक्क कायमचा संपुष्टात येईल. नासेरची तुलना अनेक ब्रिटिश पुढाऱ्यांनी हिटलर व मुसोलिनी यांच्याशी केली( शिंदे आणि लोखंडे) १९५६ मध्ये इजिप्तला दिली जाणारी मदत अमेरिकेने थांबवण्याची घोषणा केली. या देशाच्या दबावाला भीक न घालता इजिप्तमधील सुएज कालव्याचे राष्ट्रीयकरण केल्याची घोषणा नासेरने केली. या कालव्यामध्ये इंग्लंड व फ्रान्स यांची गुंतवणूक होती. त्यांना त्यांची भरपाई देण्याची घोषणा नासेरने केली. तसेच नासेरला आंतरराष्ट्रीय राजकारणात स्वतंत्र छाप उमटावयाची होती.

इजिप्तला रशियाने शस्त्रसाठयाची मदत केली. इजिप्तने सीरिया व जॉर्डन या दोन्ही देशांशी इस्त्राइल विरुद्ध लढण्यासाठी लष्करी करार केला व इजिप्शियन दहशतवादी इस्रायलमध्ये घुसवले. इस्त्राइलने सिनाई वाळवंटावर हल्ला करून गाझापट्टीवर आक्रमण केले. सुएझचे राष्ट्रीयीकरण मान्य नसल्याने ह्या युद्धात इंग्लंडने आणि फ्रान्सने इजिप्तवर आक्रमण केले. इजिप्तचा पराभव झाला. १९५७ मध्ये ऐलज-हायफा बंदरांना जोडणारी तेलाची पाईपलाईन टाकून इस्रायलने इराणमधून तेल आयात सुरु केली. या युद्धाने नासेरची मानहानी झाली.

**१९६७ चा संघर्षः**

हे युद्ध जागतिक राजकारणाला कलाटणी देणारे ठरले. अरब राष्ट्रांना इस्राइलचे स्वतंत्र राष्ट्र मान्य नव्हते. त्यामुळे इस्त्राइल व त्याचे शेजारील राष्ट्र यांच्यात संघर्ष सुरू होते. पॅलेस्टाईनमध्ये अनेक हिंसक गट उदयास आले. इस्त्राइली लोकांची धार्मिक स्थळे, दवाखाने यावर हल्ले चढून दहशत बसवण्याचा प्रयत्न करत होते. यालाच प्रत्युत्तर म्हणून ज्यू लोकही जेरुसलेम येथील मशिदींवर हल्ले करू लागले. कैरो शिखर परिषद इजिप्तच्या पुढाकाराने १९६४ मध्ये भरली. पॅलेस्टाईनमधील अरब लोकांना न्याय मिळवून देण्याच्या भावनेतून पॅलेस्टाईन मुक्ती संघटना [पी एल ओ] १९६४ मध्ये स्थापन झाली.या परिषदेत नद्यांचे पाणी इस्त्राइला मिळू न देणे आणि इस्त्राइलवर आर्थिक बहिष्कार टाकणे हे निर्णय घेण्यात आले. कैरो परिषदेने तणाव निर्माण करून युद्धजन्य परिस्थिती निर्माण केली. तसेच पीएलओपेक्षा जास्त आक्रमक स्वरूप असणारी आत्मघातकी हल्ले करणारी फतेह नावाची संघटना देखील उदयाला आली. संयुक्त राष्ट्र संघाने अरब-ज्यू संघर्ष संपुष्टात यावा म्हणून प्रयत्न केला, परंतु संघर्ष संपत नव्हता. उलट त्याने तीव्र स्वरूप धारण केले होते. इजिप्तचे अध्यक्ष जनरल नासेर याने इस्त्राइल विरुद्ध अंतिम युद्धाची घोषणा केली. अरबांच्या बाजूने इजिप्त, जॉर्डन, सीरिया, इराक, सौदी अरेबिया, अल्जेरिया, कुवेत, सुदान इत्यादी राष्ट्रे एकत्रित आली आणि ५ जून १९६७ ला युद्धाला सुरुवात झाली. (जितेंद्र भामरे) अमेरिका व रशिया या राष्ट्रांनी युद्धात प्रत्यक्ष भाग न घेता इस्त्राइल व अरब देशांना आर्थिक व लष्करी मदत करू लागले. इजिप्तने या युद्धापूर्वी इस्त्राइलसाठी सुएज कालव्याचा वापर बंद करण्याची घोषणा केली व युद्धास तोंड फुटले. इस्त्राइलने इजिप्तच्या विमानतळावर तुफानी

हल्ले चढवले. तसेच सिनाईच्या वाळवंटात मुसंडी मारून इस्रायलने इजिप्तची दाणादाण ओढवली.

इस्त्राइलने गाजाकिनारपट्टी, सिनाई वाळवंट, अरबराष्ट्रांच्या ताब्यातील जेरुसलेमचा भूभाग व जॉर्डन नदीच्या पश्चिमेकडील भूभाग तसेच सीरियाचा काही भूभाग यावर आक्रमण केले व प्रत्यक्ष ताबा मिळवला. अरब राष्ट्रांनी इंग्लंड व अमेरिका सोबतचे राजनैतिक संबंध तोडले आणि त्यांचा पेट्रोल पुरवठा बंद केला. अवघ्या सहा दिवसातच इस्त्राइलने ही आश्चर्यकारक मुसंडी मारली.

इस्त्राइलने अचूक लष्करी बळाचा वापर करून अरब राष्ट्रांना जेरीस आणले. संयुक्त राष्ट्रसंघाने युद्धबंदीचा प्रस्ताव मांडला. संयुक्त राष्ट्रसंघाच्या बैठकीत इस्त्राइलने जिंकलेला प्रदेश पुन्हा अरबांना देण्याचे नाकारले. या युद्धाचा अरब राष्ट्रांवर विपरीत परिणाम झाला. मनात सुडाची भावना कायम राहिली. इस्त्राइलचा बदला घेण्यासाठी अनेक गुप्त संघटना स्थापन झाल्या. यामुळे मात्र इस्त्राइलचा साम्राज्य विस्तार घडून आला. युनोची युद्धबंदी दोन्ही राष्ट्रांनी मान्य केली.

### १९७३ चा संघर्ष

इजिप्तचा पराभव नासेर यांच्या जिवारी लागला. १९७० मध्ये त्यांच्या मृत्यूनंतर अन्वर सादर यांनी इजिप्तची सत्तासूत्रे हाती घेतली. इजिप्तचे अध्यक्ष सादत यांनी अरब-ज्यू संघर्ष थंड होत असल्याचा आभास निर्माण केला. ज्यू लोकांचे धार्मिक उपवास चालू असताना ६ डिसेंबर १९७३ रोजी एकीकडे सुवेज कालव्याच्या पश्चिम किनाऱ्यावरून इजिप्तचा तोफखाना अचानक धडाडू लागला व इस्त्राइलच्या बार-लेव्ह तटबंदीवर इजिप्तचे तोफगोळे कोसळू लागले. दुसरीकडून गोलन टेकडयांवरून सीरियाचे असंख्य रणगाडे इस्त्राइलच्या रोखाने चाल करू लागले. एकाच वेळी दोन टोकांच्या आघाड्यांवर धडाकेने आक्रमण करून इजिप्त आणि सीरियाने इस्त्राइलला बेसावध अवस्थेत पकडले. इजिप्त व सीरिया यांनी इस्त्राइलवर सर्व ताकदीनिशी आक्रमण केले. अरब देशांनी इजिप्तच्या सुएज भागातील इस्त्राइलच्या ताब्यातील भूमी मुक्त केली, परंतु इस्त्राइलने सीरियाचा काही भाग बळकावून त्याची भरपाई केली. अत्याधुनिक शस्त्रांचा वापर करून इजिप्त व इतर राष्ट्रांनी इस्त्राइलवर सुरुवातीस आघाडी मिळवली, तरी अमेरिकेने दिलेल्या अत्याधुनिक शस्त्रास्त्रांच्या साह्याने इस्त्राइलने लवकरच बाजी उलटवली. सिनाईच्या डोंगरातील खिंडी इस्त्राइली सैन्याच्या काही पथकांनी निर्धाराने लढवल्या. गोलन टेकडयांवरील इस्त्राइलच्या रणगाडा पथकांनी पराक्रमाची शर्थ करून सिनाई रणगाडयांच्या झुंडीच्या झुंडी रोखून धरल्या. नवीन कुमक येताच शत्रूवर मात करून दमास्कसच्या दिशेने आगेकुच सुरू केली. सिनाईच्या आघाडीवर इस्त्राइलने विमान हाणीची जबर किंमत देऊन सुएज कालव्यावर पूल टाकून आपले सैन्य व रणगाडे इजिप्तच्या भूमीवर उतरवले. इस्रायलच्या या नीतीमुळे इजिप्तला संकट निर्माण झाले. हे युद्ध पुढे चालवणे इस्त्राइला तसेच अरबांनाही नको होते. इस्त्राइलला मदत करणाऱ्या राष्ट्रांची तेल निर्यात बंद करण्याची भाषा अरबांनी काढताच अमेरिका जागी झाली. अरबांना हे युद्ध जिंकता येणार नाही हे कळून चुकले होते. त्यामुळे अमेरिका व रशिया यांनी अरब-इस्त्राइल संघर्ष सोडवण्यासाठी अमेरिकेचे राजनीतिज्ञ डॉ.किसींजर यांनी पुढाकार घेऊन युद्धविराम घडून आणला. १८ दिवसाच्या युद्धानंतर शस्त्र संधी झाली.

या युद्धामध्ये अरब राष्ट्रांपेक्षा इस्त्राइल व इजिप्त यांच्यावर जास्त ताण पडला. त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले होते. अपरिमित लष्करी हानी झाली होती. निर्वासितांच्या संख्येत प्रचंड वाढ झाली होती. १९७३ रोजी इजिप्त व इस्त्राइल यांनी युद्धबंदीच्या करारावर सह्या केल्या. तरी खऱ्या अर्थाने शांतता प्रस्थापित करण्यास युनोला यश आले नाही. या प्रश्नात रशिया व अमेरिका परस्पर विरोधी भूमिका घेत असल्यामुळे या संघर्षाचा निकाल लागणे कठीण आहे.

१९७३ च्या इजिप्त व इस्त्राइल कराराची महत्त्वाची कलमे पुढीलप्रमाणे होती.

१. युद्ध विराम करणे.

२. सुएज शहराला अन्नधान्य व औषधांचा पुरवठा करणे.

३. सुएजच्या पूर्व किनाऱ्याकडे जीवनावश्यक वस्तूंच्या पुरवठयाला अडथळा न आणणे.

४. इजिप्त व इस्त्राइलने युद्ध भागातील आपापले सैन्य मागे घेणे.

या युद्ध विरामानंतर १९७३ ते ७७ अरब व इस्त्राइल यांच्यात इस्त्राइलने ताब्यात घेतलेल्या भूमीवरून वाद सुरूच राहिला. तसेच या कराराला इतर अरब राष्ट्रांची हरकत होती. इतर अरब राष्ट्रांकडून व पॅलेस्टाईनमधील अरब लोकांनी स्वतंत्र पॅलेस्टाईनची मागणी सुरूच ठेवली होती. १९७७ पर्यंत इजिप्त व इस्त्राइल दोन्ही देशांनी परस्परातील वादग्रस्त प्रश्न शांततामय मार्गाने सोडवण्याची घोषणा केली. इस्त्राइलने स्वतःच्या संरक्षणाची हमी मागून आंतरराष्ट्रीय जलमार्गातून इस्त्राइलच्या जहाजांना जाण्याची परवानगी इच्छा प्रदर्शित केली. अरब देश इस्त्राइलचा प्रखर विरोधात असले तरी इजिप्तचे अध्यक्ष अन्वर सादत यांनी शांततामय प्रक्रियेसाठी सर्व प्रयत्न केले. अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष जिमी कार्टर यांच्या मध्यस्थीमुळे इस्त्राइल व इजिप्त यांच्यात कॅम्प डेव्हिड येथे परस्पर शांतता करार संमत झाला. या करारानुसार इस्त्राइलने जॉर्डन नदीच्या पश्चिम किनाऱ्यावरील गाजापट्टीतील रहिवाशांना स्वायत्ता व स्वयंशासनाचा अधिकार राहील हे मान्य केले. तसेच सिनाई भागातून इस्त्राइली नागरिक निघून जातील असे ठरले. मात्र पॅलेस्टाईनचा प्रश्न सोडवणे त्यांना शक्य झाले नाही. इतर अरब राष्ट्र या कराराबद्दल नाखूश होते. त्यांनी याचा धिक्कार केला. या राष्ट्रांमध्ये इजिप्त हे एकटे पडले. यांच्यातील राजकीय संबंध १९८० मध्ये प्रस्थापित झाले व इस्त्राइलला राजनैतिक मान्यता देणारे इजिप्तचे पहिले अरबराष्ट्र ठरले. अन्वर सादत यांनी अरब राष्ट्रवादाचा विश्वासघात केला या भावनेतून इजिप्त मधील कट्टर वाद्यांनी त्यांची हत्या केली.

दरम्यान इस्त्राइल व इतर राष्ट्रीय यांच्यातील संघर्ष सुरूच होता. १९८१ मध्ये इस्त्राइल ने इराकमधील आण्विक भट्टीवर क्षेपणास्त्रांच्या साह्याने भीषण हल्ला केला. ते आण्विक केंद्र इस्त्राइलला नष्ट करण्यासाठी उभारले होते. या सबबी खाली त्यावर हल्ला केला. इराण व इराक यांच्यातील युद्धाचा फायदा घेऊन इस्त्राइलने १९८२ मध्ये लेबननमधील निर्वासित पॅलेस्टाईनच्या छावण्यांवर भीषण हल्ला केला. त्यात हजारो निर्वासित जागीच ठार झाले. शेकडो अरब स्त्री-पुरुष प्राणास मुकले. जगातील सर्व आघाडीच्या राष्ट्रांनी व संयुक्त राष्ट्रसंघाने या हल्ल्याचा तीव्र निषेध केला. युनोच्या सुरक्षा परिषदेने गोलन टेकडयावरील इस्त्राइलचा हक्क अमान्य केला.

पी एल ओ संघटनेचे प्रमुख यासेर अराफत यांचे केंद्र नष्ट करण्याचा प्रयत्न केला. बैरूतचे आंतरराष्ट्रीय विमानतळ नष्ट केले. या हल्ल्यात हजारो निरपराध स्त्री-पुरुष ठार झाले. १९८३ मध्ये दिल्ली येथे भरलेल्या अलिप्त राष्ट्रांच्या शिखर परिषदेने देखील पॅलेस्टाईनच्या बाजूने सहानुभूती प्रकट केली. १९८५ मध्ये सीरिया व इस्राईल यांच्यात युद्धबंदी करार संमत झाला.

**१९९३ चा शांतता करारः**

१. इस्त्राइलने पॅलेस्टाईन मुक्ती संघटनेचे अस्तित्व मान्य केले.

२. पॅलेस्टाईन मुक्ती संघटनेने इस्त्राइलचे अस्तित्व मान्य केले.

३. पॅलेस्टाईन लोकांना जेरीको प्रांतात स्वशासनाचा हक्क मिळाला.

हा करार संमत होऊन देखील दोन्हीकडील जहाल गटांना मात्र शांतता प्रक्रिया मान्य नव्हती.

**पॅलेस्टाईनचा स्वशासनाचा हक्क १९९५ :**

या कराराद्वारे इस्राईल वेस्ट बँकचा प्रदेश टप्प्याटप्प्याने पॅलेस्टाईन मुक्ती संघटनेला देण्यात येणार होता. इस्त्राइलने पकडलेले ८००० अरब युद्धबंदी मुक्त करण्यात आले. जगातील सर्व प्रमुख नेत्यांनी या घटनेचे स्वागत केले. मात्र एका जहाल इस्त्राइली व्यक्तीने इस्त्राइलचे पंतप्रधान यित्झक रॅबिन यांची १९९५ मध्ये हत्या केली व पुन्हा एकदा जहाल गट शांततेमध्ये विश्वास ठेवत नसल्याचे स्पष्ट केले.

१९९६ मध्ये जॉर्डनचे राजे हुसेन यांनी इस्त्राइलला भेट दिली. पॅलेस्टाईनमधील राजकीय प्रक्रियेला गतिमान करण्याची संकेत यामुळे मिळाले. त्यानुसार यासर अराफत हे पॅलेस्टाईनचे अध्यक्ष बनले. १९९६ मध्ये जहाल पॅलेस्टाईन गट हमासने केलेल्या बॉम्ब हल्ल्यामध्ये इस्त्राइलचे ६३ लोकांना प्राण गमवावे लागले तर हिजबुल्ला गटाने इस्त्राइल मधील एका गावावर सशस्त्र हल्ला चढवला. या सर्व घटनांचा परिणाम होऊन इस्रायलमध्ये कडव्या गटाचा नेता बेंजामिन नेतान्याहू हा सत्तेवर आला.

## ११.६ समारोप

बेन गुरीयनच्या नेतृत्वाखाली नव्याने निर्माण झालेल्या या राष्ट्राची सर्वच क्षेत्रात प्रगती झाली. झिओनिस्ट चळवळीने मोठया शिताफीने आपले ध्येय्य गाठण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये ज्यू यशस्वी झाले. हे राष्ट्र छोटे असले तरी त्याने असे आर्थिक व लष्करी सामर्थ्य कमावले आहे की, अरब राष्ट्रांना त्यांची धास्ती निर्माण झाली आहे. दुर्दम्य इच्छाशक्ती, आत्मविश्वास व स्वाभिमान या गुणांवर आपण कोणतेही उद्दिष्ट साध्य करू शकतो हे नव्याने निर्माण झालेल्या इस्त्राईलने दाखवून दिले. इ.स. १९४८-१९७५ पर्यंत चार वेळा अरब-ज्यू यांच्यात युद्धे झाली. या युद्धांच्या दरम्यान इस्त्रायलने आपल्या राष्ट्राच्या सीमा वाढवण्यात यश मिळाले.

## ११.७ प्रश्न

१) झिओनिस्टचळवळीची माहिती सांगून इस्त्राईलची निर्मिती कशी झाली ते सांगा.
२) अरब राष्ट्रवादाचा उदय कसा झाला ते सांगा.
३) अरब लीगविषयी सविस्तर माहिती दया.
४) अरब- इस्त्राईलच्या संघर्षाची सविस्तर हकीकत सांगा.

## ११.८ संदर्भ


१) प्राची, आशियाचा इतिहास (१९००-१९६०), प्राची प्रकाशन, मुंबई, ९२.

२) भामरे जितेंद्र, आशियाचा इतिहास (१९००-१९७६), आवृत्ती दुसरी, शेठ प्रकाशन, मुंबई.

३) शिंदे सुभाष, लोखंडे अजयकुमार, समकालीन जग (१९४५-२०००), आवृत्ती पहिली, शेठ प्रकाशन, मुंबई.

४) जोशी पी. जी., आधुनिक जग, (इ.स.१५०१ – इ.स.१९९०), विद्या प्रकाशन, नागपूर.

५) काळे . वा., पश्चिम आशियाचा इतिहास (इ.स. १९०२ – इ.स.१९८०), प्राची प्रकाशन, मुंबई.


❖❖❖❖

munotes.in

# १२

## इराणी क्रांती (१९७९)

**प्रकरण रचना**

१२.० उद्दिष्टये

१२.१ प्रस्तावना

१२.२ पहेलवी राजवट

१२.३ रेझाशाहाच्या सुधारणा

१२.४ श्वेतक्रांती

१२.५ इराणी क्रांती

१२.६ समारोप

१२.७ प्रश्न

१२.८ संदर्भ

### १२.० उद्दिष्टये

१. इराणमधील पहेलवी राजवटीचा अभ्यास करणे.
२. श्वेतक्रांतीची माहिती मिळवणे.
३. इराणमधील १९७९च्या क्रांतीचे विश्लेषण करणे.

### १२.१ प्रस्तावना

इराण हा पश्चिम आशियातील तेलाच्या राजकारणात महत्वाची भूमिका बजावणारा एक प्रमुख व मोठा देश आहे. इराणचे पूर्वीचे नाव पर्शिया होते. पर्शियन संस्कृतीमुळे ह्या देशाला महत्त्व प्राप्त झाले होते. आधुनिक काळात इराणमध्ये उपलब्ध असलेल्या तेलसाठ्यामुळे इराणचा प्रभाव जागतिक राजकारणात वाढला आहे. इराणला खनिजतेलाच्या साठ्यांचे नैसर्गिक वरदान असल्यामुळे पश्चिमेकडील युरोपीय देश व पश्चिम आशियातील प्रदेशात इराणला महत्वाचे स्थान आहे. या देशाच्या चतु:सिमा पुढीलप्रमाणे आहेत. इराणच्या पूर्वेस अफगाणिस्तान, पश्चिमेस इराक व तुर्कस्तान हे देश आहेत, दक्षिणेस पर्शियाचे आखात तर उत्तरेस रशिया, सौदी अरेबिया या देशांच्या सीमा आहेत.

१७९४ ते १९२५ पर्यंत इराणमध्ये कझार या तुर्की वंशाची राजवट होती, परंतू कझार राज्यकर्त्यांमध्ये अनेक गट-तट असल्यामुळे तेथे नेहमी सत्तेसाठी संघर्ष होत असे. याचा फायदा रेझाशहा पहेलवीने घेऊन इराणची सत्ता ताब्यात घेतली होती. त्याने जवळपास

२० वर्ष इराणवर राज्य केले होते. पुढे इराणमध्ये १९७९ मध्ये क्रांती झाली आणि तेथे प्रजासत्ताकाची स्थापना झाली होती. या सर्व घडामोडीचा आढावा या घटकामध्ये घेतलेला आहे.

## १२.२ पहेलवी राजवट

रेझाशहा पहेलवी यांचा जन्म एका सामान्य कुटुंबात १६ मार्च १८७८ रोजी झाला. पर्शियात एक साधा शिपाई म्हणून २० वर्षे त्याने नोकरी केली. त्याचे लष्करी कर्तृत्व पाहून ब्रिटिशांनी त्यास कोसेक डिव्हिजनच्या प्रमुखपदी नियुक्त केले. या डिव्हिजनचा कमांडर म्हणून त्याने चांगली कामगिरी बजावली. २१ फेब्रुवारी १९२१ रोजी त्याने जियाउद्दीन या सुधारक नेत्याच्या सहाय्याने पर्शियातील दुबळे सरकार उलथून पाडले. त्याच्या नेतृत्वाखाली नवे सरकार स्थापन झाले. या मंत्रिमंडळात रेझाशहा युद्धमंत्री बनला होता. जियाउद्दीनने ब्रिटिशांचे समर्थन सुरू केल्याने रेझाशाहशी त्याचे मतभेद घडून आले. त्यातून २५ मे १९२१ रोजी जियाउद्दीनला राजीनामा द्यावा लागला. त्यानंतर नवीन मंत्रिमंडळ सत्तेवर आले. ज्यावर रेझाशहाचा अंकुश होता. परंतु रेझाशहाच्या विरुद्ध असलेल्या लोकांनी त्याच्याविरुद्ध कट रचला, तो वेळेवर उघडकीस आल्याने रेझाशहाने सर्व सत्ता स्वतःच्या हाती घेतली. पर्शियाचा शहा अहमदखानला परदेशात पाठवले. ऑक्टोबर १९२३ मध्ये तो देशाचा सर्वाधिकारी बनला व मजलीसचे अधिवेशन बोलावले. फेब्रुवारी १९२५ मध्ये सर्व लष्करी अधिकार व त्यानंतर पर्शियाचे शहापद रेझाशाहला मजलीसने (कायदेमंडळने) बहाल केले. ३१ ऑक्टोबर १९२५ रोजी रेझाशहाच्या राजपदाची घोषणा करण्यात आली. १५ डिसेंबर १९२५ रोजी नव्या घटना समितीने त्याला रेझाशहा पेहेलवी अशी उपाधी दिली आणि वंशपरंपरेने या घराण्याकडे इराणचे राजपाट ठेवण्याची मान्यता दिली. २५ एप्रिल १९२६ रोजी रेझाशहाचा राज्याभिषेक सोहळा पार पाडला होता.

**रेझाशहाच्या सत्तेचे स्वरूप :**

इराणच्या घटना समितीने बनविलेल्या घटनेनुसार वेळोवेळी मजलीस या कायदेमंडळासाठी निवडणुका घेण्यात येत असल्या तरी रेझाशाहने या निवडणुकांना कधीच फारसे महत्त्व दिले नाही. प्रशासनाविषयीचे सर्व निर्णय तो स्वतःच घेत असे. रेझाशाहने राजेपद धारण केल्यानंतर लगेचच इराणमधील फार मोठी जमीन आपल्या मालकीची करून घेतली. त्यासाठी त्याने आपल्या निरंकूश सत्तेचा वापरही केला होता. इराणची सर्वांगीण प्रगती करून तेथील समाजाचे आधुनिकीकरण करण्याच्या एकमेव महत्त्वकांक्षेने त्याला झपाटले होते. अशी प्रगती कमीत कमी काळात साध्य करण्यासाठी आवश्यक असलेले नेतृत्व गुण त्याच्या अंगी असल्याने त्याच्या पिढीमधील एक विशेष कर्तबगार नेता म्हणून तो ओळखला जातो.

**रेझाशहापुढील समस्या:**

इराणचे राजेपद ज्यावेळेस रेझाशहाने आपल्याकडे घेतले होते त्यावेळची इराणची आर्थिक परिस्थिती फारशी चांगली नव्हती. इराणमध्ये अनेक देशांना विविध प्रकारच्या व्यापारी सवलती मिळालेल्या असल्याने त्यांचा इराणी अर्थव्यवस्थेवर जबरदस्त ताण पडत होता. इम्पिरियल बँक, इंडो युरोपियन टेलिग्राफ कंपनी या ब्रिटिश कंपन्या आणि रस्तेबांधणी,

मत्स्य व्यवसाय आणि बँकिंग क्षेत्रातील रशियन कंपन्या याचा इराणी अर्थव्यवस्थेवर असलेला प्रभाव लक्षणीय होता. या कंपन्यांच्या व्यवहारापासून इराणी सरकारला मोठ्या प्रमाणावर महसूल मिळत असला तरी या कंपन्यांचे इराणमधील अस्तित्व इराणी राष्ट्रवादीच्या डोळ्यात खूपत होते आणि त्यामुळे इराणी राष्ट्रवादालाही चालना मिळत असे.

**सामाजिक परिवर्तन :**

तुर्कस्थानमधील केमालपाशाप्रमाणे रेझाशहालाही पाश्चात्य संस्कृतीचे आकर्षण होते. ज्याप्रमाणे केमालपाशाने तुर्कस्थानचे आधुनिकरणकरून पाश्चात्यांच्या धर्तीवर आधारित तुर्कस्थानमध्ये आधुनिक तुर्की संस्कृती निर्माण केली, त्याचप्रमाणे इराणमध्ये सुद्धा रेझाशाहाचा आधुनिक इराणी संस्कृती रुजविण्याचा प्रयत्न होता. इराणमधील आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत त्याने इराणमधील स्त्री स्वातंत्र्यसाठी बालविवाह पद्धती रद्द केली, महिलांच्या विवाहाची वयोमर्यादा निश्चित केली, इराणमधील महिलांची बुरखा पद्धती बंद केली, इराणमध्ये मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी मुलींसाठी शाळा उघडल्या, धर्माचा गैरवापर कमी केला. तसेच इराणमध्ये सार्वजनिक रुग्णालये स्थापन केले व पायाभूत सुविधांकडे विशेष लक्ष दिले.

## १२.३ इराणच्या आधुनिकीकरणासाठी रेझाशाहाच्या सुधारणा

### १. शैक्षणिक सुधारणा :

इराणला आधुनिक देश बनविण्यासाठी रेझाशाहने शिक्षणव्यवस्थेकडे लक्ष पुरविले. कोणत्याही देशाच्या आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत शिक्षण हे महत्वाची भूमिका बजावते त्यामुळे त्याने इराणमध्ये आधुनिक शिक्षणाची सोय केली व धार्मिक शिक्षण बंद केले. शैक्षणिक क्षेत्रात आमुलाग्र बदल घडविण्यासाठी त्याने इराणमध्ये  पाश्चिमात्य देशांच्या धर्तीवर शाळा-महाविद्यालयांची स्थापना केली. प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. पर्शियन अकादमीची स्थापना करून फारशी शब्द वापरण्याचा नियम केला. इ.स. १९३५ला त्याने तेहरान विद्यापीठाची स्थापना करून या विद्यापीठातून शेतकी, वाणिज्य, विज्ञान, वैद्यकशास्त्र, परकीय भाषा इ. शाखांचा अभ्यास सुरु केला. इराणमधील शिक्षण संस्थांमध्ये परकीय शिक्षकांच्या नेमणूका केल्या, मुलींसाठी शाळा काढल्या, शैक्षणिक सुविधांचे जाळे निर्माण झाल्यामुळे आपोआप इराणमधील साक्षरतेचे प्रमाण वाढले.

### २. धार्मिक सुधारणा

इराणमधील समाजकारण व राजकारणावर धर्माचा प्रभाव जास्त होता. रेझाशहाने सत्तेवर आल्यानंतर इराणमधील समाजावर व येथील राजकारणावर धर्माचा असलेला प्रभाव कमी करण्यासाठी अत्यंत कठोर निर्णय घेतले. रेझाशाहने इराणमध्ये कुराणावर आधारित असलेली न्यायदान व्यवस्था बंद करून आपल्या देशात फ्रेंच न्यायदानपद्धतीचा स्वीकार केला. धार्मिक कार्य करणाऱ्या मुल्ला-मौलवींच्या अधिकारावर बंधने आणली. त्यांच्याकडून विवाहविषयक व शैक्षणिक हक्क काढून घेतले, इराणमधील सार्वजनिक शिक्षण संस्थांमधून दिले जाणारे धार्मिक शिक्षणास बंदी घातली, धार्मिक संस्थांच्या मालमत्ता जप्त केल्या व

धर्मगुरूंना सरकारतर्फे वेतन देण्यात येऊ लागले, धर्मगुरूंना भिक्षा मागण्यास बंदी घातली, मोहरमच्या वेळी केल्या जाणाऱ्या सार्वजनिक शोक मिरवणुकीवर बंदी घातली, इराणी धर्मगुरूंवर दहशत बसवण्याचे प्रयत्न केले. मशिदीमध्ये खुर्च्या ठेवण्याची व्यवस्था केली. रेझाशाहाच्या या क्रांतिकारी सुधारणांमुळे इराणमध्ये अस्तित्वात असलेली धार्मिक कट्टरता कमी होण्यास मदत झाली व इराणमध्ये आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेला सुरुवात झाली.

### ३. आर्थिक सुधारणा

इराणची आर्थिक व प्रशासकीय सुधारणा करण्यासाठी परकीयांची नियुक्ती करताना रेझाशहाने विशेष खबरदारी घेतली होती. परकीयांना कोणतेही विशेष अधिकार न देता तसेच परकीय तज्ञ इराणच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करणार नाही याची खबरदारी घेतली होती. इराणमध्ये आर्थिक सुधारणा करण्यासाठी रेझाशहाने बेल्जियम, अमेरिकन व फ्रेंच तज्ञांच्या नियुक्त्या केल्या होत्या. रेझाशहाने ब्रिटिशांच्या मालकी हक्काखाली असलेल्या इम्पिरिअल बँक ऑफ इराणकडून चलन व्यवहाराचे हक्क काढून घेतले आणि रियाल हे नवे चलन व्यवहारात आणले. अंग्लो इरानियन ऑइल कंपनीशी रॉयल्टी बाबतचा जुना करार रद्द करून जास्त रकमेची रॉयल्टी देणारा नवा करार त्यांने अंमलात आणला. देशातील सर्व परकीय व्यापार शासनामार्फत चालू केला. त्यातून मिळणारा नफा नवे उद्योगधंदे सुरू करण्यासाठी भांडवल म्हणून वापरण्यात आला. औद्योगिक क्षेत्रामध्ये आमुलाग्र बदल घडून आणण्यासाठी त्याने साखरनिर्मिती, तंबाखू, कापड, सिमेंट, सिगारेट, रसायने इ. उद्योगांना प्रोत्साहन देऊन त्याद्वारे निर्माण होणाऱ्या वस्तूंच्या उत्पादनास मोठया प्रमाणात चालना देण्याचे काम केले. रेझाशहाने राबविलेल्या नव्या औद्योगिक धोरणांमुळे इराणमधील औद्योगिक विकासाचा वेग वाढल्याने देशाचे लवकरच आधुनिकीकरणात रुपांतर झाले. वाहतूक व दळणवळण क्षेत्राकडे रेझाशहाने विशेष लक्ष पुरवले. डोंगराळ भागात दळणवळणाच्या उत्तम सोयी निर्माण केल्या गेल्या, हजारो मैल लांबीचे नवे रस्ते बांधले, ट्रान्स इराणीयन हा नवा रेल्वे मार्ग बांधला. या रेल्वे मार्गाचे वैशिष्टे म्हणजे हा रेल्वेमार्ग समुद्रसपाटीवरून सुरू होऊन ९००० फूट उंचीवर जाऊन परत समुद्रसपाटीवर येतो, हा रेल्वेमार्ग म्हणजे वाहतुकीच्या साधनांच्या इतिहासातील एक आश्चर्यच होते. या रेल्वेमार्गामुळे उत्तर व दक्षिण प्रांतातील दळणवळण तर वाढलेच, तसेच उत्तर इराणमधील भटक्या टोळ्यांवर नियंत्रण ठेवणे ही शक्य झाले. रस्ते व लोहमार्गाबरोबर त्याने हवाई वाहतूकीला सुद्धा चालना देऊन नवीन विमानतळे उभारली. त्यामुळे इराणमध्ये वाहतूक व दळणवळण क्षेत्रात आमुलाग्र बदल होऊन त्याचा उपयोग इराणच्या आधुनिकीकरणात झाला.

### ४. लष्करी सुधारणा

रेझाशाहने इराणचा सन्मान व प्रतिष्ठा पुन्हा स्थापन करण्यासाठी व देशाच्या अंतर्गत भागात कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी व देशाचे बाह्य आक्रमणापासून संरक्षण करण्यासाठी लष्कराची उभारणी करण्याची आवश्यकता होती. त्यासाठी त्याने परकीयांचे वर्चस्व झुगारून प्रशिक्षित व राष्ट्रनिष्ठ लष्कराची उभारणी केली, यासाठी भांडवलाची आवश्यकता होती. ते उभे करण्यासाठी त्याने उद्योजक व कारखानदारांकडून सक्तीने पैसा वसूल केला. लष्करासाठी आधुनिक शस्त्रसाठा खरेदी केला. इराणी लष्कराला प्रशिक्षण

देण्यासाठी तेल कंपन्यांकडून मिळणाऱ्या रॉयल्टीचा वापर केला. त्याने केवळ लष्कराला प्रशिक्षण दिले असे नव्हे तर इराणी पोलीस दलाला अधिक कार्यक्षम करण्यासाठी त्यांनाही प्रशिक्षण देऊन इराणी समाजात शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्याचे महत्वाचे कार्य केले. इराणमध्ये स्वतंत्र पोलीस दल व लष्कर उभारल्यामुळे देशाच्या अंतर्गत भागात शांतता व सुव्यवस्था निर्माण झाली व बाह्य शत्रूपासून देशाचे संरक्षण करण्यासाठी इराणमध्ये प्रशिक्षित लष्कराची उभारणी केली, त्यामुळे बाह्य आक्रमणाचा धोका कमी झाला.

### ५. प्रशासकीय सुधारणा

इराणच्या कायदेमंडळासाठी घेण्यात येणाऱ्या निवडणुकांना रेझाशहाने कधीच महत्त्व दिले नाही. त्याने कायदे करणाऱ्या संस्थेवर सुद्धा टीका केली होती. तो असे म्हणत असे की, 'निरर्थक बडबड करणाऱ्यांची गर्दी म्हणजे कायदेमंडळ होय'.

मिर्झा अब्दुल हुसेन खान, तायमुश्ताश, मिर्झा महंमद अली खान आणि हसन ताजिक देह हे इराणी नेते रेझाशाहचे विश्वासू सहकारी असले तरी प्रशासनाविषयीचे सर्व निर्णय तो स्वतःच घेत असे. पहिले महायुद्ध व त्यानंतरच्या काळात त्यामध्ये सुधारणा करणे शक्य नसले तरी इराणमध्ये राष्ट्रीय सैन्य उभारून समाजाचे आधुनिकीकरण करण्यासाठी रेझाशाहाला सैन्याचे एक साधन म्हणून वापर करणे आवश्यक असल्याचे लक्षात आले. प्रबळ इराणी सैन्य उभे करण्याचे काम त्याने हाती घेतले. संरक्षण मंत्री या नात्याने देशातील पोलीस खात्यावर त्याचे पूर्वीपासून नियंत्रण होते. रेझाशहाने धर्मगुरूशी विचार विनिमय करून प्रजासत्ताकाची कल्पना इस्लामच्या मूलभूत तत्वाच्या विरोधी असल्याचे त्यांच्याकडून वधवून घेतले. अशारितीने प्रजासत्ताकाची कल्पना मागे पडल्यावर रेझाशहाने राजेपद धारण करून पेहलवी घराण्याच्या राजवटीची स्थापना केली. आपल्या संपूर्ण कारकिर्दीमध्ये रेझाशहाने फक्त धर्मगुरूंची जवळीक साधून त्यांच्याशी विचारविनिमय केला. नंतर मात्र त्याने धर्मगुरूंच्या संबंधात विशेष कडक धोरण अवलंबिले होते. ठामपणे अंमलबजावणी करण्याची किमया त्याने साधली होती. त्याचे मध्यमवर्गीय जीवन, पाश्चात्य शिक्षणाचा आणि प्रशासकीय अनुभवाचा अभाव इत्यादी गोष्टी त्याच्या मार्गात कधीच आड आल्या नाहीत.

### ६. तेल उद्योगाचा विकास

इराणमधील महत्त्वाचा उद्योग म्हणजे तेलाचा उद्योग होता. इराणमध्ये नैसर्गिक तेलाचे भूमिगत साठे आहेत. त्याचप्रमाणे तेल काढणे, शुद्ध करणे यासाठी व्यापारात व्यापारी सवलती देण्यात आल्या. इ.स.१९३३ मध्ये रेझाशहाने अंग्लो-इरानियन ऑइल कंपनी बरोबर तेलविषयक सवलतीच्या करारात एकतर्फी बदल केला आणि तो इराणी सरकारला अधिक फायद्याचा होता. हा करार रेझाशहाचा विशेष उल्लेखनीय असा आर्थिक व राजनीतिक विजय होता. तेल उद्योगांमध्ये झालेला प्रचंड विकास आणि त्यापासून इराणी अर्थव्यवस्थेला मिळालेली चालना ही रेझाशहाच्या कारकिर्दीतील सर्वाधिक महत्त्वाची आर्थिक घटना होती.

इरानियन जनतेमध्ये रेझाशहाने राष्ट्रभावनेची ज्योत प्रज्वलित केली. आधुनिकतेवर भर देऊन अनेक सुधारणा त्याने आपल्या देशामध्ये केल्या. इराणसारख्या इस्लामिक देशात आधुनिकीकरण करणे म्हणजे धाडसी पाऊल होते परंतु रेझाशहाने अनेकांचा रोष पत्करून

ते काम केले हे विशेष म्हणावे लागेल. इराणमधील बड्या जमीनदारांमध्ये त्याचा पहिला क्रमांक होता. त्याचे अनुकरण त्याच्या अनुयायांनी केल्याने देशावर त्याचा वाईट परिणाम झाला. रेझाशहाने हिटलरशी मैत्री केल्याने युरोपियन राष्ट्रे इराणविरोधात गेली. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी इराणने जरी तटस्थता जाहीर केली असली, तरी तो कधीही जर्मनीच्या बाजूने वळू शकतो या भीतीने रशिया आणि ब्रिटनने संयुक्तपणे इराणवर आक्रमण केले आणि रेझाशहाला १६ सप्टेंबर १९४१ रोजी पदत्याग करण्यास भाग पाडले. मॉरिशसमध्ये हद्दपार करण्यात आल्यानंतर त्याला दक्षिण आफ्रिकेत जोहान्सबर्गला नेण्यात आले. तेथेच त्याचा २६ जुलै १९४४ रोजी मृत्यू झाला. रेझाशहानंतर त्याचा मुलगा महंमद रेझाशाह सत्तेवर आला.

**महंमद रेझाशहा पेहलवीची कारकीर्द:**

रेझाशहानंतर त्याचा मुलगा महंमद रेझाशाह हा २६ ऑक्टोबर, १९६७ रोजी इराणचा शहा बनला. पहेलवी घराण्याचा तो दुसरा आणि शेवटचा सम्राट होता. त्याच्या दूरदृष्टीने इराणमध्ये जलद औद्योगिक आणि लष्करी सुधारणा घडून येण्यास मदत झाली. तसेच त्याच्या सामाजिक आणि आर्थिक सुधारणांमुळे इराणचे आधुनिकीकरण होण्यास मदत झाली. महंमद रेझाशहाच्या कारकिर्दीत इराणचे पंतप्रधान मोहम्मद मुसादिक यांनी तेल उद्योगाच्या संदर्भातील जागतिक बँकेच्या योजना मान्य केल्या नाही. त्यांची अशी धारणा होती की, इराणच्या तेलाशिवाय युरोपातील उद्योगधंदे बंद पडतील म्हणून त्याने इंग्लंडशी असलेले राजनैतिक संबंध तोडले व ब्रिटीश मालकीच्या तेल उद्योगाचे राष्ट्रीयकरण केले. मुसादिकच्या हुकुमशहासारख्या वागणुकीमुळे जनतेत अशांतता माजली.

मुसादिकच्या अशा धोरणामुळे महंमदशहाला देश सोडावा लागला. डॉ. मुसादिकच्या एकाधिकारशाहीमुळे इराणमध्ये अशांतता निर्माण होऊन देशाच्या सार्वभौमत्वाला धोका निर्माण झाला होता. त्यामुळे इराणचा सेनाधिकारी जनरल झेहदी हा या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी पुढे सरसावला. त्याने डॉ. मुसादिकला देशद्रोहाच्या आरोपाखाली अटक केली. महंमदशहा इराणमध्ये परत आल्यानंतर जनरल झेहदी याला पंतप्रधानपदी नेमण्यात आले. डॉ. मुसादिकच्या राजनैतिक पतनानंतर इराणमध्ये इंग्लंड आणि अमेरिका यांच्या गुप्त समर्थनामुळे पुन्हा एकदा महंमद रेझा पेहलवीची राजनैतिक अधिकारशाही प्रस्थापित झाली. त्याच्या कारकिर्दीत इराणने पाश्चात्य देशांशी चांगले संबंध प्रस्थापित केले. त्याने नव्याने स्थापन झालेल्या आंतरराष्ट्रीय संघासह महसूल विभाजित करण्याचा करार केला. या करारांतर्गत इराणमध्ये तेल उत्पादनामुळे देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा वाढत होता. याच काळात त्याने अमेरिकेच्या साह्याने राष्ट्रीय विकास कार्यक्रम राबविण्यास सुरुवात केली. पाश्चात्यांच्या मैत्रीपूर्ण संबंधामुळे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रूमन यांनी १९५२ मध्ये नवीन आर्थिक योजनेअंतर्गत इराणला आर्थिक मदत केली. त्याने हाती घेतलेल्या राष्ट्रीय विकास कार्यक्रमालाच **श्वेतक्रांती** असे म्हणतात.

## १२.४ इराणी श्वेतक्रांती

इराणमध्ये महंमद रेझाशाह पहेलवीने राबविलेल्या राष्ट्रीय विकास कार्यक्रम अंतर्गत रस्ते, रेल्वे, हवाई वाहतुकीचे जाळे वाढविले, अनेक धरणे, सिंचन प्रकल्प, साथीच्या रोगांचे

निर्मुलन, औदयोगिक आणि जमीन सुधारणेला प्रोत्साहन दिले. मोठया जमीन मालकांकडून जमीन घेण्यात आली आणि गरीब शेतकऱ्यांना स्वस्त दरात विकण्यात आली. तसेच प्रत्येक इराणी नागरिकाला मोफत शिक्षण दिले गेले. सर्व महिलांना मताधिकार मिळाला. इराणमध्ये राजेशाही असली तरी काही निवडणुका अल्प प्रमाणात घेण्यात आल्या महिलांना सरकारी कार्यालयात नोकरीही दिली गेली. पेहलवीची अशी इच्छा होती की, त्याच्या पुढाकाराने इराणमध्ये एक मोठा मध्यमवर्ग तयार होईल की, जो नेहमीच त्याच्याशी एकनिष्ठ असेल. या श्वेतक्रांती अंतर्गत इराणचे मोठ्या प्रमाणावर आधुनिकीकरण होत होते. इराणमध्ये धर्मनिरपेक्षतेचा पाया रचला जात होता. याच इराणमध्ये सिनेमा हॉल सुरू होत होते, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सण साजरे होत होते. महिलांना त्यांच्या आवडीचे आधुनिक कपडे घालण्यास मोकळीक होती. इराणचा एक भाग पाश्चिमात्य संस्कृतीने झपाटलेला होता, परंतु हीच श्वेतक्रांती देशातील दोन घटकांना त्रास देत होती. एक म्हणजे इस्लाम धर्माचे अनुकरण करणाऱ्या लोकांना की ज्यांना इराणमध्ये धार्मिक राज्य हवे होते, तर दुसरे कम्युनिस्ट म्हणजे पेहलवी हे भ्रष्ट असून अमेरिका आणि ब्रिटनच्या इशारावर काम करतात असा त्यांच्यावर आरोप केला जात होता. श्वेतक्रांतीमुळे महंमद रेझाशहाला देशांतर्गत जनतेचा मोठा पाठींबा मिळाला होता.

परंतु, दुसरीकडे त्याच्या सुधारणा जलद गतीने पुढे गेल्या नाहीत, त्याला कट्टरपंथीय गटाच्या टीकेला सामोरे जावे लागले. शहाच्या निरंकुश सत्तेला, त्याच्या सरकारमधील भ्रष्टाचार, तेलाच्या संपत्तीचे असमान वितरण, सक्तीचे पाश्चिमात्यीकरण, दडपशाही या धोरणाला इराणमधून मोठया प्रमाणात विरोध सुरु झाला आणि महंमद रेझाशाहाच्या विरुध्द जनमत तयार होत गेले.

## १२.५ इराणची क्रांती

इराणमध्ये खनिज संपत्ती, नैसर्गिक वायूचे साठे असून तसेच कृषी उत्पादनही चांगल्या प्रमाणात होत असत. आर्थिक स्थैर्य आणण्यासाठी विविध योजना इराणच्या शहाणे आखल्या होत्या, तरीही देशातील गरीब लोकांच्या राहणीमानात फारसा फरक पडला नव्हता. बऱ्याच जनतेकडे स्वतःची शेती नव्हती. लाखो लोक शेतमजूर म्हणून काम करीत असे. देशात सार्वजनिक सोयी-सुविधांचा अभाव होता. ६०% लोक निरक्षर होते. अर्थव्यवस्थेत व सामाजिक जीवनात भ्रष्टाचाराचे रान माजले होते. जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा तसेच भाववाढीमुळे सामान्य लोकांमध्ये असंतोषाचा उद्रेक झाला. तेल उद्योगातून मिळणाऱ्या आर्थिक संपत्तीचा विनियोग सामान्य लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी न करता इराणच्या लष्करीकरणावर शहाने पैसा खर्च केला होता. एकाधिकारशाहीचा वापर करून शहाने स्वतःच्या अधिकाराशिवाय इतर राजकीय पक्षांना इराणमध्ये बंदी घातली. शहाच्या गुप्त पोलीस संघटनेच्या अत्याचारांमुळे पुराणमतवादी मुल्लामौलवी व विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड असंतोष पसरला. १९७०च्या दरम्यान बेरोजगारीचे प्रमाणही वाढत चालले होते. १९७८च्या वर्षाची सुरुवात रक्तरंजित दंगलींनी सुरु होऊन रस्त्यावर येऊन लोकांनी निदर्शने करण्यास सुरुवात केली. लोकांवर बेछुट पोलीस गोळीबार करण्यात आला. महंमदशहाने सप्टेंबर १९७८ मध्ये मार्शल लॉच्या साहाय्याने देशात शांतता स्थिर राखण्यासाठी लष्कराची मदत घेतली. परंतु याचा उलटा परिणाम झाला. विद्यार्थ्यांच्या असंतोषात आणखी भर पडली. इराणची अंतर्गत व्यवस्था पूर्णपणे बिघडली. लष्करानेसुद्धा

लोकांच्या आंदोलनाला सहानुभूती दर्शवल्यामुळे शहाला सत्तात्याग करण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता.

शहाने इस्लाम धोक्यात आणल्याचे कारण पुढे करून दंगली करण्यात आल्या. प्रगतीवादी व प्रतिक्रियावादी यांच्यात संघर्ष सुरू झाल्याने शहाने उपद्रव करणाऱ्यांना तुरुंगात पाठवले. अनेक धार्मिक नेत्यांना देशाबाहेर काढण्यात आले. या नेत्यांमध्ये आयातुल्ला खोमेनीसुद्धा होता. याने परदेशातून भाषणे व प्रखर वक्तव्य करून शहाविरुद्धच्या बंडास उत्तेजन दिले. आयातुल्ला खोमेनी या पुराणमतवादी कर्मठ मौलवीने शहाविरुद्धच्या आंदोलनात प्रमुख भूमिका बजावली होती. महंमद शहाविरुद्ध धार्मिक नेत्यांनी घडवून आणलेल्या क्रांतीमुळे १९७९ मध्ये महंमद शहाला इराण सोडावा लागला आणि अशाप्रकारे इराणमध्ये राजेशाहीचा अस्त झाला. आयातुल्ला खोमेनीला मानसन्मानाने देशात परत आणून १ एप्रिल १९७९ रोजी इराणमध्ये इस्लामी प्रजासत्ताकाची स्थापना करण्यात आली.

इराणमधील मौलवींचा मुख्य रोष शहाच्या धोरणांविरुद्ध नसून धार्मिक धोरणांना राज्यकारभारात गौण स्थान दिल्यामुळे होता. राजेशाही संपुष्टात आल्यानंतर इराणचा कायापालट झाला. पूर्वीची गुप्त पोलीस संघटना बरखास्त करण्यात येऊन धार्मिक धोरणांना विरोध करणाऱ्या लोकांविरुद्ध अशाच प्रकारची नवीन गुप्त पोलिस संघटना उभारण्यात आली. कुराण, शरीयत, हदीस (मुस्लीम धर्मग्रंथ) यावर आधारित समाजव्यवस्था निर्माण करण्यात आली. स्त्रियांना जे काही अधिकार प्रदान करण्यात आले होते, ते अधिकार काढून घेण्यात आले. परकीय शिक्षण संस्थांवर बंदी घालण्यात आली. पाश्चात्य संस्कृतीची वेशभूषा बंद करून स्त्रियांना बुरखा सक्तीचा करण्यात आला. आयातुल्ला खोमेनी याने रशिया व अमेरिका या दोन्ही महासत्तांवर टीका करताना अमेरिकेचा उल्लेख मोठा सैतान तर रशियाचा छोटा सैतान असा केला. जगातील सर्व मुस्लिम राष्ट्रांनी इस्लामिक राज्य स्थापन करावे असे आव्हान आयातुल्ला खोमेनीने केले. नोव्हेंबर १९७९ मध्ये इराणमधील इस्लामी मूलतत्त्ववाद्यांनी अमेरिकन दूतावासातील ५२ लोकांना ओलीस म्हणून ठेवले. बऱ्याच दिवसांच्या चर्चेनंतर अमेरिकन ओलिसांची सुटका झाली.

इराणमध्ये इस्लामिक क्रांती आणणाऱ्या खोमेनीचे १९८९ मध्ये निधन झाले. आयातुल्ला खोमेनीनंतर अली अकबर रफसंजनी यांनी इराणचे राष्ट्राध्यक्ष म्हणून सूत्रे हाती घेतली.

## १२.६ समारोप

इराणमध्ये इ.स.१९७९ मध्ये घडून आलेल्या क्रांतीला पश्चिम आशियाच्या इतिहासात अत्यंत महत्वाचे स्थान आहे. रेझाशाह पेहलवी याने जवळपास २० वर्ष इराणमध्ये राज्य केले. अत्यंत मागासलेला देश म्हणून इराणची ओळख होती, परंतु रेझाशाह सत्तेवर येताच त्याने इराणच्या आधुनिकीकरणाची कास धरली. तुर्कस्थानमध्ये ज्याप्रमाणे केमालपाशाने पश्चिमात्य पद्धतीच्या सुधारणा केल्या तशाप्रकारच्या सुधारणा इराणमध्ये घडून आणण्यासाठी रेझाशाहने प्रयत्न केला. त्यासाठी त्याने पुराणमतवादी, जुन्या रूढी, परंपरा, धार्मिक कट्टरपंथीय समाजाला नवी विकासाची दिशा देऊन इराणचे आधुनिकीकरण केले. २० वर्षात रेझाशाहने इराणचा चेहरामोहरा बदलून टाकला होता. रेझाशाहानंतर त्याचा मुलगा महंमद रेझाशहा सत्तेवर आला. त्याने इराणच्या पारंपरिक समाजाला पाश्चात्य

मूल्यांकडे नेणाऱ्या सुधारणा केल्या असल्या तरीही पेहलवी राजवटीमध्ये झालेल्या सुधारणांना आयातुल्ला खोमेनी यांनी गैरइस्लामी असल्याचे सांगून शहाच्या या सुधारणांना विरोध केल्याने आयातुल्ला खोमेनीला १९६४ मध्ये देश सोडावा लागला आणि १९७९ पर्यंत ते देशाबाहेर इराक आणि फ्रान्समध्ये राहिले. बाहेरील देशांमध्ये राहून आयातुल्ला खोमेनीने इराणमधील मौलवींच्या एका गटाच्या निदर्शनाचे नेतृत्व केले होते. निदर्शनाची परिस्थिती अनियंत्रित झाल्यावर शाहला कुटुंबासह इराण सोडावे लागले. पंधरा वर्षाहून अधिक काळ आयातुल्ला खोमेनी यांना स्वतःचा देश सोडून दुसऱ्या राष्ट्रात निवास करावा लागला. इराणमध्ये झालेल्या इस्लामिक क्रांतीचे सर्वात मोठे कारण शहाच्या राजवटीची भ्रष्ट आणि पाश्चिमात्य संस्कृतीचे केलेले अवलोकन हे होते. इस्लाम धर्माच्या मूल्यांच्या उल्लंघनामुळे तेथील जनतेच्या मनात शासनाप्रती राग निर्माण झाला होता. त्या रागाची पराकाष्ठा इस्लामिक क्रांतीच्या रूपाने झाली. इराणची इस्लामिक क्रांती संपूर्ण जगावर प्रभावकारक ठरली. जगाच्या राजकीय आणि राजनैतिक परिस्थितीवर इस्लामिक क्रांतीचा काहीसा प्रभाव आहे. १९८० मध्ये इराण आणि इराकमध्ये जे युद्ध झाले त्यामागे एक प्रमुख कारण इराणची क्रांती हे सुद्धा होते. म्हणूनच इराणच्या इस्लामिक क्रांतीला इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे.

## १२.७ प्रश्न

१. इराणमध्ये रेझाशाह पहेलवीने केलेल्या सुधारणांचा आढावा घ्या.

२. इराणमधील महंमद रेझाशाहाची कारकीर्द स्पष्ट करा.

३. इराणी क्रांतीस जबाबदार असलेल्या घटनांचे विश्लेषण करा.

४. इराणमध्ये झालेल्या क्रांतीमध्ये आयातुल्ला खोमेनी यांनी दिलेले योगदान स्पष्ट करा.

## १२.८ संदर्भ

१. भामरे, जितेंद्र, (२००९) आशियाचा इतिहास, शेठ प्रकाशन, मुंबई.

२. शिंदे, लोखंडे, (२००६) समकालीन जग, शेठ प्रकाशन, मुंबई.

३. प्राची, (२००३), आशियाचा इतिहास, प्राची प्रकाशन, मुंबई.

४. जोशी, पी.जी., (२०००) आधुनिक जग, विद्याप्रकाशन, नागपूर.

❖❖❖❖

# १३

# तेलाचे राजकारण

**प्रकरण रचना**

१३.० उदिदष्टये

१३.१ प्रस्तावना

१३.२ पश्चिम आशियातील तेलाचे राजकारण

१३.३ अँग्लो-पर्शियन ऑइल कंपनी

१३.४ तेलाचा प्रश्न

१३.५ डॉ. मुसादिकचा व तेलाचा प्रश्न

१३.६ तेल उद्योगांचे राष्ट्रीयकरण

१३.७ सारांश

१३.८ प्रश्न

१३.९ संदर्भ

## १३.० उदिष्टे

१. इराणमधील तेल उद्योगाचा अभ्यास करणे.

२. इराणमधील तेल उद्योगामध्ये युरोपीय देशांच्या हस्तक्षेपाचा अभ्यास करणे.

३. डॉ.मुसादिक यांचे तेलाच्या राजकारणातील योगदान समजून घेणे.

४. इराणमधील तेलाच्या राष्ट्रीयकरणाची पार्श्वभूमी अभ्यासणे.

## १३.१ प्रस्तावना

पश्चिम आशियातील प्रमुख देश असलेल्या इराणला तेलाच्या उद्योगाने युरोपीय देशात व मध्य आशियात तसेच जागतिक राजकारणात महत्व प्राप्त झाले होते. युरोपीय राष्ट्रांना वाहतूक, दळणवळण व इतर औद्योगिक क्षेत्र तसेच युद्धकाळात तेलाची मोठया प्रमाणात कमतरता भासत असल्यामुळे युरोपमध्ये तेलाची प्रचंड टंचाई निर्माण झाली होती. पश्चिम आशियातील इराणमध्ये तेलाचे साठे मोठया प्रमाणात असल्यामुळे पश्चिमात्य देशांनी इराणमधील तेलाच्या उद्योगात हस्तक्षेप करण्याचे धोरण स्वीकारले.



munotes.in

इराण हा पश्चिम आशियातील प्रमुख तेल उत्पादक देश असल्यामुळे या देशामध्ये इंग्लंड, रशिया, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, फ्रेंच, डच इत्यादी देशांनी तेलासाठी स्पर्धा सुरु केली होती.

इराणमध्ये आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाची कमतरता असल्यामुळे तेलाचे शुद्धीकरण व चाचण्या करण्याचे तंत्रज्ञान इराणकडे नसल्यामुळे त्याचा फायदा प्रगत राष्ट्रांनी घेण्यास सुरुवात केली.

त्यातून पश्चिम आशियामध्ये प्रामुख्याने इराणमध्ये तेलाचे राजकारण सुरु झाले. या राजकारणात डॉ. मुसादिक यांनी तेलाचे राष्ट्रीयकरण करण्याचा घेतलेला निर्णय व त्याचे इराणवर झालेले परिमाण यांचा अभ्यास या घटकामध्ये केलेला आहे.

## १३.२ पश्चिम आशियातील तेलाचे राजकारण

पश्चिम आशियातील तेलाच्या व्यापारामुळे युरोपियन देशांच्या तेलविषयक सर्व गरजा सहजपणे पूर्ण होऊ शकत असत. तेलाच्या वाहतुकीच्या खर्चाच्या दृष्टीनेही युरोपियन देशांना पश्चिम आशियामधील तेलाचा वापर करणे अधिक सोयीचे होते. जसे की, पश्चिम आशियातील त्रिपोली ते फ्रान्स हे अंतर १८०० मैल आहे, तर व्हेनिझुवेला व टेक्सास ते फ्रान्स हे अंतर अनुक्रमे ४८०० आणि ५४०० मैल आहे. त्याचप्रमाणे पश्चिम आशियातील कच्च्या तेलाचा नफा संबंधित सरकारांना मिळतो. त्याच्या साह्याने त्यांना आर्थिक व औद्योगिक विकासाचे कार्यक्रम हाती घेणे शक्य झाले असते. त्याचप्रमाणे तेथील समाजातील साम्यवादी विचारांचे व कार्यक्रमांचे आकर्षणही कमी झाले असते. अशा परिस्थितीत पश्चिम आशियातील तेलाने समृद्ध असलेल्या प्रदेशाला विशेष महत्त्व प्राप्त होणे आणि तेलाचा प्रश्न राजकारणात गुरफटला जाणे सर्वस्वी स्वाभाविक होते. पश्चिम आशियाच्या प्रदेशात कच्च्या तेलाचे साठे फार मोठया प्रमाणावर असल्याची कल्पना संबंधितांना फार पूर्वीपासून होती. प्राचीन काळात इराणमधील झोराष्ट्रीयन पंथाचे अनुयायी अग्नीदेवतेची पूजा करीत असत. अग्नीदेवांची मंदिरे नैसर्गिक वायूच्या साठ्यांच्या सभोवताली बांधली जात असल्याने या वायूच्या आधाराने तेथे अग्नीची ज्योत अखंड तेवत ठेवणे शक्य होई. १९ व्या शतकाच्या अखेरीस युरोपियन देशातील औद्योगिकीकरणाची प्रक्रियेत वाढ होऊन तेलाची गरजही वाढत गेल्याने युरोपियन राष्ट्रांचे तेलांच्या साठयांनी समृद्ध असलेल्या प्रदेशाकडे लक्ष जाणे स्वाभाविक होते. इ.स. १८७२ मध्ये आपल्या देशातील विविध प्रकारच्या नैसर्गिक साधन संपत्तीचा मुक्तहस्ते वापर करण्याची सवलत इराणच्या शहाने बॅरोल ज्युलियस डीरुटर या ब्रिटिश नागरिकाला दिली होती. ब्रिटीश नागरिकाला सवलत दिल्यानंतर इ.स. १९०१ मध्ये विल्यम नॉक्स डार्मिक या ऑस्ट्रेलियन तेल संशोधकाने इराणमध्ये तेलाचे साठे आजमावून पाहण्यासाठी विविध प्रकारच्या चाचण्या घेतल्या. या चाचण्यांचे अहवाल उत्साहवर्धक असल्याचे समजल्यावर त्याने इराणच्या शहाकडे तेल विषयक सवलतीची मागणी केली, परंतु त्यावेळेस अशी सवलत देण्याचे शहाने नाकारले. कारण त्यावेळी इराण रशियाच्या प्रभावाखाली होता. म्हणून रशियाच्या संमतीशिवाय शहाने होकार दिला नाही. शहाचा वजीर अमीन-अल-सुलतान यांनी प्रयत्न केल्यानंतर रशियाची मान्यता मिळाली. शहाने बार्शीसोबत करार करून काही अटी ठेवण्यात आल्या.

इराणमधील तेलविषयक सवलतीविषयाच्या करारात खालील अटी होत्या :

१. उत्तर इराण मधील पाच प्रांत वगळता इतर सर्व प्रदेशात या सवलती लागू होतील.

२. या सवलतींची मुदत ६० वर्षाची असून त्यानंतर तेल उद्योगाची सर्व यंत्रसामुग्री इमारती व अन्य साधने इराण सरकारच्या मालकीची होईल, परंतु त्यासाठी इराण सरकारतर्फे डार्शीला किंवा त्याच्या कंपनीला कसलीही नुकसान भरपाई मिळणार नाही.

३. सवलतींचा उपयोग करण्यासाठी जी कंपनी स्थापन होईल तिच्या भागभांडवलापैकी २०००० पौडांचे समभाग इराण सरकारला मिळतील.

४. कंपनीला होणाऱ्या वार्षिक नफ्याचा १६% भाग इराण सरकारला मिळेल.

२६ मे १९०८ रोजी मसजिद-इ-सुलेमान या ठिकाणी पहिली तेलाची विहीर खोदण्यात येऊन तेलाचे व्यापारी उत्पादन सुरू झाले. इ.स.१९०९ मध्ये दि अँग्लो-पर्शियन ऑइल कंपनीची स्थापना करण्यात आली. कंपनीचे मूळ भांडवल दोन लाख पौंड होते. इ.स. १९१३ मध्ये ब्रिटिश संरक्षण मंत्री विस्टर्न चर्चिल याने आरमारी जहाजात कोळशाऐवजी तेलाचा वापर करण्याचा निर्णय घेतल्याने ब्रिटिश आरमाराला तेलाची गरज मोठया प्रमाणात निर्माण होऊ लागली. तेल आपल्याला स्वस्त दरात मिळावे या हेतूने इ.स.१९१४ मध्ये ब्रिटिश आरमाराने दि अँग्लो-पर्शियन ऑइल कंपनीच्या भाग भांडवलापैकी ५५% समभाग विकत घेऊन कंपनीचे व्यवस्थापन आपल्या नियंत्रणाखाली आणले. त्यामुळे कंपनीला ज्या तेलविषयक सवलती मिळाल्या होत्या त्या ब्रिटिश आरमाराकडे म्हणजे पर्यायाने ब्रिटिश सरकारकडे आल्या, तेव्हापासून इ.स. १९५१ मध्ये तेलव्यापाराचे राष्ट्रीयकरण होईपर्यंत ब्रिटिश आरमाराने कंपनीकडून खास सवलतीच्या दराने तेल विकत घेतले. या तेलाची किंमत किती होती किंवा त्यामध्ये सवलत किती देण्यात आली. या सवलतींविषयी गुप्तता पाळण्यात आली. ही सवलत फार मोठी असून जवळजवळ फुकट सर्व तेल आरमाराला मिळाले असावे असा सर्वसामान्य समज झाला होता.

पश्चिम आशियातील प्रदेशावरील नियंत्रणाच्या प्रश्नावरून रशिया व इंग्लंड या राष्ट्रांमध्ये स्पर्धा असल्याने रशियानेही इराणच्या शहाकडे उत्तर इराणच्या प्रदेशात तेल सवलती विषयक मागणी केली. इ.स. १९१६ मध्ये ए.एम. खोशतारिया या रशियन नागरिकाला डार्शीला देण्यात आलेल्या सवलतीसारख्याच तेलविषयक सवलती शहाने दिल्या, परंतु याविषयीच्या कराराला इराणी कायदेमंडळाने संमती देण्याचे नाकारले. इ.स. १९२१ मध्ये स्टॅंडर्ड ऑइल कंपनी या अमेरिकन तेल कंपनीलाही अशाच सवलती देण्यात आल्या. त्यावेळेस रशिया व इंग्लंड यांनी अमेरिकेला देण्यात येणाऱ्या सवलतींना विरोध केला. अँग्लो-पर्शिअन ऑइल कंपनीने आपल्या नळामार्फत अमेरिकन कंपनीच्या तेलाची वाहतूक करण्याचे नाकारल्याने अमेरिकन कंपनीची अडचण झाली होती. या अडचणीतून मार्ग काढण्यासाठी ब्रिटिश व अमेरिकन उद्योजकांनी एक संयुक्त कंपनी स्थापन करण्याचे ठरविले. इराण सरकारने या संयुक्त कंपनी स्थापनेला स्पष्ट नकार दिला. कोणत्याही परिस्थितीमध्ये इराणला ब्रिटिशांना उत्तर इराणच्या प्रदेशात प्रवेश करू द्यायचा नव्हता. या कारणावरून इ.स. १९२३ मध्ये इराण सरकारने 'द सिंक्लेयर ऑइल कंपनी' या अमेरिकन कंपनीला तेलाची सवलत नाकारली होती.

munotes.in

## १३.३ अँग्लो-पर्शियन ऑइल कंपनी

दी अँग्लो – पर्शियन ऑईल कंपनीची स्थापना १९०९ मध्ये झाली होती. ब्रिटीश आरमाराने जागतिक पहिल्या महायुद्धाच्या काळात इराणमधील तेल वापरण्यास सुरुवात केली होती, हे तेल ब्रिटीश आरमाराला सवलतीच्या दरात मिळावे अशी ब्रिटीश अधिकाऱ्यांची अपेक्षा होती. यासाठी ब्रिटीश आरमाराने १९१४ मध्ये या कंपनीच्या एकूण भागभांडवलापैकी ५५% भागभांडवल विकत घेऊन या कंपनीचा कारभार आपल्या नियंत्रणात ठेवला. तेव्हापासून ते इ.स. १९५१ पर्यंत ब्रिटीश आरमाराने या कंपनीकडून विशेष सवलतीच्या दरात तेल विकत घेतले होते. सर चार्ल्स ग्रीनवे हा या कंपनीचा प्रमुख व्यवस्थापक होता. ग्रीनवे नेहमीच कंपनीला मिळणाऱ्या नफ्याविषयी आकड्यांची चलाखी अशा रीतीने करीत असे की, त्यामधून इराणी सरकारला मिळणाऱ्या नफ्यातील वाटा कमीत कमी राहील. ब्रिटीश अधिकारी आपल्या श्रेष्ठत्वाविषयी अहंगंड बाळगून होते. त्यामुळे हे अधिकारी इराणी नागरिकांचा नेहमीच पान उतारा करीत असत. आबादान येथील तेलशुद्धीकरणाच्या कारखान्याची वार्षिक क्षमता ५० लाख टनांची होती. या कंपनीने तेलाच्या उत्पादनातून जास्तीतजास्त नफा मिळून इराणला त्याचा फार कमी वाट मिळेल याची पूर्ण खबरदारी घेतली होती.

१९२५ मध्ये रेझाशहाने राजेपद धारण केल्यानंतर या कंपनीशी इराणी सरकारच्या भागाविषयी १९३३ मध्ये एक नवा करार त्याला करावा लागला. या करारानुसार कंपनीचे तेलविषयक सवलतीचे क्षेत्र दहा हजार चौरस मैल करण्यात आले. या करारानुसार इराणी सरकारला दरवर्षी किमान रक्कम निश्चितपणे मिळू शकेल अशी व्यवस्था करण्यात आली. त्याचप्रमाणे कंपनीने इराणी सरकारला कंपनीच्या भाग भांडवलावर दरवर्षी २०% या दराने नफा द्यायचा होता. याउलट कंपनीला इराणमध्ये सर्व प्रकारच्या करातून सूट देण्यात आली. तसेच कंपनीच्या सवलतीची मुदत इ.स.१९३३ पासून ६० वर्षे म्हणजे १९९३ पर्यंत वाढविण्यात आली. १९२९ च्या जागतिक आर्थिक महामंदीच्या तडाख्यातून इराणमधील तेलाचा व्यवसाय सापडला असला, तरी या नव्या करारामुळे इराणी सरकारचे काहीच नुकसान झाले नाही. कारण त्यांना दरवर्षी एक ठराविक रक्कम करारानुसार निश्चितपणे मिळणार होती. इ.स.१९३५ मध्ये रेझाशहाने आपला देश पर्शिया या जुन्या नावाऐवजी इराण या नव्या नावाने ओळखला जावा असा फतवा काढला. त्यामुळे कंपनीचे जुने नाव बदलून 'द अँग्लो-इरानियन ऑइल कंपनी' असे नवे नाव ठेवण्यात आले. तेव्हा पासून या कंपनीचे नाव 'द अंग्लो-इरानियन ऑइल कंपनी' या नावाने ओळखली जाऊ लागली होती.

### इराण व दुसरे महायुद्ध :

इराणमधील तेलाच्या प्रचंड साठयामुळे या प्रदेशाला आंतरराष्ट्रीय पातळीवर फार महत्त्व प्राप्त झाले होते. त्यामुळे इराणवर आपले नियंत्रण असावे असे ब्रिटिश व रशिया या सरकारांना वाटणे स्वाभाविक होते आणि त्यासाठी त्यांनी त्या दिशेने प्रयत्न केले होते. इराणमधील तेलविषयक सवलतीच्या अटीवरच रशियन सरकारने इराणमधील आपले सैन्यमागे घेतले. इ.स.१९४७ मध्ये रशिया व इराण यांच्या संयुक्त भांडवलाने एक वेगळी कंपनी स्थापन करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. परंतु इराणी कायदेमंडळाने प्रचंड

बहुमताने हा प्रस्ताव फेटाळला होता. येथून पुढे कोणत्याही परकीय कंपनीला इराणमधील तेलविषयक सवलती देण्यात येणार नाहीत असा स्पष्ट ठराव संमत झाला. त्याचवेळी कायदेमंडळाच्या काही सभासदांनी अँग्लो-इरानियन ऑइल कंपनीला देण्यात आलेल्या सवलतींची फेरतपासणी करावी अशी मागणी केली होती.

## १३.४ तेलाचा प्रश्न

इ.स.१९४५ नंतर अंग्लो-इराणियन कंपनीला मिळालेल्या सवलती आणि कंपनीची व्यवस्थापनाची पद्धत इत्यादीचा प्रश्न अधिकाधिक बिकट होऊ लागला. कंपनी व इराणी सरकार यांच्यात गंभीर मतभेद निर्माण झाले होते. या मतभेदातूनच इ.स.१९४८चा पेचप्रसंग उद्भवला. त्यावर्षी कंपनीने १९४८ या वर्षासाठी इराणी सरकारला तेलाच्या स्वामित्व धनापोटी पूर्वीच्या म्हणजे १९४७ या वर्षाच्या रकमे एवढीच रक्कम देऊ केली. कंपनीचा हा निर्णय अनाकलनीय होता. कारण १९४७ मध्ये कंपनीचा २.६ कोटीचा नफा झाला होता. पुढील वर्षी म्हणजे १९४८ मध्ये ५.२ कोटी डॉलर्स पर्यंत वाढला होता. इ.स. १९४७ मध्ये इराणी सरकारला १.९ कोटी डॉलर्स मिळाले, तर ब्रिटिश सरकारला कंपनीच्या नफ्यापोटी ५.६ कोटी डॉलर्स मिळाले होते. कंपनीच्या हिशोब ठेवण्याच्या पद्धतीमध्ये प्रचंड घोटाळा असण्याची इराणी सरकारची आणि जनतेची खात्री झाली. इराणमधील जनमत कंपनी व ब्रिटिश सरकार यांच्याविरुद्ध अतिशय प्रशुब्ध झाले. जनतेच्या वाढत्या दबावाखाली १९४८मध्ये इराणी सरकारने कंपनीला आपल्या मागण्याविषयी एक २५ कलमी खलिता सादर केला.

त्यानुसार कंपनीच्या नफ्यातील इराणी सरकारचा भाग एकूण नफ्याच्या ५०% एवढा असावा, कंपनीच्या व्यवस्थापनातील परकीय नागरिकांची संख्या कमी करावी, तसेच व्यवस्थापन व तांत्रिक क्षेत्रांमध्ये अधिक इराणी लोकांना प्रशिक्षण दिले जावे. अशा प्रकारच्या मागण्या या खलीत्यामध्ये करण्यात आल्या होत्या. या मागण्याविषयी कंपनीचे प्रशासन व इराणी सरकार यांच्या दरम्यान जो समझोता झाला, तो पूरक समझोता या नावाने ओळखला जातो. इ.स.१९४९मध्ये इराणी सरकारला नफ्यातील भागापोटी मिळण्याची रक्कम त्यांच्या अंदाजापेक्षा फारच कमी होती. इ.स. १९४८ मध्ये कंपनीच्या नफ्यापैकी इराणी सरकारचा भाग ३.७ कोटी डॉलर्सचा तर ब्रिटिश सरकारचा भाग ५.६ कोटीचा होता. अर्थातच कंपनीने पक्षपाती धोरण आणि हिशोबातील घोटाळे यामुळे इराणी लोकमत अतिशय संतप्त झाले. पुढील वर्षी म्हणजे इ.स.१९५० मध्ये इराणी कायदेमंडळाने तेलविषयक प्रश्नांची सर्वांगाने व सखोल अभ्यास करण्यासाठी एक उपसमिती नेमली. या समितीच्या अध्यक्षपदी डॉ. मुसादिक यांची नेमणूक केली. हे अर्थतज्ञ आणि वकील होते. त्यामुळे त्यांनी या कंपनीच्या कराराचा व त्यांच्या कारभाराचा तसेच हिशेब व टालळेबंदाचा बारकाइने अभ्यास केला व त्याचा पुनर्विचार करण्यावर भर दिला.

munotes.in

## १३.५ डॉ. मुसादिक व तेलाचा प्रश्न

डॉ. मुसादिक व कंपनीचे प्रशासन यांच्या दरम्यान प्रदीर्घ वाटाघाटी झाल्या पण निष्पन्न असे काहीच झाले नाही. कंपनीच्या अधिकाऱ्यांनी इराणमधील प्रक्षुब्ध जनमत व राष्ट्रवादी चळवळीचा वाढता प्रभाव या वास्तवाकडे दुर्लक्ष केल्याने हा प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा व गंभीर बनला. झपाट्याने बदलणाऱ्या जागतिक परिस्थितीमध्ये आपले महत्त्व व प्रतिष्ठा कमी होत आहे, हे कठोर वास्तव्य स्वीकारण्याची ब्रिटिशांची मानसिक तयारी अद्याप झाली नव्हती. कंपनीचे प्रशासन आणि इराणी सरकार यांच्या दरम्यान उभयपक्षी सन्माननीय तडजोड होऊन हा प्रश्न कायमचा सुटावा या उद्देशाने अमेरिकन सरकारने या कंपनीच्या प्रशासनावर दबाव आणला असला तरी त्याचा काही उपयोग झाला नाही. प्रशासनाने इराणी सरकारच्या सर्व मागण्या पूर्णपणे फेटाळून लावल्या. कंपनी प्रशासनाच्या अशा अरेरावी धोरणाची प्रतिक्रिया म्हणून इ.स. १९५० मध्ये मुसादिक उपसमितीने कंपनीबरोबरचा पूर्वीचा करार रद्द करण्याची सूचना केली. हा करार एकतर्फी असून त्याचा इराणी सरकारला काहीच फायदा होत नसल्याचा युक्तिवाद त्यांनी या सूचनेचे समर्थन करताना केला होता. कंपनीवर दबाव आणण्याच्या दृष्टीने मुसादिक यांनी इराणी कायदेमंडळात तेलाच्या व्यापाराचे राष्ट्रीयकरणाची शिफारस करणारा एक ठराव मांडला. तेलधंद्याचे राष्ट्रीयकरण कितपत यशस्वी व अव्यवहार्य आहे हे तपासून पाहण्याचे आवाहनही त्यांनी सरकारला केले होते. इ.स.१९५१रोजी तेलधंद्याच्या राष्ट्रीयकरणाची कल्पना व्यवहार्य नसल्याचा निष्कर्ष इराणी सरकारने जाहीर केला. त्यानंतर चार दिवसातच इराणचे पंतप्रधान राझमारा यांचा वध करण्यात आला.

## १३.६ तेल व्यापाराचे राष्ट्रीयकरण

पंतप्रधान राझमारा यांच्या वधानंतर एका आठवडयातच इराणी कायदेमंडळाने देशातील तेलव्यापाराचे राष्ट्रीयकरण करणारा ठराव प्रचंड बहुमताने मान्य केला. कायदेमंडळाचे या ठरावाला ब्रिटिश सरकारने हरकत घेतली. त्याविरुद्धची प्रतिक्रिया म्हणून इराणमध्ये सर्वत्र ब्रिटिश सरकारविरुद्ध तीव्र निदर्शने करण्यात आली. दरम्यान कंपनीच्या प्रशासनाने अबादान येथील तेल शुद्धीकरणाचा कारखाना बंद करण्याचे ठरवले. इराणमध्ये कंपनीची जी मालमत्ता होती तिला असणारा संभाव्य धोका टाळून तिचे रक्षण करण्याच्या उद्देशाने ब्रिटिश आरमारी जहाजे इराणच्या आखातात येऊन दाखल झाली. ब्रिटिश सरकारचीही कारवाई म्हणजे इराणी सरकारवर दबाव आणण्याचा एक प्रयत्न असल्याची जाणीव सर्वांनाच होती. ब्रिटिश सरकारच्या या कारवाईमुळे इराणी लोकमत अतिशय प्रक्षुब्ध झाले. मुसादिक यांच्या कार्यक्रमाला समाजातील सर्व वर्गातून वाढता पाठिंबा मिळू लागल्याने त्यांची लोकप्रियता झपाटयाने वाढू लागली. २८ एप्रिल १९५१ रोजी त्यांची इराणच्या पंतप्रधानपदी नियुक्ती करण्यात आली आणि त्यानंतर दुसऱ्याच दिवशी २९ एप्रिल १९५१ रोजी इराणी कायदेमंडळाने कंपनीला इराणमधून बाहेर काढण्याविषयीचा ठराव मंजूर केला. १ ऑक्टोबर १९५१ रोजी या ठरावाची अंमलबजावणी ही करण्यात आली. ब्रिटिश सरकारचे आणि कंपनी प्रशासनाचे आडमुठे धोरण आणि इराणी राष्ट्रवादीच्या वाढत्या प्रभावाकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ती यामुळे इराणमधील तेलधंद्याचा प्रश्न बिकट व गुंतागुंतीचा झाला होता.

कंपनीचा कारभार गुंडाळण्यात आल्यानंतर ब्रिटिश सरकारने हा प्रश्न हेग येथील आंतरराष्ट्रीय न्यायालयाकडे नेला. हा प्रश्न एक खाजगी कंपनी आणि सार्वभौम इराणी सरकार यांच्या दरम्यानच असल्याचं युक्तिवाद करून या प्रश्नावर न्यायनिवडा करण्याचा आंतरराष्ट्रीय न्यायालयाचा अधिकार मुसादिक यांनी सपशेल नाकारला. तथापि ब्रिटिश सरकारने इराणी तेलधंद्याच्या राष्ट्रीयकरणाला मान्यता देण्याची तयारी दर्शवली. तेलधंद्याच्या राष्ट्रीयकरणाचे आपले प्रमुख उद्दिष्ट सफल होत असल्याचे पाहून मुसादिक यांनी ब्रिटिश सरकारशी वाटाघाटी करण्याची आपली तयारी असल्याचे स्पष्ट केले. इराण सरकार आणि ब्रिटीश सरकार या दोघांमध्ये वाटाघाटीच्या अनेक फेऱ्या झाल्या. प्रत्येकाला आपली बाजू कायदेशीर व बळकट असल्याची खात्री होती. मात्र प्रत्येकाची बाजू काही गैरसमज आणि काही चुकीच्या समजुतीवर आधारित होती. हा प्रश्न सोडविण्याच्या प्रयत्नात प्रत्येकाची काही राजकीय, आर्थिक व मानसिक अडचणी होत्या. या सर्व घटकाकडे दुर्दैवाने उभयंताने पूर्णपणे दुर्लक्ष केले होते.

**डॉ. मुसादिक आणि इराणी सरकार:**

डॉ. मुसादिक यांची अशी कल्पना होती, की तेलाचे राष्ट्रीयकरण केल्याने इराणी सरकारच्या हाती उत्पन्नाचे फार मोठे साधन येईल आणि या उत्पन्नातून आर्थिक व औद्योगिक विकास साधता येईल. त्यामुळे सर्व सामान्य जनतेच्या जीवनमानात लक्षणीय फरक पडेल अशी त्यांची खात्री होती. तशा प्रकारची समजूतही त्यांनी इराणी जनतेची करून दिली होती. इंग्लंड व अन्य पाश्चात्य देशांची अर्थव्यवस्था व उद्योगधंदे पूर्णपणे तेलावरच अवलंबून असल्याने त्यांना आपल्या मागण्या मान्य करण्याखेरीज अन्य पर्याय नाही. असाही त्यांचा समज होता. ब्रिटिश सरकार बरोबरच्या संघर्षात अमेरिका आपल्या बाजूला असेल अशी त्यांची अपेक्षा होती.

तेलव्यापार अत्यंत गुंतागुंतीचा व किचकट आणि अवघड आहे, याविषयीचे तंत्रज्ञान आणि तांत्रिक बाजू पूर्णपणे आत्मसात केल्याशिवाय तो यशस्वीपणे चालविता येणार नाही. तसेच हा धंदा आंतरराष्ट्रीय स्वरूपाचा असल्याने ब्रिटिश सरकारबरोबरच्या आपल्या संघर्षाला एक आंतरराष्ट्रीय परिमाण आपोआप मिळते. या गोष्टी मुसादिक यांच्या लक्षात आल्या नाहीत, मात्र तुलनेने या वाटाघाटीमध्ये इराणची बाजू अधिक बळकट होती.

**वाटाघाटीतील पेचप्रसंग:**

अमेरिका व अन्य युरोपियन देशांनी वाटाघाटीमध्ये मध्यस्थी करून तडजोडीसाठी एकूण पाच निरनिराळे मसुदे सादर केले. तरी त्यापैकी एकावरही उभयंताचे मतैक्य होऊ शकले नाही. तडजोडीचे सर्व प्रयत्न फसल्यावर ब्रिटिश सरकारने हा प्रश्न संयुक्त राष्ट्र संघटनेकडे नेण्याचा प्रयत्न केला असला तरी मुसादिक यांनी तो हाणून पाडला. तडजोड होत नसल्याचे पाहून युरोपियन देशांनी आपल्या तेलविषयक गरजा भागविण्याचे अन्य मार्ग शोधून काढले. १९५३ च्या सुरुवातीला परिस्थिती पार बदलली इराणी तेलाचा पुरवठा पूर्णपणे थांबला असूनही तेलाच्या जागतिक बाजारपेठेत तेलाचा तुटवडा तर भासला नाहीच, परंतु मागणीपेक्षाही जास्त पुरवठा होऊ लागला. इराणी तेलाचा पुरवठा पूर्वीप्रमाणे सुरळीत झाल्यानंतर त्यासाठी बाजारपेठ कोठे शोधायची असा प्रश्न तेलधंद्याशी संबंधित असणाऱ्यांना पडला होता.

इराणमधील अंतर्गत पेचप्रसंग: तेलाचे उत्पादन व त्याचे शुद्धीकरण बंद झाल्याने त्यापासून मिळणारे उत्पन्न एकदम थांबले आणि त्यामुळे इराणी अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होऊन इराणी सरकारसमोर गंभीर आर्थिक संकट उभे राहिले. परकीय चलनाचा इराणी सरकारचा साठा कमी झाल्याने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील त्यांची पत घसरू लागली होती. इराणी सैन्यालाही साधनसामग्रीची टंचाई भासू लागली. तसेच आर्थिक टंचाईचा इराणी जमीनदार वर्गालाही त्रास सहन करावा लागला. तेलधंद्याच्या प्रश्नावर तडजोडीची शक्यता कमी झाल्याने इराणी राष्ट्रवादीची ही चांगलीच अडचण झाली. मुसादिक यांनी आपल्या हाती अधिक व्यापक अधिकार देण्यात यावेत अशी मागणी केली आणि प्रशासन, अर्थव्यवस्था आणि समाजरचना यामध्ये व्यापक परिवर्तन घडवून आणण्यासाठी अशा अधिकाऱ्यांची गरज असल्याचा युक्तिवाद त्यांनी आपल्या मागणीच्या समर्थनासाठी केला होता. मुसादिक यांच्या स्वभावातील हुकूमशाही प्रवृत्ती आता हळूहळू स्पष्ट होऊ लागली. या प्रवृत्तीचा आणखी एक आविष्कार म्हणजे त्यांनी कायदेमंडळ बरखास्त करण्याच्या प्रश्नावर सार्वमत घेण्याची केलेली सूचना होय. इराणी राज्यघटनेनुसार कायदेमंडळ बरखास्त करण्याचा अधिकार फक्त इराणच्या शहाचा असल्याने त्यांच्या सूचनेमुळे इराणमध्ये गंभीर पेचप्रसंग उद्भवला. ही सूचना बेकायदेशीर व घटनाबाह्य होती आणि तरीही सूचनेनुसार सार्वमत घेण्यात आले. त्यामध्ये ९९% लोकांनी कायदेमंडळ बरखास्त करण्याच्या बाजूने आपले मत दिले. १९५३ रोजी कायदेमंडळ बरखास्त करण्यात आले.

आपल्या आततायी आणि घटनाबाह्य कारवाईने मुसादिक यांनी इराणी समाजातील सर्व गटांचा पाठिंबा व सहानुभूती गमावली होती. तूदेह या इराणी साम्यवादी पक्षाने मात्र त्यांना पाठिंबा दिला होता. देशातील तेल धंद्याच्या राष्ट्रीयकरणाच्या प्रश्नाचे त्यांनी दीर्घकाळ भांडवल केले, मात्र असे करताना इतर बाजूनी आपली स्थिती भक्कम ठेवण्याची प्राथमिक खबरदारी त्यांनी घेतली नाही. त्याची प्रवृत्ती हुकूमशाहीची असली तरी हुकूमशहा बनण्यासाठी आवश्यक असणारे नेतृत्व गुण मात्र त्यांच्याकडे अजिबातच नव्हते अशा परिस्थितीत सर्वस्वी एकाकी अवस्थेत सापडलेल्या मुसादिक यांना इराणच्या शहाने १९५३ रोजी पंतप्रधान पदावरून बडतर्फ केले. इराणच्या शहाविरुध्द बंड करण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपावरून त्यांच्यावर खटला भरण्यात येऊन तीन वर्षाची तुरुंगवासाची शिक्षा देण्यात आली. दरम्यान अमेरिकन सरकारने इराणच्या शहाला १९५३ रोजी ४.५ कोटी डॉलर्सचे कर्ज देण्याची तयारी दाखवली.

हा प्रश्न सोडवण्यासाठी आठ तेल कंपन्यांच्या प्रतिनिधींची एक बैठक लंडन येथे भरविण्यात आली. या प्रतिनिधींबरोबर १९५४ रोजी इराणी सरकारने एक करार केला आणि त्यामुळे दीर्घकाळ रेंगाळलेला हा प्रश्न शेवटी समाधानकारकपणे सोडविण्यात आला. १९५४च्या करारातील महत्त्वाच्या तरतुदी अशा होत्या:

१. या कंपन्यांचा एक गट नॅशनल इरानियन ऑइल कंपनी या नावाने स्थापन करण्यात आला. तो इराणमधील तेलधंद्याच्या सर्व बाजू सांभाळील.

२. तेलव्यापारात होणाऱ्या उत्पन्नाचा निम्मा भाग या कंपनीला देण्यात येईल.

३. तेलधंद्याच्या राष्ट्रीयकरणाची नुकसान भरपाई म्हणून इराणी सरकारने सात कोटी डॉलर्सची रक्कम दहा वर्षाच्या मुदतीमध्ये द्यावयाची होती.

१९५४ मध्ये जागतिक बाजारपेठेतील तेलाची मागणी प्रचंड प्रमाणात वाढल्याने इराणी तेलाचा उठावही झटपट होऊ लागला. १९५६ मध्ये पूर्वी रशियाला देण्यात आलेल्या तेलविषयक सवलती या कंपनीकडे सुपूर्द करण्यात आल्याने इराणमधील तेलाच्या साठ्यांनी समृद्ध असलेल्या सर्व प्रदेशावर कंपनीचे नियंत्रण आले. नविन तेलसाठ्यांचे आणि नैसर्गिक वायूच्या साठयांचा शोध घेण्यासाठी एक नवी कंपनी स्थापन करण्यात आली. त्यानंतर लवकरच तेलावर आधारित रासायनिक उद्योगधंद्याची स्थापना करण्यात आली. आधुनिक इराणच्या इतिहासातील तेल व्यापाराच्या राष्ट्रीयकरणामधील मुसादिक यांची कामगिरी विशेष उल्लेखनीय आहे. या प्रश्नावर इराणी समाजात अभूतपूर्व ऐक्य भावना निर्माण झाली आणि डॉ. मुसादिक हे एकात्मतेचे प्रतीक म्हणून ओळखले जाऊ लागले.

## १३.७ सारांश

जागतिक पहिल्या महायुद्धानंतर इराणमधील राजकीय घडामोडी आणि त्याचा पश्चिम आशियातील व युरोपातील तेलाच्या राजकारणावर झालेला परिणाम याचा अभ्यास या घटकामध्ये केलेला आहे. इराण हा पश्चिम आशियातील तेलाचे उत्पादन करणारा एक प्रमुख देश असून या देशाकडे खनिज तेलाचे प्रचंड साठे आहेत त्यामुळे युरोपातील प्रमुख देशांच्या नजरा इराणच्या तेल साठ्यांकडे होत्या. पहिल्या महायुद्धाच्या समाप्ती नंतर दोस्त राष्ट्रांपैकी इंग्लंड आणि रशिया या देशांनी या भूभागावर आपले नियंत्रण प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला होता.

इराणमध्ये सत्तांतर झाल्यानंतर रेझाशहा पहेलवी याची राजवट सुरु झाली त्याने इराणमध्ये पश्चिमात्य धर्तीवर इराणचे आधुनिकीकरण करण्यावर भर दिला होता. परंतु इराणमधील तेलाच्या राजकारणाचा प्रश्न त्याला निकाली काढला आला नाही कारण इंग्लंड, रशिया आणि अमेरिका या देशाचे हितसंबंध तेथे गुंतलेले होते. रेझाशाहानंतर त्याचा मुलगा सत्तेवर आला त्यानेसुद्धा इराणमध्ये सुधारणेचे पर्व सुरूच ठेवले, परंतु पश्चिमात्य देशाच्या प्रचंड दबावामुळे त्याला सुद्धा तेलाच्या राजकारणाचा प्रश्न पूर्णपणे सोडविता आला नव्हता. त्यानंतर डॉ. मुसादिक यांनी तेलाच्या राजकारणाचा प्रश्न सोडविण्यासाठी आणि इराणमध्ये जनमत तयार करून इराणमधील तेल उद्योगाचे राष्ट्रीयकरण करून इराणमधील अँग्लो-इराणियन कंपनीला इराणमधून हद्दपार केले होते. परंतु त्यानंतर त्यांच्या हुकुमशाही पद्धतीच्या राजवटीमुळे त्यांनासुद्धा इराणमध्ये जास्त काळ सत्तेवर राहता आले नाही. या सर्व घडामोडींचा आढावा या घटकामध्ये घेतलेला आहे.

## १३.८ प्रश्न

१. पश्चिम आशियातील तेलाच्या उद्योगात युरोपीय देशांच्या हस्तक्षेपाची चर्चा करा.
२. अँग्लो-पर्शियन कंपनीचे इराणमधील तेल उद्योगातील मक्तेदारीचा आढावा घ्या.
३. डॉ.मुसादिक यांनी इराणमधील तेल उद्योगाच्या राष्ट्रीयकरणामध्ये बजावलेल्या भूमिकेचे परीक्षण करा.

## १३.९ संदर्भ

१. काळे म.वा., पश्चिम आशियाचा इतिहास, (इ.स.१९०० ते इ.स.१९७०) प्राची प्रकाशन, मुंबई

२. भामरे, जितेंद्र, आशियाचा इतिहास, (१९००-१९७६) शेठ प्रकाशन, मुंबई.

३. शिंदे, लोखंडे, समकालीन जग, (१९४५-२०००), शेठ प्रकाशन, मुंबई.

४. प्राची, (२००३) आशियाचा इतिहास, (१९००-१९६०) प्राची प्रकाशन, मुंबई.

५. जोशी, पी.जी., आधुनिक जग, (१५०१-१९९०) विद्याप्रकाशन, नागपूर.

❖❖❖❖

munotes.in